भारतीय रसायनशास्त्र

\- वैद्य त्र्यं. गु. काळे

पुराणशोधकग्रंथमाला.

भारतीय रसायनशास्त्र.

ग्रंथ १ ला.

लेखक व प्रकाशक,

वैद्य त्र्यंबक गुरुनाथ काळे, मुंबई.

—:o:—

रसे रसायने चैव बुद्धिर्यस्य न हीयते ।
तमहं पुरुषं मन्ये; अन्ये ते शुक्रवाटकाः ॥

रसकौतुक—

(इ. स. १९१२)

किंमत ६ रुपये

हें पुस्तक, पृष्ठें १ ते २४ रा. सायन्ना नरसू यांनीं सोलापूर येथें 'दत्तप्रसाद' प्रेसमध्यें, व पृष्ठ २५ ते २१६ रा. विनायक पांडुरंग गोठस्कर यांनीं मुंबईत आपल्या 'सुवर्ण प्रिंटिंग' प्रेसमध्यें, आणि आरंभींचीं पृष्ठें, टायटल, प्रस्तावना, अनुक्रमणिका व शुद्धिपत्र रा. चिं. स. देवळे, यांनीं मुंबईत सदाशिव गल्लींत 'मुंबईवैभव' प्रेसमध्यें.

प्रस्तावना.

हें पुस्तक लिहिण्याची प्रवृत्ति कशी झाली व त्या प्रवृत्तीस पोषक अशा कोणकोणत्या गोष्टी उद्भवल्या हें विषयप्रवेश नामक पहिल्या प्रकरणांत दिलेलेंच आहे. प्रथमतः हें पुस्तक 'समालोचक' मासिक पुस्तकाच्या वर्गणीदारांनां अल्प किंमतींत बक्षिस म्हणून देण्याचें योजिलें होतें; पण पुस्तक वाढत गेल्याप्रमाणें व समालोचकाच्या तिसऱ्या वर्षाच्या प्रकाशकानें मध्येंच हातपाय गाळल्यामुळें तो बेत रहित करावा लागला. दोन तीन फॉर्म सोलापुरच्या 'दत्तप्रसाद' छापखान्यांत छापल्यानंतर पुढें हें पुस्तक मुंबईच्या 'आर्यभिषक्' मासिक पुस्तकांतून छापण्यास दिलें; पण कर्मधर्मसंयोगानें हें संपूर्ण छापून निघण्यापूर्वींच आर्यभिषक्चे तरुण संपादक मध्येंच निवर्तले; यामुळें याचीं फक्त २१६ च पृष्ठें छापून निघालीं. पुढें कांहीं टिपा होत्या; त्या आतां दुसऱ्या आवृत्तींतच घालण्याचें योजिलें आहे. मराठी वाचकांस कळविण्यास आनंद वाटतो कीं 'आर्यभिषक्' मधून हें पुस्तक छापत असते वेळींच याचें हिंदींत भाषांतर झालें, व कानडींत याचा अनुवाद झाला. या पुस्तकांत छापण्यांत बऱ्याच चुका राहिल्या आहेत, तरी वाचकांनीं शुद्धिपत्रावरून शुद्धि करून घ्यावी अशी त्यांस विनंती आहे. कित्येकांनां या पुस्तकाची किंमत १॥ रु. अधिक वाटण्याचा संभव आहे, पण इकडे सरकारी आश्रय नसल्यामुळें, अशा पारिभाषिक Technical पुस्तकांची किंमत थोडीशी अधिक ठेवावी लागते, यास कांहीं इलाज नाहीं.

वैद्य त्र्यंबक गुरुनाथ काळे,

घर नं. १, काकडवाडी, मुंबई.

विषयानुक्रमणिका.

शुद्धिपत्र.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२७	२१	त्यक्तानित्यर्थः	त्यक्तवानित्यर्थः
,,	२७	स्पर्शता विद्धं	स्पर्शेन विद्धं
२८	२७	Tiew	View
३०	२	सिद्धरत	सिद्धरस
४४	९	सवणचंद्र	सेउणचंद्र
५४	२६	मेणीरा०	मेषीक्षीरा०
५५	१५	क्रमेपाथेन	क्रमपाकेन
५६	४	धनसत्वं	घनसत्वं
९३	४	०वसुजातावर	०वस्तुजातावर
१०४	१५	धातुदीनानां	धातुवादीन.
१७८	२९	सनकाचें	शौनकाचें
१८२	१९	शोदुत्पन्नैव	सोढुं यत्नैव
१९६	५	मंगलकषा०	मंगलकला

प्रकरण १ लें.

विषयप्रवेश

या स्वदेशी चळवळीच्या काळांत नाना शोधकांनीं नाना प्रकारच्या ग्रंथोदधींचें अवगाहन केलें. देशभक्त माधव मैराळ सुरतकर यांनीं वास्तुशास्त्र व शिल्पशास्त्र यांविषयीं व्यासंग करून त्यांविषयीं आपले शोध केसरी व काळ पत्रांतून प्रसिद्ध केले, व अलीकडे त्यांनीं ते स्वतंत्र पुस्तकरूपानेंही प्रसिद्ध केलेले आहेत. उद्योगधंदे व शास्त्र (Science) यांविषयींचें वाङ्मय शोधून आजच्या हीनस्थितींत त्याचा कसा उपयोग करून घेतां येईल याचा विचार करणें अत्यंत जरूर आहे. मींही मागें केसरीमधून शिल्पशास्त्राविषयीं मिळेल तितकी माहिती मिळवून प्रसिद्ध केली. त्यानंतर लागलेले शोध व पूर्वींची अस्सल माहिती यांचा सुसंगत इतिहास देऊन एक निबंध तयार केलेला आहे; व तो समालोचकांतून* प्रसिद्ध केलेला आहे. दे० शिवकर बापूजी तळपदे (मुंबई) यांनीं प्राचीन विमानविद्येविषयीं शोध चालविले आहेत; पण मजा अशी कीं, अद्यापि प्राचीन शिल्पशास्त्र व यंत्रशास्त्र यांविषयीं सविस्तर माहितीचे असे स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध होत नाहींत. यामुळें त्या शास्त्रांविषयींचे शोधांत प्रगति, सध्यां तरी, होणें शक्य नाहीं. नुसत्या प्राचीन ग्रंथांतील तुरळक तुरळक उल्लेखांवरून फार झालें तर त्या त्या विद्या आपल्यांत होत्या एवढें कळून येईल; पण त्यांयोगें त्या विद्यांचें रहस्य कळणार नाहीं! एवढ्याही उल्लेखांचा अगदींच उपयोग नाहीं असें नाहीं; कारण, हे उल्लेख ह्मणजे तद्विषयक ग्रंथोदधीकडे बोट दाखविणाऱ्या वाटाड्यांसारखे आहेत. कोणत्याही विद्येविषयींचे स्वतंत्र ग्रंथ मिळेपर्यंत त्या विद्येविषयीं खरी कल्पना उपजणें शक्य नाहीं. विमानांविषयीं व इतर यंत्रांविषयीं सध्यां अशीच स्थिति झाली आहे. वेद, रामायण, भारत, पंचतंत्र, सिद्धांतशिरोमणि, बृहत्कथा, इत्यादि इतर विषयप्रतिपादक ग्रंथांत ओघानें कोठें कोठें कांहीं कांहीं यंत्रांचीं वर्णनें आलेलीं आहेत; पण एवढ्यावरून त्या त्या यंत्रांचें स्वरूप कसें सम-

* समालोचक, (वर्ष दुसरें), अंक २१ वा, पहा.

जावयाचें? तेव्हां त्या त्या विषयांचें मर्म कळण्यास्तव त्याविषयींचें स्वतंत्र वाङ्मयच मिळावें लागतें हें उघड आहे.

२ पण अशी स्थिति रसायनशास्त्राविषयीं नाहीं हें पाहून त्याविषयीं शोध करण्याचें ठरविलें. या शास्त्रावरचे स्वतंत्र ग्रंथ संस्कृतमध्यें उपलब्ध आहेत. रसायनशास्त्राविषयीं संस्कृतमध्यें बरेंच वाङ्मय आहे. ह्याविषयीं प्रथम माहिती डा. गर्दे यांच्या वाग्भटाच्या प्रस्तावनेवरून मिळाली; त्यानंतर त्यांत आलेल्या **रसरत्नसमुच्चया**चें अध्ययन करून पाहिलें. त्या सूक्ष्म अध्ययनामुळें प्राचीन ग्रंथ या शास्त्रावर शेंकडो आहेत हें कळून आलें! एकेका ग्रंथावरून दुसऱ्या ग्रंथांचा पत्ता लागत चालला ! अद्यापि कांहीं सर्वच ग्रंथ उपलब्ध झालेले नाहींत ! ग्रंथ पहातां पहातां कलकत्त्याचे रसायनशास्त्राचे प्रो. प्रफुल्लचंद्रराय यांचा History of Hindu Chemistry हा ग्रंथ पहाण्यास मिळाला; पण या ग्रंथाच्या पहिल्या भागांत रसायनशास्त्रीय ग्रंथांविषयीं फार थोडी माहिती आहे; तथापि ती त्यावेळीं अधिकच होती ! हा पहिला भाग लिहिल्यानंतर ग्रंथकर्त्यास व आह्मांलाही बरेच नवे ग्रंथ व नवी माहिती मिळालेली आहे. ती त्यांच्या दुसऱ्या भागांत येणार आहे ह्मणे! पण येईल तेव्हां खरी!* प्रो. रॉय यांच्याशीं पत्रव्यवहार करून त्यांस कोणते ग्रंथ मिळालेले आहेत याचा शोध केला. अलीकडे श्रीवेंकटेश्वरप्रेसमध्यें छापलेल्या नित्यनाथाच्या **रसरत्नाकरा**ची प्रत पाहिली; पण त्यांत पांच खंडांपैकीं फक्त दोन खंडच छापलेले आहेत. तीन खंड नाहींत. भूमिकेंत हिंदी टीकाकारानें रसशास्त्रीय ग्रंथांची यादी दिलेली आहे, ती शोध करणारांस अत्यंत उपयुक्त व चांगली आहे. त्यानंतर **रुद्रयामलां**तील कांहीं कलांचा भाग, **रसकौतुक** व **रसरत्नाकरां**तील अप्रसिद्ध असें **वादिखंड** हे महत्वाचे ग्रंथांचे त्रुटित भाग मिळाले. **रसराजसमुच्चयां**तील काकचंडीश्वर-मतही मिळालें. **आयुर्वेदप्रकाश, कौतुकचिंतामणि, नागार्जुनीयकक्षपुट** व **रसरत्नाकर, योगतरंगिणी** वगैरेही पाहिलीं. या सर्व अवलोकनामुळें असें वाटूं लागलें कीं, ही सर्व माहिती संगतवार लिहून ठेवल्याखेरीज पुढील शोधकांस आपल्या

* दुसरा भागही आतां प्रसिद्ध झालेला आहे; व त्यांत बरीच अधिक माहिती आहे.

श्रमांचा उपयोग व्हावयाचा नाहीं; व त्यांचे श्रम वांचणार नाहींत. याच हेतूनें मिळालेले महत्वाचे भाग पुढें छापविण्याचा विचार आहे. प्रयोग करून पाहण्यास तरी प्रथम त्या विषयावरचें वाङ्मय उत्तम कळावें लागतें.

३ भारतीय रसायनशास्त्रीय ग्रंथांमध्यें दोन प्रकार आहेत. एक, फक्त रसायनशास्त्राचे व धातुवादाचे; व दुसरे रसवैद्यकाचे ह्मणजे वैद्यकीचे कामीं रसादिकांचा उपयोग केलेले; पहिल्या प्रकारचे ग्रंथच आज अत्यंत दुर्मिळ झालेले आहेत. दुसऱ्या प्रकारचे ग्रंथ बरेच आहेत. शुद्ध रसायनशास्त्राचे ग्रंथ अद्यापि फार थोडे मिळालेले आहेत. पुढें दिलेल्या माहितीचा असे ग्रंथ शोधून काढण्याचे कामींही उपयोग होईल. तसा उपयोग व्हावा ह्मणूनच ही सर्व माहिती प्रसिद्ध करीत आहों.

४ हेंच वाङ्मय वाचीत असतां धातुवाद खरा आहे हें प्रयोग सिद्ध करून दाखविणाऱ्या एका बैराग्याचीही गांठ पडली! त्यामुळें प्राचीन रसायनशास्त्राचें महत्व कळून आलें व ते खरे असले पाहिजेत अशी खात्री झाली; आह्मीं काय पाहिलें हें पुढें लिहिलेलेंच आहे.

प्रकरण २ रें.

रसशास्त्रांची उत्पत्ति

भरतवर्षांत रसशास्त्राचा उगम वैद्यकांत झाला. मनुष्यप्राण्यांचे नानारोगांनीं जे हाल होतात ते शमविण्यासाठीं प्राचीनकाळच्या नाना ऋषींनीं व लोकांनीं नाना मार्ग शोधून काढण्याच्या कामीं खटपट केली. कोणीं वनस्पतींच्यायोगें रोग बरे करण्याचा मार्ग काढिला, त्यांस मूलिकावैद्य ह्मणूं लागले; भारद्वाज (आत्रेय), चरकादि मंडळी या वर्गांतील होत. कोणीं शस्त्रविद्येनें रोग बरे करीत, त्यांस शस्त्रवैद्य ह्मणत; धन्वंतरी, अश्विनीकुमार, सुश्रुतादि मंडळी या वर्गांतील होत. कोणीं पारा, इतर धातु, रसें व उपरसें यांच्या शुद्धीकरणानें व भस्मीकरणानें रोग बरे करूं लागले, त्यांस रसवैद्य ह्मणत; अनेक प्राचीन 'रससिद्ध' या वर्गांतील होत. हे सारे बहुधा तांत्रिक

मार्गांतीलच होते. यांपैकीं बहुतेक 'मंत्रसिद्ध'ही असत; त्यांस मंत्रसिद्ध किंवा रससिद्धवैद्य ह्मणत; हे आपल्या मंत्रशक्तीनें मनुष्यजातीचे रोग बरे करीत. रससिद्ध व मंत्रसिद्ध हे बहुधा लोकांत फारसे मिसळत नसत; हे योग, मंत्र, तंत्रादि आपापल्या अनुष्ठानांत नेहमीं गढलेले असत. हे बहुतेक शैवपरंपरेचे तांत्रिक असत; यांच्याविषयीं बहुजनसमाजांत फार पूज्यबुद्धि असे. कारण, हे बहुधा विरक्त व निःस्पृही असत. रससिद्ध व मंत्रसिद्ध हे लोकांत फारसे मिसळत नसल्यामुळें, त्यांनीं अरण्यांमधून राहून वनस्पति, पारा, धातु, रसें, उपरसें, रत्नें, उपरत्नें यांविषयीं लावून ठेविलेले शोध ज्या अस्सल ग्रंथांत आहेत, ते सहसा मिळत नाहींत; त्या परंपरेंतील लोकांसच ते मिळतात. असो. तेव्हां रसशास्त्रें हीं प्रथम वैद्यकांतूनच निघालीं; वैद्यकाकरितांच त्यांची परिणति झाली; व **देहसिद्धि** व **लोहसिद्धि** यांत त्यांची परिसमाप्ति झाली. लोहसिद्धि व देहसिद्धि यांस प्राचीन ग्रंथांतून 'रस' व 'रसायन' ह्मटलेलें आहे. आतां मात्र आह्मीं 'रसायन' शब्द लोहसिद्ध ऊर्फ किमयेला लावतों; अलीकडच्या संस्कृत रसवैद्यकावरील ग्रंथांत देखील हाच घोंटाळा आहे. फार प्राचीनकाळीं रसविद्या व रसायनविद्या मिळूनच प्रवृत्त झाल्या व त्या मिळूनच ग्रंथांतून आढळतात; व प्राचीन ग्रंथांत तर रसायनकर्मास ह्मणजे आयुर्वृद्धीस भस्मादिक पदार्थ उपयोगी पडण्यापूर्वीं त्यांची आधीं लोहावर परीक्षा पहावी असें सांगितलें आहे. (आदौ लोहे परीक्षेत पश्चाद्देहे तथैव च ॥) यामुळें एकेकाळीं **रसविद्या** (किमया) व **रसायनविद्या** (देहसिद्धि) जोडीनेंच परिणत-दशेस आलेल्या होत्या; व अस्सल रसग्रंथांत प्रथम रससिद्धि सांगून नंतरच रसायनसिद्धि सांगितलेली आहे. या प्रकारें **रसशास्त्रांचा** उगम वैद्यकांत, परिणति-वैद्यकांत व परिसमाप्ति लोहसिद्धींत व देहसिद्धींत, अशा जरी एकेकाळीं स्थिति होती, तरी रसविद्या ही नेहमीं फारच गुप्त असे. त्यामुळें रसशास्त्रांतील देहसिद्धीचा तेवढा भाग प्रचारांत येऊन, रससिद्धि ऊर्फ लोहसिद्धि मागें पडली; व केवळ रसवैद्यकावरचेच तेवढे ग्रंथ भराभर पुढें निपजूं लागले. यामुळें **रसवैद्यक** (देहसिद्धि) व **रसशास्त्र** (किमया) असा भेद होऊन दोन्हीं शास्त्रांवर स्वतंत्र ग्रंथ निर्माण होऊन एकमेकांचा

संबंध तुटल्यासारखाच झाला; सध्यांच्या काळीं **रसवैद्यकावरचेच** अनेक ग्रंथ मिळत असून, खरीं **रसशास्त्रें** फार थोडीं मिळतात.

आर्यवैद्यकांत मूलिकावैद्य, शस्त्रवैद्य, रसवैद्य व सिद्धवैद्य असे जे चार भेद आहेत, त्यांविषयीं रसवैद्यांचें मत खालीं दिल्याप्रमाणें आहेः—

रसेन कथितो वैद्यः मानुषो मूलिकादिभिः ॥
अधमः शस्त्रदाहाभ्यां सिद्धवैद्यस्तु मांत्रिकः ॥ १ ॥
रसादिभिर्या क्रियते चिकित्सा ।
दैवीति सद्भिः परिकीर्तिता सा ॥
सा मानुषी मंत्रकृता शिफाद्यैः ।
सा राक्षसी शस्त्रकृतादिभिर्या ॥ २ ॥
रसज्ञो देववैद्यः स्यात् मानुषो मूलिकादिभिः ॥
आसुरः शस्त्रवैद्यो हि सिद्धवैद्यस्तु मांत्रिकः ॥ ३ ॥

यावरून वरील वैद्यांस क्रमेंकरून मानुषी, आसुरी, दैवी व सिद्ध चिकित्सा करीत असलेले असें रसवैद्यांनीं ठरविलेलें आहे. कालानुक्रमानेंही या चिकित्सा-पद्धति क्रमानेंच निघाल्या असाव्यात हें साहजिकच आहे; तथापि मूलिकावैद्यक, शस्त्रवैद्यक व रसवैद्यक हीं एकमेकांपासून कालारंभांत फारशीं कांहीं दूर नव्हतीं असें दिसतें. हीं वेगळाल्या परंपरेच्या लोकांत व थोडेसें मागेंपुढें पण एकाच काळीं उदयास आलीं असलीं पाहिजेत. यामुळेंच रसवैद्यकाचा किंवा शस्त्रवैद्यकाचा फारसा उल्लेख मूलिकावैद्यकांत येत नाहीं; तसेंच परस्परांच्या प्राचीन ग्रंथांत इतर पद्धतींच्या चिकित्सेविषयीं फारसें कांहीं लिहिलेलें आढळत नाहीं. अलीकडील रसग्रंथांत मात्र आर्यवैद्यकाच्या या चारी चिकित्सापद्धतींचा उल्लेख असून त्यांची तुलना केलेली आढळून येते. प्राचीनकाळीं रसवैद्यांची ही तांत्रिकपरंपराच वेगळी होती; ते आपले रसविषयक प्राचीन तांत्रिक ग्रंथ प्रत्यक्ष शंकराकडूनच प्राप्त झाले असें मानीत. प्राचीन रसतंत्रांत पारा व त्याचे अनेक उपयोग असून, तीं तंत्रें इतर चिकित्सापद्धतीइतकींच प्राचीन आहेत. प्राचीन रसतंत्रें व रसागम ह्मणून जेवढे आहेत (ते सारे शिवाच्या नांवावर लिहिलेले आहेत) तेवढे शकापूर्वीं अनेक शतकांपासून निर्माण होत असत; व या विद्येचा प्रारंभ भरतवर्षांत कमींतकमी

शकापूर्वी ३।४ हजार वर्षांपासून तरी झाला असला पाहिजे, असें ग्रंथविस्तारावरून कळून येईल. तांत्रिकमार्गातील अनेक लोकांच्या अनेक शोधांमुळें भारतीय रसविद्या परिपूर्ण होऊन, तींत देहसिद्धि व लोहसिद्धि परिपूर्णपणें साधली होती; कालेंकरून ही विद्या लोपत लोपत आज बहुतेक तिचा नाशच झाला आहे. ग्रंथ राहिलेले असल्यास तें आमचें नशीब; पण या विद्या परंपरेनें जाणणारे आतां फार थोडे आहेत. अद्यापिहि भरतखंडांत, नाहीं ह्मणतां, देहसिद्धि व लोहसिद्धि जाणत असलेले महात्मे आहेत, हें भरतवर्षाचें सुदैव होय ! असो

रसशास्त्रांच्या उगमाविषयीं स्वतः तांत्रिक लोकांचें काय मत आहे हें पाहून हें प्रकरण संपवितों:—

भूतानुकंपाप्रवणो महेशः । स्मशानवासी जगदादिनाथः ॥
*स्ववीर्ययुक्तागदयोगरत्नैः । कीर्णानि तंत्राणि बहूनि चक्रे ॥१॥
रसग्रंथेषु तंत्रेषु धातुशोधनमारणे ॥
विवृत्ते च विशेषेण रसराजस्य संस्कृतिः ॥ २ ॥

यावरून रसतंत्रांतून धातूंची शोधन व मारणक्रिया व विशेषेंकरून पाऱ्याचे (आठरा) संस्कार—यांचें विवरण असतें किंवा होतें हें कळून येईल. रसविद्येची व रसशास्त्रांची प्रशंसा त्यांनीं या प्रकारें केलेली आहे:—

रसविद्या परा विद्या त्रैलोक्येऽपिच दुर्लभा ॥
भुक्तिमुक्तिकरी यस्मात्तस्मात् ज्ञेया गुणान्वितैः ॥ १ ॥
साध्येषु भेषजं सर्वं ईरितं तत्ववेदिना ॥
असाध्येष्वपि दातव्यो रसोऽतः श्रेष्ठ उच्यते ॥ २ ॥
रसे रसायने ज्ञाने बुद्धिर्यस्य न हीयते ॥
तमहं पुरुषं वंदे; अन्ये ते शुक्रवाटकाः ॥ ३ ॥

या प्रकारें, रसविद्येनें लोहसिद्धि, द्रव्यसिद्धि, किमया ऊर्फ हेमतारादिकरण साधतें, व रसायनानें असाध्य रोगही जाऊन देहाचें आयुरारोग्य सिद्ध होतें; व यांमुळें पुढें मुक्तीही मिळते अशीं तांत्रिकांचीं मतें आहेत. **निरोगी-देह, व निश्चित-मन** हीं असल्यानंतर, **इच्छा असेल त्याला** मोक्षसाधनास वाटेल तितकी सवड असते हें उघड आहे.

* ह्मणजे पाऱ्यानें युक्त अशा उत्तम औषधांच्यायोगें.

प्रकरण ३ रें.

रसविद्या व जीवन्मुक्ति

रसवाद्यांपुढें ध्येय हें असें कीं, "सिद्धे रसे करिष्ये निर्दारिद्र्यगदं जगत्" ह्मणजे रस सिद्ध झाला असतां सर्व जगत् दारिद्र्य व रोग यांजपासून मुक्त करीन. एवढाच त्यांचा हेतु नव्हता. जीवन्मुक्ति मिळविणें हाही एक त्यांचा अंतिम-हेतु असे. जीवन्मुक्ति साधावी ह्मणून पिंडस्थैर्य बनवावयाचें; हें पिंडस्थैर्य रसविद्येनें होतें. ह्मणून रसवाद्यांपुढें लोहसिद्धि, देहसिद्धि व जीवन्मुक्ति हे तीन विषय असत. **रसार्णवा**च्या प्रारंभाच्या भागांत शिव पार्वतीस सांगतात कीं:—

अजरामरदेहस्य शिवतादात्म्यवेदनम् ॥
जीवन्मुक्तिर्महादेवि! देवानामपि दुर्लभा ॥ ८ ॥
पिंडपाते तु यो मोक्षो स च मोक्षो निरर्थकः ॥ ९ ॥

* * * *

तस्मात्तं रक्षयेत्पिंडं रसैश्चैव रसायनैः ॥
षड्दर्शनेऽपि मुक्तिस्तु दर्शिता पिंडपातने ॥
करामलकवत्सापि प्रत्यक्षं नोपलभ्यते ॥ १२ ॥
शून्यध्यायी मंत्रजापी न पिंडं धारयेत्क्वचित् ॥ १४ ॥
तेन पिंडो महाभागे रक्षणीयः प्रयत्नतः ॥ १७ ॥

पिंडरक्षणाचे उपाय दोन प्रकारचे सांगितलेले आहेत. एक, रसयोग; व दुसरा, पवनयोग. या प्रकारें कर्मयोग दोन प्रकारचा आहे. कर्मयोगानें पिंडधारणा होते.

कर्मयोगेन देवेशि! प्राप्यते पिंडधारणम् ॥ १८ ॥
रसश्च पवनश्चैव कर्मयोगो द्विधा मतः ॥
*मूर्छितो हरति व्याधिं मृतो जीवयति स्वयम् ॥ १९ ॥
बद्धश्च खेचरः कुर्यात् रसो वायुश्च भैरवि! ॥
ज्ञानान्मोक्षः सुरेशानि! ज्ञानं पवनधारणात् ॥ २० ॥

* ह्याच श्लोक रसेश्वरदर्शनांत व हठयोगप्रदीपिकेंत उतरून घेतला आहे.

तत्र देवि! स्थिरं पिंडं पिंडस्थैर्ये रसः प्रभुः ॥
अचिराज्जायते देवि! शरीरमजरामरम् ॥ २१ ॥
मनसश्च समाधानं रसयोगादवाप्यते ॥ २२ ॥
तस्य मंत्राश्च सिध्यंति यो अत्ति मृतसूतकम् ॥
स्वदेहखेचरत्वं च शिवत्वं येन लभ्यते ॥ ३१ ॥
तादृशे तु रसज्ञाने नित्याभ्यासं कुरु प्रिये ॥

मनाचें समाधान, मंत्रसिद्धि, खेचरीसिद्धि, शिवतादात्म्य व जीवन्मु
इतकीं ज्या रसयोगानें साधतात, तो कर्मयोगांत श्रेष्ठ कसा नव्हे बरें? जी
न्मुक्ति मिळविण्यासाठीं प्रथम देहस्थैर्य बनविलें पाहिजे. रसार्णवकारांनीं र
योगाचें महत्व दाखवितेवेळीं, पवनयोगानें (प्राणायामादिक योगानें) व मं
योगानें पिंडस्थैर्य प्राप्त होत नाहीं, असें ह्मटलें आहे. याच शरीरांत मुक्ति
मुक्ति मिळवावयाची असल्यास रसविद्येचा अभ्यास करा, असा एकंद
मथितार्थ आहे. **रसहृदय**कार श्रीमद्गोविंदपूज्यपाद यांनींही याच कल्प
खालील आर्यांत फारच उत्कृष्ट तऱ्हेनें गोंविलेल्या आहेत. रसहृदयाच्या
हिल्या अवबोधांतील बहुतेक आर्या रसरत्नसमुच्चयकारानें व माधवाचार्य
(रसेश्वरदर्शनांत) उतरून घेतलेल्या आहेत. त्या अत्यंत गोड व श्रीशं
राचार्यांच्या गुरूंना शोभण्यासारख्या आहेत ह्मणून येथें देऊन ठेवितों.

*मूर्छित्वा हरति रुजं, बंधनमनुभूय मुक्तिदो भवति ॥
अमरीकरोति सुमृतः, कोन्यः करुणापरः सूतात् ॥ ३ ॥
सुरगुरुगोद्विजहिंसापापकलापोद्भवं किलासाध्यं ॥
तदपि च शमयति यस्मात्कोन्यस्तस्मात्पवित्रतरः ॥ ४ ॥
रसबंधश्च स धन्यः प्रारंभे यस्य सततमिव करुणा ॥
सिद्धे रसे करिष्ये महीमहं निर्जरामरणम् ॥ ६ ॥
ये चात्यक्तशरीराः हरगौरीसृष्टिजां तनुं प्राप्ताः ॥
वंद्यास्ते रससिद्धाः मंत्रगणाः किंकरा येषाम् ॥ ७ ॥
सुकृतफलं तावदिदं, सुकुले यज्जन्म, धीः स्वतंत्राऽपि ॥
सापि च सकलमहीतलतुलनकला; भूतलं च सुविधेयं ॥ ८

* हें मूळ चार प्रतींवरून शुद्ध करून योग्य असेल तो पाठच येथें दिला आहे. र
रत्नसमुच्चय, रसेश्वरदर्शन व रसहृदयाच्या दोन प्रती यांवरून मूळ दिलें आहे.

भूतलविधेयतायाः कथमर्था विविधभोगफलाः ॥
भोगाः संति शरीरे; तदनित्यमहो वृथा सकलम् ॥ ९ ॥
इति धनशरीरभोगान् मत्वाऽनित्यान् सदैव यतनीयम् ॥
मुक्तौ; साच ज्ञानात्, तच्चाभ्यासात् स च स्थिरे देहे ॥१०॥
तत्स्थैर्ये न समर्थं रसायनं किमपि मूललोहादि ॥
स्वयमस्थिरस्वभावं दाह्यं क्लेद्यं च शोष्यं च ॥ ११ ॥
काष्ठौषध्यो नागे, नागं वंगेऽथ, वंगमपि शुल्बे ॥
शुल्बं तारे, तारं कनके; कनकं च लीयते सूते ॥ १२ ॥
परमात्मनीव नियतं भवति लयो यत्र सर्वसत्वानाम् ॥
एकोऽसौ रसराजः शरीरमजरामरं कुरुते ॥ १३ ॥
अमृतत्वं हि भजंते हरमूर्तौ योगिनो यथा लीनाः ॥
तद्वत्कवलितगगने रसराजे हेमलोहाद्याः ॥ १४ ॥
स्थिरदेहेऽभ्यासवशात् प्राप्य ज्ञानं §गुणाष्टकोपेतम् ॥
प्राप्नोति ब्रह्मपदं; न पुनर्भववासदुःखानि ॥ १५ ॥
एकांशेन जगंति च विष्टभ्यावस्थितं परंज्योतिः ॥
पादैस्त्रिभिस्तदमृतं सुलभं न विरक्तिमात्रेण ॥ १६ ॥
न हि देहेन कथंचित् व्याधिजरामरणदुःखविधुरेण ॥
क्षणभंगुरेण सूक्ष्मं तद्ब्रह्मोपासितुं शक्यम् ॥ १७ ॥
नामापि देहसिद्धेः को गृण्हीयात् विना शरीरेण ॥
तद्योगिगम्यममलं मनसोऽपि न गोचरं तत्वम् ॥ १८ ॥
यज्ञाद्दानात्तपसो वेदाध्ययनात् दमात्सदाचारात् ॥
अत्यंतं श्रेयः किल योगवशादात्मसंवित्तिः ॥ १९ ॥
गलितानल्पविकल्पः सर्वार्थविवर्जितश्चिदानंदः ॥
स्फुरितोप्यस्फुरिततनाः करोति किं जंतुवर्गस्य ॥ २० ॥
भ्रूयुगमध्यगतं यत् शिखिविद्युन्निर्मलं जगद्भासि ॥
केषांचित्पुण्यकृतां उन्मीलयति चिन्मयं ज्योतिः ॥ २१ ॥
परमानंदैकमयं परमं ज्योतिःस्वभावमविकल्पं ॥
विगलितसर्वक्लेशं ज्ञेयं शांतं स्वसंवेद्यम् ॥ २२ ॥

§ हे ‘ आत्मगुण ’ ह्मणून आठ गुण प्रसिद्ध आहेत. चाळीस किंवा सोळा संस्कार व आठ आत्मगुण मिळून मनुष्य तयार होतो.

तस्मिन्नाधाय मनः स्फुरदखिलं चिन्मयं जगत्पश्यन् ॥
उत्सन्नकर्मबन्धो ब्रह्मत्वमिहैव चाप्नोति ॥ २३ ॥
अस्तं हि यांति विषयाः प्राणांतःकरणसंयोगात् ॥
स्फुरणं नैंद्रियतमसां नातः स्फुरतश्च दुःखसुखे ॥ २४ ॥
रागद्वेषविमुक्ताः सत्याचारा नरा मृषा रहिताः ॥
सर्वत्र निर्विशेषा भवंति चिद्ब्रह्मसंस्पर्शात् ॥ २५ ॥
तिष्ठन्त्यणिमादियुता विलसद्देहा मुदा सदानंदाः ॥
ये ब्रह्मभावममृतं संप्राप्ताश्चैव कृतकृत्याः ॥ २६ ॥
आयतनं विद्यानां मूलं धर्मार्थकाममोक्षाणां ॥
श्रेयःपरं किमन्यत् शरीरमजरामरं विहायैकम् ॥ २७ ॥
यज्जरया जर्जरितं कासश्वासादिदुःखवशमाप्तम् ॥
योग्यं तन्न समाधौ प्रतिहतबुद्धींद्रियप्रसरम् ॥ २९ ॥
*बालः षोडशवर्षो, विषयरसास्वादलंपटः परतः ॥
यातविवेको वृद्धो; मर्त्यः कथमाप्नुयान्मुक्तिम् ॥ ३० ॥
अस्मिन्नेव शरीरे येषां परमात्मनो न संवेदः ॥
देहत्यागादूर्ध्वं तेषां तद्ब्रह्म दूरतरम् ॥ ३१ ॥
तस्माज्जीवन्मुक्तिं समीहमानेन योगिना प्रथमं ॥
दिव्या तनुर्विधेया हरगौरीसृष्टिसंयोगात् ॥ ३२ ॥

जीवन्मुक्ति पाहिजे असेल तर रसयोगानें पिंडस्थैर्य करून घेतलें पाहिजे, हाच गोविंदाचार्यांचा आशय आहे.

* गोविंदपूज्यपादांच्या वरील आर्येची तुलना, शंकराचार्यांच्या खालील चर्पटपंजरींतील श्लोकाशीं करा:—

बालस्तावत्क्रीडासक्तः । तरुणस्तावत्तरुणीरक्तः ।
वृद्धस्तावत् चिंतामग्नः । परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः ॥

प्रकरण ४ थें.

धातुवाद खरा आहे !

पूर्वी नाथपंथांतील लोकांनीं तीनचार विषयांचा चांगलाच अभ्यास केलेला होता. ते विषय ह्मणजे मुख्यत्वेंकरून हे:– (१) **योगशास्त्र**, (२) **भक्तिशास्त्र**, (३) **रसशास्त्र** किंवा **किमया**, (४) **ब्रह्मज्ञान व मोक्ष**. नाथपंथांतील लोकांनीं तंत्रग्रंथांचें चांगलेंच अध्ययन केलें होतें, इतकेंच नव्हे, तर कित्येक नवीन तांत्रिक ग्रंथही त्यांनीं रचून ठेविलेले आहेत. हा नाथपंथ फार प्राचीन आहे अशी आमची समजूत आहे. सध्यां तर गौडपादनाथाचार्य व गोविंदनाथमुनि या श्रीशंकराचार्यांच्या गुरुपरंपरेंतील नाथांपेक्षां प्राचीनतर नाथ मला माहीत नाहींत. मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ यांच्यानंतरचे शिष्य ज्ञानेश्वर हे जसे केवळ वेदांतमार्गी झाले, तद्वतच गौडपादनाथाचार्य व गोविंदनाथमुनि यांचे शिष्य प्रसिद्ध श्रीशंकराचार्य हे केवळ वेदांतमार्गी बनले. श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर हे दोघेही एकाच नाथपरंपरेंतील असून त्यांनीं त्या परंपरेंतील सर्वच विषयांचें ज्ञान जगांत प्रगट केलें नाहीं. भक्तिशास्त्र, योगशास्त्र व ब्रह्मज्ञान या तिन्हींवर वरील दोघांनीं पुष्कळच लिहिलेलें आहे. रसविद्या ऊर्फ किमयेचें मात्र श्रीशंकराचार्य व श्री ज्ञानेश्वर यांनीं बरेंच गूढ ठेविलेलें आहे; तथापि रसविद्या ऊर्फ किमया या दोघांसही माहीत नव्हती असें मात्र नाहीं. त्यांच्या ग्रंथांतून किमयेचे उल्लेख बरेच आढळतात; व त्यांवरून त्यांस तो विषय चांगलाच अवगत होता असें कळून येतें. श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर यांनीं स्वतः जरी या प्रकारें किमया जगांत प्रगट केली नाहीं, तथापि त्यांच्या गुरुपरंपरेंतील मंडळींनीं रसशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथच लिहून ठेविलेले आहेत. येथें ते ग्रंथ कोणते आहेत हें पाहण्याचा किंवा दाखविण्याचा माझा इरादा नाहीं. श्रीशंकराचार्यांच्या ग्रंथांत स्पर्शवेधाचे व इतर किमयाविषयक उल्लेख कोठें कोठें आलेले आहेत.* ज्ञाने-

* **शतश्लोकीं**त हा श्लोक आहे:—
दृष्टांतो नैव दृष्टः त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः ॥
स्पर्शश्चेत्तत्र कल्प्यः स नयति यदहो **स्वर्णतां अश्मसारं** ॥

श्वरांनीं असे उल्लेख कोठें केले आहेत हें तयारच असल्यामुळें येथें देणें सोपें आहे. ह. प. श्रीपतिबोवा भिंगारकर यांनीं आपल्या श्रीज्ञानेश्वरवादाच्या पुस्तकांत याविषयीं माहिती दिली आहे. (पृ. ७०।७१ पहा). ज्ञानेश्वरींत किमयाविषयक ओंव्या होत्या, व त्या पुढें गाळण्यांत आल्या. या वादाचा समारोप करितेवेळीं त्यांनीं या प्रकारें लिहिलें आहे:—"ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरींत किमयेच्या ओंव्या घातल्या होत्या. त्याचें कारण ते (ह्म. सांप्रदायिक लोक) असें सांगतात कीं, नित्यनेमानें श्रद्धापूर्वक ज्ञानेश्वरीचें पारायण करणाऱ्यास उदरनिर्वाहाची काळजी लागूं नये, ह्मणून मुद्दाम त्या ओंव्या घातल्या होत्या. ग्रंथ तयार झाल्यावर ज्ञानेश्वरानें तो ग्रंथ आपले ज्येष्ठ बंधु असून गुरुस्थानापन्न असलेले जे निवृत्तिनाथ त्यांस दाखविला. त्यांनीं समग्र वाचून पहातां असें सांगितलें कीं, दुसऱ्याच्या ग्रंथावर टीका करण्यांत विशेष तें काय? नंतर निवृत्तिनाथांनीं त्या ग्रंथांतील किमयेसंबंधानें ज्या ओंव्या होत्या, त्यांपैकीं कांहीं ओंव्या मुळींच गाळून टाकून कांहीं ओंव्याची फिरवाफिरव केली. त्यांचा हेतु इतकाच कीं, जीवमात्र प्रपंचांत निमग्न झालेला बहिर्मुखवृत्तीचा आहे, आणि हा ग्रंथ अध्यात्मविद्येनें ओतप्रोत भरलेला आहे; जर या ग्रंथांत किमया आहे असें समजलें तर सर्व लोक अध्यात्मविद्येचा त्याग करून किमयेच्या ओंव्यांचा स्वीकार करतील; कारण प्रपंचांत द्रव्याची अवश्यकता सर्वांसच असते, व परमार्थांत द्रव्य आणि स्त्री अत्यंत मादक आहेत व त्या मोहानें मनुष्यास परमार्थ करण्याची इच्छाहि होत नाहीं. असो. ज्ञानेश्वरींतील किमयेच्या ओंव्या निवृत्तिनाथानें गाळून टाकिल्या, किंवा एकनाथानें टाकिल्या, कसेंही असलें तरी या कथेचा सारांश इतकाच कीं, ज्ञानेश्वरींत किमयेच्या ओंव्या होत्या, पण त्या पुढें गाळून टाकण्यांत आल्या. सध्यां प्रचलित असलेल्या ज्ञानेश्वरीचें सूक्ष्म अवलोकन केल्यास किमयेच्या ओंव्यांत जो फेरबदल झाला आहे तो मात्र कांहीं ओंव्यांत आढळण्यांत येतो; तथापि, गाळून टाकलेल्या ओंव्या कोणत्या हें मात्र निश्चयानें सांगतां येत नाहीं. वनस्पतींच्या योगानें तांब्याचें सुवर्ण, व कथिलाचें रुपें होतें याविषयीं **पद्मपुराण (?), रसयोगप्रकाश, रसेंद्रचिंतामणि, गोरक्षकिमयागार, रसार्णव, रसरत्नसमुच्चय, रसपद्धति, रसहृदय** इत्यादि अनेक ग्रंथांचीं प्रमाणें आहेत; व तसें करण्याचीं उदाहरणेंही लोकसमूहांत बरींच सांपडतात. (नंतर ज्ञानेश्वरींतील किमयेच्या निदर्शक ह्मणून कित्येक ओंव्यांचा त्यांनीं उतारा दिला आहे; त्या सर्वच ओंव्या किमयेच्या नाहींत अशी आमची समजूत आहे. आमच्या मतें खऱ्या किमयेच्या निदर्शक ओंव्या ह्या:—)

परी मात्रेचेनि मापे । दिव्यौषध जैसे घेपे । कथलाचे कीजे रुपे । रसभावने ॥१॥ जैसे कनकी तेजपाणी । मीठाते बांधी आणि । ते तुल्यचि मेळवणी । रसांतराची ॥ २ ॥ जैसे रसौषध खरे । आपले काज करुनी पुरे । शेखी आपणही नुरे । तैसे होतसे ॥ ३ ॥ पितळेची गंधी काळीक । जै फिटली होय निःशेष । तरी सुवर्ण काय आणिक । जोडु जाईजे ॥ ४ ॥ कां पाठोवाटीं पुटें । भांगार खार देणें घटे । तैं कीड घडकरी तुटे । निर्व्याज होय ॥५॥ नातरीं जें धातुवादाही न जोडे । तें लोहींच पंधरें सांपडे । जैं दैवयोगें चडे । परिस हातां ॥ ६ ॥

ओंव्यानंतर ह. श्रीपतिबोवा पुढें लिहितात कीं, "या ओंव्या किमयेच्या अर्थाच्या स्पष्ट बोधक आहेत; आणखीही पुष्कळ ओंव्या सांपडतील. परंतु किमयेच्या भाषेचें अर्थज्ञान झालें पाहिजे. नाग, नागीण, विंचू, सारी, मारी, धसा, मासा, कमठ, कढी, कीट, पुट, किडाळ, रवि व चंद्र इत्यादि शब्द किमयेच्या ग्रंथांत वापरलेले आढळतात; त्यांचें गुरुमुखानें ज्ञान झाल्यावांचून त्या शब्दांचा अर्थ जसा समजावा तसा समजत नाहीं. गोरक्षकिमयागार नांवाच्या ग्रंथांत असे किमयेचे शब्द फार आहेत. कांहीं संप्रदायिक पुरुषाकडे गाळून टाकिलेल्या किमयेच्या ओंव्यांची यादीही सांपडते; पण त्यांची दीक्षा घेतल्यावांचून व संप्रदायिक बनल्याशिवाय ते इतरांस सांगत नाहींत."

वरील ज्ञानोबारायांच्या ओंव्यांत खालील रसशास्त्रांतील सिद्धांताचे उल्लेख आहेत:—

(१) कथिलास एका विशिष्ट मात्रेनें **रस**भावना दिल्यास त्याचें रुपें होतें*

* मोरोपंतांनींही एकेठायीं (ह. वं. अ. ४२) याच सिद्धांताचा असा उल्लेख केलेला आहे:—" कीं सिद्धपारदाचें श्रेयस्कर लंघिजे वच न कथिलें ॥"

(२) पितळेची ‘ गंधी व काळीक ’ गेली कीं, त्यांत व सोन्यांत कांहीं फरक नाहीं.

(३) धातुवादानेंही (Metallurgy and mining) एखादे वेळीं जें सोनें लवकर मिळत नाहीं, तें दैवयोगेंकरून ‘ परिस ’ हातीं आला असतां, लोहांतच (Iron) मिळतें. ‘ परिस ’ हा ‘स्पर्शमण्या’चें अपभ्रष्ट रूप आहे. वेधांच्या नाना प्रकारांपैकीं ‘स्पर्शवेध’ हा एक प्रकार आहे. वेध ह्मणजे एका धातूची दुसरी धातु बनविणें (Transmutation of metals). स्पर्शवेधांत नुसत्या स्पर्शानें लोहाचें सुवर्ण होतें असें ग्रंथांतरीं वर्णन आढळतें. स्पर्शवेध करण्याची शक्ति ज्या मण्यांत मूळची असते किंवा आणिली असते त्यासच मराठी लेखकांनीं ‘परिस’ ह्मटलें आहे. यासच पाश्चात्य किमयावादी (alchemists) Philosophers' stone ह्मणत असत.

पाश्चात्य देशांमधूनही अनेक शतकेंपर्यंत किमयावाद्यांची कल्पना धातूंचे वेध होऊं शकतात अशीच होती; पण ही कल्पना अलीकडील रसायनशास्त्र्यांस मान्य नाहीं. या विषयाची ते थट्टाच करितात. याविषयीं एका लेखकानें असें लिहिलें आहे कीं:—

“Thus it will be seen that from the gradual aggregation of facts resulting from the pursuits of the alchemists ultimately sprang an exact science, and toward the latter part of the sixteenth century appeared a set of investigators of a very different order, who, instead of wasting their time in the pursuit of such fanciful theories, as that of transmutation, the philosopher's stone &c., devoted themselves to the unravelling of the principles that govern the composition and formation of bodies already known.” *Dental Metallurgy* (by C. J. Essig, and A. Koenig) p. 19.

या इ. स. १९०४ मध्यें छापलेल्या पुस्तकांतील उताऱ्यावरून अलीकडील शास्त्रज्ञांची परवांपरवांपर्यंत कशी समजूत होती हें कळून येईल. अलीकडे रेडियमच्या गुणधर्मांच्या ज्ञानानें या मतांत थोडासा फरक पडत चालला आहे.

किमयावाद्यांच्या मनांत वेधाची कशी कल्पना आली ?

याविषयीं पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं नाना प्रकारच्या कल्पना जुळवून आपल्या मनाचें समाधान करून घेतलेलें आहे. वेधाची कल्पना किमयावाद्यांनीं भलत्याच गोष्टींवरून व चुकीच्या प्रयोगांवरून गृहीत धरिली यामुळें त्यांची कल्पना (Theory) चुकीची आहे असा या शास्त्रज्ञांचा आक्षेप आहे; पण किमयावाल्यांचे लक्षांत कांहीं तरी अधिक गोष्टी आलेल्या असाव्यात. सध्यां सुमारें ६४ चौसष्ट धात्वात्मक मूळ द्रव्यें मानण्यांत येतात; तथापि या धात्वात्मक मूळ द्रव्याच्या (Metallic elements) मूळ स्वरूपाविषयीं शास्त्रज्ञांत मतभेद आहेत. कांहीं जण ह्मणतात कीं, “ When man shall have mastered that great power of nature–electritity–many of the so-called elements will be found probably to be compound bodies.” मनुष्याचा जेवेळीं पूर्ण ताबा विद्युल्लतेवर—वीजेवर—बसेल तेवेळीं सध्यां ज्यांना मूलद्रव्यें (Elements) मानितात, अशांपैकीं पुष्कळच धातु मिश्र पदार्थ असलेलें कळून येईल. कित्येक तर याहूनही पुढें गेलेले असून सर्व पदार्थ **एकाच मूळद्रव्यांतून** निर्माण झाले असें ह्मणत आहेत.* मानिलेल्या चौसष्ट मूळ-धातूंपैकीं विजेच्या भयंकर माऱ्यापुढें किती टिकाव धरून राहतात हें पाहिलें पाहिजे. **वीज पडली असतां** सोन्याचा मुलामा दिलेल्या वस्तूंची काय अवस्था होते हें एकानें या प्रकारें वर्णिलेलें आहे:—

“ There are, however, indications that even those so-called simple bodies are the results of combinations of still more primitive elements. It has been observed that when lightning has struck gilded ornaments they have become blackened, and it has been found, on analysing the blackened matter, that the presence of sulphur was distinctly indicated. Unless sulphur exists in the lightning it must have existed in the gold, and have been evolved by the action of lightning. We may then fairly

* Prof. Graham's *Researches with Hydrogen*, 1869.

assume that gold contains the elements of sulphur, and this is no anomaly in the case of gold, as other metals have also been proved to contain the elements of sulphur,* and the dreams of physical Alchemy may have some foundation, after all. But sulphur is supposed to be related to nitrogen, and the elements of nitrogen are believed to be hydrogen and carbon, and if we go still further, we find that even on the pysical plane, all bodies are only modifications of one premordial element, which is not of a sufficiently material nature to be detected by physical means ... &c." Franz. Hartmann, *Magic, Black and White*, p. 210.

यावरून विजेच्या धक्क्यानें सुवर्णाचें पृथक्करण होऊन त्यांतून गंधक बाहेर पडतो असें अनुमान वरील लेखकानें काढिलेलें आहे. आमच्याकडील रससिद्धांनीं **रस व गंधक** यांच्या संयोगानें सुवर्ण होतें असें नाना ठायीं लिहिलेलें आहे; त्यांत तथ्य असलें पाहिजे हें यावरून उघड होतें. निसर्ग देवतेइतकाच जोराचा धक्का माणसांस देतां आला तर त्यासही सुवर्णाचें पृथक्करण करितां येईल.

किमया कोणांस साधली होती कीं नाहीं, ह्याची कोणांस खात्री करून घ्यावयाची असेल तर त्यांनीं जर्मनभाषेंत इ० सन १७८० सालीं छापलेलें "Collection of Historical accounts regarding some remarkable occurences in the life of some still living Adepts" हें पुस्तक वाचावें अशी डाक्टर हार्टमननें शिफारस केलेली आहे. त्यांतील त्यांनीं दिलेली एक गोष्ट अशी आहे कीं, एका बैराग्यानें एकदां एका बाईजवळ असलेलें सर्व रुपें सोनें करून सोडिलें. ती बाई नवऱ्यापासून विभक्त रहात असे; नवऱ्यास पैशाचा लोभ सुटून तें सुवर्ण (त्यांतील अर्धा हिस्सा) आपणांस मिळावें ह्मणून त्यानें तिजवर दावा आणिला; पण कोर्टांत चौकशी होऊन त्या पैशावर नवरोजीचा हक्क पोंचत नाहीं असा निकाल झाला ! तें सुवर्ण कसें बनलें होतें याविषयीं चौकशी झाली ! असो.

* David Law, F. R. S. E. "*Simple Bodies in Chemistry.*"

आपल्याकडेही अशा नाना प्रकारच्या बैराग्याच्या गोष्टी किमयेसंबंधीं लोकांनीं पाहिल्या आहेत व ऐकिल्या आहेत. आपल्याकडे अशा गोष्टी लिहून ठेऊन त्यांची पुढें चौकशी करण्याची बुद्धि फार कमी असल्यामुळें जिकडे तिकडे अनुभवाच्या **लेखांचा** अंधेर आहे. ही उणीव अंशतः तरी दूर करावी ह्मणून मीं किमयेविषयीं आपला अनुभव देऊन ठेवितों.

किमयेविषयीं स्वानुभव.

एका बैराग्यानें जून १९०८ मध्यें माझे समक्ष केलेले प्रयोग.

हुबळीस दारावर एक बैरागी पाऱ्याचें लिंग, मणि, वगैरे बनविलेले कोणांस पाहिजे आहेत काय ह्मणून विचारीत चालला होता. मीं सहज त्यास आंत बोलाविलें. मी त्यापूर्वी ५।६ महिने रसशास्त्रें वाचीत असल्यामुळें, रसलिंगाचें महत्व थोडेसें समजलें होतें; शिवाय, पारा घट्ट व अग्निस्थिर असा मिळाला ह्मणजे किमयेचें अर्धें कार्य झालें असें ऐकिलेलें होतें. त्यामुळें, बैराग्यानें केलेलें आहे तरी काय, हें पहावें ह्मणून मीं त्यास आंत बोलाविलें. तो आंत आला. त्यानें प्रथम घट्ट पाऱ्याचें लिंग, नंतर मणि, आंगठ्या वगैरे दाखविल्या. त्या वस्तु दुधांत ठेऊन दूध प्यालें असतां देहाला आरोग्य होतें ह्मणून सांगितलें. मीं त्यास विचारिलें "हा पारा कसा घट्ट बनविला?" 'वनस्पतीच्या योगें' हें ठराविक उत्तर मिळालें. ती वनस्पती कोणती हें विचारलें तरी तो सांगेना; मग 'मजसमोर पारा घट्ट करून दाखवीत असाल तर पाहण्याची इच्छा आहे' असें मीं ह्मटलें. पण त्यास बैराग्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. नंतर त्यानें पारा लोण्यासारख्या स्थितींत आणिलेला व कांचेच्या पुडीसारख्या स्थितींत असलेला दाखविला. या प्रकारें पारा नाना स्थितींमधून जाऊन शेवटीं घट्ट होतो असें त्यांनीं सांगितलें.

(२) यानंतर तो बैरागी त्या दिवशीं निघून गेला. पुढें एकदोन दिवसांनीं येऊन त्यानें 'तुला एक प्रयोग करून दाखवितों' ह्मणून सांगितलें. त्या दिवशीं त्यानें पाऱ्यावर एक पांढरें स्वच्छ भस्म घालवून वर मेणानें तें झांकवून, ती शेणी विस्तवांत ठेवून अग्नि प्रज्वलित करविला. पुढें तो पारा घट्ट बनून त्याचें रुपें झालें ! हा पारा मींच बाजारांतून आणिला होता. तो

वस्त्रांतरित मात्र करून घेण्यास त्यानें सांगितलें. पारा मींच आपल्या हातानें शेणींत घातला. वर एक गुंजभर भस्म त्यानें घालण्यास दिलें. तें भस्म देखील मींच पाऱ्यावर घालून मेणानें झांकलें. शेणी अग्नींत ठेविल्यानंतर अग्नीजवळ बुवा बिलकुल गेला नाहीं. शिवाय रुपें जें झालें, तें पाऱ्याच्या स्वरूपाच्या (Mass) वजनाच्या मानानेंच झालें. पारा सुमारें -॥= भार होता. एक गुंज त्याचें भस्म. रुपें तेवढेंच निघालें. त्याची सर्व प्रकारची परीक्षा–सोनारी –व आसिडांत केली. सर्व बरोबर आहे.

(३) यानंतर आणखी एके दिवशीं तो आला. त्यानें दुसरा एक प्रयोग तुला दाखवितों ह्मणून सांगितलें. त्या दिवशींही वरीलसारखाच सर्व प्रयोग करून शेणी मजकडून अग्नींत टेवविली. वर अग्नि पेटविला. कांहीं काळानें त्यांत सोन्याचा -।- भार तुकडा निघाला. हाही पाऱ्याचे मानानेंच होता. याचीही सर्व परीक्षा केली. तर तो नैट्रिक वगैरे आसिडांत विरघळला नाहीं; नैट्रोहैड्रोक्लोरिक आसिडांतच नेहमींच्या सुवर्णाप्रमाणें वितळला. हें सोनें रंगानें शंभर नंबरी घट्टीच्या सोन्यापेक्षां लाल आहे; यावरून किमयेचें सोनें अधिक शुद्ध बनतें असें दिसतें. या गोष्टी मीं स्वतः पाहिल्या आहेत. मीं किमया कधींही खोटी ह्मणणार नाहीं. बुवाच्या प्रयोगांत कोणतीही लबाडी नव्हती. तो दूरच असे. फक्त भस्म, गुंजगुंज, त्यानें आपलें घातलें. मग आतां सोनें व रुपें मूलद्रव्यें (Elements) कशीं मानावींत? तीं संयोगीद्रव्येंच (Compounds) असलीं पाहिजेत !!!

या स्वानुभवावरून काय सिद्ध होतें ?

या स्वानुभवावरून पुष्कळ गोष्टी सिद्ध होतात. त्या अशा:—

(१) अर्वाचीन रसायनशास्त्रवेत्ते समजतात त्याप्रमाणें रुपें व सोनें हीं (Elements) मूलद्रव्यें नाहींत.

(२) तीं प्राचीन भारतीय व पाश्चात्य रसवेत्ते समजत होते त्याप्रमाणें (Compounds) ह्मणजे मिश्रधातु असावींत.

(३) पारा व इतर कांहीं भस्मरूप पदार्थ (हे बहुधा धातुरूपच असावेत) मिळवून रुपें व सोनें बनवितां येतें.

(४) एकाच पाऱ्यांत एकदां एक भस्म घातल्यानें रुपें होतें, व

(५) दुसऱ्या वेळीं त्यांतच दुसरें भस्म घातल्यानें सोनें होतें.

(६) यावरून; सोनें व रुपें यांतील मूळ-पदार्थ पारा हा एकच आहे, व

(७) सुवर्णत्व व रूप्यत्व आणण्यासाठीं मात्र बाहेरील थोडीशी उपाधि कारणीभूत आहे.

(८) ही उपाधि कळली असतां आपणांलाही सोनें व रुपें बनवितां येणें शक्य आहे. (आज आपणांस ती उपाधि माहीत नाहीं, तो भाग वेगळा !)

(९) पारा रंजित व बद्ध ज्यायोगें होतो, ते भस्मरूप पदार्थ होते.

पाश्चात्य उपपत्ति.

स्वानुभवानें जे सिद्धांत किंवा जी उपपत्ति आह्मीं बसविली, तेच सिद्धांत व तीच उपपत्ति पाश्चात्य रसवाद्यांनीं बसविली आहे.

आठव्या शतकांतील मध्यभागांत होऊन गेलेल्या **गेबर** नांवाच्या (Geber) एका आरबी रसवेत्त्याविषयीं व त्याच्या मताविषयीं असें लिहिलें आहे-

"He thought that metals were all equally composed of mercury, arsenic and sulphur, and that in the descending scale from gold to lead, mercury, arsenic and sulphur were each present in a greater or less degree of purity in proportion to the color and quality of each metal."

गेबरच्या मताप्रमाणें प्रत्येक धातूंत पारा, सोमलधातु व गंधक हीं तिन्हीं असतात. रंगाच्या व गुणांच्या मानानें प्रत्येकांत हे तिन्ही पदार्थ कमीजास्त मानानें असतात, असें तो ह्मणतो. आमच्या निदर्शनास एवढेंच सध्यां आलें आहे कीं, रुपें व सोनें यांजमध्यें सारखाच पारा आहे. बाकीच्यांत असल्याविषयीं माहिती नाहीं; कारण बैराग्यानें त्या पाऱ्यांत कशाचीं भस्में घातलीं हें अज्ञातच आहे. एक एक गुंज भस्माशिवाय, -॥= भार रुप्यांतील व -।- भार सोन्यांतील बाकीचा सर्व भाग पाराच होता. यावरून बहुतेक भाग (रुपें व सोनें यांतील) पाराच आहे एवढेंच समजून येतें. फक्त पाऱ्याला रंगवून घट्ट कसा करितां येतो हाच यांतील प्रश्न दिसतो.

A Brief Guide to the Celestial Ruby नांवाच्या एका पाश्चात्य रसग्रंथाच्या कर्त्यानें याचविषयीं असें लिहिलेलें आहे कीं:—

"We do not, as is sometimes said, profess to create gold and silver, but only to find an agent which... ... ... is capable of entering in-to an intimate and maturing union with the mercury * of the base metals ... ... Our Art ... only arrogates to itself the power of developing, through the removal of all defects and superfluities, the golden nature which the baser metals possess."

प्रत्येक धातूंत, (हे रसवादी ह्मणतात त्याप्रमाणें) पारा असल्यास, प्रत्येक धातूचें सोनें बनलेंच पाहिजे हें उघड होतें. कारण एकाच पाऱ्याचें कांहीं भस्मांशीं संयोग होऊन रुपें व सोनें झालें! (वरील इंग्रजी उतारे *The story of Alchemy* व Enc. Brit. मधील *Alchemy* या विषयावरचा लेख-यांतून घेतलेले आहेत.)

या प्रकारें, रुपें व सोनें बनवितां येणें शक्य (व सिद्ध) आहे हें इक-डील अनुभवांवरून व पाश्चात्य आणि पूर्वेकडील रससिद्धांच्या लेखांवरून कळून येतें, व त्यावर जर पूर्व व पश्चिम येथील सिद्धांनीं स्वतंत्र ग्रंथ लिहून ठेविलेले आहेत, तर अद्यापि कोणांस त्या ग्रंथांवरून सोनें बनवितां कां येत नाहीं? याविषयीं पाश्चात्य किमयेचे सर्व ग्रंथ धुंडाळून पाहिलेले, व Alchemy-वरचा Enc. Brit. मध्यें लेख लिहिलेले गृहस्थ लिहितात कीं:—"We *cannot always make sure of under-standing them;* yet from

* पाऱ्याविषयीं संस्कृत ग्रंथांत तो 'शिववीर्य' असून **त्याच्या मलांनच सर्व धातु बनल्या आहेत** असें ह्मटलें आहे:—

प्रच्युतश्च रसो धातुर्गृहीतः शूलपाणिना ॥
प्रक्षिप्तो वदने वन्हेः गंगायामपि सोऽपतत् ॥ १ ॥
बहिःक्षिप्तस्तया सोपि परिदंदह्यमानया ॥
संजातास्तन्मलेनैव धातवः सिद्धिहेतवः ॥ २ ॥
सर्वधातुगतं तेजो मिश्रितं यत्र तिष्ठति ॥
तस्मात्सम्मिश्रकः प्रोक्तो नानारूपफलप्रदः ॥ ३ ॥

the medley of their writings more fragments of real chemistry may be gathered than is really supposed." या विषयांवरचे रससिद्धांचे ग्रंथच नीट कळत नाहींत हीच रड आहे! पूर्वे-कडील सिद्धांच्या ग्रंथांविषयींही हेंच खरें आहे. ग्रंथच जर नीट कळत नाहींत, तर त्यांवरून सिद्धि कशी मिळेल?

सोनें बनणें शक्य आहे कीं नाहीं?

याविषयीं अनुभव तर दिलाच आहे; पण अर्वाचीन शास्त्रवेत्त्यांचें मत देखील देतों:—"As to the theoretical possibility of making gold, the great French chemist Dumas, considered that a solution might be found in the doctrine of isomerism; and the great English chemist Sir Humphrey Davy re-fused to pronounce that the alchemists were wrong." Enc. Brit. *Alchemy*, p. 462—465.

किमयेविषयीं संस्कृतमधील किरकोळ उल्लेख.

शेवटीं, किमयेविषयीं स्वतंत्र ग्रंथांशिवाय कांहीं किरकोळ उल्लेखही आढ-ळतात; तेही येथें विशदीकरणार्थ देऊन ठेवतों:—

(१) **यथा सिद्धरसस्पर्शात् ताम्रं भवति कांचनम्** ॥ (योगचिंता)

'सिद्धरस' हा एका विशिष्ट तऱ्हेनें तयार केलेला पारा आहे.

(२) **यथा रसस्पर्शनतोऽयसोऽपि ।**
सुवर्णता स्यात्कमले तवा (था) ते ॥ — (लक्ष्मीहृदय.)

(३) ***हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः** ॥ —(अग्निपुराण.)

* 'हिरण्यगर्भ' हें काय आहे, हें नीट समजत नाहीं. ते एक प्रकारचे मणि होते, किंवा त्याचे मणि करीत असें खालील उल्लेखांवरून वाटतें.

(१) व्यासानें जपमाला कसली असावी हें सांगतेवेळीं ह्मटलें आहे:—(कोठें हें कळलें नाहीं! हा उताऱ्यावरून उतारा घेतला आहे.)

हिरण्यगर्भमणिभि र्जप्तं शतगुणं भवेत् ।

(२) अष्टांगसंग्रहांत वैद्य वाग्भट लिहितो कीं:—

रुक्मगर्भो मणिर्धार्यः चाणक्येष्टो विषापहः ॥ उ. अ. ४०

यावरून हा एखादा मणीच असावा, असें वाटतें.

A Brief Guide to the Celestial Ruby नांवाच्या एका पाश्चा
रसग्रंथाच्या कर्त्यानें याचविषयीं असें लिहिलेलें आहे कीं:—

"We do not, as is sometimes said, profess to cre-ate gold and silver, but only to find an agent which... ... ... is capable of entering in-to an intimate an maturing union with the mercury * of the base metals ... ... Our Art ... only arrogates to itself the po-wer of developing, through the removal of all defect and superfluities, the golden nature which the baser metal possess."

प्रत्येक धातूंत, (हे रसवादी ह्मणतात त्याप्रमाणें) पारा असल्यास, प्रत्ये धातूचें सोनें बनलेंच पाहिजे हें उघड होतें. कारण एकाच पाऱ्याचें कांहि भस्मांशीं संयोग होऊन रुपें व सोनें झालें! (वरील इंग्रजी उतारे *The story of Alchemy* व Enc. Brit. मधील *Alchemy* या विषयावरचा लेख-यांतून घेतलेले आहेत.)

या प्रकारें, रुपें व सोनें बनवितां येणें शक्य (व सिद्ध) आहे हें इक डील अनुभवांवरून व पाश्चात्य आणि पूर्वेकडील रससिद्धांच्या लेखांवरून ज कळून येतें, व त्यावर जर पूर्व व पश्चिम येथील सिद्धांनीं स्वतंत्र ग्रंथ लिहू ठेविलेले आहेत, तर अद्यापि कोणांस त्या ग्रंथांवरून सोनें बनवितां कां ये नाहीं? याविषयीं पाश्चात्य किमयेचे सर्व ग्रंथ धुंडाळून पाहिलेले, व Alchemy वरचा Enc. Brit. मध्यें लेख लिहिलेले गृहस्थ लिहितात कीं:—" W *cannot always make sure of under-standing them;* yet from

* पाऱ्याविषयीं संस्कृत ग्रंथांत तो 'शिववीर्य' असून **त्याच्या मलांनच स** **धातु बनल्या आहेत** असें ह्मटलें आहे:—

प्रच्युतश्च रसो धातुर्गृहीतः शूलपाणिना ॥
प्रक्षिप्तो वदने वन्हेः गंगायामपि सोऽपतत् ॥ १ ॥
बहिःक्षिप्तस्तया सोपि परिदंदह्यमानया ॥
संजातास्तन्मलेनैव धातवः सिद्धिहेतवः ॥ २ ॥
सर्वधातुगतं तेजो मिश्रितं यत्र तिष्ठति ॥
तस्मात्समिश्रकः प्रोक्तो नानारूपफलप्रदः ॥ ३ ॥

the medley of their writings more fragments of real chemistry may be gathered than is really supposed." या विषयांवरचे रससिद्धांचे ग्रंथच नीट कळत नाहींत हीच रड आहे! पूर्वेकडील सिद्धांच्या ग्रंथांविषयींही हेंच खरें आहे. ग्रंथच जर नीट कळत नाहींत, तर त्यांवरून सिद्धि कशी मिळेल?

सोनें बनणें शक्य आहे कीं नाहीं?

याविषयीं अनुभव तर दिलाच आहे; पण अर्वाचीन शास्त्रवेत्त्यांचें मत देखील देतों:—"As to the theoretical possibility of making gold, the great French chemist Dumas, considered that a solution might be found in the doctrine of isomerism; and the great English chemist Sir Humphrey Davy re-fused to pronounce that the alchemists were wrong." Enc. Brit. *Alchemy*, p. 462—465.

किमयेविषयीं संस्कृतमधील किरकोळ उल्लेख.

शेवटीं, किमयेविषयीं स्वतंत्र ग्रंथांशिवाय कांहीं किरकोळ उल्लेखही आढळतात; तेही येथें विशदीकरणार्थ देऊन ठेवतों:—

(१) यथा सिद्धरसस्पर्शात् ताम्रं भवति कांचनम् ॥ (योगचिंता)
'सिद्धरस' हा एका विशिष्ट तऱ्हेनें तयार केलेला पारा आहे.

(२) यथा रसस्पर्शनतोऽयसोऽपि ।
सुवर्णता स्यात्कमले तवा (था) ते ॥ — (लक्ष्मीहृदय.)

(३) *हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः ॥ —(अग्निपुराण.)

* 'हिरण्यगर्भ' हें काय आहे, हें नीट समजत नाहीं. ते एक प्रकारचे मणि होते, किंवा त्याचे मणि करीत असें खालील उल्लेखांवरून वाटतें.

(१) व्यासानें जपमाला कसली असावी हें सांगतेवेळीं ह्मटलें आहे:— (कोठें कळलें नाहीं! हा उताऱ्यावरून उतारा घेतला आहे.)

हिरण्यगर्भमणिभि र्जप्तं शतगुणं भवेत् ।

(२) अष्टांगसंग्रहांत वैद्य वाग्भट लिहितो कीं:—

रुक्मगर्भो मणिधार्यैः चाणक्येष्टो विषापहः ॥ उ. अ. ४०

यावरून हा एखादा मणीच असावा, असें वाटतें.

अर्कषोडशखेंदुभिः ।
(४) तारताम्रसुवर्णानां
कृता त्रिशक्तिमुद्रेयं तीव्रदारिद्र्यनाशिनी ॥ —(**शारदायां**)?

(५) यथा क्षारादिसंतापैः हेम्नोऽधिकतरा द्युतिः ॥—(**आर्ष्टिषेण**).

(ग्रंथ कळत नाहीं).

(६) आत्मानं बन्धयित्वा सृजति सुकनकं (**पारदः पारदोसौ** ॥

—(**रसकौतुक**).

(७) तेनैवाद्भुतमक्षयं सुकनकं कृत्वाथ विद्वत्तमैः ।
देयं दीनजने च दुष्टविमुखं कुर्यात्समस्तं जगत् ॥
—(**नित्यनाथ, वादिखंड**).

'तेनैव' ह्मणजे पारदानें. श्रीशंकराचार्यांनीं ' देयं दीनजनाय च वित्तं' असें ह्मटलें आहे; पण वित्त द्यावें कोठून ?

(८) **सूते सूतवरो वरं सुकनकं (नित्यनाथ, वादिखंड)**

(९) रसेंद्रचिंतामणीच्या शेवटच्या भागांत रसविद्येचें या प्रकारें माहात्म्य गायिलेलें आहेः—

यथा न रोचते किंचित् व्यंजनं लवणैर्विना ॥
रसशास्त्रं विना तद्वत् सर्वशास्त्रं न रोचते ॥ १ ॥
किं दरिद्रस्य विद्याभिः ज्वरजीर्णस्य किं धनैः ।
आरोग्यं अजरा वित्तं अत्रायत्नादवाप्यते ॥ २ ॥
अहेः केनोपनीयेत शास्त्रं रसमहीपतेः ॥
यत्प्रसादेन निर्विघ्नं उत्तरंति भवार्णवम् ॥ ३ ॥
मृषा सरस्वती लक्ष्मी तुल्ये जल्पंति दुर्धियः ॥
एतच्छास्त्रसरस्वत्या यल्लक्ष्मीःखलु जन्यते ॥ ४ ॥

(१०) संस्कृतमधील सर्व वैद्यकीच्या ग्रंथांत, लोहांच्या अध्यायांत सोन्याचें वर्गीकरण करितेवेळीं खालील तीन प्रकार केलेले आहेत. कांहीं ठिकाणीं पांच आहेत, पण बाकीचे दोन खालील तिहींतच अंतर्भूत होतातः—

***रसजं क्षेत्रजं चैव लोहसंकरजं तथा ।**
त्रिविधं जायते हेम चतुर्थं नोपलभ्यते ॥— (रसार्णव, पटल ७वें)

*दुसऱ्या एका ठायीं हीच कल्पना अशी व्यक्त केलेली आहेः—
तच्चैकं रसवेधजं, तदपरं जातं स्वयं भूमिजं, ।
किंचान्यद्बहुलोहसंकरभवं, चेति त्रिधा कांचनम् ॥

'रसजं' ह्मणजे 'रसेंद्रवेधसंजातं,' रसाच्या वेधानें बनविलेलें. ' क्षेत्रजं ' ह्मणजे खाणींतील नेहमींचें, व 'लोहसंकरजं' ह्मणजे धातु मिश्र करून बनविलेलें. क्षेत्रजाशिवाय कृत्रिमरीत्या दोन तऱ्हेनें हेम पूर्वी बनवीत असत; निदान बनवितां येतें अशी त्यांची समजूत असे; ह्मणज सोनें मूलद्रव्य नसून संकरधातु आहे अशी प्राचीन रसवेत्त्यांची समजूत होती.

(११) नित्यनाथानें रसरत्नाकरांत एके ठायीं लिहिलें आहे कीं:—

अभ्रकं मारितं येन पारदं च वशीकृतं ।
द्वारं उद्घाटितं तेन यमस्य धनदस्य च ॥

अभ्रक ज्यानें मारिलें, व पारा ज्यानें वश करून घेतला, त्यानें यमाचें व कुबेराचें द्वार खुलें केलें !!!

रसवेत्त्यांची समजूत.

सर्व धातु पाऱ्याचींच विकृत स्वरूपें असून तीं कमी अधिक मानानें मलरहित असल्याप्रमाणें त्यांस कमी अधिक गुण व मौल्य आलेलें आहे अशी प्राचीन रसवेत्त्यांची व मुनींची समजूत असे. ही कल्पना स्पष्टपणें वाचकांच्या नजरेस येण्यासाठीं मीं दोन ठिकाणची पारदोत्पत्तीची हकीकत येथें तुलनार्थ उतरून घेतों. रामायणासारख्या ग्रंथांत शिवबीजाचा व इतर धातूंचा असा संबंध पाहून कोणांसही आश्चर्य वाटण्यासारखेंच आहे.

रसरत्नसमुच्चय (अध्याय १ ला.)

***शैलेऽस्मिन् शिवयोः प्रीत्या परस्परजिगीषया ।**
संप्रवृत्ते च संभोगे त्रिलोकीक्षोभकारिणि ॥
विनिवारयितुं वन्हिः संभोगं प्रेषितः सुरैः ।
कांक्षमाणैस्तयोः पुत्रं तारकासुरमारकम् ॥
कपोतरूपिणं प्राप्तं हिमवत्कन्दरेऽनलं ।
अपाक्षिभावसंक्षुब्धं स्मरलीलाविलोकिनम् ॥
तं दृष्ट्वा लज्जितः शंभुः विरतः सुरतात्तदा ।
प्रच्युतश्च रसो धातुः गृहीतः शूलपाणिना ॥
प्रक्षिप्तो वदने वन्हेः गंगायामपि सोऽपतत् ।
बहिः क्षिप्तस्तया सोपि परिदंदह्यमानया ॥

*हिमालयावर.

संजातास्तन्मलान्नानाधातवः सिद्धिहेतवः ।
यावदग्निमुखाद्रेतोन्यपतद्भूरिसारतः ॥
शतयोजननिम्नांस्तान्कृत्वा कूपांस्तुपंच च ।

*　　*　　*　　*

सर्वधातुगतं तेजो मिश्रितं यत्र तिष्ठति ।
तस्मात्स मिश्रकः प्रोक्तो नानारूपफलप्रदः ॥

रामायण (१—३६।३७)

पुरा राम कृतोद्वाहः शितिकंठो महातपाः ।
दृष्ट्वा च भगवान्देवीं मैथुनायोपचक्रमे ॥
तस्य संक्रीडमानस्य महादेवस्य धीमतः ।
शितिकंठस्य देवस्य दिव्यं वर्षशतं गतं ॥

*　　*　　*　　*

ततो देवाः पुनरिदं ऊचुश्चापि हुताशनं ।
आविश त्वं महातेजो रौद्रं वायुसमन्वितः ॥
तदग्निना पुनर्व्याप्तं संजातं श्वेतपर्वतं ।
दिव्यं शरवणं चैव पावकादित्यसंनिभं ॥

*　　*　　*　　*

यदिदं क्षुभितं स्थानात् मम तेजोऽह्यनुत्तमं ।
यत्तेजः क्षुभितं ह्यद्य तद्धरा धारयिष्यति ॥
एवमुक्तः सुरपतिः प्रमुमोच महाबलः ।
तेजसा पृथिवी येन व्याप्ता सगिरिकानना ॥

*　　*　　*　　*

प्रणिपत्य सुराः सर्वे पितामहमपूजयन् ।
ते गत्वा परमं राम कैलासं धातुमंडितं ॥
अग्निं नियोजयामासुः पुत्रार्थं सर्वदेवताः ।
देवकार्यमिदं देव समाधत्स्व हुताशन ! ॥
शैलपुत्र्यां महातेजो गंगायां तेज उत्सृज ।
देवतानां प्रतिज्ञाय गंगामभ्येत्य पावकः ॥
गर्भं धारय वै देवि देवतानामिदं प्रियं ।
इत्येतद्वचनं श्रुत्वा दिव्यं रूपमधारयत् ॥

स तस्या महिमां दृष्ट्वा समंतादवशीर्यत ।
समंततस्तदा देवीं अभ्यार्षिंचत पावकः ।
सर्वस्रोतांसि पूर्णानि गंगाया रघुनंदन ।
तमुवाच ततो गंगा सर्वदेव पुरोगमं ।
अशक्ता धारणे देव तेजस्तव समुद्धृतं ।
दह्यमानाग्निना तेन संप्रव्यथितचेतना ।
अथाब्रवीदिदं गंगां सर्वदेवहुताशनः ।
इह हैमवते पार्श्वे गर्भोयं संनिवेश्यतां ।
श्रुत्वा त्वग्निवचो गंगा तं गर्भमतिभास्वरं ।
उत्ससर्ज महातेजाः स्रोतोऽभ्यो हि तदानघ ।
यदस्या निर्गतं तस्मात्तप्तजांबूनदप्रभम् ।
कांचनं धरणीं प्राप्तं हिरण्यमतुलप्रभम् ।
ताम्रं कार्ष्णायसं चैव तैक्ष्ण्यादेवाभिजायत ।
मलं तस्याभवत्तत्र त्रपु सीसकमेव च ।
तदेतद्धरणीं प्राप्य नानाधातुरवर्धत ।
निक्षिप्तमात्रे गर्भे तु तेजोभिरभिरंजितं ।
सर्वं पर्वतसंनद्धं सौवर्णमभवद्वनम् ।
जातरूपमितिख्यातं तदाप्रभृति राघव ।
सुवर्णं पुरुषव्याघ्र हुताशनसमप्रभं ॥

बालकांड, अ. ३७ वा.

रसरत्नसमुच्चयाच्या व रामायणाच्या उताऱ्यांत एकाच शिवबीजाचें वर्णन असून, त्यास ‘ शिवरेतस् ’, ‘ शिवतेजस् ’ असेंही म्हटलेलें आहे. दोन्ही ग्रंथांत या ‘ शिवतेजा ’ चा व नाना धातूंचा संबंध जोडलेला आहे. यावरून, पाऱ्यापासूनच नाना उपाधींनीं सर्व धातु बनल्या अशी पूर्वींची समजूत फार प्राचीन काळापासून इकडे असल्याचे कळून येईल. ‘शिवरेत’ ‘शिवतेज’ वगैरे म्हणजे पाराच होय यांत शंकाच नाहीं. येथें, शिवतेजाप्रमाणेंच; अग्नि, गंगा, वायु, गर्भ वगैरे शब्द सांकेतिक अर्थाचे आहेत. तसेंच, “ सर्वं पर्वतसंनद्ध (श्वेतरूपं) वनं तेजोभिरंजितं सौवर्णमभवत् ” व “ तदाप्रभृति, हे राघव ! हुताशनसमप्रभं सुवर्णं जातरूप मिति ख्यातं ” हीं

वाक्येंही सांकेतिक अर्थानेंच उलगडणारीं असून, तीं रसविद्याविषयक उल्लेखाचीं आहेत. * असो.

यांतील रहस्य कळणें झाल्यास वरील उताऱ्यांचें सांप्रदायिकरीत्याच अर्थ केले पाहिजेत; शब्दार्थ करूं नयेत; कारण याविषयीं असे नियम आहेत:—

(१) **आगमं ज्योतिषं वैद्यं तथा गारुडमेव च ।**
संप्रदायेन गृण्हीयात् शब्दार्थं नैव कारयेत् ॥ १ ॥

(२) **गारुडे धातुवादे च ज्योतिषे वैद्यके तथा ।**
कारणं प्रत्ययस्तत्र; न तु शब्दविचारणा ॥ २ ॥

या नियमांचे अर्थ उघडच आहेत.

---

* या भागाचें भाषांतर, वे. काशीनाथ वामन लेले यांनीं, आपल्या रामायणाच्या भाषांतरांत याप्रकारें केलेलें आहे:–(पृ १२८ । १२९ पहा)

"हे रामा! नंतर धातूंनीं भूषित अशा सर्वोत्कृष्ट कैलासपर्वतावर जाऊन पुत्रोत्पत्ती करितां त्या सर्व देवतांनीं अग्नीची प्रार्थना केली, 'हें देवकार्य आहे, ह्यास्तव, हे महातेजस्वी, हुताशना ! पर्वतकन्या जी गंगा तिचे ठाई तूं शंकराचें तेज नेउन ठेव.' नंतर सांगितलेलें कार्य करण्याविषयीं देवांनां वचन देऊन अग्नी गंगे समीप आला आणि म्हणाला, 'हे देवि ! तूं गर्भ धारण कर! हें देवतांनां प्रिय आहे' अशाप्रकारचें हें अग्नीचें भाषण श्रवण करून गंगेनें दिव्यरूप धारण केलें. तेव्हां तिचें तें सौंदर्य-वैभव अवलोकन केल्याबरोबर तो (पारदरूप शिवतेजोराशि) आसमंतात् भागीं उचंबळून पडला. तेव्हां अग्नीनें चोहोंकडून गंगादेवीला (शिववीर्यरूप पारदानें) अभिषेक केला (म्हणजे गंगेच्या आसमंताद्भागीं अग्नीनें तो पारद ठेविला.) असतां हे रघुनंदना रामा! गंगेचे सर्व ओघ त्यानें भरून गेले. नंतर त्या सर्वदेवाग्रणि अग्नीला गंगा म्हणाली, 'हे देवा, तूं ठेविलेलें हें अत्यंत उग्र तेज धारण करण्यास मी समर्थ नाहीं. त्या तेजोरूप अग्नीच्या योगानें माझ्या शरीराचा अगदी भडका होत असल्यामुळें मला फारच मूर्छा येऊं लागली आहे.' ह्यावर सर्व देवांच्या उद्देशानें हवन केलेल्या द्रव्याचें भक्षण करणारा अग्नि 'ह्या हिमालयाच्या पार्श्वभागीं हा गर्भ ठेव' ह्मणून गंगेला ह्मणाला असतां, त्याचें भाषण श्रवण करून तो अत्यंत उज्वल गर्भ, हे निष्पापा त्या महातेजस्वी गंगेनें आपल्या प्रवाहापासून हिमालयावर नेऊन ठेविला. गंगेपासून निघालेलें तें तेज तापलेल्या सुवर्णासारिखें होतें, आणि ह्मणून ज्या भूप्रदेशावर तें ठेविलें गेलें तो भूप्रदेश अतुल कांतीनें युक्त असें सुवर्ण बनला, व त्या तेजाच्या तीक्ष्णपणामुळें पलीकडे असलेला कांहीं भूप्रदेश (?) ताम्र-

पाऱ्याविषयीं प्राचीन ग्रथांतील उल्लेख.

रा. रा. केसरीकर्ते यांसः—

शैवपरंपरेच्या ग्रंथामधून रसविषयक उल्लेख असतात हें मीं मागें लिहिलेलेंच आहे. त्या प्रमाणें वीरशैवमतांच्या कांहीं ग्रंथांत कांहीं रसविषयक उल्लेख सांपडले. हे आगमग्रंथ शंकराचार्यांहून तर किती तरी प्राचीन आहेत.

परमेश्वरागम व सूक्ष्मागम या दोन्ही ग्रंथांत एकच श्लोक आढळतो, तो दृष्टांताच्या रूपानें घेतलेला आहे. तो असा:—

यथा हि रजतं ताम्ररसयोगात्सुवर्णताम् ।
तथा शिवज्ञानरसात् शूद्रादिः शिवतांव्रजेत् ॥

–व लोह बनून राहिला, त्या गर्भाचा मल कथिल व शिसें बनला, आणि **याप्रमाणें भूमीवर प्राप्त झालेलें तें तेज अनेक धातूंच्या रूपानें वृद्धिंगत झालें.** गर्भ हिमालयावर ठेवितांक्षणी त्याच्या तेजाच्या योगानें रंजित झालेलें तें पर्वतसंबंधी वन सर्व सुवर्णाचें झालें. हे पुरुषश्रेष्ठा राघवा? तेव्हां पासून अग्नीसारखें तेजोरूप असलेलें सुवर्ण **जातरूप** ह्मणून प्रख्यात झालें." यांत सांकेतिक अर्थ दृष्ट्या बऱ्याच चुका आहेत.

यावर रामाश्रमाची टीका अशी आहे कीं (मीं महत्वाचाच तेवढा भाग उतरून घेतलेला आहे)-(गंगा) दिव्यं रूपमधारयत् । स्रोतोरूपं मुक्त्वा इति शेषः । तस्या महिमां दिव्यरूपवैभवं सः ऐश्वरतेजोराशिः पारदः अवशीर्यंत शीर्णः । उत्तमस्त्रीदर्शने रसेश्वरस्य तद्ग्रहणाय उच्चलाद्वियोजनपर्यंतमिति सुप्रासिद्धं । यद्वा सः अग्निः अवशीर्यंत ऐश्वरं तेजस्त्यक्तवानित्यर्थः । अभ्यषिंचतेति रसेश्वरेणेति शेषः स्रोतांसि नाड्यः । ... ...यत् यस्मात् अस्याः निर्गतं तत् तस्मात् गंगागर्भतो निर्गमात् तत्तेजः जांबूनदाकारसुमेरुकन्यापत्त्यत्वात् गंगायास्तप्तजांबूनदं सुवर्णं तेन समप्रभमासीदिति शेषः । अतएव धरणीं प्राप्तं साक्षात्स्वबद्धं धरणीस्थं वस्तु कांचनमकरोत् । तत्समीपवर्तिभूसंस्थं अतुलप्रभं हिरण्यं रजतमकरोत् । तत्तेजः संबधितैक्ष्ण्यादेव तद्व्यवहितभूस्थं वस्तुजातं ताम्रं कार्ष्णायसं लोहं अभिजायत ।...तत्तस्य गर्भस्य मलं त्रपुसीसं च अभवत् । अयं भावः । तैक्ष्ण्यमलगंध (धा) मुक्तेन शुद्धेन स्पर्शता विद्धं स्वर्णं । गंधयुक्तेन विद्धं रजतं । तैक्ष्ण्ययुक्तेन विद्धं ताम्रं लोहं च । मलयुक्तेन विद्धं त्रपुसीसे इति नानाधातुः तद्रूपम् । नच स्पर्शवेधित्वमेतस्य अपिरूपवेधित्वमपत्याह ।

यावर वीरशैवधर्म शिरोमणींत अशी व्याख्या आहे कीं:-

रसविद्धस्य ताम्रस्य, रससंस्पर्कात् ।
सुवर्णतां प्राप्तस्य, न पुनस्ताम्रत्वदशा ॥

याचप्रमाणें बसवपुराणांतही (अ० ३८-८७) याविषयीं असा उल्लेख आहे कीं-

यथा रसस्य संस्पर्शात् ताम्रं भवति कांचनम् ।
तथेशदीक्षया मर्त्यः शिवो भवति निश्चयात् ॥

असो.

कित्येकांचा आक्षेप असा आहे कीं पारा हा पदार्थ व पाऱ्याची विद्या हीं इ. स. ४०० च्या सुमारापूर्वीं हिंदुस्थानांत नव्हतीं, पण ती त्यांची चूक-खास चूक आहे. सुमारें पहिल्या शतकांतल्या नागार्जुनाच्या गोष्टीवरून व आणखी इतर पुराव्यांवरून इ. स. पूर्वीं हजारों वर्षांपासून

-यांत तैक्ष्ण्य, मल, व गंधरहित शुद्ध स्पर्शानें विद्ध झालेला पारा स्वर्ण झाला, गंधानें विद्ध रुपें झाला, तैक्ष्ण्यानें विद्ध तांबें व लोखंड झाला, मलानें विद्ध कथिल व सीस झाला, या प्रकारें नाना धातुरूप तो बनला, असे यांत झटलेलें आहे. यांत रसवेत्त्यांची उपपत्ति दिलेली आहे.

पाश्चात्य प्राचीन रसवेत्त्यांची या बाबतींत काय समजूत होती, हें डब्ल्यू ऑस्ट-वॉल्ड यांनींही आपल्या the principle of in Organic chemistry या ग्रंथांत दिलेलें आहे. या ग्रंथाचें ए. फिंडले यांनी इंग्रजींत भाषांतर केलेलें आहे. (भाषांतराची तिसरी प्रत, १९०८ सालची पाहा.) पाऱ्यावर लिहितेवेळीं (पृष्ठ ६६८ मध्यें) ते लिहितात कीं:-"In the older history of Chemistry, while the experimental conception of a chemical clement was not yet developed, mercnry was regarded as the type of the *metallic character*; this found expression in the fact that mercury was regarded as a constituent of all metals. the endeavours to prepare gold and silver from baser metals, which an connected with this tiew, had geunerally for the first purpose, the "fixing" of the mercury i. e. making it nonvolatile." या उताऱ्यानें पाश्चात्य प्राचीन रसवेत्त्यांचीं काय मतें होतीं व त्यांचें ध्येय काय होतें हें कळून येईल.

ही विद्या हिंदुस्थानांत आहे; इतकेंच नव्हे, तर पाश्चात्य Alchemy वरचे (म्ह. रसविद्येवरचे, किमयेवरचे) ग्रंथ व आपल्याकडचे ग्रंथ हे ताडून पाहिले असतां, ही विद्याही पूर्वेकडूनच पश्चिमेकडे गेली असें म्हणावें लागतें. पारा हा पदार्थ बाहेरचा असेल; पण तो पूर्वीं एकें काळीं हिमालयाच्या आसपास कोठें तरी मिळत असल्याखेरीज त्यास 'शिव-वीर्य' हें नांव खास आपल्या लोकांनी दिलेलें नाहीं असें वाटतें. हेमचंद्र नांवाच्या जैन ग्रंथकारानें परिशिष्टपर्वांत पाऱ्याचा सहज असा उल्लेख केलेला आहे कीं:-

लब्धः किंचिन्निधानं वा रसो वा साधितस्त्वया ॥

सर्ग ३-१९

हा उल्लेख इ. पू. चौथ्या किंवा पांचव्या शतकांत होऊन गेलेल्या जंबूस्वामी नांवाच्या एका जैन केवलीच्या हकीकतीविषयीं लिहितांना दिलेला आहे. असो. याहीविषयीं काळाचा संशय राहतोच. आमच्या पुराण ग्रंथांतून कोठें पाऱ्याचा उल्लेख आहे काय हें पाहत असतां गरुडपुराणांत असा उल्लेख मिळाला:-

श्वेतकाचसमं तारं हेमांशशतयोजितम् ।
रसमध्ये प्रधार्यंत मौक्तिकं देहभूषणम् ॥ ३८ ॥

मुक्ताफलपरिक्षा नाम, अ. ६९

दुसऱ्याही एके ठिकाणीं अंत्यकर्मप्रकरणांत पाऱ्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

पाश्चात्य रसग्रंथ व इकडील रसग्रंथ यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असें समजून येतें कीं, पाश्चात्य रसग्रंथांचीं जीं सध्यां इंग्रजींत भाषांतरें झालीं आहेत त्यांवरून पाहतां, आपल्याकडील ग्रंथांतील परिभाषाच त्यांत असल्यामुळें, ती सध्याच्या युरोपीय रसायनवेत्त्यांस समजत नाहीं. ती परिभाषा मुद्दाम आपल्या व तिकडच्या लोकांनीं अशीच गूढ व चमत्कारिक ठेविलेली आहे. आम्हीं येथें तुलनेसाठीं कांहीं शब्द दोहोंकडचे देतों त्यांचा तिकडे कांहीं अर्थच होत नाहीं. इकडची परिभाषा ठाऊक असली तर होतो. तीं अशीं:-

Mercury of the Sages. हें भलतेंच भाषांतर होय!

सिद्धरस—'सिद्धरत' म्हणजे आमच्याकडे, एका विशिष्ट तऱ्हेनें तयार केलेला पारा, असा अर्थ होतो. 'सिद्धांचा रस' असें भाषांतर तिकडच्या लोकांनीं केलेलें आहे. सिद्ध रसाचें लक्षण असें दिलें आहे कीं:—

योऽग्निसहत्वं प्राप्तः संजातो हेमतारकर्ता च ।
बद्धो रसश्च ज्ञेयः विधिना सिद्धिप्रदो भवति ॥

कालिकारहित ताम्र—Copper withonta Shadonw. तांबें कांहीं रासायनिक क्रियेनें अग्नींतही काळें न पडण्याची युक्ती आमच्या रसग्रंथांत आहे; असें झालें म्हणजे त्या तांब्यास 'कालिकारहित ताम्र' असें ह्मणतात.

रस—Water of metalo.

रसास तो रसरूप असल्यामुळें आपल्याकडे 'रस' असें ह्मटलें आहे. 'रसनात्सर्वधातूनां रस इत्युच्यते बुधैः ।' अशीही त्याची व्युत्पत्ति दिलेली आहे. 'रसोहमप्सु कौंतेय' यांत देखील 'सर्व प्रवाही पदार्थांमध्यें मीं श्रेष्ठ असा पारा आहे' असाच भगवंतांचा आशय असावा असें वाटतें. वाल्मीकि, ऋष्यशृंग, मांडव्य व वसिष्ठ यांस जर पारा व त्याची विद्या इकडे माहीत होती तर त्यांच्या नंतर शेंकडों वर्षांनीं होऊन गेलेल्या श्रीकृष्णास पारा माहीत नव्हता हें शक्य दिसत नाहीं. 'पाण्यांतील मीं रस आहे' असा जो वरील वाक्याचा अर्थ कारितात, त्यांत स्वारस्यच नाहीं. एका जातींच्या पदार्थांतील सर्वोत्कृष्ट वस्तु मीं आहे, असें सांगण्याकडे नेहमीं भगवंतांचें लक्ष असतें. 'पांडवानां धनंजयः' 'वृष्णीनां वासुदेवोऽस्थि' वगैरे वाक्यांत हेच तत्व गोविलें आहें असो.

रसमणि—Hydrolith.

Hydrolith ह्मणजे 'पाण्याचा दगड' होय. सिद्ध रस करून तो पुढें दगडासारखा घट्ट व कठिण बनविला ह्मणजे त्यास 'रसमणि' असें आपल्याकडे ह्मणतात.

पक्वबीज—Perfcehed Gold.

या प्रमाणें इतर अनेक पारिभाषिक शब्द आहेत. त्यांचा विस्तार येथें करावयाचा नाहीं सध्यां इतिहासाचा विषय असल्यामुळें रसविद्या व तीतील शब्द मूळचे आपल्याचकडचे असल्यामुळें, तिकडचीं त्यांचीं सध्यांचीं भाषांतरें चुकीचीं व काल्पनिक झालीं आहेत. या एका गोष्टींवरूनच आपल्या भारत वर्षांतूनच ही विद्या पाश्चात्य देशांत २०००—३००० हजार वर्षांपूर्वीं पसरली हें कळून येतें.

ब्रह्मपुराणांत गौतमीमाहात्म्य एक बराच प्राचीनतर भाग आहे; त्याच्या ९३ व्या अध्यायांत खालील श्लोक आहेत:—

महतां दर्शनं ब्रम्हन् जायते नहि निष्फलं ।
द्वेषादज्ञानतो वापि प्रसंगाद्वा प्रमादतः ॥ ३८ ॥
अयसः स्पर्शसंस्पर्शौ रुक्मत्वायैव जायते ॥ ३९ ॥

बऱ्याच प्राचीन काळापासून तांत्रिक लोकांनीं रसविद्येचा अभ्यास भरतखंडांत केला होता याविषयीं आतां प्रो. रॉय यांचीही खात्री झालेली आहे. ते लिहितात:—

"The existmec of a vast ancient Tantric literahnre with alchlmy as a component part has now becn placed bey andt doub" *His of Hanidn cheniestry* Vol II, Intrs, p. 42.

कुब्जिकामत उर्फ कुब्जिकातंत्र नांवाच्या एका प्राचीन तंत्रग्रंथांत रस क्रियेचे अनेक उल्लेख आहेत. या तंत्राची गुप्त लिपींत लिहिलेली एक प्रत इ. स. ६०० च्या सुमारची मिळाली. वरील तंत्रांत एकेठाई वाक्य आहे कीं:—

पालेन विहितो वेधः किं व्यंजतो न विध्यते ॥
रसाविद्धं यथा ताम्रं न भूयस्ताम्रतां व्रजेत् ॥ *

---

* **परापरप्रकाशिका** नामक शैव ग्रंथांतही असाच उल्लेख आहे:—

रसविद्धं यथा ताम्रं ताम्रभावाद्विमुच्यते ॥
सुवर्णेन सहैकत्वं गतं तद्यानि हेमताम् ॥
एवं स शिवतां प्राप्तो न पुनः पशुतां व्रजेत ॥

अलीकडे चाणक्याचें मूळ अर्थशास्त्र मिळालेलें असून, तें म्हैसुरास छापत आहे. हा ग्रंथ ६००० चा असून दंडीनें उल्लेख केलेला हाच चाणक्याचा ग्रंथ होय. याचें थोडेसें भाषांतर म्हैसूरचे पंडित रुद्रपटण शामशास्त्री यांनीं केलेलें मजकडे पाठविलें होतें हा ग्रंथ इ. पू. ३२९ च्या सुमाराचा खास आहे. यांत आमच्या धातुशास्त्राचे व पारदविद्येचे अनेक उल्लेख आहेत;–

यांत कोशाध्यक्षाच्या ११ व्या अध्यायांत मोतीं, रत्नें, सुगंधी द्रव्यें चर्में, कांबळीं, रेशमी व कापसाची वस्त्रें वगैरेंचीं लक्षणें सांगितलेलीं असून, तीं उत्कृष्टपणें कशीं संग्रहास ठेवावी याचें वर्णन आहे.

आकरकर्मांतप्रवर्तनं नांवाच्या १२ व्या अध्यायांत खनिजशास्त्र व खनिजद्रव्यें यांचीं माहिती आहे. त्यांत प्रथमच '**शुल्बधातुशास्त्र**' व 'रसपाक' जाणणाऱ्या लोकांचा राजानें संग्रह करावा असें सांगितलें आहे. पं. शामशास्त्री यांनीं 'रसपाक' याचा अर्थ 'the art of distillation and con bens ahion of mereury' असा केलेला आहे. टीकाकारानें शाकलादिकांच्या धातुशास्त्रांचा उल्लेख केलेला आहे. नंतर सुवर्ण, शिलाजतु, मिश्रधातु (ores), रूप्यधातु (silver ores), त्यांचें सत्वपातन, ताम्र, शीसधातु, त्रपु, तीक्ष्ण, वैक्रांत, मणिधातु, इत्यादिकांचें वर्णन आहे. या अध्यायांत दोन तीन ठिकाणीं पारदविद्येचे उल्लेख आहेत. आशा कांहीं सुवर्णधातु (gold-ores) सांगितल्या आहेत कीं, "**प्रतीवापार्थस्त (त) स्ताम्ररूप्यवेधनाः**" ज्या तांबें व रुपें यांना वेध करूं शकतात. यावर टीकाकारानें असा खुलासा केलेला आहे कीं:– "**ताम्रस्य रूप्यस्य वा हेमत्वापादनाः।**"

सुवर्णाध्यक्षावर १३ वा अध्याय स्वतंत्र आहे. यांत सोन्याचे प्रकार शुद्धाशुद्धता, प्रत्येकाचीं लक्षणें, तें शुद्ध करण्याच्या रीती, वगैरे विषय आहेत. पुढील अध्यायांत सोनारांची कामें वगैरे दिलीं आहेत.

एके ठाई पाऱ्याचा पुनः आसा उल्लेख आलेला आहे कीं:–

प्रातिलेपिना रसेन द्विगुणाभ्युक्तं।
तपनीयं शुकपत्रवर्णं भवति।
द्रवीकृत बलेन (?) कृष्णायसेनेति केचित्।
तेनैव हिंगुलकसहितेनेत्यपरे।

यांवर टीका अशी आहे:—

"रसेन पारदेन। Some say 'with melted black iron' Others say 'with melted black iron mixed with versnition.' Rasa is meacury-commentary." असें.

इ. पू. ३२९ च्या सुमारास होऊन गेलेल्या चाणक्याच्या ग्रंथांत जर पाऱ्याचे, पाऱ्यांच्या वेधकत्वाचे व एकंदर धातुशास्त्राचे विशेष उल्लेख आहेत; व टीकाकारांच्या मतें जर तेव्हां **शाकला** दिकांचीं धातुशास्त्रें व रत्नशास्त्रें होतीं, तर याही पूर्वीं कित्येक शतकें या विद्या इकडे प्रचलित असल्या पाहिजेत.

गरुडपुराणांत मणिपरीक्षेच्या अध्यायांत कांहीं प्रसंगीं व्याडि, व व्यास यांचीं नांवें आलीं आहेत. व्याडि हा मोत्यांच्या प्रकरणांत आलेला आहे; व व्यास हा रत्नपरीक्षेंत आलेला आहे. याप्रकारें पुष्कळ काळापासून धातुशास्त्र, रसविद्या, मणिपरीक्षा वगैरे विषयांचे आमचे लोक अध्ययन करीत आहेत.

प्रकरण ५ वें.

रसरत्नसमुच्चय.

रसरत्नसमुच्चय हा ग्रंथ आनंदाश्रम ग्रंथावलींत प्रसिद्ध झालेला आहे. हा प्रसिद्ध वैद्य वाग्भटाचा आहे अशी कांहीं जणांची समजूत आहे; पण डॉ. गर्दे यांचें मत असें आहे कीं वैद्य वाग्भट व या ग्रंथाचा कर्ता हें भिन्न असून रसरत्नसमुच्चय हा ग्रंथ इ. स. च्या आठव्या शतकाहून अर्वाचीन आहे, तो किती अर्वाचीन आहे! हें पुढें पाहूं. वैद्यवाग्भट हा

त्याहून बराच प्राचीन ह्मणजे इ. स. ३००–४०० च्या सुमाराचा असावा असें डॉ. गर्दे यांचें मत आहे. (वाग्भट, प्रस्तावना, पहा). ग्रंथारंभींच ग्रंथकारांनें आपल्या पूर्वींच्या रससिद्धांची नांवें दिलीं आहेत; तीं अशीं,—

आ[1]दिमश्चंद्रसेनश्च लंकेशश्च विशारदः ॥
कपाली मत्तमांडव्यौ भास्करः शूर (सूर) सेनकः ॥ २ ॥
रत्नको[2]शश्च शंभुश्च सा[3]त्विको नरवाहनः ॥
इंद्रदो गोमुखश्चैव कं[4]बलिर्व्याडिरेवच ॥ ३ ॥
नागार्जुनः सुरानंदो नागबोधिर्यशोधनः ॥
खंडः कापालिको ब्रह्मा गोविंदो लं[5]पंको हरिः ॥ ४ ॥
सप्तविंशतिसंख्याकाः रससिद्धिप्रदायकाः ॥
रसांकुशो भैरवश्च नंदी स्वच्छंदभैरवः ॥ ५ ॥
मंथानभैरवश्चैव का[6]कचंडीश्वरस्तथा ॥
वासुदेव ऋषि[7]शृंगः क्रियातंत्रसमुच्चयी ॥ ६ ॥
रसेंद्रतिलको योगी भालुकी मै[8]र्थिलाव्हयः ॥
महादेवो नरेंद्रश्च र[9]त्नाकरहरीश्वरौ ॥ ७ ॥
एतेन क्रियतेऽन्येषां तंत्राण्यालोक्य संग्रहः ॥
रसानामथ सिद्धानां चिकित्सार्थोपयोगिनां ॥ ८ ॥
सुद्धता सिंहं[10]गुप्तस्य रसरत्नसमुच्चयः ॥ अध्याय १ ला.

१ आगमः । ‘आदिम’ ह्मणजे ‘आदिदेव महेश’ होय; किंवा ‘आदिम’ नावांचा कोणीं अगदीं प्रथम रसतंत्र कर्ता असावा. ‘आगम’ नांवाचा ग्रंथकार असणें शक्य दिसत नाहीं. ‘आगम’ हें ग्रंथांचें नांव असतें. २ रत्नघोषश्च । ३ तात्विको । या ठाईं ‘तथैकः’ असाही पाठ आहे, पण त्यायोगें २७ रससिद्धांची संख्या भरत नाहीं. ४ कपिलो व्यालिरेव च । ५ लंबको, लंपटो । ६ काकश्चंडीश्वर । ७ ऋष्यशृंगः । ८ मर्थलाव्हयः । ९ वासुदेवो हरीश्वरः । १० संघगुप्तस्य ।

पुढें ६ व्या अध्यायांतही * २७ रससिद्धांचीं नांवें आलेलीं आहेत, तीं अशीं:—

व्या[1]ल्याचार्यश्चंद्रसेनः सुबुद्धिर्नरवाहनः ॥
नागार्जुनो रत्नघोषः सुरानंदो यशोधनः ॥ ५७ ॥
इंद्र[2]धूमश्च मांडव्यः चं[3]र्पटिः सूरसेनकाः ॥
आ[4]दिमो नागबुद्धिश्च खंडः कापालिको[5] मतः ॥ ५८ ॥
कामा[6]रिस्तांत्रिकः शंभुः लंको[7] लंपटशारदौ ॥
बाणासुरो मुनिश्रेष्ठो गोविंदः कपिलो बलिः ॥ ५९ ॥
एते सर्वेतु राजेंद्रा[8] रससिद्धामहाबलाः ॥ ६० ॥
सप्तविंशतिसंख्याका रससिद्धिप्रदायकाः ॥
वंद्याः पूज्याः प्रयत्नेन ततः कुर्याद्रसार्चनं ॥ ६१ ॥

* हा ‘शिष्योपनयन’ नांवाचा रसरत्नसमुच्चयांतील बहुतेक संपूर्ण अध्याय (श्लोक १–६६), नित्यनाथाच्या **रसरत्नाकरा** च्या **वादिखंडां**तील प्रथमोपदेशांतून उतरून घेतलेला आहे. (उपदेश १ ला, ९–७३ पहा). हें **वादिखंड** फार प्रयासाने आह्मांस मिळालें, वेंकटेश्वरप्रतींत हे खंड छापलेलें नाहीं. या **वादिखंडांत** अथपासून इतिपर्यंत धातुवाद ऊर्फ किमयाच आहे. हा अत्यंत अपरूप ग्रंथाचा भाग अप्रसिद्धच आहे. पूर्वींच्या २७ रससिद्धांचीं नांवें **रसरत्नाकरांत** अशीं दिलीं आहेत. (६३–६८)

सर्वेषां रसं[1]सिद्धानां नाम संकीर्तयेत्सदा । व्याल्याचार्यश्चंद्रसेनः सुबुद्धिर्नरवाहनः ॥ नागार्जुनो रत्नघोषः सुरानंदो[2] यशोधरः । इंद्रधूमश्च मांडव्यो चर्पटः शू (सू) रसेनकः ॥ आडमो नागबुद्धिश्च खांडिको[3]पंडिको हरः । कापाडी सात्विकः शंभुः लंको लंपट शारदौ ॥ बाणासुरो मुनिश्रेष्ठो गोविंदः कपिलो बलिः । एते सर्वे तु भूपेंद्राः रससिद्धिप्रदायकाः ॥ चरंति सर्वलोकेषु नित्यं भोगपरायणाः । सप्तविंशतिसंख्याका रससिद्धिप्रदायकाः ॥

१ व्याड्याचार्यः । २ इंद्रद्युम्नश्च । ३ चर्पटी शूर । ४ आगमो; आडमो, आढमो । ५ कापालिकः परः । ६ कामारिः सात्विकः; । कामारिस्तात्विकः । ७ लंकालंपट । ८ सूतेंद्राः ।

१ रसविद्यानां । २ यशोधरः । ३ खंडः कापालिकोऽपरः । हाच खरा पाठ असावा.

सत्तावीस रससिद्ध अ. १ प्रमाणें	सत्तावीस रससिद्ध अ. ६ प्रमाणें
१ व्याडि	१ व्याडि
२ चंद्रसेन	२ चंद्रसेन
३ नरवाहन	३ नरवाहन
४ नागार्जुन	४ नागार्जुन
५ रत्नको (घो) श	५ रत्नघोष
६ सुरानंद	६ सुरानंद
७ यशोधन	७ यशोधन
८ इंद्रद	८ इंद्रधूम (इंद्रद्युम्न)
९ मांडव्य	९ मांडव्य
१० शू (सू) रसेनक	१० शू (सू) रसेनक
११ आदिम	११ आदिम
१२ नागबोधि	१२ नागबुद्धि
१३ खंड	१३ खंड
१४ कापालिक	१४ कापालिक
१५ तात्विकः सात्विक	१५ सात्विकः तात्विक (तांत्रिक)
१६ शंभु	१६ शंभु
१७ लंकेश	१७ लंक
१८ लंपट (क)	१८ लंपट
१९ गोविंद	१९ गोविंद
२० कपिल (कंबली)	२० कापिल
२१ विशारद	२१ सुबुद्धि
२२ कपाली	२२ चर्पटि
२३ भास्कर	२३ कामारि
२४ गोमुख	२४ शारद
२५ ब्रह्मा	२५ बाणासुर
२६ मत्त	२६ मुनिश्रेष्ठ
२७ हरि	२७ बली

वरील यादींत २० नांवां पर्यंत सर्व नांवें बहुतेक सारखीं आहेत; पुढील सात ७ नांवें मात्र या दोन्हीं यादींत जमत नाहींत. कदाचित तीं एकाच व्यक्तींची दोन दोन नांवे असतील; पण प्रमाणें मिळेपर्यंत आम्हांस

तसें मानतां येणें शक्य नाहीं. असो. वरील सत्तावीस रससिद्धांच्या नांवाखेरीज पहिल्या अध्यायाच्या श्लोक ५ ते ९ पर्यंत ग्रंथकारानें आणखी कांहीं रसतंत्रकारांचीं नांवें दिलीं आहेत. तीं अशीं:—

१ रसांकुश	११ मालुकी
२ भैरव	१२ मैथिलार्य (मर्यलार्य)
३ नंदी	१३ महादेव
४ स्वच्छंद भैरव	१४ रत्नाकर
५ मंथानभैरव	१५ हरीश्वर
६ काकचंडीश्वर	
७ वासुदेव	
८ ऋषिशृंग	
९ क्रियातंत्रसमुच्चयी (?) *	
१० रसेंद्र तिलक	

* हें स्वतंत्र नांव नसून "सर्व क्रियातंत्रांचा (prachical treahises) समुच्चय करणारा" असा अर्थही होऊं शकेल.

या १९ नांवां खेरीज या ग्रंथामध्यें अनेकठाईं इतर ग्रंथकारांचेही उल्लेख आहेत; व वरील १९ शिवाय इतर ग्रंथकारांचेही मत घेतलें आहे असें (१–८) या श्लोकावरूनही कळून येतें, वरील पंधराशिवाय ग्रंथांत आणखी कोणत्या ग्रंथकारांचा व ग्रंथाचा उल्लेख येतो हें आपण पाहूं:—

१६ भैरवनाथ	२६ सोमसेनानी
१७ भैरवानंदयोगी	२७ स्वर्वणाख्यलोकनाथ
१८ लोकनाथ	२८ ब्रह्मज्योतिर्मुनींद्र
१९ प्राणनाथ	२९ करवालभैरव
२० श्रीकृष्णदेव	३० मृगचारी
२१ सिद्धनाथ (१७--११६)	३१ सोमसत्य
२२ बुद्धमुनि (२०–१०७)	३२ नासत्य, दस्रौ
२३ श्रीनित्यनाथ (२७–११९)	३३ त्रिपुरा
२४ आस्तिक (२९-८३)	३४ चंपकारण्यवासी पूर्णामृतयोगी
२५ सोमदेवसूत्र (३–४२)	३५ सिंघण

या ६२—६३ ग्रंथकारांच्या नांवाखेरीज कांहीं ग्रंथांचीं प्रत्यक्ष नांवें ही दिलीं आहेत, तीं अशीं:—

१ रसार्णव (११–१०)
२ देवीशास्त्र (११–१२७)
३ रसरत्नाकर (५–५७)
४ रससिंधु (५–१११)
५ रामराजी (५–१४१)

रसरत्नाकर हा ग्रंथ नित्यनाथ सिद्ध यानें लिहिला असून त्यांतलि उतारे (५–५७) मध्यें घेतलेले आहेत; पण आनंदाश्रमांत छापलेल्या प्रतीच्या भूमिकेंत, हा ग्रंथ रसरत्नसमुच्चयापेक्षां अर्वाचीन आहे हें गृहीत धरून वरील उतारा क्षेपक असावा असें दर्शविलें आहें; पण श्रीनित्यनाथाच्या रसरत्नाकरांतून उतारे घेतले एवढेंच नव्हे, तर दुसऱ्या एका ठाईं (२७) ग्रंथकर्त्यानें श्रीनित्यनाथाच्या नांवाचाही उल्लेख (कामेश्वरमोदका विषयीं लिहीत असतां) असा केलेला आहे:—

सर्वेषां हितकारको निगदितःश्रीनित्यनाथेनवै ॥

या दुहेरी उल्लेखांवरून रसरत्नसमुच्चयापेक्षां **रसरत्नाकर** व त्याचा कर्ता **श्रीनित्यनाथ** हे प्राचीनतर होत हें कळून येईल. याच नित्यनाथ सिद्धानें **कामरत्न** नामक दुसरें एक तंत्र रचिलें आहे. याचा काळ कोणता होता हें मात्र कळतनाहीं ‘रसरत्नाकर’ व ‘कामरत्न’ हीं दोन्हीं तंत्रें आतां छापून प्रसिध्द झालेलीं आहेत.

‘रससंहिता’ व ‘रसनिगम’ हे त्या त्या ठिकाणच्या उल्लेखांवरून पहातां स्वतंत्र त्या नांवाचे ग्रंथ ह्मणून उल्लेखिल्या प्रमाणें दिसत नाहींत. दोन्हींचाही सामान्य नामाप्रमाणें ‘रसतंत्र’ किंवा ‘रसशास्त्र’ या अर्थी उपयोग केलेला असावा, असें मला तरी वाटतें. पहिलीं पांच मात्र ग्रंथांचींच नांवें आहेत, हें खास.

रसशास्त्रावर पूर्वीं जें नानातऱ्हेचें वाङ्मय पसरलेलें होतें, त्यांत कांहीं संहितारूप ग्रंथ, कांहीं सूत्रग्रंथ, कांहीं वार्तिकें, व कांहीं निघंटु असावेत असे खालील उल्लेखांवरून कळून येईल. रसशालेमध्यें कसे लोक ठेवावेत हें ग्रंथकार सांगतात:—

रससंहितयो वैद्या निघंटुज्ञाश्च वार्तिकाः ।
सर्वदेशजभाषाज्ञाः संग्राह्यास्तेपि साधकैः ॥ २४ ॥ अ० ७ ॥

आतां आपण कांहीं ग्रंथकारांविषयीं याच ग्रंथांत कांही विशेष मिळतें काय हें पाहूं.

सिंघण व भैरवानंद.

इयं हि पोटली प्रोक्ता सिंघणेन महीभृता ।
सिंघणस्यापि निर्दिष्टा भैरवानंद योगिना ॥
लोकनाथोक्तपोटल्या उपचारा इह स्मृताः ॥ १६–१३१ ॥
रसः क्रव्यादनामायं प्रोक्तो मंथानभैरवे ।
सिंघणक्षोणिपालस्य सूरिमांसप्रियस्य च ॥ १६–१४३ ॥

यावरून सिंघणराजाच्यावेळीं लोकनाथ व भैरवानंदयोगी हे होते हें कळून येईल; कदाचित् भैरवानंदयोगी हे लोकनाथसिद्धांचे शिष्यही असूं शकतील. भैरवानंदयोग्यांवर सिंघणराजाची फार बहाल मर्जी होती असें दिसतें; कारण खालच्या उल्लेखांत त्यानें भैरवानंदयोग्यास एक गांव इनाम दिला असें वर्णन आहे:—

दिष्टो ग्रामं समासाद्य भैरवानंदयोगिना ॥ १६–१४३ ॥

‘मंथानभैरव’ हा भैरवानंदयोग्यानें केलेला ग्रंथ असावा असें वरील उल्लेखावरून वाटतें.

वासुदेवाला “**मुनीः श्रीवासुदेव**” असें ह्मटलें आहे. पथ्यांत ककारादिनिषिद्ध पदार्थ दोन ग्रंथातून सांगितले आहेत (१) देवीशास्त्रातून व (२) श्रीकृष्णदेवोदिद ग्रंथांतून. श्रीकृष्णदेवोदित ग्रंथ कोणता हें कळत नाहीं. वासुदेव व श्रीकृष्णदेव हे एकच असतील काय?

रसवैद्यक व साधें वैद्यक यावरचें वाङ्मय बऱ्याच प्राचीन काळापासून इकडे प्रचलीत होतें. रसार्णव हा ग्रंथ नागार्जुनापेक्षां (इ. स. १००)

प्राचीनतर आहे. व्याडि हा ग्रंथकार इ. पू. ४०० च्या सुमाराचा होता. नासत्य किंवा दस्रसंहिता, भालुकीचा ग्रंथ; भास्कर उर्फ भानूचा ग्रंथ, शंभूच्या नांवावरचा ग्रंथ, (देवीशास्त्र) असें देवतांपासून आलेले आगमग्रंथ याहून प्राचीनतर असावेत असें वाटतें. (२०-१०७ मध्यें) खगेश्वररस म्हणून बुद्धमुनींच्या नांवावर एक प्रयोग दिलेला आहे. यावरून बुद्धमुनींचा (इ. पू. ५००) एखादा वैद्यकावर ग्रंथ होता, असें दिसतें. याहूनही प्राचीनकाळी रसवैद्यकाचा इकडे उगम झालेला असावा असें वाटण्यास आणखीही कारणें मिळतात. (२९-८३ मध्यें.) आस्तिकोक्त एक तेल दिलेलें आहे हें तेल विषकल्पांत दिलें आहे; यावरून विषशास्त्रावर आस्तिकानें कांहीं तरी लिहिलें होतें असें दिसतें. हा आस्तिक पांडवांच्या नंतरचा जो वैशंपायनराजा त्याच्या वेळेस होऊन गेला असें भारतावरून कळतें. हे दोन्हीं एकच असावेत. भारतकालीन काश्यप मांत्रिकाचे सर्पशास्त्रांतील कांहीं उतारे भविष्यत्पुराणांतलि पाहिल्या भागांत दिलेले आहेत यावरून आस्तिक व काश्यप यांनीं सर्पविद्येचा अभ्यास केलेला होता हें कळून येते. शिवाय, या सर्पविद्येचा उल्लेख वैदिक ग्रंथामधूनही आढळतो यावरून पांडवांच्या पूर्वींपासूनच या सर्पविद्येचा अभ्यास वैदिकऋषि व मुनि करीत असावेत हें उघड होतें. पांडवकालीन गर्गाचार्यही वैद्यकांत प्रवीण असावा असें दिसतें; कारण एकेठाईं त्याविषयीं असा उल्लेख आहेः-

उक्तं श्रीगिरिशेन कालयवनोद्भूत्यै पुरा तत्पितुः ॥ २६-४० ॥

कालयवनासारखा बलवान् पुत्र निपजण्यासाठीं गर्गाचार्यास शंकरानें एक वृष्य प्रयोग सांगितला असें म्हटलें आहे. या सर्व उल्लेखांवरून पहातां गर्ग, आस्तिक, कश्यप वगैरे पांडवकालीन व्यक्तींचे वैद्यकावर ग्रंथ पूर्वी उपलब्ध असावेत असें अनुमान होतें. यामुळें डॉ. गर्दे यांनीं रसवैद्यकाचा प्रारंभ इ. स. ४०० हा जो धरिला आहे तो चुकीचा आहे असें मानणें भाग पडतें.

सोमदेव—हा राजा होता असें 'सोमदेवभूभृत्' 'सोमदेवसेनानी' वगैरे जे प्रयोग आढळतात त्यावरून कळून येतें. सोमदेवराजा व त्याचा सेनापती या दोघांनींही रसवैद्यकावर ग्रंथ लिहिलेले होते असें वाटतें. सोमदेवसेनानी हें फक्त सोमदेवासच उद्देशून म्हटलें असेल तर सोमदेवाचा वेगळा सेनापती गृहीत धरावा लागत नाहीं. या सोमदेवानें बरींच रसशास्त्रें[१] पाहून रस यंत्रांविषयीं एखादा ग्रंथ लिहिला होता असें वाटतें:—

> **रसनिगमप्रमहाब्धेः सोमदेवः समंतात् ।**
> **स्फुटतरपरिभाषानामरत्नानि हृत्वा ॥**
> **व्यरचयदतियत्नात्तैरिमां कंठमालां ।**
> **कलयति भिषगद्यो मंडनार्थं समायां ॥ ८-८९ ॥**
> **अथ यंत्राणि वक्ष्यंते रसतंत्राण्यनेकशः ॥**
> **समालोक्य समासेन सोमदेवेन सांप्रतं ॥ ९-१ ॥**

या उल्लेखांवरून कोणास असें वाटण्याचा संभव आहे कीं रसरत्नसमुच्चय हा ग्रंथ वाग्भटानें लिहिला नसून सोमदेवानें लिहिला पण रसरत्नसमुच्चयांत पूर्वग्रंथांतलि जसेचे तसेच उतारे कांहीं स्थळीं घेतलेले असतात हें लक्षांत ठेविलें म्हणजे (९-१) हा श्लोक मूळच्या सोमदेवाच्या ग्रंथातलिच असावा, असें कळून येईल. सोमदेव हा रसयंत्रवेत्ता म्हणून प्रसिद्ध होता व तो रसरत्नसमुच्चयकाराहून प्राचीनतर होता, हें खालील नाभियंत्राविषयींच्या उल्लेखांवरून कळून येईल:—

> **नंदी नागार्जुनश्चैव ब्रह्मज्योतिर्मुनीश्वरः ।**
> **वेत्ति श्रीसोमदेवश्च नापरः पृथिवीतले ॥ ९-६५ ॥**

या पद्यांत कदाचित् कालानुक्रमही असण्याचा संभव आहे. तसा जर कालानुक्रम यांत असेल तर नंदी किंवा नंदीश्वर हा ग्रंथकार नागार्जुनाहून (इ. स. १००) प्राचीनतर ठरेल; व ब्रम्हज्योतिर्मुनीश्वर हा नागा-

१ यावरूनच रसशास्त्रावर किती विस्तृत वाङ्मय पूर्वी निपजलें असावें हें आपणांस कळून येईल.

२ सोमदेवाचा **रसेंद्रचूडामणि** नांवाचा एक ग्रंथ असून त्यांतून बहुधा हा भाग **रसरत्नसमुच्चयकारानें** उतरून घेतला आहे असें प्रो. प्रफुल्लचंद्रराय यांचें मत आहे. His, hindu chemistry, पृ. ११९, टीप पहा.

र्जुन (इ. स. १००) व सोमदेव (याचा काळ पक्का कळत नाहीं), यांच्या दरम्यान होऊन गेला असें कळून येईल.[1] असो.

रसरत्नसमुच्चयग्रंथाचा काळ.

या ग्रंथाच्या (६-९८) श्लोकांत चर्पटीनाथाचा उल्लेख आहे. चर्पटीनाथाविषयीं नवनाथभक्तिसारांत (अ० ३८-४०) खालील ऐतिहासिक माहितीचा भाग मिळतो. **चर्पटीनाथ**—भागिरथीच्या तीराजवळ पुलिग्राम उर्फ लुतग्राम या ठाईं सत्यश्रवानामक ब्राम्हणात हें बाळ सांपडलें. सत्यश्रव्यानें तें घरीं नेऊन चंद्रा नामक आपल्या बायकोस दिलें. पुढें आठव्यावर्षीं उपनयन वगैरे केल्यानंतर कुलंब व चर्पटीनाथ हे दोघे सत्यश्रव्याजवळ अध्ययनास होते. पुढें यजमान कृत्य करीत असतां चर्पटीनाथानें दक्षिणेकरीतां यजमानास दुखविल्यामुळें सत्यश्रव्यानें रागानें त्याच्या गालफडांत यजमानासमक्ष मारिलें हें त्या मानी बाळास न मानवल्यामुळें कुलंब व चर्पटी हीं दोन्हीं मुलें तेथून ९ कोंसांवर असलेल्या बद्रिकाश्रमीं गेलीं. तेथें त्यांस मत्स्यंद्रनाथांची गांठ पडली व त्यांच्या प्रसादानें दत्तात्रयानें त्यांवर अनुग्रह केला. नंतर चर्पटी हा नाथपंथीं बनून शाबरी विद्येंत निपुण झाला. याची मग सिद्धांत गणना होऊं लागली. नंतर चर्पटीनाथानें अनेक तीर्थें केलीं. तीर्थाटणाच्या वेळीं त्यांनीं एकंदर नऊ शिष्य केलें. त्यांचीं नांवें अशीं:--

१ राघवसिद्ध	**६ सारेंद्रकसिद्ध**
२ बाळसिद्ध	**७ हुक्षसिद्ध**
३ गोंकाटसिद्ध	**८ द्वारभैरवसिद्ध**
४ जांबुसिद्ध	**९ रणसिद्ध**
५ नैमित्यकसिद्ध	

१ सोमदेवाच्या 'रसेंद्रडामणि' ग्रंथाचा उल्लेख नित्यनाथ सिद्धांच्या 'रसरत्नाकरां'त आहे. यांवरून रसेंद्रचूडामणि हा ग्रंथ नित्यनाथांहूनही प्राचीनतर आहे हें सिद्ध होतें.

चर्पटीनाथांच्या अंगी अनेक सिद्धि होत्या. त्यांस वाताकर्षण विद्या येत असें वाताकर्षण विद्येनें याने एकदा सकळ देव जिंकले. हा नवनारायणापैकीं पिप्पलायननारायणाचा अवतार होता, अशी प्राचीन काळीं समजूत होती नवनाथभक्तिसार हा ग्रंथ गोरक्षाच्या **किमयागार** ग्रंथावरून लिहीला असें नरहरि मालु म्हणतो.

हा चर्पटीनाथ मत्स्येंद्रनाथाचा समकालीन होता हें यावरून कळून येईल. खाली दिल्याप्रमाणें ज्ञानेश्वराची गुरुपरंपरा आहे. निवृत्तिनाथाचा

मत्स्येंद्रनाथ
गोरक्षनाथ
गैनीनाथ
निवृत्तिनाथ
ज्ञानेश्वर

व ज्ञानेश्वराचा काळ माहीत आहे निवृत्तिनाथाच्या वेळेस मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, व गैनीनाथ हे तिघेही होते. ज्ञानेश्वरी शके १२१२ त रचलीं गेलीं. या पूर्वीं ५० वर्षें[1] मत्स्येंद्रनाथ व चर्पटीनाथ असलें पाहिजेत. म्हणजे शके ११५० ते १२०० पर्यंत मत्स्येंद्रनाथ व चर्पटीनाथ होऊन गेले असावेत. या चर्पटीनाथाचा ज्या अर्थीं रसरत्नसमुच्चयांत उल्लेख आहे त्या अर्थीं तो ग्रंथ याहून अर्वाचीन असला पाहिजे.

सिंघणराजाचा उल्लेख--चर्पटीनाथाच्या उल्लेखाशिवाय रसरत्नसमुच्चयांत सिंघणराजाचाही उल्लेख आहे. हा सिंघणराजा देवगिरीच्या जाधव राजांपैकीं असावा, त्यांत दोन सिंघण राजे होऊन गेले. त्यांची

१ याविषयीं निवृत्तिनाथाचा एक अभंग आहे; तो असा:-

आदिनाथ उमाबीज प्रगटिलें । मच्छिंद्रा लाधलें सहजस्थिती ॥ १ ॥
तेचि प्रेममुद्रा गोरक्षीं दिधली । पूर्णकृपा केली गैनीनाथा ॥ २ ॥
वैराग्यें तापला सप्रेमें निवाला । ठेवा जो लाधला शांतिसुखा ॥ ३ ॥

* * * * * *

निवृत्ति गैनी कृपा केली असे पूर्ण । कुळ हें पावन कृष्णनामे ॥ ५ ॥
याविषयीं ज्ञानेश्वरीचा अखेरचा भागही पहा. तेथें हीच परंपरा आढळते.

तेवढ्या पूरती वंशावळ खाली दिली आहे; या वंशावळीवरून पहिला सिंघण खिस्ती शकाच्या अकराव्या शतकाच्या अखेरीस झाला हें कळून येईल. रसरत्नसमुच्चयांतील सिंघण राजा हा बहुतकरून दुसरा सिंघण असावा तसा तो असेल तर हा ग्रंथ १२४७ नंतर कांहीं वर्षांनीं रचिला गेला असावा असें दिसतें. ह्मणजे सामान्यतः इ. स. १३०० च्या सुमारास हा ग्रंथ रचिला असावा. डॉ. गर्देयांच्या मतें तो इ. स. ८०० नंतर केव्हां-तरीं रचिला असावा. वरील विचारसरणीवरून या ग्रंथाचा काळ सुमारें इ. स. १३०० हा ठरतो.

सेवणचंद्र (दुसरा) इ० स० १०६९
सिंघण (पहिला)
मल्लुगि
भिल्लम (इ० स० ११९१)
जैत्रपाळ (इ० स० ११९१–१२१०)
सिंघण (दुसरा) इ० स० १२१०–१२४७)

याप्रमाणें पांडवकाळापासून तों इ. स. १३०० च्या सुमारें ६२–६३ ग्रंथकार रसशास्त्रावर होऊन गेले, व त्यांच्या ग्रंथांवरून सिंहगुप्तसुनु (किंवा संवगुप्तसूनु) (वाग्भट?) यानें रसरत्नसमुच्चय हा ग्रंथ सुमारें इ. स. १३०० च्या सुमारास रचिला, * या गोष्टी आपणांस कळून येतील.

---

* प्रो. प्रफुल्लचंद्रराय यांनीं आपल्या "History of hindu chenmisry" या ग्रंथाच्या प्रस्तावनेंतही (पृ. ८९ पहा) असेंच मत दिलें आहे. ते ह्मणतातः— "the date of the R. R. S. may, therefore, fll placed betewrən the 13 th and 14 th cənhərsces A. D. " Jntro, p. ldxxxix. आमचीं व त्यांचीं प्रमाणें भिन्न आहेत, ही ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

प्रकरण ६ वें.

रसेंद्रचिंतामणि.

हा ग्रंथ गुहकुलसंभव श्रीरामचंद्रानें लिहिलेला आहे. याचीं कुलदैवतें श्रीमदांबिका व महेश्वर हीं होत यानें आपल्या ग्रंथास रसेंद्रचिंतामणी असें कां नांव दिलें हें याप्रयारे सांगितलें आहेः—

"लघीयः निखिलरसज्ञानदातृत्वाच्च चिंतामणि रिव चिंतामणिः ॥"

हा ग्रंथ लिहितेवेळीं आपण अनुभव घेऊनच लिहिलें आहे, अनुभवा-शिवाय गुरु व शिष्य व्यर्थ होत, याविषयीं त्यानीं असें लिहिलें आहेः-

आस्वाद्यं बहु विदुषां मुखादप (व) इयं ।
शास्त्रेषु स्थितमकृतं न तल्लिखामि ॥
यत्कर्म व्यरचयमग्रतो गुरूणां ।
प्रौढाणां तदिह वदामि विस्तरेण ॥ १ ॥
अध्यापयंति यदि दर्शयितु क्षमंते ।
सूतेंद्रकर्मगुरवो गुरवस्त एव ॥
शिष्यास्त एव रचयंति गुरोः पुरो ये ।
शेषाः पुनस्तदुभयाभिनयं भजंते ॥ २ ॥
संस्काराः परतंत्रेषु ये गूढाः सिद्धिसूचिताः ॥
तानेव प्रकटीकर्तुं उद्यमं किल कुर्महे ॥ ३ ॥

याप्रकारें ग्रंथकारानें आपल्या ग्रंथाचें महत्व वर्णन केलेलें आहे; यापैकीं बहुतेक श्लोक आयुर्वेदप्रकाशकर्त्यानें प्रस्तावनेंत उतरुन घेतलेले आहेत, जे स्वानुभवाचे श्लोक ते सुद्धां पुढें नुसते तसेच उतरुन घेतलले आढळतात; यावरून प्रयोगशास्त्रांत भारतीयांची किति अवनती झालेली होती हें कळून येईल. रसेंद्रचिंतामणीची कलकत्ताप्रत अत्यंत अशुद्ध आहे; या ग्रंथांत खालील ग्रंथांचा व ग्रंथकारांचा उल्लेख आहेः—

ब्रहद्वाशिष्ट; रसार्णव; रसहृदय; नित्यनाथाचा रसरत्नाकर, रसहृदय-स्वरस; रसमंगल; सिद्धिलक्ष्मीश्वरतंत्र; चरक; नागार्जुनिय लोहशास्त्र; लोकनाथ; वैद्यनाथ प्राणनाथ; रामराज (हा बहुधा **रामराजी** ग्रंथाचा कर्ता असावा). इत्यादि.

उपसंहारांत ग्रंथकार लिहितो कीं:--

अनिर्जि (श्चि) तफलाश्चान्ये योगास्ते हि मयोज्झिताः ॥
यथा न रोचते किंचिद्व्यंजनं लवणैर्विना ॥
रसशास्त्रं विना तद्वत् सर्वशास्त्रं न रोचते ॥ २ ॥
किं दरिद्रस्य विद्याभिः, ज्वरजीर्णस्य किं धनैः ॥
आरोग्यमजरातित्वं आम्नायत्नादवाप्यते ॥ ३ ॥
बहुसंग्रहसंहितार्थं सूरि--स्फुरदंतःकरणेन कंठधार्यः ॥
निरमायि मया रसेंद्रचिंता--मणिरच्छिद्रतया मणेरनर्घः ॥ ४ ॥

हा ग्रंथ मुख्यत्वेंकरून रसवैद्यकावरचा आहे; तथापि प्रास्ताविक ८।६ अध्याय सामान्य रसायनशास्त्रावरचे आहेत; व हा भाग बराच विशदपणें लिहिलेला आहे. पुढच्या भागांत सर्व औषधें आहेत.

प्रकरण ७ वें

योगरत्नाकर.

सुमारें १५० वर्षांपूर्वीच्या 'योगरत्नाकर' नामक ग्रंथाच्या एका हस्त लिखित प्रतींत डॉ. गर्दे यांस खालील रसवैद्यकावरलि ग्रंथांचीं नावें आढळलीं; यांत कांहीं ग्रंथकारांचींही नांवें आहेत असें स्पष्टपणें दिसते.

१ चर्पट (टि-नाथ).
२ रुद्रतंत्र.
३ नागार्जुन.
४ यामल (रुद्रयामल).
५ चिकित्सामृतसागर.
६ योगसार.
७ सारसंग्रह.
८ मतिमुकुर.
९ योगरत्नावली.
१० वैद्यालंकार.
११ योगरत्नसमुच्चय.
१२ योगतत्व.
१३ राजमार्तंड.
१४ रसरत्नप्रदीप.
१५ चिकित्सादीप.
१६ शिवागम.
१७ वैद्यामृत.
१८ वैद्यजीवन.
१९ चिकित्सासार.
२० वीरसिंहावलोकन.
२१ योगतरंगिणी *
२२ रसपद्धति.
२३ रसरत्नसमुच्चय.
२४ रसरत्नाकर.
२५ रसेंद्रचितामणि.
२६ रसहृदय.
२७ रसमाधव (आयुर्वेदप्रकाशकर्ता) *
२८ नारायणीय.
२९ रसार्णव.
३० विदेह.
३१ गदनिग्रह.
३२ वंगसेन.
३३ अगस्तिसंहिता.
३४ वृंदमाधव
३५ वैद्यरहस्य.
३६ चिकित्साकलिका.

या शिवाय 'योगरत्नाकरांत' अनेक वनौषधि वैद्यकावरच्या ग्रंथांचा उल्लेख आहे.

चिकित्सा कलिका हा ग्रंथ प्रसिद्ध वाग्भटाचा नातू 'तिसट' यानें लिहिला असून तो रसवैद्यकावर नाहीं, तथापि येथें यादींत त्याचा समावेश केलेला आहे.

प्रकरण ८ वें.

आयुर्वेद प्रकाशा*चें सूक्ष्म अवलोकन

वरील यादींत आयुर्वेदप्रकाशकर्त्यास 'योगरत्नाकरकर्त्यानें 'रसमाधव' असें म्हटलें आहे. या आयुर्वेदप्रकाशाचें थोडक्यांत अवलोकन करूं. तो ग्रंथ १५० वर्षांहून प्राचीनतर आहे हें तर उघडच झालें. असो. या

* 'योगतरंगणी' व 'आयुर्वेदप्रकाश' या दोनग्रंथांच्या उत्तम हस्तलिखितप्रति हुबळी येथील देशी वैद्य दत्तात्रयशास्त्री पुराणिक यांजवळ आहेत त्यांनीं त्या प्रती कृपाकरून आम्हांस पहाण्यास दिल्या.

माधव नांवाचा
ग्रंथाचा कर्ता काशीवासी उपाध्याय सारस्वतकुलावतंस
सौराष्ट्र देशांत जन्मलेला कोणीं आहे. याची शके १७३१ मधलि प्रत
पहाण्यास मिळाली. रसशास्त्रांवरील ग्रंथांत यांचे फार महत्व आहे;
कारण अनुभव घेतल्या खेरीज (नुसत्या प्राचीन ग्रंथांवरून) एकही
प्रयोग लिहिला नाहीं, अशी कर्त्यांची प्रतिज्ञा आहे; शिवाय परंपरा;
ग्रंथांतील गूढ भाग, प्रत्यक्षमाहिती वगैरे ही यांत पुष्कळ आहे.

संस्काराः परतंत्रेषु ये गूढाः सिद्धिसूचिताः ।
तानेव प्रकटीकर्तुमुद्यमं किल कुर्मं हे ॥ ४ ॥

अश्रौषं बहुविदुषां मुखादवश्यं । शास्त्रेषु स्थितमकृतं न तल्लिखामि ॥ यत्कर्म व्यरचयमग्रतो गुरूणां । प्रौढानां तदिह वदामि वीतशंकः ॥ ६ ॥ अध्यापयंति यदिदर्शयितु क्षमंते । सूतेंद्रकर्मगुरवो गुरवस्तएव ॥ शिष्यास्त एव रचयंति पुरो गुरूणां । शेषाः पुनस्त दुभयाभिनयं भजंते ॥ यद्यन्मयाऽ क्रियत कारयितुं चशक्यं । सूतेंद्रकर्मतदिह प्रथमां बभूवे ॥ ७ ॥अध्यापयंति यइदं नतु कारयंति । कुर्वंति नेदमधियंत्युभये मूषार्थाः ॥ ८ ॥ कर्मयद्यद· साध्यं स्यादुर्लभं यद्यदौषधं ॥ तत्तत्सर्वं परित्यज्य सारभूतं प्रकाशितम् ॥ १० ॥ क्वचिच्छास्त्रे क्रिया नास्ति कर्म संख्या नच क्वचित् ॥ रस· युक्तिः क्वचिन्नास्ति संप्रदायः क्वचिन्नच ॥ ११ ॥ अतः सिद्धिर्न सर्वत्र रसे वापि रसायने ॥ वैद्यवादे प्रयोगेच तस्माद्यत्नो मया कृतः ॥ १२ ॥ यद्यद्गुरुमुखोद्गीतं स्वानुभूतं च यन्मया ॥ तत्तल्लोक हितार्थाय वक्ष्याम्यनति विस्तरं ॥ १३ ॥ यदन्यत्र सदन्नास्ति यदन्नास्ति न तत्क्वचित् ॥ १४ ॥

येणें प्रमाणें याग्रंथाचें महत्व फार आहे. असो खाली दिलेल्या ग्रंथांचा उल्लेख यांत आहे:—

रस पद्धति	प्राणिकल्पद्रुम
(रस) वाग्भट (रसरत्नसमुच्चय)	नित्यनाथ
रसरत्नाकर	लघुयोगतरंगिणी
रसचिंतामणि	भावप्रकाश
शिवागम	रसमंजरी
शार्ङ्गधर	रसपद्धति
सिद्धलक्ष्मीश्वरतंत्र	राजनिघंटु
रसहृदय	आग्निवेश
रसराजलक्ष्मी	

प्रकरण ९ वें.

योगतरंगिणी.

ग्रंथकारानें आपल्या विषयीं खालील माहिती दिली आहे, तो ह्मणतो:—

आपस्तंबस्याच खोलपनाम्नो ।
धाम्नो भासां कौंडपल्लीभवस्य ॥
तैलंगस्य प्रीतिभाजो गिरीशे ।
काशीवासं कुर्वतो भूरिकीर्तेः ॥ २ ॥
राज्ञां मान्यस्यात्र रिंगीणभट्टस्यासीत्पुत्रो वल्लभो वेदविद्यः ॥
तस्यासीरन् सूनवोऽमी त्रिमल्लो रामो गोप श्चेति नाम्ना त्रयोऽपि ॥३॥
तेषु त्रिमल्ल भट्टेन नाम्ना योगतरंगिणी ।
चिकित्सा लिख्यते भूरि ग्रंथेभ्यः स्वपरार्थिना ॥ ४ ॥

यावरून हा ग्रंथ त्रिमल्लभट्ट नामक तैलंगी ब्राह्मणानें लिहिला आहे हें कळून येईल. या ग्रंथांत खालील ग्रंथांचे उतारे आहेत, त्यांत कांहीं साध्या वैद्यकाचे व कांहीं रसवैद्यकाचे ग्रंथ आहेत:—

चरक	वसंतराज
शार्ङ्गधर	बौद्धसर्वस्व
गोरक्षमत	भल्लूकमत
वैद्यालंकार	चक्रदत्त
भद्रशौनक	मदनपाल
सारसंग्रह	योगशत
योगरत्नावली	वृंद
रसरत्नप्रदीप	आरोग्यदर्पण
बृहदात्रेय	रसमार्ग *
प्रयोगपारिजात	रसमंजरी
कृष्णात्रेय	चिकित्सा
वृद्धहारीत	चिकित्साकलिका
नागार्जुन	वीरसिंहावलोकन
चर्पटि	
रुद्रतंत्र	
रसचिंतामणि	

* हा 'रसपद्धति' नामक ग्रंथच कीं काय ?

रसार्णव	राजमार्तंड
मंथानभैरव	रसरत्नाकर
रसेंद्रचिंतामणि	रसरत्नावली
धन्वंतरिमत	मतिमुकुर
रससिंधु	वैद्यादर्श
रसेंद्रसंहिता	अश्विनीकुमारसंहिता
रुग्विनिश्चय-माधवनिदान ?	योगरत्नप्रदीप

प्रकरण १० वें.

❀ दत्तात्रेयतंत्रांतील रसविद्या. ❀

दत्तात्रेयतंत्र या नांवाचें एक तंत्र कलकत्यास छापलेलें आहे. याचे एकंदर ३० पटल आहेत. या तंत्राचा बरोबर काळ समजत नाहीं; पण यांत नागार्जुनाचा उल्लेख (२४-१) असून 'किमया' या अर्थी 'रसायन' शब्द उपयोजिलेला आहे. अस्सल प्राचीन रसशास्त्रीय ग्रंथांत 'किमये'ला 'रसकर्म' असेंच ह्मटलेलें आहे. 'रसायन' शब्द पूर्वीं देहसिद्धीला लावीत; पण अलीकडच्या ग्रंथांत याच्या अगदीं उलटा प्रकार आढळतो. रसायनशब्द लोहसिद्धीला लावतात. तेव्हां रसायनशब्द किमयेच्या अर्थीं योजिलेला असल्यामुळें, हें तंत्र आलीकडील काळांतलें असावें असें ह्मणतां येईल. या तंत्रांत खालील तंत्रग्रंथांचाही उल्लेख आहे त्यावरूनही कदाचित् पुढें मागें या तंत्राचा काळ ठरण्याचा संभव आहे ह्मणून त्याचा उतारा देऊन ठेवितों.

संति नानाविधा लोके यंत्रमंत्राभिचारिकाः ।
आगमोक्ताः पुराणोक्ताः वेदोक्ता डामरे तथा ॥ ४ ॥
उड्डीशे मेरुतंत्रे च काल (क) चंडे (डी) श्वरे तथा ।
राधातंत्रे च देवेश तारातंत्रेऽमृतेश्वरे ॥ ५ ॥
तत्सर्वं कीलकं कृत्वा कलौ वीर्यविवर्जितं ॥ ३० ॥

यावरून प्रस्तुत तंत्र उड्डीशतंत्र, मेरुतंत्र, * काकचंडीश्वरतंत्र, राधातंत्र, तारातंत्र व अमृतेश्वरतंत्र इत्यादि तंत्रांनंतर निपजलें हें उघड होते.

याच्या ११ व्या पटलांत असा एक श्लोक आहेः—

गृहीत्वा मृत्तिकागंधं कदलीरससंयुतं ॥
ताम्रपात्रे प्रलिप्तेन जायते रौप्य भाजनं ॥ ४४ ॥

या श्लोकाच्या मागेंपुढें हा किमयेचा विषय बिलकुल नाहीं. या तंत्राचें १३ वें पटल तर स्वतंत्रपणें रसायन प्रयोगांसच समर्पण केलेलें आहे. यांत एकंदर तीन प्रयोग आहेत. ते सर्वांस एकत्र पाहण्यास मिळण्या करितां येथें उतरून घेतो.:—

ईश्वर उवाच ।

गोमूत्रं हरितालं च गंधकं च मनःशिला ।
समं समं गृहीत्वा तु यावत् शुष्यति पेषयेत् ॥ १ ॥
एकादश दिनं यावत् यत्नेन रक्षयेत् शुचिः + ।
मंत्रेण धूपदीपादि नैवेद्यैर्दुग्धसंयुतैः ॥ २ ॥

अथ मंत्रः । (यंत्रस्तु) । ॐ नमो हरिहराय रसायनसिद्धिंकुरुकुरु स्वाहा ॥ अयुतजपेन सिद्धिः ॥

‡ तद्वटीं गोलकं कृत्वा वस्त्रेण वेष्टयेत्पुनः ।
मृत्तिकां लेपयेत्तस्य छाया शुष्कं तु कारयेत् ॥ ३ ॥
× मर्तें कुंडे विनिक्षिप्ते पलाटी काष्ठवन्हिना ।
* ज्वालयेदष्टयामंतु नान्यथा शंकरोदितं ॥ ४ ॥
तद्भस्म जायते सिद्धि विद्धि सिद्धिसमाकुलम् ॥
ताम्रपात्रे अग्निमध्यें बिंदुमात्रं नियच्छति ॥ ५ ॥
तत्क्षणाज्जायते स्वर्णं नान्यथा शंकरोदितं ॥
दातव्यं गुरुभक्ताय न दद्याद्दुष्टमानसे ॥ ६ ॥
सिद्धपीठे भवेत्सिद्धिः गायत्री लक्षजापनैः ।
यस्मै कस्मै न दातव्यं दातव्यं शिवभक्तके ॥ ७ ॥

---

* **मेरुतंत्र** तर हल्लीं "वेंकटेश्वर" प्रेसमध्यें छापलेलें आहे. + 'सच' पाठभेद। ‡ 'सर्वं तु' पाठभेद । × 'गर्त्तकुंडे' पाठभेद ।

* यांतील पाठभेद बडली (पो. मुरगोड) येथील वे. यज्ञेश्वरदिक्षित इनामदार यांचे संग्रहांतील प्रतीवरून घेतलेले आहेत. ती प्रत जुनाट व हस्तलिखित आहे. या पुढें पाठभेद पुष्कळच आहेत ह्मणूण दुसरा पाठ स्वतंत्रपणें दुसरीकडे देऊं. तात्पर्यांत फरक मात्र नाहीं.

आग्निमुख द्विजातीनां पा (या) चकानां विशेषतः ।
गोप्यं गोप्यं महागोप्यं देवानामपि दुर्लभम ॥ ८ ॥
रसप्रतिक्रियां कृत्वा गोप्यं नैव प्रकाशयेत् ।
वनितापुत्रमित्रादि गोप्यं सिद्धि प्रदायकं ॥ ९ ॥

(प्रयोग २ रा.)

आनीय बहुयत्नेन संबलं तोलकद्वयं ॥
वसुराद्यं शिवं चाद्यं मायाबिंदुसमन्वितं ॥ १० ॥ (?)
बीजत्रयं चाष्टशतं प्रजपेत्संबलोपरि ॥
अशीतितोलकंमानं कृष्णधेनुसमुद्भवं ॥ ११ ॥
दुग्धमानीय यत्नेन चाष्टोत्तरशतं जपेत् ॥
वस्त्रयुक्तेन सूत्रेण दुग्धमध्यें विनिक्षिपेत् ॥ १२ ॥
उत्तापं ज्वालघेद्धीमान् मंदमंदेन वन्हिना ॥
रिपुसैंदार्धपर्यंतं (?) अर्धशेषं भवेद्यदि ॥ १३ ॥
तदैवोत्तोल्य तद्द्रव्यं दग्धं तोये विनिक्षिपेत ॥

ततः परीक्षा कर्तव्या ।

निर्धूमं पावके द्रव्यं दृष्ट्वा उत्थाप्य यत्नतः ॥ १४ ॥
तत्रैव प्रजपेन्मंत्रं सर्वं मंगलमात्मकं ॥
सार्धैन तोळनं ताम्रं वन्हिमध्ये विनिक्षिपेत् ॥ १५ ॥
यथा वन्हिस्तथा ताम्रं दृष्ट्वा उत्थाप्य यत्नतः ॥
गुंजाप्रमाणं तद्रव्यं सत्यं सत्यं हि शंकरि ॥ १६ ॥
रौप्यं भवति तद्रव्यं नान्यथा शंकरोदितं ॥

अन्यमतेन ।

कृष्णसर्पमेकं गृहीत्वा तस्य मुखे शिववीर्यं पूरयित्वा सर्पस्य मुखं गुदंच बध्द्वा नूतनमृण्मयस्थालीमध्ये संस्थाप्य स्थालीमुखं मृदादिना संलिप्य निर्जनस्थाने प्रातरारभ्य पुनः प्रातर्यावत् वन्हिना ज्वालं दद्यात । ततः शुभक्षणे स्थालीमुखमुध्दृत्य सर्पं भस्म विहाय शिववीर्यं गृण्हीयात । ततस्तोलकमित ताम्रं गालयित्वा तस्मिन् गलितताम्रे रक्तिकमात्रं तत् शिववीर्यं दद्यात् । तेन तत्क्षणादेव तत्ताम्रं सुवर्णीभूतं जातमिति । आदौ शिवार्चनं कृत्वा पश्चात्प्रयोग एष प्रकर्तव्यः ॥ १७ ॥

इति दत्तात्रेयतंत्रे ईश्वरदत्तात्रेय संवादे रसायनं नाम त्रयोदशः पटलः ॥ १३ ॥

प्रकरण ११ वें.

कामरत्नांतील रसायनशास्त्र.

श्रीनागभट्टविरचित कामरत्नांत कांहीं रसायन प्रयोग आहेत. या कामरत्नांत एकंदर सोळा उपदेश आहेत; त्यापैकीं १६ वा उपदेश याविषया वरचा आहे. या कामरत्नाचा काळ कळत नाहीं, हा ग्रंथ इतर २१४ ग्रंथांबरोबर कलकत्त्यास छापलेला आहे. श्रीनित्यनाथसिद्ध विरचित कामतंत्र व हें वेगळे असावेत असें दिसतें. नागभट्ट विरचित कामरत्नांत रस व रसविद्येविषयीं खालील माहिती आहे. ती एकत्र पहाण्यास मिळावी ह्मणून एथें उतरून घेतलेली आहेः—

अथ वीर्यस्तंभनवाजीकरणादिषु प्रोक्तरसयोगादिसिद्धये रसादिशोधनमारणं च ॥ तत्रादौ रसशोधनं ॥

पक्षादूर्ध्वं न कर्तव्यं रससंस्कारमुमुत्तमम् ।
अघोरेणैव मंत्रेण रससंस्कारपूजनं ॥ १ ॥

ॐ अघोरेभ्योऽथ घोरेभ्यो घोराघोरतरेभ्यश्च सर्वतः सर्व शर्वेभ्यो नमस्ते रुद्ररूपेभ्यनमः ॥ २ ॥ इत्यघोर मंत्रः ॥

कुमार्यां च निशाचूर्णा द्दिनं सूतं विमर्दयेत् ।
पातयेत्पातनायंत्रे सम्यक् शुद्धो भवेद्रसः ॥ ३ ॥
अथवा हिंगुलात्सूतं ग्राहयेत्तत्रिगद्यते ।
पारिभद्ररसैः पेष्यं हिंगुलं याममात्रकं ॥ ४ ॥
जंबीराणां द्रवै वाथ पेष्यं पातनयंत्रके ।
तत्सूतं योजयेद्योगे सप्तकंचुकवर्जितं ॥ ५ ॥
रसस्य दशमांशं तु गंधं दत्वा विमर्दयेत् ।
जंबीरस्य द्रवैयामं पेष्यं पातनयंत्रके ॥ ६ ॥
पुनर्मर्द्यं पुनः पात्यं सप्तवारं विशुद्धये ।
इत्येवं शुद्धि (द्ध) माख्यातं यथेष्टैकं प्रकारयेत् ॥ ८ ॥

अथ रसमारणम् ।

मु (उ) क्तं सर्वस्य सूतस्य तप्तखल्वे विमर्दनम् ।
अजाशकृत्तुषाग्निं तु सूगर्तै त्रितयं क्षिपेत् ॥ ९ ॥
तस्योपरिस्थितं खल्वं तप्तखल्वमिदं भवेत् ।

खल्वं लोहमयं शस्तं पाषाणोत्थमथापि वा ॥ १० ॥
अजीर्णे चाप्यबीजं च यः सूतं प्पातयेन्नरः ।
ब्रह्महा स दुराचारो मंत्रद्रोही महेश्वरि ॥ ११ ॥
रामठं पंचलवणं तथा क्षारचतुष्टयं ।
त्रिकटु शृंगवेरं च मातुलुंगरसाप्लुतं ॥ १२ ॥
पिंडमध्ये रसं दत्वा स्वेदयेत्सप्तवासरं ।
मारणालेपमृद्भांडे (?) ग्रासार्थी जायते ध्रुवं ॥ १३ ॥
एतदेव रसं यत्नात जंबीरनीरसंयुतं ।
दिनैकं धारयेद्धर्मे मृत्पात्रे वा मृतो भवेत् ॥ १४ ॥
तदा ग्रासः प्रदातव्यः स्वर्णशुद्धिः शनैः शनैः ।
चतुर्दशादिनान्यंतं क्रमाज्जीर्णस्य चालयेत् ॥ १५ ॥
सूतं स्वर्णं व्योम शंखतुल्यं रंभाद्रवैर्दिनं ।
मर्दयेद्बीजसंयुक्तं चार्वा चारणयंत्रके ॥ १६ ॥
सर्वकै मूलिकाद्रावैर्दिनमेकं तु मर्दयेत् ।
गर्भयंत्रगतं पाच्यं मंत्रयेत्पूर्ववद्रसं ॥ १७ ॥
ब्रह्मदंडी मेघनादं चित्रकं कटुतुंबिका ।
बद्धवल्ली बला कन्या त्रिकट्वर्कस्नुहीपयः ॥ १८ ॥
कंदोरंभा च निर्गुंडी लज्जा जाती जयंतिका ।
विष्णुक्रांता हस्तिशुंडी दद्रुघ्नो भृंगराट् पटुः ॥ १९ ॥
गुडूची लांगली नीरकणा-काली-महोरगाः ।
काकमाची च दंती च ... ... ॥ २० ॥
एताः समस्ताः व्यस्ताः वा देया ह्यष्टदशाधिकाः ।
उक्तस्थाने प्रयोक्तव्याः रजराजस्य (कर्मणि ?) ॥ २१ ॥
(वालुकायंत्रः) ।

अथ हिंगुलशुद्धिः ।

मेणीक्षीराम्लबद्धानां दरदं घर्मभावितम् ।
सप्तवारं प्रयत्नेन शुद्धिमायाति निश्चितं ॥ २२ ॥

अथ गंधकशुद्धिः ॥

शुकपक्षसमच्छायो नवनीतसमप्रभः ॥
मसृणः कठिणः स्निग्धः श्रेष्ठो गंधः स उच्यते ॥ २३ ॥
साज्यभांडे पयः क्षिप्त्वा मुखं वस्त्रेण वेष्टयेत् ।
तत्पूर्वं चुर्णितं गंधं श्रावेण बांधयेत्पुनः ॥ २४ ॥

भांडं निक्षिप्य भूमध्ये रुध्द्वा देयं पुटं लघु ।
तत्क्षीरेण द्रुतं गंधं शुद्धं योगेषु योजयेत् ॥ २५ ॥
गंध घृते विपक्तव्यं यावत्तैलनिभं भवेत् ।
वस्त्रेणांतरितं कृत्वा चालयेत्त्रिशदंतरे ॥ २६ ॥
पुनर्विंशति संग्राह्यं शुद्ध्यष्टद्वादश क्रमात् ।
अष्टमाषं चतुर्थं वाऽप्यर्धं चैव समांशकं ॥ २७ ॥
प्रतिग्रासे तप्तखल्वे दिनमम्लेन मर्दयेत् ॥

(अथ गंधकजारणा ।)

तत् क्षिपेच्च विनायंत्रे जंबीररससंयुतं ॥ २८ ॥
तद्यंत्रे धारयेद् धर्मे दिनं स्याज्जारितो रसः ॥
तं पटुक्षारगोमूत्रं स्नुक्क्षीराम्लै प्रलेपिते ॥ २९ ॥
दृढवस्त्रे बहिर्बद्ध्वा मृद्घटे स्वेदयेद्बुधः ॥
कांजिके क्षारसंयुक्ते यंत्रे पाके त्र्यहार्निशं ॥ ३० ॥
तदुद्धृत्य रसं (से) देयं खल्वे संमर्दयेत्क्षणम् ॥
संमर्द्य पूर्ववत्क्षेप्यं यंत्रे लिप्तपुटे पुनः ॥ ३१ ॥
क्रमे पाकेन दिवसे त्रिभि ग्रासः प्रजीर्यति ।
जीवितेन तदा तस्माद्बिजं दत्वा विमर्दयेत ॥ ३२ ॥
प्रतिग्रासे तप्तखल्वे यथाशक्त्या च जारयेत ।

(अथ सूतमारणं ।)

तं जीर्णं मारयेत्सूतं मारणं कथ्यते द्रवैः ॥ ३३ ॥
अंकोलस्य शिफा चाद्भिः पिष्ट्वा खल्वे विमर्दयेत् ।
सूतं गंधकसंयुक्तं दिनांते तद्विशोधयेत् ॥ ३४ ॥
पुटयेद्भूधरे यंत्रे दिनांते तन्मृतं भवेत् ॥
कृष्णधत्तूरतैलेन सूतं मर्द्यं द्वियामकं ॥ ३५ ॥
दिनैकं तत्पचेद्यंत्रे कटुपाके न (पुटपाके न) संशयः ॥
रसं गंधं समं मर्द्यं दिनं निर्गुंडिकाद्रवैः ॥ ३६ ॥
वज्रमूषान्वितं ध्मातं भस्मे सूतं भवेन्म (वत्य) लम् ।
टंकणं मधुलाक्षां च उर्णा गुंजा सुतोरसः ॥ ३७ ॥
मर्दयेद्भृंगजद्रावैः दिनैकं चाहरेत्पुनः ॥
ध्माते भस्मत्वमायाति शुद्धस्फटिकसंनिभः ॥ ३८ ॥
द्विपलं सूतराजस्य पलैकं गंधकस्य च ॥
कन्यानीरेण संमर्द्य दिनमेकं निरुत्तरं ॥ ३९ ॥

बद्ध्वा तदक्षूधरे यंत्रे दिनैकं मारयेत्पुटात ॥
इत्येवं जारिते सूते मारणं परिकीर्तितं ॥ ४० ॥
अथवा मासयोग्यं तु हन्याद्रसान्वितं रसं ॥
सूतं च धनसत्वं च मर्दयेत्कंगुली (णी) द्रवैः ॥ ४१ ॥
दिनैकं गोलकं चैव शोषयेदातपे खरे ॥
गर्भयंत्रगतं पाच्यं त्रिदिनं तु महाग्निना ॥ ४२ ॥
करीषाग्नौ दिवारात्रौ पचित्वा भस्मतां नयेत ॥ ४३ ॥

इति श्रीनागभट्टविराचेते कामरत्ने षोडशोपदेशः समाप्तः ॥ १६ ॥

प्रकरण १२ वें.

नित्यनाथसिद्धाचा रसरत्नाकरग्रंथ.

नित्यनाथसिद्धाचा 'रसरत्नाकर' ह्मणून श्रीवेंकटेश्वर छापखान्यांत जें पुस्तक छापलेलें आहे, त्यांत कित्येक भाग कमीं आहेत; उदाहरणार्थ, यांत वादिखंड व पुढील दोन खंड नाहींत तसेंच कलकत्ता प्रतींतही नाहींत. वादिखंड ह्मणजे रसविद्येचा उर्फ किमयेचा भाग आहे. हें खंड तर अत्यंत महत्वाचें आहे. याचें पुढें निरीक्षण करूं. प्रथम छापील पुस्तकाचें निरीक्षण करूं. वेंकटेश्वर छापखान्यानें काढलेली प्रत हिंदी भाषानुवादासह आहे. या ग्रंथांत काय काय विषय आहेत ते ग्रंथकाराच्या शब्दांनींच देतोः—

रसोपरसलोहानां तैलमूलफलैः सह ।
असाध्यं प्रत्ययोपेतं कथ्यते रससाधनं ॥ २ ॥
वैद्यानां यशसेऽर्थाय; व्याधितानां हिताय च ॥
वादिनां कौतुकार्थाय; वृद्धानां देहसिद्धये ॥ ३ ॥
मंत्रिणां मंत्रसिद्धयर्थं विविधाश्चर्य कारणं ।
पंचखंडमिदं शास्त्रं साधकानां हितं प्रियं ॥ ४ ॥
रसखंडे तु वैद्यानां; व्याधितानां रसेंद्रके ॥
वादिनां वादिखंडे च; वृद्धानां च रसायने ॥ ५ ॥
मंत्रिणां मंत्रखंडे च रसादिद्धिः प्रजायते ॥
सुतरां नास्ति संदेहः तत्तत्खंड विलोकिनाम ॥ ६ ॥

	खंड	विषय	उपदेश
१	रसखंड	वैद्यक	१०
२	रसेंद्रखंड	चिकित्सा	...
३	वादिखंड *	धातुवाद (किमया)	२०
४	मंत्रखंड	मंत्रसिद्धि	८
५	रसायनखंड	देहसिद्धि	२०

यावरून रसरत्नाकरांत डावीकडे दिलेलीं पांच खंडें व विषय आहेत हें वाचकांस कळून येईल. या पैकीं वादिखंडच छापील पुस्तकांत आढळत नाहीं हें वर लिहिलेंच आहे. या पांच खंडावरून या ग्रंथाचा एका वादिखंडाशिवाय बाकीच्या सर्व भागांत वैद्यकीच आहे हें कळून येईल. मंत्रखंडांतील मंत्र तरी देहारोग्याचेच (ह्म. विषहारक वगैरे) आहेत. तेव्हां रसरत्नाकर हा ग्रंथ मुख्यत्वेंकरून रसवैद्यकावरचा आहे हें सिद्ध होतें.

पूर्वींच्या ग्रंथांचा उल्लेख.

यदुक्तं शंभुना पूर्वं रसखंडे रसार्णवे ॥
रसस्य वंदनार्थं च दीपिकारसमंगले ॥ १६ ॥
व्याधितानां हितार्थाय प्रोक्तं नागार्जुनेन यत् ॥
उक्तं चर्पटि सिद्धेन स्वर्गवैद्यकपालिके ॥ १७ ॥
अनेकरसशास्त्रेषु संहितास्वागमेषु च ॥
यदुक्तं वाग्भटे तंत्रे सुश्रुते वैद्यसागरे ॥ १८ ॥
अन्यैश्च बहुभिः सिद्धैः यदुक्तं च विलोक्यतत् ॥
तत्र यद्यदसाध्यं स्यात यद्यदुर्लभमौषधं ॥ १९ ॥
तत्तत्सर्वं परित्याज्य सारभूतं समुद्धृतं ॥
क्वचिच्छास्त्रे क्रिया नास्ति क्रमसंख्या नच क्वचित् ॥ २० ॥
मात्रायुक्तिः क्वचिन्नास्ति संप्रदायो नच क्वचित् ॥
तेन सिद्धिर्नतत्रास्ति रसे वाथ रसायने ॥ २१ ॥
वैद्ये, वादे, प्रयोगे च तस्माद्यत्नो मया कृतः ॥
यद्यद्गुरुमुखात् ज्ञातं स्वानुभूतं च यन्मया ॥ २२ ॥
तत्तल्लोकहितार्थाय प्रकटी क्रियतेऽधुना ॥
यदन्यत्र तदत्रास्ति यदत्रास्ति न तत्क्वचित ॥
रसरत्नाकरः सोयं नित्यनाथेन निर्मितः ॥ २५ ॥

---

* खंड ३ । ४ । ५ हे तीन्हीं, छापील प्रतींत नाहींत.

या वरून खालील ग्रंथांची ओळख नित्यनाथास होती हें कळून येतें:—

१ रसार्णव (त्याचें रसखंड ?)
२ रसमंगल (त्यावरची दीपिकाटीका ? कीं स्वतंत्र रसदीपिका ?)
३ नागार्जुनाचा ग्रंथ (कोणता ?)
४ चर्पटीसिद्धाचा ग्रंथ (स्वर्गवैद्यकापालिकच काय ?)
५ स्वर्गवैद्यकापालिक (वेगळा ग्रंथ ?)
६ अनेक रसशास्त्रें, रससंहिता, व रसागम (कोणतें ?)
७ वाग्भटतंत्र (हें रसवैद्यकावरचें नसून प्रसिद्ध वाग्भट्टाचें 'अष्टांगहृदय' असावें.)
८. सुश्रुत.
९ वैद्यसागर.

वादिखंडाचें महत्व.

वादिखंडाची एक हस्तलिखित प्रत हुबळीस डॉ. गोरे यांजकडे मिळाली. दुर्दैवेंकरून ती संपूर्ण नाहीं. त्रुटितच आहे. संपूर्ण प्रत बडोद्याहून मिळाली. या वादिखंडांतून शिष्योपनयनाचें संपूण प्रकरण (६६ श्लोकांचें) रसरत्नसमुच्चयकार वाग्भटानें जसेंचें तसें उतरून घेतलें आहे. या एका गोष्टीवरूनच र. र. स. कार वाग्भट हा नित्यनाथाहून अर्वाचीन ठरतो. नित्यनाथानें सुश्रुताबरोबर ज्या वाग्भटाचा उल्लेख केलेला आहे तो प्रसिद्ध वैद्य वाग्भट होय! यावरून वैद्यवाग्भट व रसवाग्भट हे भिन्नभिन्न होत हेंहीं आयतेंच ठरून जातें. रसरत्नाकराच्या प्रारंभी वाग्भटतंत्राचा उल्लेख पाहून कित्येकजण रसवाग्भटाहून नित्यनाथाला अर्वाचीन ठरवू पाहतात; पण र. र. स. मध्येहीं नित्यनाथाचा उल्लेख आहे हें ते विसरतात! त्यांना वादिखंडातून रसवाग्भटानें सबंध साहावा अध्याय उतरून घेतलेला आहे हें माहित नाहीं. रसवाग्भटा नंतरच्या रसग्रंथांनींही 'वैद्यवाग्भट' व 'रसवाग्भट' असे दोन भेद मानून त्यांस भिन्न मानिलें आहे. वैद्यवाग्भट हा इ. स. २००–३००

च्या सुमारास होऊन गेला; रसवाग्भट हा १३००–१४०० च्या दरम्यान होऊन गेला; याहूनहीतो अलीकडचाच होईल, शिवाय मागें जाऊं शकत नाहीं. रसवाग्भटानें र. र. स. च्या प्रारंभीं रससिद्धांचीं एकदा नांवें देऊन पुन्हा: साहव्या अध्यायांत कां दिलीं याचा अतां उलगडा होतो. हा संपूर्ण अध्याय वादिखंडातून उतरून घेतलेला आहे; उतरून घेतलेल्या भागांत रससिद्धांचीं नांवेंही आलेलीं होतीं तींही रसवाग्भटानें पुन्हा: उतरून घेतलीं! याप्रकारें सहाव्या अध्यायांत रसवाग्भटानें दिलेलीं रससिद्धांचीं नांवें मूळ नित्यनाथाच्या वादिखंडांतील होत! पहिल्या अध्यायांतील नावांत व या नांवांत कित्येक ठिकाणीं कां फरक पडतो हें आतां कळून आले. या दोन्ही यादी भिन्न भिन्न ग्रंथांवरून रसवाग्भटानें उतरून घेतलेल्या आहेत हें आतां उघड झालें. असो.

वादिखंडाच्या प्रारंभीं नित्यनाथानें अशी प्रस्तावना लिहिली आहे:—

नत्वा श्रीपार्वतीदेवीं नत्वा श्रीसिद्धेशं तथा ॥
रसरत्नाकरं वक्ष्ये देहे लोहे शिवंकरं ॥ २ ॥
शिववीर्यं सूतराजः पारदश्च रसेंद्रकः ॥
एतानि रसनामानि तथान्यानि, शिवे यथा ॥ ३ ॥
हते शिवपदं सिद्धं साधकानां महोत्सवे ॥
शिववीर्यं तथाख्यातं सर्वसिद्धिप्रदायकम् ॥ ४ ॥
यतः पराशिवात्सूतं तेन सूतं शिवोदितं ॥
* संसारस्य परं पारं दत्तेसौ पारदः स्मृतः ॥ ५ ॥
रसः करोति लोहानि देहाश्चा (हं चा) पि सुसेवनात् ॥
रसेंद्रस्तेन विख्यातो द्रवत्वाच्च रसः स्मृतः ॥ ६ ॥
रसशास्त्रेषु सर्वेषु शंभुना सूचितं पुरा ॥

* हा श्लोकार्ध श्रीमाधवाचार्यांनीं आपल्या सर्वदर्शनसंग्रहांतील रसेश्वरदर्शनांत उतरून घेतलेला आहे. (पहा, आनंदाश्रम प्रत, पृ. ८०, ओळ ५ वी.) यावरून रसरत्नाकर व त्याचा कर्ता नित्यनाथ हे माधवाचार्यांहून प्राचीनतर ठरतात, म्हणजे, इ. स. १३५० पूर्वी ५० । ७५ वर्षें तरी नित्यनाथ होऊन गेला असला पाहिजे. म्हणजे १२५०–१३०० च्या जवळजवळ नित्यनाथ होऊन गेला. त्यानें चर्पटीचा उल्लेख केलेला असल्यामुळें याहून पूर्वी तो जाऊं शकत नाहीं.

रसं रसायनं दिव्यं; सूचितं नैव बुध्यते ॥ ७ ॥
सिद्धैः शिवमुखात्प्राप्तं तेषां सिद्धिश्च साधनात् ॥
सिद्धैः शिवमुखात्प्राप्तं तेषां सिद्धिश्च साधनात् ॥
संप्रदायक्रमे (मैः) युक्ते (क्तैः) तैः स्वशास्त्रेषु गोपितं ॥ ८ ॥
मयापि तन्मुखात्प्राप्तं साधितं बहुधा तव (?) ॥
\+ रसशास्त्राणि सर्वाणि समालोक्य यथाक्रमं ॥
साधकानां हितार्थाय प्रकटीक्रियतेऽधुना ॥ ९ ॥ इ. इ.

रसरत्नसमुच्चयकारानें, वादिखंडांतलि (उपदेश १ ला, श्लोक९–७३ हे) ६६ श्लोक आपल्या 'शिष्योपनयन' नामक साहव्या अध्यायांत (श्लोक १–६६) उतरून घेतलेले आहेत. या उताऱ्यानंतर र. र. स. यांत पुढें आणखी ५ श्लोक इतर ठिकाणचे आहेत; पण वादिखंडांतील पहिला उपदेश श्लोक ७३ सच संपतो. असो. वादिखंडाच्या दुसऱ्या उपदेशापासून विषयास प्रारंभ झाला. प्रथमोपदेशांत श्लोक ६४–६८ पर्यंत सत्तावीस रससिद्धांचीं नित्यनाथसिद्धानें जीं नांवें दिलीं आहेत तीं तुलनेंकरितां आह्मी रसरत्नसमुच्चयावर लिहिते वेळी टीपेंत दिलेलींच आहेत.

नित्यनाथ सिद्धानें चर्पटिनाथाचा उल्लेख केलेला असल्यामुळें व रसरत्नाकरांतून रसेश्वरदर्शनांत माधवाचार्यांनीं एका श्लोकार्धाचा उतारा घेतलेला असल्यामुळें नित्यनाथसिद्ध याचा काळ इ. स. १२५०–१३०० च्या दरम्यान असला पाहिजे. याहून पूर्वींही नित्यनाथास नेतां येत नाहीं व अलीकडेही आणतां येण्याजोगें नाहीं. याविषयीं सविस्तर विवेचन वाचकांनीं रसरत्नसमुच्चयावरील प्रकरणांत पहावें; ह्मणजे कारणें कळतील.

वादिखंडांतील विषय.

वादिखंडाचीं हस्तलिखित प्रत पूर्ण मिळाली नाहीं हें वर लिहिलेलेंच आहे. बाकीचा भाग नंतर दुसऱ्या प्रतींत मिळाला. यांची एकंदर ४० पत्रें मिळालीं. प्रत्येक पत्रांत सुमारे १२×२ ओळी आहेत; व प्रत्येक

\+ येथून श्लोक ७३ पर्यंत रसरत्नसमुच्चय, अ. ६ यामध्ये उतरून घेतलेला आहे.

ओळींत सुमारें १॥ श्लोक आहे. या मानानें पाहतां आमच्याजवळ असलेल्या हस्तलेखांत एकंदर (२४+४०×२ =६४०) सुमारे साडेसाहाशें श्लोक आहेत. वादिखंडांत संपूर्णपणें धातुवाद किंवा किमया वर्णिलेला आहे. आमच्याजवळच्या त्रुटित प्रतींत एकंदर १७ उपदेश पूर्ण झाले असून १८ वा उपदेश अपूर्ण आहे; त्याचे फक्त ३६ च श्लोक आहेत. या १८ ही उपदेशांत काय काय विषय आहेत हें खालीं देतों ह्मणजे वादिखंडाचें महत्व बरोबर लक्षांत येईल:—

१ उपदेश—रसदीक्षाविधानं।
२ ,, —सर्ववर्गसाधनादि रसशोधनादि नाम।
३ ,, —वज्रादिशोधनं।
४ ,, —ताररंजनं।
५ ,, —स्वर्णवर्णोत्कर्षणं।
६ ,, —नागरंजनं चंद्रार्कवेधनं च।
७ ,, —द्रुतसूतप्रयोगः।
८ ,, —वंगस्तंभनादि दलकरणं।
९ ,, —वज्रयोगेन हेमकरणं।
१०–१५ —सारणक्रामणजारणसत्वद्रुतियंत्रकरणानि।
१६ ,, —गुटीरसायनमूलीभक्षणाविधिः, केशरंजनवीर्यवृद्धिस्तंभनादीनि।
१७ ,, —रत्नादि, गंधवादः, धनधान्यवर्धनं च।
१८ ,, —सूतबंधनादि (त्रुटितं)।

या विषयसूचीवरून रसशास्त्र ऊर्फ धातुवादावरचा हा केवढा महत्वाचा भाग आहे हें कळून येईल; ह्मणूनच श्रीमाधवाचार्यांनीं यांतील श्लोकार्ध रसेश्वरदर्शनांत उतरून घेतला असावा.

प्रकरण १३ वें.

❀ सिद्ध नागार्जुन व त्याचे ग्रंथ. ❀

सिद्ध नागार्जुनाविषयीं हकीकत लोकमित्र (आक्टोबर १९०९) व औषधी बाड, दुसरी आवृत्ति (आ. म. शंकर दाजी शास्त्री पदेकृत, पृ. १६३-१७०) यामध्यें प्रसिद्ध झालेली आहे. पण या दोन्ही ठिकाणीं लेखकांनीं नागार्जुनाविषयींची ही हकीकत कोणत्या ग्रंथाच्या आधारें किंवा कशावरून दिली आहे, हें बिलकुल लिहिलें नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट होय. दोघांची बहुतेक हकीगत एकच आहे यावरून ती त्यांनीं एकमेका पासून तरी घेतली असावी, अगर एकाच मुळावरून तरी घेतली असावी; पण त्या मूळ ग्रंथाचा दोघांच्याही हकीकतींत उल्लेख नाहीं. नागार्जुनास झाल्यास आज जवळ जवळ १८०० वर्षें झालीं; तर इतक्या प्राचीन हकीकतीविषयीं योग्य ग्रंथोक्त प्रमाणें पाहिजेत, त्या शिवाय त्या हकीकतीस इतिहासाचे स्वरूप येत नाहीं.

वरील दोन्हीं हकीकतींतील पाल्हाळ सोडून देऊन त्याचा इतिहासिक निष्कर्ष काढिला तर नागार्जुना विषयीं खालील माहिती कळते.

(१) नागार्जुन मंत्र, तंत्र, रसविद्या, पादुकासाधन, आकाशगमन इत्यादि विद्यांत अत्यंत निष्णांत होऊन सिद्ध झाला.

२) तो पालिठाण्याच्या रणसिंह राजाची कन्या भोपळा व नागराज वासुकी याचा पुत्र होता; ह्मणून त्यास नागार्जुन असें नांव पडलें.

(३) नागार्जुन प्रथम मोठा शैव व तांत्रिक होता; पण रसविद्या व आकाशगमन हीं साध्य करून घेण्यासाठीं त्यानें पादलिप्ताचार्य नामक एका जैन श्रावकाचा शिष्य होऊन त्यास प्रसन्न करून घेतलें. त्याज कडून त्यानें त्या दोन्ही विद्या मिळविल्या.

(४) तो शककर्त्या पैठणच्या शालिवाहनाचा समकालीन होता, व त्यां दोघांचा कांहीं कारणांनीं स्नेह जमला. शालिवाहनाचीं दोन मुलें

त्याजजवळ विद्याभ्यासास होतीं; त्यांनीं त्यास मारिलें. या शालिवाहनाच्या बायकोचें नांव चंद्रलेखा.

(५) यानें रसविद्येचे प्रयोग खंबायत (स्तंभनपूर) व त्याजवळील मेढी येथें केलें.

ही हकीकत ऐतिहासिक कसोटीस कितपत टिकते हा एक प्रश्न आहे पालिठाण्यास रणसिंह नांवाचा राजा शकारंभाचे सुमारास असल्याबद्दल कोठें पुरावा आहे काय? नागार्जुन भोपला राजकन्या व नागराज वासुकि यांचा पुत्र असें ह्मटलेलें आहे खरें; पण नागराज वासुकीचा पुत्र ह्मणजे काय? त्यावेळीं वासुकी (व तोही नागराज!) कोठून आला? पादलिप्ताचार्यांच्या काळाबद्दल स्वतंत्रपणें जैनग्रंथांत कोठें माहिती मिळते काय त्यांची प्रसिद्धी जैन वाङ्मयांतून असली पाहिजे; त्यांचे ग्रंथ कांहीं या विषयावर आहेत काय? त्यांत नागार्जुनाचा कोठें उल्लेख आहे काय? नागार्जुनाचे रसशास्त्रावर व पादुकासाधनांवर लिहिलेल्या ग्रंथाठाई पादलिप्ताचार्यांचा कां उल्लेख नसावा? अथवा असा उल्लेख असल्यास तो कोठें आहे? शककर्ता पैठणच्या शालिवाहनाची स्त्री चंद्रलेखा होती याला दुसरें कोठें प्रमाण आहे काय? पादलिप्ताचार्य, रणसिंहराज व शालिवाहनराज हे समकालीन असल्याबद्दल पुरावा कांहीं आहे काय? नागार्जुनाचा स्नेही शालिवाहन शककर्ताच होता यास प्रमाण कांहीं आहे काय? कीं ही किंवदंतीच आहे? इतक्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळाल्यानंतर ही हकीकत ऐतिहासिक कसोटीस उतरल्यासारखी झाली. या हकिकतीचा प्रदेश उत्तरेकडचाच असून तो गुजराथ व खंबायतापासून पैठण पर्यंत व्यापून आहे. ही एक हकीकत झाली. सर्व हकिकती मिळाल्यानंतर पुढें निष्कर्ष काय निघतो हें नंतर सविस्तरपणें पाहूं.

* ही हकीकत कोठें आहे याबद्दल शोध करीत असतां असें कळून आलें आहे कीं, ती प्रबंध चिंतामणी नामक जैन ग्रंथांत आहे प्रबंधचिंतामणी विषयीं पुढें लिहिलेलेंच आहे.

नागार्जुनाविषयीं व त्याच्या रसविद्याप्राविण्याविषयीं कर्नाटकांत व विशेषेंकरून धारवाड जिल्ह्यांत प्रसिद्धी आहे. गदग शहराजवळील कपोतगुडांत त्यानें भट्टी लावली होती व तोनागांवी (नागार्जुनाचा गांव)येथें रहात असे अशी प्रसिद्धी आहे. सर्व पर्वत सोन्याचा करून लक्ष्मीची किंमतच नाहींशी करण्याचा त्याचा विचार दिसल्यामुळें देवांना राग येऊन त्यांनी त्यासठार केलें अशी कथा आहे.मरतेवेळीं देखील ही रसविद्या प्रकट व्हाही ह्मणून त्यानें खालील अर्धवट श्लोक उच्चारिला अशी आख्यायिका आहे:—

तुत्थ्यरसगंधकं । तुथ्यारसगंधकं ॥
मत्तोंड्डु मत्तोंड्डु । मत्तोंड्डु मत्तोंड्डु ॥

दुसरी ओळ कानडींतील आहे. तिचा अर्थ असा आहे कीं वरील तीन पदार्थ व आणखी एक आहे; हे चार मिळून कार्य होतें. चौथा पदार्थ उच्चारण्याच्या आंतच त्याची वाचा खुंटली व स्मरणशक्ती कमी झाली. नागार्जुनानें ही रसविद्या मिळविण्याविषयीं फार श्रम केले व तींत त्यास सिद्धि मिळविण्यापूर्वी फार वेळां निराश व्हावी लागलें, वगैरे गोष्टी कानडी लोकांकडून ऐकण्यास मिळतात. त्यानें अशा निराशेच्या वेळीं काढिलेला उद्गार ह्मणून खालील कानडीवचन प्रसिद्ध आहे त्यावरून रससिद्धि मिळण्यास कसकशाची जरूरी आहे हें कळून येत असल्यामुळें ते वचन येथें देऊन ठेवितो:—

मृंग वेंयिलिल्लु ।
वंग बालियलिल्लु ।
रस निल्ललिल्लु ।
मुद्दु कंगेट्टु हाळनादे भिक्षांदेहि ॥ १ ॥

याचा अर्थ असा कीं, भृंग (अभ्रक ?) शिजला (ह्य. रस झाला ?) नाहीं. वंगाचा स्तंभ झाला नाहीं; व रस (अग्नींत) टिकला नाहीं, यामुळें मीं कंगाल होऊन भीक मागत आहे. भिक्षा घाला ! असें ह्मणत तो कित्येक दिवस फिरत असे, ह्मणे ! नागार्जुनानें रसविद्येवर कानडींत व संस्कृतमध्यें अनेक ग्रंथ रचल्याविषयीं कर्नाटकांतहीं प्रसिद्धि आहे. या

हकीकतीपैकीं बऱ्याच भागाला 'कृतपुरपुराण' नामक पौराणिक ग्रंथाचा आधार आहे असें ह्मणतात. 'कृतपुर' ह्मणजे गदग कृतपुरपुराणांत गदग व त्या आसपासच्या प्रदेशांचें माहात्म्य आहे. पण अद्यापि हा ग्रंथ मला पाहण्यास मिळाला नाहीं.

नागार्जुन नांवाचा माध्यमिकमताचा एक प्रसिद्ध बौद्धही होता अशी तिसरी एक प्रसिद्धि आहे. नागार्जुन ज्या काळीं होऊन गेला त्याकाळीं धर्मांतर करण्याची फार पद्धत असल्यामुळें कारणपरत्वें एकाच मूळच्या वैदिकधर्मीय नागार्जुनानें जैन व बौद्ध धर्म स्वीकारिला असावा असें आह्मांस वाटतें. अशा प्रकारें नागार्जुन एकच पण चोहोंकडे तांत्रिक विद्या व रसविद्या यांमध्यें प्रवीण म्हणून प्रसिद्ध असलेला लेखक असल्याचें कळून येईल. रसवैद्यक व साध्या वैद्यकांतही तो अति निपुण होता असें दिसतें. नागार्जुनाचा उल्लेख नंदिसूत्रें व आवश्यक सूत्रें यांच्या प्रारंभीं आहे. (Ind. Ant. Vol. 18, P. 8. पहा) यानें आर्यरसायन शास्त्रांत बरीच सुधारणा करून नवे शोध लावले असें म्हणतात. रसरत्नसमुच्चयकारानें व नित्यनाथानें (रसरत्नाकरकारानें) २७ रससिद्धांत याची गणना केलेली आहे. बौद्धांत, जैनांत व वैदिकांत हा प्रसिद्ध होऊन गल्यामुळें या सर्व परंपरेमध्यें त्याचें नांव आढळतें या सर्व परंपरेंत वर्णित असलेला नागार्जुन एकच प्रसिद्ध मनुष्य असावा, असा आम्हीं वर आमचा ग्रह दिलेलाच आहे. प्रत्येक परंपरेंत तो प्रसिद्ध होता; व त्या त्या लोकांनीं त्याविषयीं कांहींतरी लिहून ठेविलेलेंच आहे. तें कितपत एकमेकांशीं सुसंगत असेल हा प्रश्नच आहे. फार प्राचीनकाळीं होऊन गेलेल्या प्रसिद्ध पुरुषांविषयीं, त्यांच्या काळाविषयीं असाच घोटाळा नेहमीं बहुधा असतो.

बौद्धधर्माच्या प्राबल्याच्या काळांत कांहीं रोगांवरचीं औषधें शिलालेखांत कोरून ठेविलेलीं असत. असें वाटतें; कारण वृंद व चक्रपाणि यांनीं एका अंजनाचा प्रयोग देऊन तो पाटलिपुत्रांत नागार्जुनानें स्तंभावर कोरिला होता असें लिहिलेलें आहे.

" द्रव्याण्येतानि संचूर्ण्य वर्तिः कार्या नभोंबुना ।
नागार्जुनेन लिखिता स्तंभे पाटलिपुत्रके ॥ "

वृंदलिखित सिद्धयोगः ६०–१४८.

या वृंदाच्या ग्रथांतील उल्लेखांवरून नागार्जुन हा चक्रपाणि व वृंद यांहून प्राचीनतर असला पाहिजे हें स्पष्ट दिसतें. चक्रपाणीनें आपला ग्रंथ वृंदाच्या सिद्धयोगावरून लिहिला; त्याचा काळ इ. स. १०४० च्या सुमाराचा हें प्रसिद्ध आहे. चक्रपाणीचा बाप गौडनाथ नयपाल याच्या दरबारांत वैद्य होता. वृंद हा चक्रपाणीहून १००।२०० वर्षें तरी प्राचीनतर असला पाहिजे; व नागार्जुन त्याहून किती प्राचीनतर असेल तें कळत नाहीं. तें आतां शोधून काढावयाचें आहे.

दल्ल (ल्व) ण नांवाचा सुश्रुतावरचा टीकाकार आहे; त्यानें लिहिलें आहे कीं, सुश्रुताची जी सध्याची प्रत आहे. तिचें मूळ नागार्जुनानें अनेक साधनांवरून साध्य आहे याप्रमाणें ठरविलें.

आल्बीरुणी नामक अरबी लेखकानें याच्याविषयीं असें लिहिलें आहे:—" A famous representative of this art (alchemy) was नागार्जुन a native of the fort Daihak near Somnath. He excelled in it and composed a book which contains the substance of the whole literature on this subject and is very rare. He lived nearly a hundred years before our time."—India, Vol. I, p. 189.

आल्बीरुणीचें मत खरें धरीलें तर इ. स. ९०० च्या सुमारास नागार्जुन निवर्तला असें ठरेल, पण हें आल्बीरुणीचें विधान चुकलेलें असावें. कारण चिनी प्रवासी हुएनत्सांग यानेंही स्थानिक दंतकथांवरून नागार्जुनाविषयीं असें लिहून ठेविलें आहे:—"नागार्जुन बोधित्सव" was well practised in the art of compounding medicines. by taking a preparation he nourished the years of life for many hundreds of years, so that neither the mind nor appearance decayed सातवाहराज had partaken of this mysterious medicine" Beal's

Buddhist Records of the Western World Vol. II, p. 212. हुएनत्सांग हा इकडे (हिंदुस्थानांत) इसवी सन ६२९ च्यानंतर १५–२० वर्षें होता. त्यावेळीं जर नागार्जुनाच्या कथा प्रचलित होत्या तर इ. स. ९०० च्या सुमारास तो निवर्तला, हें आल्बीरुणीचें विधान खरें कसें मानतां येईल? नागार्जुनास किमया ' ऊर्फ ' रसविद्या ' येत होती, व तो सातवाहन राजाचा मित्र होता याबद्दलही हुएनत्सांगनें लिहिलें आहे. तेव्हां, हुएनत्सांगचा नागार्जुन कोण याबद्दल शंका राहत नाहीं. इ. स. ६२९ च्या सुमारास इकडे, नागार्जुन एका सातवाहन राजाचा मित्र व रसविद्याप्रवीण म्हणून प्रसिद्ध असल्याचें यावरून कळून येईल. हुएनत्सांग लिहितो:—" नागार्जुन was a friend of सात वाहन ' a king of कोसल country to the southwest of Urisya (ओडिसा) and watered by the upper feeders of the Mahanadi.—Ibid, II, P. 209. या सातवाहनाच्या काळाबद्दल Burgess चा आर्कीयालॉजिकल सर्वे ऑफ इंडिया पहा. प्रंबधचिंतामणींतील अगदीं प्रारंभी जी हकीकत दिली आहे. तिला हुएलत्सांगच्या या उल्लेखावरून बळकटी येते व सातवाहनाचा व नागार्जुनाचा संबंध होता, हें ऐतिहासिक दृष्टचाही खरें मानावें लागतें. नागार्जुनाचा समकालीन सातवाहन शककर्ता सातवाहनच होय कीं नव्हे एवढेंच आतां पाहणें जरूर आहे. बहुधा ते एकच असावेत; कारण युरोपीय विद्वान् बौद्ध परंपरावरून नागार्जुन इ. स. च्या पहिल्या शतकांत होऊन गेला असेंच मानतात, व तें वरील परंपरेशीं जुळतें; पण अकराव्या शतकांतील **राजतरंगिणी**कारानें नागार्जुन हा शाक्यसिंहानंतर १५० वर्षांनंतर होऊन गेला असें लिहिलें आहे. यावरून तो शकापूर्वी आणखी ३०० वर्षें जाऊं शकतो; पण राजतरंगिणीकाराचें हें विधान आल्बीरुणीच्या विधानाप्रमाणेंच चुकीचें असावें असें वाटतें. राजतरंगिणीकाराला अकराव्या शतकांत नागार्जुनाच्या काळाबद्दल काय प्रमाणें मिळालीं असतील तीं असोत ! तीं त्याच्यावेळींही दुर्मिळ असावींत असें आल्बीरुणीच्या त्याच्या ग्रंथांच्याही दुर्मिळत्वाविषयींच्या उल्लेखांवरून वाटतें.

बौद्धांचा माध्यमिकमताचा तत्ववेत्ता नागार्जुन आणि रसवेत्ता व तंत्रवेत्ता नागार्जुन हे परस्पर भिन्न आहेत. अशा कित्येकांच्या शंका असल्याचें वर लिहिलेंच आहे. हे भिन्न नसावेत असा तर आमचा पक्का ग्रह आहे. ते भिन्नच असतील तर, बौद्ध तत्ववेत्ता नागार्जुन हा राजतरंगिणीकाराचा (इ. स. ३०० च्या सुमारचा) नागार्जुन असावा, असें धरावें लागेल कांहीं झालें तरी, आमचा रसवेत्ता व तंत्रवेत्ता नागार्जुन हा (शककर्ता). सातवाहनाचा दोस्त, अतएव, पहिल्या शतकांतलाच ठरतो. त्यास इ. स. १०० च्या सुमारास धरण्यास कांहीं हरकत नाहीं.

नागार्जुनाचे ग्रंथ.

आतां नागार्जुनाच्या ग्रंथांविषयीं थोडेंसें लिहितों. त्याचे उपलब्ध व अनुपलब्ध ग्रंथांची यादी खालीं देतों.

(१) नागार्जुनसंहिता (एक लक्ष ग्रंथ–तंत्रशास्त्र.) अप्रसिद्ध.
(२) नागार्जुनकक्षपुटी (तंत्रग्रंथ) छापला आहे.
(३) नागार्जुनतंत्र (बौद्ध तंत्र) अप्रसिद्ध.
(४) आश्चर्ययोगरत्नमाला (तंत्रशास्त्र) छापलेली आहे.
(५) नागार्जुनकल्प (वैद्यशास्त्र) अप्रसिद्ध.
(६) रतिशास्त्र (कामशास्त्र) छापलें आहे.
(७) लोहशास्त्र (याचा चक्रपाणीनें १०४० त उल्लेख केला आहे.) अप्रसिद्ध.
(८) सरत्नाकर (रसशास्त्र ऊर्फ किमया) अप्रसिद्ध.
(९) आरोग्यमंजरी (वैद्यशास्त्र , अप्रसिद्ध.
(१०) धातुरत्नमाला (किमया–कर्त्याबद्दल संशय आहे) अप्रसिद्ध.
(११) योगसार (वैद्यशास्त्र) अप्रसिध्द.

सिद्ध नागार्जुन व त्याचे ग्रंथ.

नं. २

मागे सिद्धनागार्जुनाविषयीच्या जैन व कानडीपरंपरांचा विचार केला. प्रबंधचिंतामणींतील हकीकत जैन परंपरेप्रमाणें आहे. त्यानंतर प्रो. राय

यांचा His of Hindu cheriesty Vol. II, हा ग्रंथ नुकताच प्रसिध्द झालेला हातीं आला. त्यांत त्यांनीं नागार्जुना विषयींच्या सर्व बौध्द परंपरा––तिबेटी व इतर बौध्द ग्रंथांवरून आणि तारानाथांच्या बौध्द धर्माच्या इतिहासावरून संगृहीत केलेल्या आहेत. इंग्रजींतून या संग्रहास किंवा हा संग्रह करण्यास जितकी साधनांच्या दृष्टीनें सुलमता आहे, तितकी मराठींतून नाहीं, हें उघडच आहे. म्हणूनच, मुख्य मुख्य गोष्टींचा थोडक्यांत (वरील पुस्तकावरूनच) या लेखांत मराठींत उल्लेख करितों.

नागार्जुन हा माध्यमिक मताचा प्रवर्तक असल्यामुळें, उत्तरेकडच्या बौध्द ग्रंथांतून त्याजाविषयींच्या कथा, त्याच्या अद्भुत सिद्धि, व त्यानें केलेले चमत्कार वगैरे विषयीं पुष्कळ उल्लेख आहेत. माध्यमिक मताचा मुख्य सिद्धांत—**सर्व शून्यं**—असा आहे. हुएनत्स्यांगनें देव, अश्वघोष, कुमारलब्ध व नागार्जुन या चौघांस ‘चतुर्दिशेचे चार सूर्य’ असें म्हटलेलें आहे. (Julian's texts, Vol II, p. 214) इ. स. ४०१–४०९ च्या इतक्या प्राचीनकाळीं नागार्जुन बोधिसत्वाचें एक चरित्र चीनीभाषेंत भाषांतरित झालेलें होतें. (Bun. Nanjio's Catalogue, Ap. I, No, 3.) ह्या चिनी भाषेंतील भाषांतराचें मूळ इकडील एकादा संस्कृत ग्रंथ असला पाहिजे, हें उघड आहे. तो निदान १००।१५० वर्षें तरी प्राचीनतर असला पाहिजे; आणि या ग्रंथांहून १००।१५० वर्षें पूर्वीं सिध्द नागार्जुन स्वतः होऊन गेला असला पाहिजे हें उघड होतें. यावरून मागें आम्हीं जो इ. स. १०० च्या सुमाराचा नागार्जुनाचा काळ ठरविला तो बरोबरच आहे हें कळून येईल. तारानाथ या तिबेटी भिक्षूनें सतराव्या शतकाच्या प्रारंभीं एक बौद्ध धर्माचा इतिहास लिहिलेला आहे. त्यांत त्यांनीं सिद्ध नागार्जुनाविषयीं आपल्या वेळीं प्रचलित असलेल्या सर्व दंतकथांचा संग्रह करून ठेविलेला आहे. मोठ्या लोकांबद्दलच्या आख्यायिकाही कालांतरानें कशा मोठ्या होत जातात, हें ज्यांच्या लक्षांत आहे, त्यांनीं जैन परंपरांप्रमाणें, या बौद्ध परंपरांचेंही, ऐतिहासिक निष्कर्षाच्या

वेळीं, फार सूक्ष्मतऱ्हेनें निरीक्षण केलें पाहिजे. तारानाथाचा इतिहास व इतर तिबेटी साधनें यांवरून थोडक्यांत बौद्धपरंपरेप्रमाणें सिद्ध नागार्जुनाचें चरित्र असें असल्याचें कळून येतें:—

“विदर्भ देशांतील एका श्रीमान ब्राह्मणास पुष्कळ वर्षें पर्यंत मुलगा झालेला नव्हता. त्याला एके दिवशीं असा दृष्टांत झाला कीं १०० ब्राह्मणांना भोजन घालून त्यांस दानें दिल्यानें तुला पुत्र होईल. त्याप्रमाणें त्यानें केलें; व पुढें दहा महिन्यांनीं त्यास मुलगा झाला. नंतर त्याचें जातक वर्तविण्यासाठीं त्याचा बाप ज्योतिष्यांकडे गेला; त्यांत असें निघालें कीं तें बालक एका आठवड्यावर जगणार नाहीं. मग तें मूल अधिक जगण्याचा उपाय ह्मणून ज्योतिषांनीं १०० भिक्षूंनां त्याचप्रमाणें भोजनादि उपचार करण्यास सुचविलें. यायोगें फक्त सातच वर्षें मुलगा जगेल असें त्यांनीं सांगितलें. सातव्या वर्षाच्या अखेरीस आईबापांनां त्याजबद्दल अत्यंत हुरहुर वाटुं लागली. त्याचें मरण आपल्या समोर घडलेलें त्यांजकडून न पाहवल्यामुळें, त्या मुलांच्या शुश्रूषेस माणसें देउन त्यांनीं त्याची दुसरीकडे रवानगी केली. तो मुलगा अशा तऱ्हेनें आपले दिवस दुःखांत कंठीत असतां, एके दिवशीं महाबोधिसत्व अवलोकितेश्वर खसर्पण यानें गुप्तरूपानें त्यास दर्शन दिलें व ‘जमका अजब तडाख्यां’ तून सुटावयाचें असेल तर तूं मगधदेशांतील नालेंद्र (नालंद) येथील महाविहारास जा, ह्मणून सांगितलें. नंतर त्या मुलानें तेथें प्रयाण करून, द्वाराजवळ जाऊन कांहीं गाथा ह्मटल्या. त्यावेळीं तेथें विहाराधिपति प्रसिद्ध सत्पुरुष श्रीसहरभद्र हे होते. त्यांनीं नागार्जुनास भिक्षु केलें. पुढें कित्येक दिवसांनीं मगधदेशांत दुष्काळ पडून विहारांतील भिक्षूंच्या पोटापाण्याची फार टंचाई पडूं लागली. त्यावेळीं झालेल्या त्यांच्या हालानें नागार्जुनाच्या मनावर फार चमत्कारिक परिणाम झाले. यावेळीं प्रथम या लोकांचें व विशेषेंकरून नागार्जुनाचें लक्ष, भिक्षूंसाठीं लोकांवर तर भार न टाकतां, संपत्ति मिळविण्याचा या जगांत कांहीं मार्ग आहे कीं काय, या शोधाकडे

लागलें. ज्या मानानें ज्याची कळकळ असते त्या मानानें त्याजकडून क्रिया घडत असते, या महासिद्धांताप्रमाणें, नागार्जुनाचें लक्ष याविषयाकडे दिवसेंदिवस अधिकाधिकच वेधत गेलें. त्यानें रसविद्या पैदा करण्यासाठीं हिंदीमहासागरांतील एका बेटांत एक रससिद्ध होता त्याजकडे गमन केलें. समुद्राचें उल्लंघन करणें कोणत्याही साधारण उपायांनीं शक्य नसल्यामुळ त्यानें आकाशगमनाच्या कांहीं प्रयोगानें एका झाडाचीं दोनपानें आपल्या पायांस लावून, आकाशमार्गानें त्या सिद्धाकडे गमन केलें. त्या सिद्धास तेथें हा मानवी प्राणी कसा आला याचें मोठें आश्चर्य वाटूं लागलें. नंतर नागार्जुनानें आपण त्या पानांच्या योगें कसे आलों, हें निवेदन केलें. नागार्जुनानें तीं दोन्हीं पानें न दाखवितां एक पान लपवून ठेविलें होतें. त्याचा पुढें उपयोग झाला. त्या सिद्धाच्या मनांत ही विद्या जंबूद्वीपांतील मानवांना कळूं नये असें असल्यामुळें, तें पान आपणांस दिल्यास आपण ही विद्या तुला शिकवूं ह्मणून त्यानें नागार्जुनास सांगितलें. नागार्जुनानें परत जाण्याकरितां एक पान भिक्षूच्या शाटींत लपवूनच ठेविलें होतें, ह्मणून ती अट कबूल केली. सिद्धानें तें पान त्याजकडून मागून घेण्यांत त्याचा एवढाच उद्देश होता कीं, नागार्जुनास तेथेंच अडकवून ठेवावें; पण नागार्जुन त्याहूनही वस्ताद. त्यानें ती विद्या त्या सिद्धाकडून पैदा करून त्या महासागरांतील बेटांतून जंबूद्वीपाकडे (हिंदुस्थानाकडे) पुनरपि आकाशमार्गानें गमन केलें. या वेळीं तें दुसरें पान अर्थात उपयोगी पडलें. नालंदच्या विहारास येऊन रससिद्धीच्या योगानें त्यानें सर्व भिक्षूंचें यथायोग्य पोषण केलें. त्यानें या विद्येमुळें व इतर तपानें सिद्धि मिळविल्या. नालंदच्या भिक्षूंनां त्यांनीं बौद्धधर्माचीं तत्वें चांगलीं शिकविलीं. नागार्जुनानें उत्तर कुरु देशाकडे जाऊन तेथें अनेक चैत्यें व आलयें स्थापिलीं. त्यानें विविधशास्त्रें वैद्यक, ज्योतिष, व रसविद्या यांवर अनेक ग्रंथ लिहिले. सरहभद्राच्या मरणानंतर नालंदच्या विहाराचें आधिपत्य साहजिकच याच्याकडे आलें. ही कामगिरी त्यानें चोख बजावली. सरहभद्राकडून प्राप्त झालेल्या माध्य-

मिक मताचा त्यानें चांगला परिपाक करून त्याचा प्रसार केला. नागार्जुन हा दक्षिणेकडील राजा De-Chye (शंकर) याचा मित्र होता. त्यास त्यानें बौद्ध केलें.

नागार्जुनानें श्रीशंकराचार्यांचीं मतें खोडून काढिलीं असाही या हकीकतींत एकेठाई उल्लेख आहे; पण हा कालविपर्यासाचा ढळढळीत दोष आहे. असो. वरील बौद्धपरंपरांच्या हकीकतीवरून एवढें सिद्ध होतें कीं, नागार्जुन प्रथम ब्राह्मणधर्मीयांच्या पोटीं जन्मून ब्राह्मणधर्मातच वाढला, व पुढें त्यांनीं बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन रसविद्या प्राप्त करून घेतली. हुएन्स्योगच्या व या हकीकतींवरून एवढें सिद्ध होतें कीं, नागार्जुन नांवाची एकच प्रसिद्ध व्यक्ति असून, कांहीं लोक समजतात त्याप्रमाणें त्या दोन अगर तीन व्यक्ति नव्हत्या हाच नागार्जुन माध्यमिक मताचा प्रवर्तक होता एवढेंच नव्हें, तर (६–७ व्या शतकांत देखील) याची मंत्र, तंत्र रसविद्या, आकाशगमन इत्यादि विद्यांत तो सिद्ध होता अशी प्रसिद्धि होती. नागार्जुन एकच व्यक्ति होती याबद्दल प्रो. रायनीही असें लिहिलेलें आहे:– "It is thes clear that all the testimonies concur in asserting नागार्जुन not only as the originator of the माध्यामिक philosophy but also as an gadept in majca, conjuration and and alchemy, and that even so early as the 7th century A. D. *His, of Hindu Chemistry*, Vol. II.) p. XX, Introduction.

बौद्ध परंपरेवरून आणखीं एक गोष्ट लक्षांत येते कीं, नागार्जुनानें रसविद्या प्राप्त करून घेण्याच्या पूर्वींच, आकाशगमनविद्या प्राप्त करून घेतली होती. ही विद्या त्यानें पादलिप्ताचार्य नामक जैनपरंपरेच्या सिद्धाकडून प्राप्त करून घेतली, अशी जैन परंपरा आहे. यावरून नागार्जुनानें बौद्धधर्माची दीक्षा मिळण्यापूर्वींच जैन परंपरेच्या एका सिद्धाकडून आकाशगमनविद्या मिळविली होती असें वाटतें नागार्जुन प्रथम ब्राह्मणधर्मीय असून आकाशगमनविद्या प्राप्त करून घेण्याकारितां जैनधर्मी

गुरूकडे त्यानें अध्ययन केलें व नंतर भूतदयेच्या मूर्तिमंत तत्वाकारितां त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें त्यानें बौद्धधर्म स्वीकारिला, व बौद्ध धर्मस्वीकारल्यानंतर त्याचें रसविद्येकडे लक्ष गेलें, असें वरील हकीकतीवरून सिद्धांत निघतात. नागार्जुनाच्या धर्मांतरांविषयीं व धर्ममतांविषयीं एवढी माहिती मिळते. त्या त्या काळच्या धर्ममतांची छाप त्याच्या त्या त्या ग्रंथांत असलेली दिसून येते. त्याचा कक्षपुटी ग्रंथ जर पाहिला, तर तो पूर्ण तांत्रिक स्वरूपाचा असून प्रारंभीं नमन शंकरासच आहे; हा ग्रंथ केवळ तंत्रशास्त्राचा असून आरंभीं अनेक ब्राह्मण परंपरेच्या तंत्रग्रंथांचा उल्लेख आहे. यांत आकाशगमन विद्येचाही भाग आहे. यावरून हा ग्रंथ नागार्जुनानें ब्राह्मणधर्मांत असतांनाच, पण आकाशगमन विद्या प्राप्त करून घेतल्यानंतर लिहिला असावा असें अनुमान निघतें. यावरून दुसरें एक असें समजून येतें कीं नागार्जुनानें बहुधा जैन धर्माचा केव्हांच स्वीकार केला नसून, फक्त आकाशगमनविद्या मिळविण्यासाठीं तेवढेंच त्यानें पादलिप्ताचार्यांजवळ अध्ययन केलें असावें. जरी धर्मदीक्षा त्यानें घेतली असली तरी विद्याप्राप्ती पुरतीच ती घेतली असावी; वास्तविकरीत्या त्याच्या मनाचा कल कांही जैन धर्माच्या मतांकडे नसावा. नागार्जुनाचे मनाचा कल बौद्धधर्माकडेच पुढें वळला. बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतरच याचें लक्ष रसविद्येकडे लागलें असावें, या सिद्धांतास देखील त्याच्या रसविद्येवरील ग्रंथावरून पुष्टीकरण मिळतें. नागार्जुनाचे एकंदर तीन ग्रंथ छापलेले आहेत; व एक ग्रंथ मला हस्तलिखित प्रतीच्या रूपानें उपलब्ध झालेला आहे.

छापील ग्रंथ.	हस्तलिखित.
नागार्जुन कक्षपुटी. आश्चर्ययोगरत्नमाला. राति शास्त्र.	रसरत्नाकर.

बाकीचे ग्रंथ अझून पहाण्यासही मिळत नाहींत. वर दिलेल्या उपलब्ध अशा ४ ग्रंथांवरून पहातां देखील मागील धर्ममतांच्या फरकाची छाया त्यांपैकीं शेवटच्या ग्रंथांतच तेवढी दिसून येते, कारण तोच फक्त रसविद्येवरील ग्रंथ आहे. कक्षपुटींत व आश्चर्ययोगरत्नमालेंत केवळ तंत्रशास्त्राचाच विषय असून शैव परंपरेच्या अनेक तंत्रांतूनच नागार्जुनानें हे विषय घेतलेले आहेत. त्यावेळीं त्याच्या मनावर इतर मतांची छाया पडलेली दिसून येत नाहीं. कक्षपुटींत आकाशगमनविद्येवर कांहीं भाग आहे, पण जैनधर्माचा पगडा त्याच्या मनावर बसलेला कोठें दिसून येत नाहीं. सारे मंत्र व साऱ्या देवता वगैरे केवळ शैव तांत्रिक परंपरेच्याच आहेत. कक्षपुटी लिहिल्या तेव्हां नागार्जुनाला रसविद्येचीं माहिती नव्हती असें मानण्यास एक कारण आहे. तें असें कीं, प्रारंभी त्यानें **रसार्णव** ग्रंथांचा उल्लेख केलेला असूनही रसशास्त्रावरील एकही प्रयोग त्यानें आपल्या ग्रंथांत दिलेला नाहीं; निदान कलकत्ता व बेळगांव येथें छापलेल्या कक्षपुटीच्या दोन्ही प्रतींत रसार्णवींतील एकही रसविद्येचा प्रयोग नाहीं. यावरून त्यावेळीं नागार्जुनास 'रसार्णव' हा शैव तांत्रिक परंपरेचा ग्रंथ केवळ **तंत्रग्रंथ** ह्मणूनच महत्वाचा वाटला असावा; रसग्रंथ ह्मणून रसविद्येवरचा ग्रंथ ह्मणूनच वाटला नसावा, हें एक; किंवा कक्षपुटी सध्यां मिळत आहे तशी, अपूर्ण तरी असली पाहिजे हें एक; पण ग्रंथरचनेवरून पहातां कक्षपुटी अपूर्ण असल्याप्रमाणें दिसत नाही. यावरून पहिलेंच अनुमान खरें ठरण्याचा संभव अधिक आहे. मग, रसार्णव ग्रंथाच्या प्रस्तावनेंत नागार्जुनानें उल्लेख केला असून पुढें सबंध ग्रंथांत यांतील रसविद्येवरील एकही प्रयोगाचा उतारा नाहीं, हें कसें झालें असावें? यावरून त्यावेळीं त्याच्या मनाची या विद्येकडे प्रवृत्ति झाली नसावी व त्यास तिचा अनुभव आला नसावा, असेंच मानावें लागतें. या दोन्ही ग्रंथांच्या रचनेच्या वेळीं नागार्जुन पूर्ण शैव होता असेंच मानावें लागतें. तिसरा ग्रंथ 'रतिशास्त्र' यांत 'शिवप्रोक्तरतिशास्त्र'

व गर्गानें पारीक्षित जनमेजयास सांगितलेलें रतिशास्त्र याच दोन प्राचीन ग्रंथांचा उल्लेख असून, नागार्जुन श्रीशैलपर्वतावर असतेवेळीं वंडिन् नामक शिष्यास त्यानें हें रतिशास्त्र सांगितलें असें त्यावरून कळून येतें यांत शिवा विषयीं नागार्जुनाची फार पूज्य बुद्धी दिसून येते. तेव्हां हाही ग्रंथ शैव परंपरा कायम असतेवेळींच नागार्जुनानें लिहिला असेंच मानावें लागतें. आतां रहातां राहिला रसरत्नाकर. यांत मात्र बौद्ध परंपरेची कर्त्याच्या मनावर छाया पडलेली दिसून येते. त्यानें श्लोक ३८७ मध्यें लिहिलें आहे कीं :—

प्रणिपत्यसर्वबुद्धान्........सकलदोषविनिर्मुक्तान् ।
वक्ष्ये सर्वहितार्थं कक्षपुटं सर्वसिद्धिकरं ॥ ३८७ ॥

पहिल्या चरणांतील कांहीं भाग हस्तलिखित प्रतींत नाहीं. येथें सर्व बुद्धांनां स्पष्ट नमन आहे. तसेंच दुसऱ्या एका ठिकाणीं 'प्रज्ञापारमिता' नामक एका बौद्ध परंपरेच्या देवतेच्या स्वप्नांतील स्फूर्तीनें (दृष्टांतानें) आपणांस अमुक एक प्रयोग समजला असें रसरत्नाकरांत ह्मटलें आहे. मात्र या श्लोकाचा आमच्या प्रतींतील पाठ व प्रो. रायच्या प्रतींतील पाठ मात्र भिन्न आहेत. ते दोन्ही येथें देतों—

आमच्या प्रतींतील पाठ.

प्रज्ञायां तु मृडा निशीथसमये स्वप्ने प्रसादीकृतं ।
नाम्ना तीक्ष्णमुखं रसेंद्रममलं नागार्जुनप्रोदितं ॥ ८६ ॥

प्रो. रायच्या प्रतींतील पाठ. (उतारे पृ. १० पहा)

प्रज्ञापारमिता निशीथसमये स्वप्ने प्रसादीकृतं ।
नाम्ना तीक्ष्णमुखं रसेंद्रममलं नागार्जुनप्रोदितं ॥

या पाठभेदांत 'प्रज्ञायां तु मृडा' असा एक पाठ आहे, व 'प्रज्ञापारमिता' असा एक पाठ आहे. पहिल्या पाठानें 'शिवानें बुद्धींत रात्रीं स्वप्नांत प्रेरणा केली' असा अर्थ निघतो व दुसऱ्या पाठानें 'प्रज्ञापारमितेनें' रात्रौ स्वप्नांत प्रेरणा केली असा अर्थ निघतो. तेव्हां एथें शंका आली. मूळचा पाठ कोणता कोणास माहीत? या पाठांत जरी शंका असली, व त्यामुळें 'शिव' कीं 'प्रज्ञापारमिता' देवता त्यांत उद्दिष्ट आहे याची जरी शंका

असली, तरी वरील श्लोक ३८७ मध्यें मात्र प्रो. रॉय व आमच्या— दोघांच्याही प्रतींत 'प्रणिपत्य सर्वं बुद्धान्' असें स्पष्ट आहे. तसेंच यांत नागबुद्धि अगर नागबोधि या बौद्धपरंपरेच्या ग्रंथकारांचे उतारेही दिलेले आहेत. त्याचें पुढें वर्णन आहेच. असो. या एकंदर विवेचनाचा मथितार्थ एवढाच कीं, रसविद्या प्राप्त झाली तेव्हां नागार्जुनानें बौद्ध धर्म स्वीकारिला होता हेंच बहुधा संभवनीय दिसतें.

नागार्जुनानें नानाशास्त्रांचा अभ्यास नाना तांत्रिक व वैदिक परंपरांवरून केलेला होता, यांत शंकाच दिसत नाहीं; कारण त्यानें कक्षपुटींत ह्मटलें आहे कीं:—

संसारे बहु विस्तीर्णे विद्यासिद्धिमनेकधा ।
प्रोक्तवान् शंकरः शीघ्रं यदपृच्छत पार्वती ॥ १ ॥
अन्यै देवगणैः सिद्धैः मुनिभिः साधकोत्तमैः ।
यद्यदुक्तं हि शास्त्रेषु तत्सर्वमवलोकितं ॥ २ ॥
शांभवे यामले शाक्ते मौळ कौलेय डामरे ।
स्वच्छंदे नाकुले शैवे राजतंत्रेऽमृतेश्वरे ॥ ३ ॥
उड्डीशे वातुले तंत्रे उच्छिष्टे सिद्धशाबरे ।
किंकिणी मेलतंत्रेच काकचंडीश्वरीमते ॥ ४ ॥
शाकिनी डाकिनीतंत्रे रौद्रेऽनुग्रह विग्रहे ।
कौतुके शक्तितंत्रे च निराकार गुणोत्तरे ॥ ५ ॥
हरमेखलके तंत्रे इंद्रजाले रसार्णवे ।
आथर्वणे महावेदे चार्वाके गारुडेऽपिच ॥ ६ ॥
इत्येवमागमप्रोक्तं वक्त्राद्वक्रेण यच्छ्रुतं ।
तत्सर्वं हि समुद्धृत्य दग्धो घृतमिवादरात् ॥ ७ ॥
साधकानां हितार्थाय मंत्रखंड मिहोच्यते ।

यावरून शैव व इतर परंपरेचे आगम व तंत्रग्रंथ, सिद्धांचे ग्रंथ मुनींचे ग्रंथ, साधकांचे ग्रंथ, नांवानें उल्लेखिलेलीं तंत्रें—ही सर्व आगमोक्त माहिती, व तोंडच्या परंपरेनें मिळालेली माहिती—या सर्वांवरून दह्या-पासून लोणी काढितात तशी नागार्जुनानें माहिती काढून तयार केलेली आहे. यावरून नागार्जुन हा जबरा शोधक व मोठा संग्रही होता हें कळून येईल. त्यानें नाना परंपरांवरून विद्यांचा संग्रह केला होता.

इ. स. १०० च्या पूर्वी तांत्रिक व इतर परंपरेचे ग्रंथ निपजले होते हें यावरून कळून येईल, आतां नागार्जुनाचे रसरत्नाकराविषयींच विशेषें-करून विचार करूं.

रसरत्नाकर (नागार्जुनाचा)

नागार्जुन कोण होता, तो कधीं होऊन गेला, व त्यानें कोणकोणते ग्रंथ लिहिले, याविषयीं माहिती दिलेलीच आहे. आतां त्याच्या रसरत्नाकराची जी एक प्रत मिळाली आहे तीविषयीं थोडीशी अधिक माहिती देतों. रसरत्नाकर ग्रंथ एक नित्यनाथाचा आहे; व दुसरा नागार्जुनाचा आहे. हे अगदीं भिन्न ग्रंथ आहेत.

नागार्जुनाचा ग्रंथ एकंदर ६७० श्लोकांचा आहे. यांत रसविद्या व रसायनविद्या ह्मणजे लोहसिद्धि देहसिद्धी हे दोन्ही विषय अगदीं उत्तम तऱ्हेनें वर्णिलेले आहेत; नागार्जुन हा भारतीय रसवेत्त्यांमध्यें एक अपूर्व सिद्ध होऊन गेला. रसरत्नसमुच्चयकर्त्यानें याची २७ रससिद्धांत गणना केलेली असून, याच्या ग्रंथांतून अनेक उतारे घेतलेले आहेत. नागार्जुनानें आपल्यापेक्षांही प्राचीनतर अशा कांहीं ग्रंथकारांचा उल्लेख केलेला आहे, तो ऐतिहासीक दृष्ट्या अत्यंत उपयोगी व महत्वाचा आहे नागबोध अगर नागबुद्धि याचा त्यानें दोन ठिकाणी असा उल्लेख केलेला आहे:....

(१) शुद्धः स भवेत्सारणाविधि नागबोधिकृतः॥ ३९४ ॥
(२) दारिद्र्यार्णवमग्ना सत्वं द्विष्ट्वा (?) द्विपंचविंशतिकम् ॥
करुणावेशितमतिमान् कनककरं नागबुद्ध्यैतत ॥ ४१५ ॥

नागार्जुनानें नागबोधि अगर नागबुद्धि याचा सारणविधि दिलेला आहे; नागार्जुन त्यास फार पूज्य मानीत आहे. यावरून नागबोधि हा नागर्जुनाचा शिष्य नसून कोणी तरी नागार्जुनाहून प्राचीनतर ग्रंथकार आहे हें सिद्ध होतें. या नागबोधीची गणता र. र. स. कारानें रससिद्धांत केलेली आहे.

नागार्जुनानें आपणांस रससिद्धी कशी मिळाली, याची हकीकत आ-पल्या ग्रंथांत दिलेली आहे, ही मोठी अपूर्व गोष्ट होय; शास्त्रीय ग्रंथांत

आणि असें आत्मवृत्त सांपडणें हें फारच दुर्लभ होय; आजपर्यंत आह्मी पाहिलेल्या कोणत्याही रसग्रंथांत असें आत्मवृत्त मिळत नाहीं; या कारणांमुळें एक प्रकारचें विशेष महत्व या ग्रंथास प्राप्त झालेलें आहे आत्मवृत्ताचा संपूर्ण भाग येथें मी उतरून घेतों: (अशुद्धें बरीच आहेत)

श्रीशैलपर्वतस्थायी सिद्धो नागार्जुनो महान् ।
सर्वसत्वोपकारी च सर्वभाग्यसमन्वितः ॥ ४१७ ॥
प्रार्थितो ददते शीघ्रं तेनावश्यं (?) हि यादृशं ।
दृष्ट्वा त्यागं च भोगं च सूतकस्य प्रसादतः ॥ १८ ॥
सर्वसत्वे मायावेधी स्वरसेन तथैव च ।
तेषां मध्ये प्रदानं च (प्रधानश्च) रत्नघोषः प्रतारकः ॥ १९ ॥
कृतांजलिपुटो भूत्वा नागार्जुनपुरः स्थितः ।
पृच्छते, रसकर्माणि विद्यादानं ददस्व मे ॥ ४२० ॥

श्रीनागार्जुन उवाच ।

साधु साधु महाप्राज्ञा ! तुष्टोहं भक्ति (क्त) वत्सल ।
कथयामि न संदेहो यत्त्वया परिपृच्छितं ॥ २१ ॥
वलीपलितनाशं च तथा कालस्य वंचनं ।
यथा लोहे तथा देहे क्ष (क्र) मते नात्र संशयः ॥ २२ ॥
सहस्रांसबलत्वं च (?) कोटिवेधी भवेद्रसः ।
तदहं हि संप्रवक्ष्यामि भवतो हि यथाविधि ॥ २३ ॥
सत्वानां भोजनाप्योय (?) साधिता वटयक्षिणी ।
द्वादशानि तु वर्षाणि महाक्लेशः कृतो मया ॥ २४ ॥
तत्कालदृष्टद्रव्याणां दिव्यवाणी मया श्रुता ।
अदृष्टप्रार्थिता पश्चात् दृष्टा त्वं भव सांप्रतं ॥ २५ ॥

श्रीवटयक्षिण्युवाच ।

साधु साधु महासिद्ध ! त्वद्भक्त्या तु महात्मनः ।
यत्कार्यहारितो भद्र तत्सर्वं प्रददाम्यहम् ॥ २६ ॥

श्रीनागार्जुन उवाच ।

तुष्टा त्वं यदि मे देवि ! कष्टया द्वादशवर्षया ।
आत्मा सत्यं च ते सत्यं ततः पश्चाद्ब्रवीम्यहं ॥ २७ ॥

श्रीवटयक्षिण्युवाच ।

सत्यं सत्यं पुनः सत्यं महोवाचा त्रिधाकृता ।
किंचित्प्रार्थय मे सिद्ध ! तत्सर्वं प्रददाम्यहं ॥ २८ ॥

श्रीनागार्जुन उवाच ।

यदि तुष्टासि मे देवि ! सर्वदा भक्तवत्सले ।
दुर्लभं सर्व लोकेषु रसबंधं ददस्व मे ॥ २९ ॥
येन केनाप्युपायेन प्रकरोति (मि) महाद्भुतं ।
साधनं सूतकस्यापि मृत्युदारिद्र्यनाशनं ॥ ४३० ॥
पर्वतगृहप्रासादसशैलवनकाननम् ।
कांतमयं (?) प्रवक्ष्यामि लोकानां हितकाम्यया ॥ ३१ ॥
भोजनं वस्त्रतांबूलं समधाद्यैः (?) प्रदापयेत् ।
आत्मख्यातिर्यथा तिष्ठेत् अस्मिंश्च पृथिवीतले ॥ ३२ ॥
तदुपायं वरारोहे ! कथयस्व प्रसादतः ।

श्रीवटयक्षिण्युवाच ।

यत्किंचित्पृच्छसे भद्र तत्सर्वं प्रददाम्यहं ॥ ३३ ॥
कुरु द्रव्य यथातथ्यं तिष्ठेहं त्वत्समीपतः ।
सर्वलक्षणसंपूर्णा यस्तु लक्षस्य पोषिता ॥ ३४ ॥
तस्य स्पर्शावलोकेन युष्मत्सिद्धिर्भविष्यति ।
तया तस्य श्रुतं वाक्यं प्रार्थितः शालिवाहनः ॥ ३५ ॥
युष्मत्सामर्थ्य योगेन साधयामि महारसम् ।

शालिवाहन उवाच ।

सुवर्णरत्नभांडारं, कुमारी, मदसुंदरी ॥ ३६ ॥
निवेदितं मयात्मानं आदेशो देवि ! दीयताम् ।
साधु साधु महाप्राज्ञ ! ममादेशप्रपालक ॥ ३७ ॥
साधयामि न संदेहो युष्मत्साह्येन साधकं ।
पुनरन्यं प्रवक्ष्यामि मांड येन यथा कृतं ॥ ३८ ॥
रसोपरसयोगेन सिद्धं सूतं सुसाधितं ।
विद्धशुल्बायनं नागं यथार्थं कांचनं कृतं ॥ ३९ ॥
तस्य सारं वसिष्ठेन रसकर्मावधारितं ।
शास्त्रं वासिष्ठमांडव्यं गुरुपार्श्वे यथाश्रुतं ॥ ४४० ॥
तदहं संप्रवक्षामि साधनं च यथाविधि ॥ इ. इ.

या उताऱ्यावरून खालील गोष्टी कळून येतात;—

(१) नागार्जुन रससिद्ध झाल्यानंतर श्रीशैलपर्वतावर रहात असे. तो रससिद्धीच्या योगें सर्व प्राण्यांस ते मागतील तें देत असे; कारण सर्वांचा त्याला मोठा ळळा होता (मायावेधी).

(२) एके दिवशीं **रत्नघोष** म्हणून एक लबाड शिष्य आला त्यानें
धन वगैरे न मागतां रसाविद्येची गुरुकिल्ली मागितली.

(३) तेंव्हां नागार्जुनानें आपण बारा वर्षें तपश्चर्या **करून** वटयक्षिणी
कशी प्रसन्न करून घेतली, व तिच्या प्रसादानें व ओळखीनें लक्षांचा
पोषक जो **शालिवाहनराजा** याची गांठ कशी पडली, व त्याच्या साहा-
य्यानें रससिद्धि कशी करून घेतली, हें सांगितले या नागार्जुनाच्या रस-
सिद्धीस, **वसिष्ठानें मांडव्यास** शिकाविलेलें **वासिष्ठमांडव्यशास्त्र** फारच
उपयोगीं पडलें. हें शास्त्र नागार्जुन आपल्या गुरूजवळ पढला. राजा
शालिवाहनानें सुवर्णरत्नभांडार, आपली कुमारी, आपली मदसुंदरी भार्या व
स्वतः आपण–आपल्या सेवेस हजर आहो, ह्मणून वटयाक्षिणीस सांगितलें;
मग मांडव्याच्या शास्त्राच्या आधारानें सिद्ध नागार्जुनानें रस सिद्ध केला.

(४) पुढें **रत्नघोष** त्याविद्येंत त्याचा शिष्य झाला.

या मांडव्य व रत्नघोषांचा र. र. स. कर्त्यांनी रससिद्धांमध्यें उल्लेख
केलेला आहे. वासिष्ठानें मांडव्यास रसशास्त्र व ज्योतिषशास्त्र हीं दोन्ही
शिकविली. याच रससिद्ध मांडव्याचा उल्लेख, वाचस्पतिमिश्रानें पतंजलि-
सूत्रांतील (योगाच्या) कैवल्यपादाच्या सूत्रावर टीका करितेवेळी असा
केलेला आहे.

इहैव वा रसायनोपयोगेन ।
यथा मांडव्यो मुनिः रसोपयोद् विंध्यवासी इति ।

पातंजलदर्शन. विद्यासागरीप्रत पृ. १८०

यावरून मांडव्यमुनि हा रससिद्ध विंध्यपर्वतावर रहात असे हे कळूनयेते.

लोकनाथ विभूचा श्लोक ५८५ मध्यें एका 'पोटलिका विधाना'
चा कर्ता ह्मणुन उल्लेख आलेला आहे. या लोकनाथाचा र. र. स. कर्त्या-
नेंही उल्लेख केलेला आहे. याने **रसेंद्रमंगल** नांवाचा ग्रंथ लिहिल्याप्रमाणें
वाटतें. हा **रसेंद्रमंगल** ग्रंथ **रसमंगलाहून** अगदी भिन्न होय ! **रसमंगल**
ग्रंथ शंकराच्या नांवावर प्रसिद्ध आहे.

कांहीं रसयोगानें दीर्घायु होण्याचा प्रयोग **मार्कंडेयाचा** ह्मणून उतरू-
न घेतलेला आहे (श्लो. ४८५). श्लोक ५३८ मध्यें **वार्तिकांचाही**

उल्लेख आहे. याप्रमाणें इ. स. १०० च्या सुमारास (नागार्जुनाच्या
वेळेस) बरेच रस ग्रंथ प्रसिद्ध होते असे कळून येतें. **नागबोधि, लो-
कनाथ, मांडूक, मांडवेय, वार्तिककार** इत्यादि रससिद्धांचे ग्रंथांचा
तर उल्लेखच आहे.

नागार्जुनाविषयीं जैनांची माहिती.

(मूळ उतारा)

अथ ढंकाभिधानभूभृति रणसिंहनामा राजपुत्रः तन्नंदनां भूपलनाम्नीं
सौंदर्यनिर्जितनागलोकबालां आलोक्य, जातानुरागतयास्य सेवमानतां-
तस्य वासुकेः सुतो नागार्जुननामा समजनि । तेन पातालपालेन सुत-
स्नेहमोहितमनसा सर्वासामप्यौषधीनां फलानि मूलानि दलानि च भोजि-
तस्तत्प्रभावान्महासिद्धिभिरलंकृतः सिद्धपुरुषतया पृथ्वीं विगाहमानः
शातवाहननृपतेः कलागुरुर्गरीयसीं प्रतिष्ठां उपागतोऽपि गगनगामिनीं
विद्यामध्येतुं श्रीपादलिप्तपुरे पादलिप्ताचार्यान्सेवमानो व्रतपतिः भोजना-
वसरे पदे लेपप्रमाणेन गगनोत्पतितान्श्रीअष्टापदप्रभृतीनि तीर्थानि नमस्कृ-
त्य तेषां स्वस्थानमुपेयुषां पादौ प्रक्षाल्य ज्ञातसप्तोत्तरशतसंख्यमहौषधीनां
आस्वादवर्णघ्रागादिभिर्निर्णीय च गुरूनवगणय्य कृतपदलेपःकुकवाकुकलापिवत् उत्पत्यावटे निपतंश्च तद्व्रणश्रोणि जर्जितांगो गुरुभिःकिमेतदित्यनुयुक्तो
यथाद्वृत्तांतं निवेदयन् तच्चातुर्यचमत्कृतचेतोभिः ताच्छिरसि पद्महस्तपूर्वकं
षाष्टीकतंडुलोदकेन तानि भेषजान्यभ्यंज्य, तत्पादलेपाद्गगनगामी भूया इति
तदनुग्रहादेकां सिद्धिं मासद्य, श्रीपार्श्वनाथ पुरतः साध्यमानो रसः समस्तस्त्रै
णलक्षणोपलक्षित पतिव्रतवनिता मर्द्यमानः कोटिवेधी भवतीति तन्मुखादा
कर्ण्य च, यत्पुरा समुद्रविजयदाशार्हेण त्रिकालवेदिनःश्रीपार्श्वनाथाबिंबरत्नमयं
निर्माप्य श्रीद्वारवत्यां प्रासादे न्यस्तं, द्वारवती दाहानंतरं समुद्रेण प्लावि-
तायां तस्यां पुरि, तत्र समुद्रे तस्मिन्बिंबे तथैव विद्यमाने, कांतीयसांया-
त्रिकस्य धनपतिनाम्नो यानपात्रे देवतातिशयात् स्खालिते इह जिनबिंब-
मस्तीति निर्णीय नाविकां स्तत्र प्राक्षिप्य, सप्तसंख्यैरामतंतुभिः संदानित
मुद्धृत्य, निजायां पुरि चिंतातीतलाभात स्वयंकृतप्रसादे न्यस्तवान् । त
त्सर्वातिशायिबिंबं नागार्जुनः स्वसिद्धरससिद्धयेऽपहृत्य सेडीतटिन्यास्तटे
तदेव विन्यस्य तत्पुरतो रससाधनाय श्रीसातवाहनस्यैकपत्नीं चंद्रलेखा-
भिधानां प्रातिनिशं सिद्धव्यंतरसांन्निध्यात्तत्रानीय, रसमर्दनं कारयति

स्म। इत्थं भूयो भूयस्तत्र यातायाते सति, बंधुबुध्या सा नागार्जुनपार्श्वे तदौषधीनां मर्दनहेतुं पृच्छती, सोऽपि स्वकल्पनया कोटिवेध (चि) रसस्य यथावस्थितं वृत्तांतं निवेदयन्, तस्याश्च वचनगोचरातीतं सत्कारं कुर्वाणोऽनन्यसामान्यसौजन्यं प्रवर्तयामास। अथ कदाचित्तया निजांगजयोरस्मिन्वृत्तांते निवेदिते तौ तल्लुब्धौ राज्यं परित्यज्य नागार्जुनसमलंकृतां भुवमागतौ कैतवेन तस्य रसस्य जिघृक्षया गुप्तवेषौ यत्र नागार्जुनं भुंक्ते तत्र तां अर्थ दानेन परितोष्य रसवार्तां पृच्छतः। सा च तज्जिज्ञासया तदर्थं सलवणां रसवतीं कुर्वती, षण्मास्यां व्यतीतायां तस्मिन्क्षारामिति रसवतीं दूषयति सति, इंगितैः सिद्धं रसमिति ताभ्यां निवेदितवती। अथ प्रतिपन्नभागिनेयाभ्यां रसग्रसनलालसाभ्यां वासुकिना निर्णीतदर्भांकुरस्त्युरिति परंपरया ज्ञाततत्वाभ्यां तेनैवं शस्त्रेण तथैव स निजघ्ने। स रसः संप्रतिष्ठितदेवताधिष्टानवशात् तिरोहितो बभुव यत्र स रसः स्तंभितः तत्र स्तंभनकाभिधानं श्रीपार्श्वनाथतीर्थ रसादप्यतिशायि सकललोकाभिलषितफलप्रदम्। ततः कियता काले न तद्बिंबं वदनमात्रवर्ज भूम्यंतरितं बभूव। अथ श्रीशासनदेवतादेशात् षण्मासीं यावदाचाम्ला[1]नि निर्माय कठिनप्रियोगेण नवांगवृत्तौ निवृत्तायां श्रीअभयदेवसूरीणां वपुषि प्रदुर्भूते प्रभूतरोगे पातालपालः श्रीधरणेंद्रनामा सितसर्परूदमास्थाय तद्वपुर्जिव्हया विलिह्य, प्रसद्य निरामयीकृत्य तत्तीर्थं श्रीमदभयदेवसूरीणां उपादिदेश। श्रीसंघेन सह समागतास्तत्र ते सूरयः प्रस्रवंतीं सुरभिं विलोक्य गोपालबालैर्निवेदितायां भुवि नवंद्वात्रिंशतिकास्तवं कुर्वंतो विशत्तमेन वृत्तेन तत्रश्रीपार्श्वनाथबिंबं प्रादुश्चक्रुः। देवतादेशेन तद्वृत्तंगोप्यमेव निर्ममे।

यन्मार्गेऽपि चतुःसहस्रशरदो देवालये योऽर्चितः।
स्वामी वासव वासुदेववरुणैः स्वावासमध्ये ततः॥
कांत्याभिभ्यधनेश्वरेण महता नागार्जुनेनार्चितः।
पायास्तंभनके पुरे स भवतः श्रीपार्श्वनाथो जिनः।
इति श्रीनागार्जुनोत्पत्तिः स्तंभनकतीर्थावतारप्रबंधौ।

मागें सारांश दिलेला आहे त्यांत त्याच्या या मुळांत कांहीं ठिकाणीं फरक आहे हें वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल. येथें सातवाहनाची एकपत्नी चंद्रलेखा ही नागार्जुनानें आणीत असलेली राजास कळल्याचें

1 रसवती विधायिनीं कांचित्

त्रिलकुल वर्णन नाहीं. फक्त, तिनें लोमानें आपल्या पुत्रांस हें वर्तमान सहज सांगितलें. तेव्हां तिच्या त्या दोन पुत्रांनीं तो कोटिवेधी रस पळवावा म्हणून गुप्तवेषानें नागार्जुनाचे आश्रमांत येऊन, तेथील दासीला, पैशानें वश करून, रससिद्ध झाल्यानंतर, नागार्जुनास त्यांनीं आचानक मारलें, एवढेंच वर्णन आहे. पुढें तो रस त्यांसही उपयोगी पडला नाहीं; तो गुप्त झाला असें येथें म्हटलें आहे. रस जेथें स्तब्ध (स्तंभित) झाला त्यागांवास स्तंभनपुर (खंबायत) म्हटलेलें आहे.[2] शालिवाहन, शालवाहन, सालवाहण, सालवाहन, सालाहन, सातवाहन, इत्यादि रूपें जैन वाङ्मय यांत या राजाच्या नांवाचीं आढळतात. यासच कांहीं ठिकाणीं हाल असेंही म्हटलेलें आहे; पण डॉ. भांडारकर यांनीं हाल हा एक सातवाहन कुळांतला राजा होता असें दाखविलें आहे. हा नागार्जुनाचा समकालीन सातवाहनराजा या कुळांतील प्रारंभीं प्रारंभीचा असला पाहिजे; कारण याच्यावरून पुढें त्या कुलास सातवाहनकुल असें नांव पडलें. हे राजे प्रतिष्टान ऊर्फ पैठण येथें महाराष्ट्रांत राज्य करीत असत. शालिवाहनप्रबंध नावांच्या प्रबंधचिंतामणिच्या भागांत या राजासंबंधाची कांहीं माहिती आहे. यास ज्ञानसागर नांवाच्या जैन मुनीनं पूर्वभवाच। (पूर्वजन्माचा) वृत्तांत सांगितला तेव्हांपासून याचे दानधर्माकडे, व कवि आणि विद्वान लोक यांच्या संग्रहाडे लक्ष लागलें:—

"स श्रीशातवाहनः पूर्वभववृत्तांतं जातस्मृत्या साक्षात्कृत्य, ततः प्रभृति दानधर्ममाराधयन् सर्वेषां महाकवीनां विदुषांच संग्रहपरः। चतसृभिः स्वर्णकोटीभिः गाथाचतुष्टयं क्रीत्वा सप्तशतीगाथाप्रमाणं शालीवाहनाभिधानं संग्रहगाथाकोशं शास्त्रं निर्माप्य नानावदातनिधिः सुचिरं राज्यं चकार।"

या शालिवाहनप्रबंधांत टीपा देतेवेळीं पं. दिनानाथ (पुस्तकाचे संपादक) यांनी एक प्राकृत भाषेंतील उतारा व कांहीं माहिती दिलेली

1 पं. दीनानाथ यांचा 'प्रबंधचिंतामणी' पृ. ३१२ पहा.

2 'स्तंभ' याचेंच रूप 'खांब' अस झालेलें आहे.

1 प्रबंधचिंतामणि, पृ. २८

आहे. तीही येथें देऊन ठेवतों. प्राकृताची संस्कृत छाया देतों. हा प्राकृत उतारा बराच जुना दिसतो.

" रत्नसिंहराज्ञो भोपलनाम्नी सुता, तस्या नागार्जुनो नाम पुत्रः । स सिद्धपुरुष इति विख्यातः पृथिवीं विचरन् सालिवाहनराज्ञः कलागुरु जातः । स पादलिप्ताचार्यं निषेवते । कदापि गुरुमुखात् श्रुतम् । यथा हि कांति पार्श्वनाथबिंबं रससाधनार्थं । ततो नागार्जुनो तदभिप्रायं ज्ञात्वा कांति पुरात्कपटेन सेडीनदीतटे समानीय तद्बिंबं स्थापयित्वा रससिद्धो जातः तत्र श्रीशालिवाहनराज्ञः चंद्रलेखाभिधाना सती द्वयं निजपुत्रस्य तस्मै नागार्जुनाय द्वाभ्यां शिक्षार्थं निवेदितं । तौ रसलुब्धौ निजं राज्यं मुक्त्वा नागार्जुनपार्श्व आयातौ । ततो रससिद्धिं ज्ञात्वा तेनैव शस्त्रेण ताभ्यां नागार्जुनो निहतः । तस्मिन्स्थाने स्तंभनं नाम नगरं जातम् । कालिक-कालकाचार्य-वंशजातपादलिप्तगणधरोपदेशान्नागार्जुनयोगींद्रः आनि-नाय आत्मनः स्थाने । कांति पुरात्कपटवृत्त्या रत्नमयपार्श्वनाथबिंबम् । पादलिप्तोऽपि पाटलीपुत्रस्य मुरुंडराज मस्तकपीडां मंत्रशक्त्यानिवार्य प्रतिष्ठानपुरं प्राप्तस्तद्यथा ।

यथा यथा प्रदेशिनीं जानौ पादलिप्तो भ्रामयति ।
तथा तथा तस्य शिरोवेदना प्रणश्यति मुरुंडराजस्य ॥ १ ॥
शालिवाहनपुरः सरा नृपाः ।
चित्रकारिचरिता इहाभवन् ।
दैवतै बहु विधैरधिष्ठित ।
चात्रसत्रसदनान्यनेक शः ॥ २ ॥
कपिलात्रेयबृहस्पति पांचालोऽहं महीभृदुपरोधात् ।
न्यस्तस्वचतुर्लक्षग्रंथार्थं श्लोकमेकमप्रयमम् ॥ ३ ॥
स चायम् ।
जीर्णे भोजनमात्रेयः, कापिलः प्राणिनां दया ।
बृहस्पतिरविश्वासः, पांचालः स्त्रीषु मार्दवं ॥ ४ ॥

ते चत्वारोऽपि स्वस्वग्रंथं राज्ञेऽदर्शयन्, तच्छ्रोतुमसमर्थे राजानं श्लोकैकपादेन स्वस्वसकल ग्रंथाभिप्रायं निवेदयामासुः ।

१ एथपर्यंतच प्राकृत उतारा आहे. पुढील मचकूर प्राचीन आधारांवरून पं. दीनानाथांनीं दिलेलो आहे.

१ प्रतिष्ठानपुरे । २ कामशीलकर्ती चामन्य । ३ शालिवाहन राज्ञ आग्रहातं ।

यानंतर उज्जयिनीच्या विक्रमाचें व शालिवाहनाचें युद्ध होऊन, दोघांचा तह झाला, तो आसाकीं.

'तापीतीरपर्यंतमुत्तरापथं साधयित्वा प्रतिष्ठानपुरे राज्यं चकार । स्वकीयं संवत्सरं प्रावीवृतत्' ।

उत्तरापथांतील तापतीरापर्यंतचा प्रदेश शालिवाहनाच्या ताब्यांत राहावा. याप्रकारें यानें पैठण येथें राज्य करून आपल्या नांवाचा शक प्रवृत्त केला.

"ततो गीतमोहितां देवीं मायासुरः कश्चिदहरत् । तदन्वेषणाय शूद्रकं प्राहिणोत । सोऽपि सकोलेयकः कोल्लपुरस्थां महालक्ष्मीं आराध्य, तं असुरं अमारयत् । देव्या दत्तं खड्गमादाय मायासुरस्थात्रा दर्शितां महिषी मादायागतः । तस्मै शूद्रकाय तुष्टेन राज्ञा राज्यार्थं दत्तं । एवं नानाविधानि हालक्षितिपालस्य चरित्राणि । स्थापितोऽनेनगोदावरीतीरे महालक्ष्मी प्रासादः । नरपति नागह्रदे निधनं प्राप्तः ।

या प्रकारें जैनपरंपरेची माहिती पं. दीनानाथानी दिलेली आहे. यांतील नागार्जुनाची माहिती अगदीं साधी आहे. पूर्वी दिलेल्या मराठी सारांशापेक्षां, पंधराव्या शतकांतील मेरुतुंगाच्या हकीकतीत अधिक संभाव्यता आहे; त्याहून प्राकृत उताऱ्यांत ही गोष्ट फारच साधी व सरळ आहे.

शालिवाहन व त्याचा कलागुरु नागार्जुन यांच्याविषयीं, व पादलिप्त यांच्याविषयीं आखणी कांहीं माहिती, डॉ. भाऊ दाजी यांच्या लेखसंग्रहावरून मिळते. तीही येथें देतों. डॉ. भाऊ दाजी यांनीं कांहीं जैनग्रंथ पाहून कालकाचार्य, व पादलिप्तचार्य यांची माहिती दिली आहे. त्यांतलि गरजेपुरती एथें घेऊं.

मेरुतुंगाच्या स्थविरावलींत, श्रीकालकाचार्याला सूरीपद महावीराच्या निर्वाणानंतर ४९३ वर्षांनीं प्राप्त झालें असें म्हटलें आहे. त्यावेळीं उज्जयिनीस नभोवाहन राजाचें राज्य संपून, गर्दभिल्ल नांवाच्या नवीन वंशाची स्थापना झाली. गर्दभिल्लानें १३ वर्षें राज्य केलें. गर्दभिल्लानें कालका-

1 Dr. Bhau Daji's Literary Remains, p. 131.

उपमर्द केल्यामुळें,
चार्यांच्या सरस्वती नावांच्या बहिणीचा बलात्कारानें उपमर्द केल्यामुळें,
कालकाचार्यानें शकांकडून त्यास राज्यभ्रष्ट करविलें. शकांनीं उज्जयि-
नीस ४ वर्षें राज्य केलें तोंच गर्दभिल्लाचा पुत्र विक्रमादित्य यानें
या शकांनां उज्जयिनींतून हांकून लावून आपला विक्रमसंवत् महावीरानंतर
(४५३+१३+४) ४७० वर्षांनंतर सुरू केला. महावीराचें निर्वाण
इ. पू. ५२७ वर्षीं झालें हें अनेक पुराव्यांवरून सिद्ध होतें. महावीरा-
नंतर ४७० म्हणजे इ. पू. ५७ होतें. तेव्हां कालाचार्य इ. पू. ७४ ते ५७
पर्यंत व पुढेंही थोडा काळपर्यंत होते हें जैन ग्रंथावरून कळून येते.

डॉ. भाऊ दाजींनीं (पृ. १२०मध्यें) कालीकाचार्यांची स्वतंत्र हकीकत दिलेली आहे. तींतही वर दिलेली हकीकत असून शकराज्याची स्थापना उज्जैनीस केल्यानंतर पुढें कालकाचार्यानें काय केलें हेंही दिलेलें आहे. शक राजे इ. पू. ६१ च्या सुमारास हिंदुस्थानांत शिरले हें वर दिलेलेंच आहे. त्यावेळीं लाट देशांतील भडोच शहरांत बालमित्र व भानुमित्र हे राजे राज्य करीत होते. हे कालकाचार्यांचे भाचे होते. शकराजांनीं यांचेंही सहाय्य घेऊन उज्जयिनी शहर घेतले. याप्रमाणें उज्जयिनींत इ. पू. ६१ मध्यें शकांचा अंमल चालू झाल्यानंतर आपल्यां भाच्याबरोबर कालकाचार्य भडोच येथें गेले. तेथें राजपुरोहिताचा व यांचा तंटा होऊन, राजपुरोहित महाराष्ट्रदेशांतलि प्रतिष्ठानचा राजा शातवाहन याच्या पदरीं जाऊन राहिला. कालकाचार्यनें पर्यूषणापर्वाची तिथि ठरविली वगैरे हकीकत आहे.

एका मारवाडी पुस्तकांत एक गाथा अशी आहे कीं, कालकसूरी दोघे झाले. पहिल्यास श्यामार्जुन असेंही म्हणत असून तो महावीरानंतर ३३५ वर्षांनंतर झाला; व दुसरा कालकसूरी हा आपल्या सरस्वती बहिणीला गर्दभिल्लाच्या रंगमहालांतून सोडविता झाला. हा महावीरानंतर ४५३ वर्षांनीं झाला.

प्रभावकचरित्र नामक ग्रंथांत श्रीपादलिप्तसूरीची हकीकत आहे. त्यांत असें सांगितलें आहे कीं महावीरानंतर ४८० वर्षांनंतर आर्य खपुटाचार्य (ऊर्फ पादलिप्ताचार्य) होऊन गेले. श्रीमत् सातवाहन राजा हा (?) तीर्थाला आला होता व तेव्हां तेथें पादलिप्तसूरीनें ध्वज उभारि-ला. तसेंच त्यावेळीं तेथें कालकाचार्यांचा भाचा बालमित्र राजाही हजर होता, असें म्हटलें आहे.

या हकीकतीवरून कालकाचार्य, पादलिप्तसूरी ऊर्फ खपुटचार्य, बाल-मित्र व भानुमित्र, नागार्जुन, व सातवाहन, हे समकालीन असल्याचें कळून येतें. तसेंच, उज्जैनीच्या विक्रमादित्याच्या वेळीं कोणीतरी एक **सातवाहनराजा** प्रतिष्ठान येथें राज्य करीत होता, व त्याचाच कलागुरु नागार्जुन होता हेंही सिद्ध होतें.

तिसरा एक कालकाचार्य इ. स. ९९३ मध्यें होऊन गेला. आपणांस पहिल्याशींही कांहीं कर्तव्य नाहीं व तिसऱ्याशींही कर्तव्य नाहीं. फक्त दुसऱ्याशीं कर्तव्य आहे.

जैन ग्रंथकारांच्या ग्रंथांत पैठणच्या शातवाहनांविषयीं बऱ्याच हकीकती मिळतात. राजशेखराच्या चतुर्विंशति प्रबंधांत सातवाहन व त्याचा मंत्री शूद्रक यांची गोष्ट वर पं. दीनानाथ यांनीं दिल्याप्रमाणें दिली आहे. त्यानें एक गाथासंग्रहही केला असें बऱ्याच ठिकाणीं म्हटलें आहे. पं. दीनाना-थाच्या मतें हा पैठणाचा सातवाहन राजा हालच होय. मेरुतुंगानें जें सातवाहन ऊर्फ शालिवाहनाचें वर्णन (त्यानें गाथासंग्रह केला म्हणून) दिलें आहे, तें पहातांही हा जैनांचा शालिवाहन म्हणजे हालच दिसतो. याची राणी गीतमोहित असून, तिला एका मायासुरानें पळवून नेली होती तिची सुटका शूद्रक मंत्र्यानें करून आणिली; पण मेरुतुंगानें शालिवाहन व नागार्जुन या दोघांच्याही हकीकती देतांना नागार्जुनाचा समकालीन सातवाहन, व गाथासंग्रहकर्ता शालिवाहन एकच असें कोठेंही म्हटलेलें

1 Dr. Bhau Daji's Literary Remains, p. 126.

नाहीं. नागार्जुनसमकालीन शालिवाहन राजाच्या बायकोचें नांव चंद्रलेखा असें असून तिला दोन मुलें होतीं. सप्तशतीगाथाकर्ता शालीवहनाची हकीकत देतेवेळीं तो नागार्जुनाचा समकालीन होता असें कोठेंही ह्मटलेलें नाहीं. याशिवाय, ज्यांनीं आपला शक चालू केला तो एक तिसराच शालिवाहन राजा असून, त्याचा मंत्री शूद्रक व भार्या (नांव कळत नाहीं) असावी. याची बायको कोल्हापूरकडच्या कोणीं असुरानें गीतमोहित करून हरण करून नेली. या प्रकारें तीन शालिवाहनांच्या गोष्टी एकत्र केलेल्या दिसतात. यांचा तपशील आमच्या मतें असा दिसतोः—

काल सुमारें इ. स. ५७

(१) **सातवाहन**–हा वायुपुराणांतील तिसरा राजा कृष्णाचा पुत्र शातकार्णी हा असावा. हाच बहुधा नागार्जुनांचा समकालीन असून त्याचा आश्रयदाता असावा. याला चंद्रलेखा स्त्री व दोन मुलगें असावते. उज्जयिनीच्या विक्रमानें दक्षिणदेश जिंकू लागतां यानेंच त्याचा पराभव करून, तापीनदीपर्यंतचा उत्तरेकडचा प्रदेश यानें आपल्या राज्याला जोडला असावा. या राजापासूनच या वंशांतील राजांनां सातवाहन अगर शालवाहन कुलांतले राजे असें ह्मटलें असावें. यापुढचे सर्व राजे सातवाहन अगर शालवाहन होत.

काल इ. स सुमारे ७८

(२) **शालिवाहन**–याचा मंत्री शूद्रक असावा. यानें शकांचा पराभव करून शालिवाहन कुळाची कीर्ति वाढविली असावी, व तन्निमित्त यानें आपल्या नांवाचा शक चालू केला असावा. याची राणी गीतमोहित होती तिला मायासुरानें पळवून नेली. ती शूद्रकानें सोडवून आणिली.

(३) **सातवाहन**–हा गाथासंग्रहकार कुंतलदेशाधिपति पैठणचा राजा असावा. हा कविवत्सल होता. याच्या पदरीं शर्मा वर्मा, गुणाढ्य वगैरे कवि होते. ह्याला वीटर्सनच्या प्रतींत "शंतकर्णोपनामक द्विपिकर्णात्मज

मळयावतिप्राणप्रिय–मलवत्युपदेशे पंडितीभूत ....कविवत्सल ....हालाद्युपरामक श्रीसातवाहन नरेंद्र," असें ह्मटलें आहे. ही हकीकत गुणाढ्याच्या हकीकतीशीं जुळते. हा मलयवतीचा प्राणप्रिय होता. हा प्राकृत भाषांचा मोठा भोक्ता होता. हा कवि व विद्वान यांचा पोषक होता. याची गाथासप्तशती प्रसिद्ध आहे. वात्स्यायनानें आपल्या कामसूत्रांत या मलयावती व याचा याप्रकारें उल्लेख केलेला आहे. कर्तर्या कुंतलः शातकार्णिः, शातवाहन महादेवीं मलयवतीं (जघान) यांत कुंतलदेशाधि पति शातकर्णिवंशातलि शातवाहन राजानें आपली पट्टराणी मलयवती ईस ठार मारलें सें आहे. यावरून एक संशय असा येतो कीं वरचा दुसरा शालिवाहन व हा कदाचित् व बहुधा एक असावा; कारण वरील राजाची स्त्री गानलुब्ध होती असें ह्मटलें आहे. तेव्हा ती गानलुब्ध होऊन कोणीं असूरा बरोबर पळून गेली असावी; मग राजानें शूद्रकास पाठवून त्या असूरास ठार करून तिला आणिलें असावें; व रतिक्रीडत खात्रीनें तिला–संशय मनांत घुसत असल्यामुळें–जिवे मारिलें असावें; व हाच विचार बळावतो. कारण जितकें प्रेम अधिक तितकाच रागही अधिक असतो. जी राजाची पट्टराणी व प्राणप्रिय होती ती गानलब्ध होऊन पळून गेली, ही गोष्ट सारखी त्याच्या मनांत सलत असली पाहिजे. व तिचा अंत मलयवतीचा प्राण घेऊनच व्हावयाचा दुसरा व तिसरा शालिवाहन एकच केल्यास कालाचे कांहीं घोटाळे येतात काय हें आपण पाहूं. वायुपुराणांतील गातमी पुत्र[1] (१३ वा) याचा काळ डॉ. भांडारकर यांनीं अनेक विदेशिय लोकांच्या लेखां वरून व इकडील शिळालेखांवरून इ. स. १३३ हा ठरविलेला आहे, व त्याबद्दल वादही असणें शक्य नाहीं सातवा जो **हाल** त्यापासून या गोतमीपुत्रापर्यंत वायुपुराणाप्रमाणें सुमारें ५६ वर्षे गेलीं, तीं १३३ मध्यें वजा केली असतां हालाचा काळ इ. स. ७७ हा येतो. तेव्हां हा हाल शककालप्रवर्तक असणें बि-

१ डॉ. भांडारकर यांचा दक्षिणचा इतिहास, मराठी भाषांतर, पृ. ७१ ७६

रुकुल संभव नाहीं. तसेंच तिसरा शातकार्णि यापासून हाला पर्यंत किति वर्षें गेलीं, हें पहातां देखील त्या शातकार्णिराजाचा काळ विक्रमादित्याशीं समकालीन होण्याइतका जवळ जवळ येतो. हीं वर्षें जवळ जवळ ११७ होतात. ह्मणजे शातकार्णि याचा काळ ४० इ. पू. हा येतो. विक्रम इ. पू. ५७ मध्यें राज्यावर बसला. त्याचें राज्य स्थिरस्थावर होऊन त्याला दक्षिणेकडे दृष्टि वळवावयाला निदान १५।१६ वर्षें तरी गेलीं असावींत. त्यावेळीं त्याचा समकालिन हा शातकार्णि असावा. असो. हाल सातवाहनानें आपल्या गाथासप्तशतातिं या विक्रमाचा व सातवाहनाचा—दोघांचाही उल्लेख केलेला आहे.(प्राकृताची छाया देतों)

संवाहनसुखरसतोषितेन ददता तव करे लाक्षां (अथवा) लक्षं चरणेन (चलनेन) विक्रमादित्यचरितं अनुशिक्षितं तस्याः ॥ ६४० ॥ मापन्नानि (आपर्णानि) कुलानि द्वावेव जानीत उन्नतिं नेतुम् गौर्यां हृदयदयितोऽथवा शातवाहननरेंद्रः ॥ ६७ ॥

हा शातवाहन, वायुपुराणांतील तिसरा शातकार्णि व नागार्जुन व विक्रमसमकालीन राजाच असावा. याप्रकारें सुमारें ५७–४० इ. पूर्वींच्या काळीं नागार्जुन होऊन गेला हें वरील सर्व हकीकतींवरून कळून येतें. शिवाय या जैनग्रंथावरून असा उलगडा होतो कीं इ. स. ४७ च्या सुमारास झालेल्या खपुटाचार्य ऊर्फ पादलिप्ताचार्य यांचा शिष्य नागार्जुन हा पैठणच्या शातकार्णि नांवाच्या शातवाहन ऊर्फ शालिवाहन राजाचा कलागुरु होता. या शातकार्णि शालिवाहनानें इ. पूर्वी ४० ते इ. स. १६ पर्यंत राज्य केलेलें आहे. (५६ वर्षें). तेव्हां नागार्जुन याच्या दरम्यान त्याचा कलागुरु असावा.

प्रकरण १४ वें.

रुद्रयामलांतील रसायनशास्त्र.

रुद्रयामलतंत्र हें संस्कृतमधील चासष्ट तंत्रांपैकीं एक प्रसिद्ध तंत्र आहे. हे फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. आगम, तंत्र, यामल व

१ रसवती विधायिनीं कांचित्.।

डामर असे चार तऱ्हेचे तंत्रग्रंथ आढळतात; त्यांपैकीं यामलग्रंथांमध्यें हें रुद्रयामळ पहिलें यामल होय यास ‘शंभुयामल’ अगर ‘शांभव यामल’ असेंही ह्मणत असत. सिद्ध नागर्जुनानें इ. स. १०० च्या सुमारास याचा उल्लेख आपल्या कक्षपुटींत याप्रकारें केलेला आहे:–

शांभवे यामले, शाक्रे मौले कौलेडायमरे ।

यावरून हा ग्रंथ शककालाहून प्राचीनतर असावा हें कळून येईल.

२ हा ग्रंथ मंत्रशास्त्र, कल्पशास्त्र, रसशास्त्र, भूगर्भशास्त्र, धातुशास्त्र, व शिल्पशास्त्र इतक्या शास्त्रांच्या दृष्टीनें महत्वाचा आहे असें ऐकिवांत आहे. संपूर्ण ग्रंथ एक लक्षाचा असून अति महत्वाचा आहे अशी बातमी आहे, तथापि तो पहाण्यास मिळे पर्यंत निश्चयात्मक असें कांहीं एक त्याविषयीं लिहितां येत नाहीं. या ग्रंथाचा थोडा भाग कल्याास छापलेलाहीं आहे; आमचे स्नेही दत्तात्रय कृ. देवधर यांस रुद्रयामत्यापैकीं खालील तीन भाग मोठ्या प्रयासानें मिळालेले आहेत; ते हे:–

(१) रसार्णवकल्प.

(२) गंधककल्प.

(३) पारदकल्प.

हे तीन्ही कल्प रसशास्त्रदृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहेत,

रसार्णवकल्प.

रुद्रयामलांतील रसार्णवकल्पाची व रसार्णव ह्मणून स्वतंत्रपणे उपलब्ध असलेल्या ग्रंथाची तुलना करण्याजोगी आहे. कित्येक ठाईं तर दोहोंतील संपूर्ण श्लोकचे श्लोक व विधींचे विधीही एकच आहेत. रसार्णव ग्रंथा हा कदाचित् रसार्णवकल्पावरून संक्षेप रूपानें बनविलेला असेल अगर मूळ रुद्रयामलांतील संपूर्ण रसार्णवकल्पच कदाचित् रसार्णवग्रंथ असेल. दोन्हींचा अतिनिकट संबंध आहे एवढें मात्र खरें. रसार्णवकल्प प्राचीनतर आहे कीं रसार्णवग्रंथ प्राचीनतर आहे, हें रुद्रयामल संपूर्ण पाहण्यास मिळाल्याखेरिज ठरविणें कठिण आहे, तथापि एकगोष्ट लक्षांत

ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, नागार्जुनानें आपल्या कक्षपुटींत शांभवयामलाबरोबर रसार्णवाचाही स्वतंत्र उल्लेख केलेला आहे ("हरमेखलके तंत्रे इंद्रजाले रसार्णवा।") यावरून रुद्रयामलाबरोबरच नागार्जुनासमोर रसार्णवं ग्रंथही स्वतंत्रपणे उपलब्ध होता एवढें कळून येतें. रुद्रयामल बहूधा रसार्णवाहूनही प्राचीनतर असावें; रसार्णव कर्त्यानें कित्येक ठाईं रुद्रयामलांतील माहिती आपल्या ग्रंथांत गोंविली असावी, असें वाटते.

गंधकल्प.

याची हस्तलिखित प्रत संपूर्ण मिळाली नाहीं. यांत एकंदर १३८७ श्लोक आहेत. हा भाग रुद्रयामलातील आठ्ठाविसाव्या पटलांतील आहे. 'इति श्रीरुद्रयामले पार्वतीप्रश्ने अष्टाविंशतितमे पटले गंधककल्पे गंधकफलं समाप्तं' असा शेवटीं शेरा आहे. यांत एकंदर १३८७ श्लोक नुसत्या गंधकावर आहेत; यावरूनच तांत्रिक लोकांनीं आपलें धातुज्ञान (तांत्रिकांनीं गंधकास धातु ह्मटलें आहे) किती वाढविलेलें होतें हें कळून येईल.

गंधककल्पांत रुद्रयामलांतील पूर्वीच्या कांहीं भागांचा याप्रकारें उल्लेख आहे:—

अतिशुद्ध च ते धातुः प्रोक्ते कार्यें फलप्रदा।
उक्ता सा धातुकेकल्पे श्रुतं ते परमेश्वरि! ॥ १ ॥
अष्टमे पटले दिव्ये अनेका औषधी मताः।
तन्मध्ये कथितं सर्वं नानासंसारकारणं ॥ २ ॥

यावरून, आठवे पटलांत ओषधीकल्प असावा, व दुसरे कोठें तरी धातुशुद्धींवर धातुकल्प ह्मणून एक विस्तृत कल्पच असावें, हे कळून येतें.

गंधकल्पांत विशेषेंकरून गंधकाचेच रसयोग व रसायनयोग सांगितलेले आहेत. गंधकभक्षणाच्या विधीचा तर अत्यंत विस्तार आहे. गंधकभक्षणाचें माहात्म्यही फार वर्णिलेलें आहे. गंधकतैल व गंधकभक्षकाचें मलमूत्र यायोगें रसकर्म सांगितलेलें आहे. गंधकभक्षकासाठीं कांहीं कलाही सांगितल्या आहेत. मणिबंधन, प्रवाल करण, शीतोदक, उष्णोदक, रक्तोदक, विषोदक, अमृतोदक, चंद्रोदक इत्यादि Mineral Waters

चे उपयोगही सांगितलेले आहेत. गंधक भक्षणास कसा शुद्ध करून घ्यावा, हीनगंधकांचा उपयोग दारूच्या कामीं कसा करावा, व त्यायोगें तोफांनीं व सुरुंगांनीं कोट कसे पाडावेत हेंही दिलेलें आहे. गंधकाचे मनुष्यजातावर बाह्यवसुजातावर, व पक्षिजातावर तांत्रिकांनीं प्रयोग करून पाहिलेले आहेत या प्रकारें नाना रस व रसायनयोग या कल्पांत आहेत. आमचीं प्रत अगदीं अशुद्ध असल्यामुळें कोणताही प्रयोग संपूर्णपणें नीट कळत नाहीं.

पारदकल्प.

पारदकल्पही रुद्रयामलांतील २८ व्या पटलांतीलच एक भाग आहे; यांत सुमारें ३५०० श्लोक आहेत. यास रसकल्पही ह्मणतात. याकल्पांत पाण्याविषयीं सर्व प्राचीन तांत्रिक माहिती आहे. याकल्पांत काय विषय आहेत, याची नीट कल्पना येण्यासाठीं पारदकल्पांती विषयानुक्रमणिका देतों. हा भाग पूर्णत्वानें पहाण्यास मिळाला. हा अतिशय विस्तृत व महत्वाचा भाग आहे. यांतील रसायन फारच प्रगति पावलेलें आहे.

(पारदकल्पाची विषयानुक्रमणी.)

मंगलाचरणं।
पारदगंधकमहती भेदकथनं।
संप्रदायापारद विधि;।
सूतदोषाः।
सूतशुद्धिसंस्काराः।
बंधिनी क्रिया।
अभ्रकचारणं।
गगनग्राहकर्ता पारदः।
लोहचारणं जारणं च।
राजिदापनं।
गंधकजारणं।
स्वर्णशोधनं।
मनःशिलासत्वजारणं।
खर्परसत्वजारणं।
हीरकजारणं।
बद्धसूतस्य सारणा।
प्रतिसारणं।
क्रामणं।
वेधसंस्कारः।
वेधांते मारणं वा।
हेमराजी
अयः प्रकाशराजी।
खर्परसत्वपातनं।
महोदधिरसः।
अंतरे ढालनक्रिया।
गंधकपारद योजनं।

सर्वार्थसिद्धि क्रिया ।
माणिक्यसंस्कार क्रिया ।
मुक्ताबंधनक्रिया ।
विद्रुम क्रिया ।
रसराजोत्तमा क्रिया ।
अनेकौषधियोगेन पारदीक्रिया।
तैजसं जलं ।
गंधकसिद्धि प्रकारः ।
ब्रह्मवृक्षतैल प्रकारः ।
नागशुद्धिः ।
नागरंजनं ।
चिंतामणिर ः ।
दाडिमतैलं ।
ज्ञातिकातैलं ।
लोहरंजनं ।
उद्घाटनसंस्कारः ।
ातूनां द्रावणं ।
सौगंधिकद्रव्यकरणं ।
हीरक भस्मप्रकारः ।
वज्रपरीक्षा
चंद्रकांत—सूर्यकांत—रसः ।
गंधकतैल क्रिया।
रजतरंजन क्रिया ।
अभ्रकद्रुतिः ।
अभ्रकद्रुतिजारणं ।
बिलोरमणिद्रांवणं ।
हेमरक्तीकरणं ।
धातूनां सिद्धिः ।
धूम्र बंधिनी क्रिया ।

या सूचीवरून तांत्रिक रसायन शास्त्राच्या शोधांचें क्षेत्र विस्तृत झालें होतें, हें कळून येईल. यांतील बहुतेक क्रिया आजच्या रसायन शास्त्रांस माहीत नाहींत. भारतीय रसायन शास्त्राची फारचे प्रगति झालेली होती !

प्रकरण १५ वें.

रसकौतुक

हा एक रसशास्त्रावरीलच ग्रंथ आहे. हुबळींतील डॉ० गोरे यांच्या हस्तलिखित ग्रंथसंहांत हा मला पाहण्यास मिळाला. ग्रंथकारानें प्रारंभीं अशी प्रस्तावना लिहिली आहे.

नत्वा शिवं गणपति गुरुपादयुग्मं ।
पीठे स्थितां त्रिपुरसुंदरिदेवतां च ॥
वैद्य प्रबोधनकरं रसकौतुकाख्यं ।
नानारसोपरसजारमारणं च ॥ १ ॥
मल्लारिनामा कुरुते सरस्यां (?) ।

ग्रंथांश्च मूलादिरसेंद्रयोगं ॥
रसेंद्रशास्त्राण्यवगाह्य सम्यक् ।
संगृह्य सारं गुरुसंप्रदायात् ॥ २ ॥
श्रीरुक्ष्मणाख्यं पितरं नमस्य ।
श्रीविश्वनाथस्य पदे स्थितं च ॥
श्रीपार्वतीध्यानवसत्वयातं (?)
गुरुश्रीकृष्णं शरणं प्रपन्नं ॥ ३ ॥
आदाय सारं रसराजशंकरात्।
रसामृताद्वा रसराजमंगलम् ।
रसार्णवाच्चापि रसेंद्रसंग्रहात् ।
रसेंद्रसाराद्रसरत्नदीपात् ॥ ४ ॥
रसयोगमुक्तावलि रसालंकारसंयुतां ॥
रसेंद्रहृदयं दृष्ट्वा तथा सूतमहोदधिं ॥ ५ ॥

\+ + + ÷

यद्यद्गुरुभ्योऽनुगतं च किंचित्।
मयाद्भुतं सकलं ससारं ॥
संगृह्यते लोकहिताय सम्यक् ।
मनोरमे सद्रसकौतुकाख्ये ॥ ८ ॥

या प्रस्तावनेवरून ग्रंथकारानें खालील ग्रंथ अवलोकन केलेले होते हें सिद्ध होतें. रसराजशंकर, रसामृत, रत्सराजमंगल, रसार्णव, रसेंद्र-संग्रह, रसेंद्रसार, रसरत्नदीप, रसयोगमुक्तावली, रसालंकार, रसेंद्रहृदय, व सूतमहोदधि.

या लक्ष्मणपुत्र मल्लारीचा काळ ठरविण्यास कांहीं बळकट साधन उपलब्ध नाहीं; तथापि हा बराच अलीकडचा (ह्मणजे १५ व्या शतकाच्या सुमारचा, असावा असें वाटण्यास कारणें आहेत. मला मिळालेल्या प्रतींत पांच अध्याय असून पांचव्या अध्यायाच्या शेवटीं ग्रंथकर्त्यानें असें लिहीलें आहे:—

आलोक्य वृंदसुश्रुतं … … … ।
तस्य सारं मया गृह्य हारीतचरकादिकान् ॥
आत्रेयं वाग्भटं सिद्धसारं दामोदरं गुरुं ॥
वक्ष्ये योगांश्च कतिचित् क्वाथचूर्णादिकान् शुभान् ॥

यांतील दामोदरगुरु जर शार्ङ्गधराचा पिता दामोदर असेल तर हा १४ व्या शतकाहून अर्वाचीन ठरेल. एकूण, हा मल्लारि शकाच्या १५ व्या शतकांतला असें साधारणपणें मानण्यास मला प्रत्यवाय दिसत नाहीं. पुढें याहून स्पष्टतर प्रमाणें उपलब्ध झालीं तर याच्या काळाविषयींच्या लेखांत सुधारणा करितां येईल. रसवैद्यकाच्या दृष्टिनें पहातां थोडक्यांत हा ग्रंथ चांगला व वठलेला आहे असें ह्मणावें लागतें.

प्रकरण १६ वें.

❀ रसार्णव. ❀

रसार्णव हा एक रसविद्येवरिल तांत्रिक ग्रंथ असून याचे एकंदर १८ पटल आहेत. हा ग्रंथ शिव ऊर्फ भैरव यांनीं पार्वती ऊर्फ भैरवी इजला सांगितला आहे. हा ग्रंथ अतिशय महत्वाचा असून नागार्जुनाहून प्राचानतर आहे.* नागार्जुनानें ा. ल्या कक्षपुटींत याचा असा उल्लेख केलेला आहेः—" हरमेखलके तंत्रे इंद्रजाले रसार्णवे ॥" नागार्जुन इ. स. १०० च्या सुमारास होऊन गला. हें आह्मी दुसरीकडे दाखविलेलें आहे. तेव्हा हें तंत्र (रसार्णव) इ. स. च्याही पूर्वीच्या काळचें असलें पाहिजे हें उघड होतें. हा ग्रंथ रसशास्त्रावर अतिशय महत्वाचा व प्र-

* प्रो. प्रफुल्लचंद्र राय यांनीं आपल्या His of Hindu chemistry, Vol. I, च्या प्रस्तावनेंत (पृ. ८४) ह्मटलें आहे. कीं, नागार्जुनाच्या रसरत्नाकरांतून रसार्णवकारानें पुष्कळ मजकूर उतरून, घेतला असावा. हा त्यांनीं रसरत्नाकराच्या अर्धवट प्रतीवरून काढिलेला तर्क होय; पण स्वतः नागार्जुन तर आपल्या ' कक्षपुटींच्या प्रारंभी 'रसार्णवाचा उल्लेख करीत आहे तर नागार्जुन अर्वाचीन आहे. यांत शंका कसली. रसरत्नाकरांत जर साम्य असेल तर ते नागार्जुनानें रसार्णवाला मान दिल्यामुळें असा नाहीं तरी नागार्जुन काय किंवा गोविंदाचार्य काय, कोणींही रसार्णवाला प्रमाणभूत ग्रंथ मानण्याइतकी त्याची योग्यताच आहे. मोराव्या यास १२ व्या शतकांतला ग्रंथ समजतात ? हा काळ पात्र वरील करणांमुळें चुकीचा आहे, तथापि ते या ग्रंथाची योग्यता ओळखून आहेत ते लिहितात;—" It is to be-

माणभूत आहे; कारण रसरत्नसमुच्चयकार वाग्भटानें तर ' रसार्णवादिशास्त्राणि ' पाहून मीं हा ग्रंथ लिहितो, असें ह्मणतेवेळी त्यास रसग्रंथांत अग्रस्थान दिलेलें आहे; शिवाय श्रीमद्गगवद्गोविंदपूज्यपाद यांनीं आपल्या ' रसहृदयांत ' शेंकडो प्रयोग यावरूनच आर्यारूपांत बनविलेले आहेत. व माधवाचार्यांनीं ' रसेश्वरदर्शन ' प्रकरणांत यांतील उतारे दिलेले आहेत. रसार्णव हा ग्रंथ अनुष्टुप् श्लोकरूप असून याची एकंदर ग्रंथसंख्या २०७९ इतकी आहे. या ग्रंथाच्या अध्यायानुक्रमणीवरून यांत कोणकोणते विषय आलेले आहेत व ते किती महत्वाचे आहेत हें कळून येईलः—

रसार्णवाची पटलानुक्रमणी.

---

regretted that of the several works quoted by माधव, रसार्णव alone seems whane survived to our days, to have This work is almost unknown in Beugal, and extremely rare even in N. India and the Deccan. As one of the earliest works of its kind; which throws a plood of light on the chemical kuowlege of the Hindus, (about the 12th century A D.) (१) रसार्णव must be regarded as a valuable national legacy, It has besides, the merit of being the inspirer of several works of the Iatro chemical period, notably रसरत्नसमुच्चय and रसेंद्रचिंतामणि. &c &c.,"

१० रसशोधन.
११ बालजारणा.
१२ सारमारिविषामृतशैलोष्णजलकथा.
१३ बद्धस्य जारण.
१४ वज्रबंधयोग.
१५ रसोपरसलोहबंधयोग.
१६ रंजनं.
१७ लोहवेध.
१८ देहवेध.

या प्रकारें ही पटलानुक्रमणी आहे. या वरून किती प्रकारचे विषय यांत आलेले आहेत हें कळून येईल,

हें रसार्णवतंत्र निघण्यापूर्वीं अनेक तांत्रिक ग्रंथ निर्माण झालेले होते असें दिसतें. कारण पार्वती शिवास प्रश्न करिते:--

देवदेव महादेव कालकामाँगदाहक।
कुलकौलमहाकौलसिद्धकौलादिसाधनं * ॥ ४ ॥
त्वत्प्रसादाच्छ्रुतं सर्वं अशेषमवधारितं।
यदि तेऽहमनुग्राह्या यद्यहं तव वल्लभा ॥ ५ ॥
सूचिता सर्वतंत्रेषु या पुनर्न प्रकाशिता।
जीवन्मुक्तिरियं नाथ कीदृशी वक्तुमर्हसि ॥ ६ ॥

या उल्लेखावरून कुलतंत्रें, कौलतंत्रें, महाकौलतंत्रें व सिद्धकौलतंत्रें इत्यादि अनेक मार्गांचीं तंत्रें रसार्णवापूर्वीं निपजलीं होतीं असें दिसतें तसेंच त्या त्या तंत्रांत पिंडस्थैर्यानें प्राप्त होणारी जीवन्मुक्ति नुसती सूचित केलेली असून ती या तंत्रांत सविस्तर सांगितली आहे, हेंही समजतें. ही जीवन्मुक्ति पिंडस्थैर्यावर अवलंबून असून, पिंडस्थैर्य पारदविद्येवर अवलंबून असल्यामुळें, पारदीय विद्येविषयींच्या सूचना, व या विद्येचा अभ्यास रसार्णवाहून प्राचीनतर अशा अनेक तंत्रग्रंथांतून आढळत असला पाहिजे.

रसार्णवापूर्वीं अनेक रसशास्त्रें निपजलेलीं असावींत, या अनुमानाला त्या ग्रंथांतील खालील उल्लेखांवरून बळकटी मिळते.

(१) रसगुरु कसा असावा. हें सांगतेवेळीं रसार्णव लिहितो कीं, तो 'अनेकरसशास्त्रज्ञ, असावा. रसार्णवापूर्वीं अनेक रसशास्त्रें असल्याखेरीज रसार्णव असें कसें लिहील ?

(२) बाराव्या पटलांत (श्लोक प्रारंभापासून १२६२ वा) शिवागमाचा याप्रकारें उल्लेख आहे:—

यस्य यो विधिराख्यातो वेधकस्य शिवागमे।
स तेनैव तु कामेन तेन कुर्याद्रसायनं ॥

(३) तिसऱ्या पटलांत 'डामराख्य महातंत्रा' चा याप्रकारें उल्लेख आहे:—

डामराख्यं महातंत्रं भ्रामणेषु नियोजयेत्।
चिंतामणिं महाविद्यां कवचेषु नियोजयेत्॥ २१० श्लोक ॥

(४) चवथ्या पटलांत मानप्रकरणांत (श्लोक ५५४) "दशनिष्कं पलं प्रोक्तं इति धन्वंतरेर्मतं" असा धन्वंतरीचा उल्लेख केलेला आहे. धन्वंतरीचा साधारणवैद्यकावरील ग्रंथांचाच हा उल्लेख आहे, कीं धन्वंतरीचा रसशास्त्रावर एखादा स्वतंत्र ग्रंथ होता ? 'धन्वंतरी पटल, म्हणून एक रसशास्त्रावरील ग्रंथ असल्याचें कळतें; पण तो ग्रंथ मीं स्वतः पाहिलेला नसल्यामुळें रसार्णवानें उल्लेखिलेला धन्वंतरीचा ग्रंथ हाच होय कीं नव्हे, हें सांगतां येत नाहीं.

या प्रकारें पुष्कळ रसशास्त्रें रसार्णवा पूर्वाही निपजलीं होतीं असें दिसतें. शिवागम, डामरतंत्र, धन्वंतरीय ग्रंथ [पटल (!)] वगैरेंचा तर उल्लेखच आहे. हे सर्व ग्रंथ यावरून इ. स. पेक्षां पुष्कळ पूर्वींचे असले पाहिजेत हें कळून येईल.

प्रकरण १७ वें.

रसहृदय.

हा ग्रंथ केवळ रसविद्येवरचाच असून यांत एकंदर एकोणीस अवबोध आहेत. हा ग्रंथ १०/५ श्लोकचजा बहुतेक सर्व आर्या रूप आहे; यांत एकंदर ५१२ आर्या आहेत.

ग्रंथकर्त्यांचें नांव व हकीकत.

हा ग्रंथ श्रीमद्गोविंदभगवत्पूज्यपादाचार्यांचा आहे. हे गोविंदभगवत्पूज्यपाद ह्मणजे श्रीशंकराचार्यांचेच गुरु असावेत, ही गोष्ट कित्येक लोक मान्य करीत नाहींत. पण माधवाचार्यांनीं रसहृदय कारांचा ज्या तऱ्हेच्या पूज्यबुद्धीनें उल्लेख केलेला आहे, त्यावरून पहातां हे शंकराचार्यांचे गुरूच असावेत असें वाटतें. शिवाय, रसहृदयांतील प्रास्तविक अवबोधांतील वेदांत इतक्या उत्कृष्ट तऱ्हेनें लिहिलेला आहे कीं, तो शंकराचार्यांच्या गुरूखेरीस इतराकडून असा लिहिला जाणें शक्यच नाहीं. तिसरें कारण असें कीं या ग्रंथांतील एकदोन ठिकाणीं दृष्टांत देखील वैराग्याचे व मोक्षाचेच दिलेले आहेत, अशी तन्मय वृत्ती झालेली शंकराचार्यांच्या गुरु खेरीज कोणाची असूं शकणार? रसहृदयाची प्रस्तावना तर आह्मीं दुसरीकडे संपूर्ण उतरून घेतलेली आहे. ह्याच प्रस्तावनेंतील २७ आर्या रसरत्नसमुच्चय कर्त्यानें, व १३ आर्या माधवाचार्यांनीं (रसेश्वरदर्शनांत) उतरून घेतलेल्या आहेत. त्याशिवाय बाकींचे वेदांतपर उद्गार येथें मुद्दाम देतोः—

पक्षच्छेदमकृत्वा रसबंधं कर्तुमीहते यस्तु ।
बीजैरेव स हि जडो; वांछत्यजितेंद्रियो मोक्षम् ॥ ४—४ ॥
वर्जितचिंताकोपः कुर्याच्च सुखांबुना स्नानं ।
नोल्लंघयेद्गृहज्वरराक्षसभूतानि मातृदेवीश्च ॥ ४८ ॥
परमे ब्रह्मणि लीनः प्रशांतचित्तः समत्वमापन्नः ।
आश्वासयन्, त्रिवर्गं विजित्य, रसानंदपरितृप्तः ॥ ४९ ॥

यस्त्यक्त्वा शास्त्रविधिं प्रवर्तते स्वेच्छया रसे मूढः ॥
तस्य विरुद्धाचारात् अजीर्णमुत्पद्यते नितरां ॥ ५० ॥
अवबोध १९ वा.

रसहृदयाच्या प्रास्ताविक अवबोधांतील खालील आर्या शंकराचार्यांच्या चर्पटपंजरीतील पुढील श्लोकांशी तुलना करून पहाण्याजोगी आहेः—

श्रीमद्गोविंदपूज्यपाद (रसहृदय).	श्रीशंकराचार्य (चर्पटपंजरी).
बालः षोडशवर्षो, विषयरसास्वादलंपटः परतः । यात विवेको वृद्धो, मर्त्यः कथमाप्नुयान्मुक्तिं ॥	बालस्तावत्क्रीडासक्तः । तरुणस्तावत्तरुणीरक्तः ॥ वृद्धस्तावच्चिंतामग्नः । परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः ॥

वरील एकंदर कारणपरंपरेवरून व विशेषतः माधवाचार्यांनीं रसहृदयकारांस 'गोविंदभगवत्पादाचार्यैः' असें उल्लेखिलेलें आहे यावरून, रसहृदयकार गोविंदाचार्य हे श्रीशंकराचार्यांचेच गुरु असावेत असें वाटतें; कारण माधवाचार्य भलत्याला 'गोविंदभवत्पादाचार्य' कसे ह्मणतील !

गोविंदाचार्यांच्यावेळचा राजा.

गोविंदाचार्यांनीं रसहृदयाच्या अखेरीस थोडीशी माहिती दिलेली आहे. ती इतिहासदृष्ट्या महत्वाची आहेः—

रसवादोऽनंतगुणो द्रवगोलककल्कभेदेन ।
कलितः प्रधानसिद्धैः; यैर्दृष्टास्ते जयंति नराः ॥ ७७ ॥
शीतांशुवंशसंभवहैहयकुलजन्मजानितगुणमहिमा ।
स जयति श्रीमदनश्च किरातनाथो रसाचार्यः ॥ ७८ ॥
यस्य स्वयमवतीर्णा रसविद्या सकलमंगलाधारा ॥
परमश्रेयसहेतुः श्रेयसी परमेष्ठिनः पूर्वम् ॥ ७९ ॥
तस्मात्किरातनृपते र्बहुमानमवाप्य रसकर्मरतः ।
रसहृदयाख्यं तंत्रं विरचितवान् भिक्षुगोविंदः ॥ ८० ॥
अवबोध १९ वा.

भिक्षु गोविंदाचार्य यांचा सन्मान रसाचार्य व चंद्रवंशांत उत्पन्न होऊन हैहयकुलास आपल्या जन्मानें भूषित केलेल्या, किरातांच्या श्रीमदन * नांवाच्या राजानें केला. त्याच्या विनंतीवरून गोविंदाचार्यांनें हें रसहृदयतंत्र रचिलें. या हैहयकुलांतील श्रीमदन राजाविषयीं कोठें शिलालेखांतून वगैरे माहिती मिळते कीं काय, हें आपण आतां पाहूं.

डॉ. गर्दे यांनीं आपल्या 'वाग्भटाच्या' प्रस्तावनेंत (पृ. ६४) याच रसहृदयकर्त्याचा काळ ठरवितेवेळीं खालील माहिती दिलेली आहेः—

"हे (च) गोविंदपूज्यपाद शंकराचार्यांचे गुरु असावेत असें कित्येक ह्मणतात. तसें असल्यास त्यांचा काल ८ व्या शतकाचे सुमारास येतो; कारण शंकराचार्य इ. स. ७८८ त जन्मले असा इतिहास आहे व जरी कदाचित् रसहृदयकर्ते गोविंदपूज्यपाद आचार्यांच्या गुरूहून भिन्न मानिले तरी दुसऱ्या आधारानें त्यांचा काळ तोच ठरतो. रसहृदयकर्त्यानें आपल्या ग्रंथाच्या अखेरीस हैहयकुलांतील मदनराजाच्या सूचनेवरून तो ग्रंथ रचिला आहे असें ह्मटलें आहे ह्या हैहयकुलांती राजांची वंशावळ कनिंगह्याम साहेबांच्या आर्कियॉलॉजिकल रिपोर्टांत दिली आहे. (See Archiolojical Survey Reports, Vol. XVII, p. 78) त्यावरून असें दिसून येते कीं त्या वंशावळींत 'कामदेव' या नांवाचा राजा ८ व्या शतकांत गादीवर होता, व हाच रसहृदयोक्त 'मदन' होय; कारण, अशा तऱ्हेनें नांवांचा पर्याय देण्याचा प्रघात आढळतो व 'मदन' या नांवाचा एकंदर वंशावळींत दुसरा कोणींच आढळत नाहीं.

जर कनिंगह्यामचा 'कामदेव' व रसहृदयकाराचा 'मदन' (हे दोघेही हैहयकुलांतलेच असल्याचें वर्णन आहे ह्मणून) एकच असतील, तर दोन

* श्रीमदन हा किरात लोकांवर राज्य करीत असे; पण तो चंद्रवंशांपैकीं हैहयकुलांत उत्पन्न झालेला होता. याच हैहयकुलांत कार्तवीर्य सहस्रार्जुन निपजला होता. 'किरात नाथ' हें विशेषनाम नव्हे, त्याचा अर्थ फक्त 'किरातांचा राजा.'

प्रमाणांनीं गोविंदाचार्यांचा काळ आठव्या शतकांतला असें ठविल्याप्रमाणें होईल. रसहृदयकार गोविंदाचार्य शंकराचार्यांचे गुरु, व हैहयकुलांतील 'कामदेव' ऊर्फ 'मदन' राजानें बहुमानित—अत एव आठव्या शतकांतले होते, याबद्दल आम्हांस तर बिलकुल शंका वाटत नाहीं.

.. रसहृदयकार गोविंदाचार्य हे रससारकर्ते गोविंदाचार्यांहून प्राचीनतर व भिन्न आहेत. रससारकर्ते 'भिक्षु' नव्हतें? ते बरेच अर्वाचीन आहेत.

:. श्रीमद्गोविंदाचार्यांनीं संपूर्ण रसशास्त्र अवघ्या ९१२ आर्यांत इतक्या मार्मिक आणि सुंदर रीतीनें आणिलेलें आहे की, खरोखर यास "रसहृदय" ह्मणण्याला कोणतचि हरकत नाहीं रसविद्येचें हें खरोखरच 'हृदय' आहे? रसविद्येचे गूण कोणत्या तरी ग्रंथांतून प्रथम कळावयाचें असेंल तर तें रसहृदयावरून कळेल, कारण तेथें रसविद्येचे 'हृदय' आहे, असो.

प्रकरण १८ वें

रससार.

हाही ग्रंथ केवळ धातुवाद ऊर्फ रसविद्येवरचाच आहे. यांत एकंदर २४।२९ पटल असून, एकंदर श्लोकसंख्या ८८० वर आहे. रसहृदय कर्ते गोविंदभगवत्पूज्यपादांहून अगदीं भिन्न व अर्वाचीन असे दुसरे कोणीं गोविंदाचार्य **रससारचे** कर्ते आहेत. हा ग्रंथ १४ व्या किंवा १९ व्या शतकांत निर्माण झालेला दिसतो. ग्रंथकर्त्यानें प्रस्तावना व उपसंहारामध्यें थोडीशी हकीकत दिलेली आहे. आपण कोण, व कां ग्रंथरचीत आहों, याचा त्यांत खुलासा आहे. ते लिहितातः—

आलोक्य सर्वशास्त्राणि अनुभूय यथास्थितं ।
सारात्सारं समुद्धृत्य संक्षेपादर्थगौरवात ॥ ३ ॥

रससारं प्रवक्ष्यामि नानासिद्धैस्तु भाषितं ।
साधकानां हितार्थाय लोकानामनुकंपया ॥ ४ ॥

पटल १ लें.

महाक्लेशं च कुर्वंति मूढा द्रव्यस्य हेतवे ।
रसेंद्रं नैव जानंति मृत्युदारिद्र्यनाशनं ॥ २५ ॥
एकच्छास्त्रं मया ख्यातं संक्षेपात्तु न विस्तरात् ॥
सर्वकामप्रदं चैव लोहदेहस्य सिद्धये ॥ २९ ॥
मूढज्ञातिसमुत्पन्नो आचार्यः सहदेवकः ।
सर्वशास्त्रप्रवीणोऽसौ मंत्रसिद्धः प्रजोत्तमः ॥ ३० ॥
विश्रुतस्तस्य पुत्रोऽभूत् आचार्ये सहदेवकः ॥
तदुत्तमस्य यं सूर्यसुरादित्याकृति भुवि ॥ ३१ ॥
तत्संभवसुतः ख्यातो गोविंदः शिववंदकः ॥
शिष्यः श्रीधरदेवस्य रसकर्मसु कोविदः ॥ ३२ ॥
अनुभूयाखिलं शास्त्रं एतत्तेन विनिर्मितं ।
कृपया धातुदीनानां दीनत्वस्य विनाशने ॥ ३३ ॥
अंतर्वेदीसमुत्पन्नो जातिसार श्चतुर्द्विजः ॥
अभयापालपुत्रोऽसौ वीरदेवो हि वंदितः ॥ ३४ ॥
जारणांतामिदं प्रोक्तं मया श्रेष्ठं विनिर्मितं ।
अनुभूतं मया सर्वं वीरदेवप्रसादतः ॥ ३५ ॥
निर्मंथ्य सर्वशास्त्राणि अनुभूय पुनः पुनः ।
बौद्धमतं तथा ज्ञात्वा रससारः कृतो मया ॥ ३६ ॥
अनेन कर्मसंयुक्तो, नानामतविभूषितः ॥
अक्रियापूरितः सर्वो, रससारस्तु दुर्लभः ॥ ३७ ॥
किमन्यै बहुभिःशास्त्रैः किमन्यैश्च रसायनैः ॥
रससारं च यो वेत्ति वादिराजः स जायते ॥ ३८ ॥
यदस्ति सर्वशास्त्रेषु तदिहास्त्यखिलं खलु ।
यदिहास्ति तद् इहैव नान्यत्र रसकर्मणि ॥ ४७ ॥
इदं च परमं गुह्यं रक्षणीयं प्रयत्नतः ।
शिष्येभ्यो न परं देयं न देयं यस्यकस्यचित् ॥ ४० ॥
व्यसनो पठते चैव त्वरितं फलकांक्षिणे ॥

पटल २४।२५

यावरून हा गोविंदाचार्य कोणी मूढज्ञातिमध्यें (?) उत्पन्न झालेला शिवपूजक असावा हें कळून येतें. त्याची वंशावळ डावीकडे दिलेली

सहदेवकाचार्य
सहदेवक
गोविंदाचार्य

आहे. हा पुढें श्रीधरदेवाचाशिष्य बनला. यानें अनुभव घेऊन हें फारच उत्कृष्ट शास्त्र निर्माण केलें. नंतर ‘ जातिसारचतुर्द्विज ’ असा अभयापालाचा पुत्र वीरदेव यानें जारणेच्या अखेरपर्यंत रसविद्या गोविंदाचार्यांस शिकविली. हा वीरदेव अंतर्वेदींत राहणारा असे. वीरदेवाच्या प्रसादानें गोविंदाचार्याला या शास्त्राचा अनुभव घेतां आला. यावरून श्रीधरदेव हा लौकिक गुरु होता असें वाटतें. याप्रकारें वीरदेवाकडून विषयज्ञान व अनुभव मिळविल्यानंतर नाना रसग्रंथ पाहून, व बौद्धमतही तपासून गोविंदाचार्यानें हा **रससार** ग्रंथ लिहिला.

या ग्रंथाची योग्यता.

या ग्रंथांत नाना मतें (Theories) असून, शिवाय ह्या ग्रंथांत कर्माधिकारही (Practice) आहे; ह्मणजे हा ग्रंथ केवळ थियॉरेटिकल नसून कर्मसंयुक्तही आहे. बाकीचे सर्व ग्रंथ ‘ अक्रियापूरित ’ आहेत. ह्मणून त्यांवरून कांहीं काम करितां येत नाहीं. म्हणून उपपत्ति यांनीं युक्त असलेला हा ग्रंथ दुर्लभ होय, असा कर्त्याचा शेरा आहे. इतर शास्त्रें कशास पाहिजेत, इतर प्रयोग कशास पाहिजेत, एक **रससार** ज्यास कळतो तो ‘ **वादिराज** ’ होतो ह्यांत सर्व कांहीं विषय आहेत. यांतील मात्र सर्व विषय कोठेंच नाहींत. हें शास्त्र ज्याला त्याला देऊं नये. हें नीट जपून ठेवावें. ‘ त्वरित फल मिळावें ’ असें ह्मणणाऱ्या **उताविळ्या** शिष्याला, व व्यसनयुक्त शिष्याला तर बिलकुलच देऊं नये. खरोखरच हा ग्रंथ, कर्ता ह्मणतो तितक्या योग्यतेचा आहे. हा ग्रंथ रसविद्येच्या मावळत्या काळांत तयार झालेला असल्यामुळें, व्यवहारांत प्रयोग करितेवेळीं कोठें अडतें, हें कर्त्यास नीट समजल्यामुळें त्यानें व्यवहारिक भाग चांगलाच लिहिलेला आहे. असो.

प्रकरण १९ वें.

पतंजली.

योगेन चित्तस्य पदेन वाचां। मलं शरीरस्य तु वैद्यकेन ॥
योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां । पतंजलिं प्रांजलिरानतोऽस्मि ॥
भोजः— न्यायवार्तिक.

पतंजलीनें व्याकरणावर जसें महाभाष्य लिहिलें, तसेंच वैद्यकावर कांहीं ग्रंथ लिहिले अशी समजूत आहे. योगसूत्रेंही याच पतंजलीचीं आहेत असें कित्येक मानतात. पतंजलीचा वैद्यकावरचा ग्रंथ म्हटला ह्मणजे चरकावरील भाष्य होय. या टीकेंतील एक उतारा नागेश भट्टानें आपल्या लघुमंजूषेमध्यें दिलेला आहेः—"आप्तो नाम अनुभवेन वस्तुतत्त्वस्य कात्स्न्येंन निश्चयवान्, रागादिवशादपि नान्यथावादी यः स इति चरके पतंजलिः ।" चक्रपाणीनें चरकावरील आपल्या 'आयुर्वेददीपिका' नामक टीकेंत पतंजलीला याप्रकारें प्रणति केलेली आहेः—

पातंजल–महाभाष्य–चरकप्रतिसंस्कृतैः ॥
मनोवाक्कायदोषाणां हर्त्रेऽहिपतये नमः ॥

'अहिपति' अगर 'फणिपति' हें नांव पूर्वींच्या ग्रंथांत पतंजलीस लाविलेलें आहे; कारण त्यास शेषाचा अवतार समजत असत; किंवा छंदःशास्त्रकार पिंगलाप्रमाणें योगसूत्रकार पतंजलीही कदाचित् नागजातीचा ग्रंथकार असेल. चक्रपाणीच्या मतें पतंजलीनें (१) पातंजल (योगशास्त्र) (२) महाभाष्य, (३) चरकप्रतिसंस्कृति–हीं तीन पुस्तकें लिहिलीं. 'चरकप्रति संस्कृत' या पदानें चरकाच्या टीकेच्या स्वरूपाचा चांगला बोध होतो. दृढ बलानें एकदां तर चरकाची संस्कृति केलेलीच होती. पतंजलीनेंही टीका व प्रतिसंस्कृति अशीं दोन कार्यें त्या ग्रंथांवर केलीं, असा बोध होतो. पतंजलीनें नुसती टीका अगर भाष्यच करून न थांबतां, दृढबला प्रमाणें चरकावर प्रतिसंस्कारही केला, असें यावरून कळतें. 'संस्कार करणें' म्हणजे प्राचीन ग्रंथांचें संपादन करितेवेळीं तीं तीं शास्त्रें अर्वाचीन शोधांचा वगैरे त्यांत समावेश करून कालानुगामी Upto clcte बनविणें.

याच पतंजलीला पवनयोगाबरोबरच (प्राणायामादिक) रसयोगाचेंही ज्ञान होतें, असा साधारण समज आहे. चक्रपाणिग्रंथावरील टीकाकार शिवदास यानें पतंजलीच्या लोहशास्त्रांतून उतारे दिलेले आहेत. यावरून पतंजलीचें लोहशास्त्रही एकेकाळीं प्रसिद्ध होतें हें कळून येईल. पतंजलीस रसायन सिद्धीचें ज्ञान होतें अशी आलबिरुणीच्या वेळींही समजूत होती; कारण तो लिहितोः—

" The author (Patanjali) adds to the three parts of the path of liberation a fourth one of an illusory nature, Called रसायन consisting of alchemistic tricks with various drugs, intended to reaeise things, which by nature are impossible."

Alberunis India, I, p, 80.

पतंजलीनें रससिद्धि अगर रसायन सिद्धीवर लिहिलेला एखादा स्वतंत्र ग्रंथ आलबिरुणीच्या वेळीं होता कीं काय नकळे! पण तसें तर कांहीं दिसत नाहीं; कारण आलबिरुणी पतंजलीच्या (योग) ग्रंथाच्या चौथ्या पादाचा (कैवल्यपादाचा) वर उल्लेख करीत आहे; पण त्या कैवल्यपादांत तर रासायनिक प्रयोग दिसत नाहींत. मग हा काय घोटाळा आहे ह्मणून सूक्ष्मदृष्टीच्या आम्हीं पाहूं लागलों; तों कैवल्यपादांतील पहिल्या सूत्रांत अनेक सिद्धींचा उल्लेख आहे. तें सूत्र असेंः—

जन्मौषधिमंत्रतपः समाधिजाः सिद्धयः ।

यांत पतंजलि सिद्धि किती प्रकारांनीं मिळतात हें सांगतातः—(१) जन्मसिद्धि, (२) औषधिसिद्धि (३) मंत्रसिद्धि (४) तपःसिद्धि (५) समाधिसिद्धि, यांत 'रससिद्धि' कोठें आहे? व्यासभाष्यांत 'औषधी' वर अशी टीका आहे कीं, 'औषधिभिः असुरभवनेषु रसायने नेत्येवमादि' यावर पुनः वाचस्पतिमिश्राची अशी टीका आहे. "औषधिसिद्धिमाह असुरभवनेषु इति । मनुष्यो हि कुतश्चिन्निमित्तादसुरभवनमुपसंप्राप्तः कमनीयाभिरसुरकन्याभिः उपनीतं रसायनमुपयुज्य अजरामरणत्वमन्याश्च सिद्धीरासादयति । इहैव वा रसायनोपयोगेन । यथा मांडव्यो मुनिः रसो-

पयोगाद् विंध्यवासी इति ।" या दोघांच्या टीकांवरून 'औषधिसिद्धि' हा शब्द 'रससिद्धि' असाच आहे हें उघड होईल. 'औषधसिद्धि' हा शब्द 'रससिद्धि' या अर्थीं रुद्रयामलांतील गंधककल्पांतही उपयोजिलेला आहेः—

> विधिहीने न सिध्यंति मंत्राराधनमौषधं ।
> कदाचिद्विधिहीनानां काले सिद्धिस्तु जायते ॥

या श्लोकांत 'औषधसिद्धि' ह्मणजे 'रससिद्धी' च कां घ्यावी हें रससिद्धि कां होत नाहीं? या प्रकरणांत दाखविलेलें आहे.

रस अगर रसायन सिद्धि असुरभवनांत विशेषेंकरून असते अशी व्यासाची समजूत दिसते; पण वाचस्पतिमिश्र ह्मणतो कीं, असुरभवनच कशाला पाहिजे? मांडव्यमुनिही रससिद्ध होऊन विंध्यवासी होऊन राहिला होता; ह्मणजे या भरतवर्षांत होता, असा आशय या मांडव्याचा उल्लेख रसरत्नसमुच्चय कर्त्यानें सत्तावीस रस सिद्धांत केलेला आहे; व यानें लिहिलेल्या शास्त्राचा नागार्जुनानें आपल्या **रसरत्नाकरांत** उल्लेक केलेला आहे. तेव्हां मांडव्य हा प्रसिद्ध रससिद्ध होता यांत शंकाच नाहीं. मांडव्य हा वशिष्ठाचा शिष्य होय. वशिष्ठानें यास ज्योतिषशास्त्र व रसशास्त्र हीं शास्त्रें शिकविल्याप्रमाणें दिसतें. वशिष्ठ, मांडव्य, इंद्रद्युम्न, ऋष्यशृंग, वगैरे रामायणकालीन व तत्पूर्वींचेही लोक रससिद्ध ह्मणून प्रसिद्ध आहेत तेव्हां खि. पू. दुसऱ्या शतकांतील पतंजलीस हा रसयोग माहीत असल्यास त्यांत नवल नाहीं.

पतंजलीचे ग्रंथ. (खि. पू. १५०)

(१) योगसूत्रें.
(२) महाभाष्य.
(३) चक्रावरील टीका. (अनुपलब्ध)
(४) लोहशास्त्र. (अनुपलब्ध)

या प्रमाणें पतंजलीनें ग्रंथ लिहिले होते. याहून कांहीं त्याचे अधिक ग्रंथ असल्यास, त्यांची माहिती सध्यां मिळत नाहीं.

प्रकरण २० वें.

रसरत्नप्रदीप.

याची एक हस्तलिखित प्रत मला धारवाडहून मिळाली. यांत देहसिद्धि व लोहसिद्धि हे दोन्ही विषय आहेत. प्रारंभ असा आहेः—

> श्रियं स दद्यात् भवतां पुरारिः ।
> यदंगतेजःप्रसर (?) भवानी ॥
> विराजते निर्मलचंद्रिकायां ।
> महौषधीव ज्वलिता हिमाद्रा ॥ १ ॥
> * सृष्टं येन चिदाचिदात्मखमरुत्तेजो[1]जलंभूगणाः ।
> सत्संविच्छिवशक्ति भैरवकला श्रीकंठपंचाननाः ॥
> [2]रुद्रेशेति शिवे (ति) चेति विबुधाश्चंद्रार्कतारागणाः ।
> सोऽयं पातु चराचरं जगदिदं निर्नामनामाभिधः ॥ २ ॥
> सूते सूतवरो वरं सुकनकं शब्दापरं स्पर्शनात् ।
> धूमाद्विध्यति तत्क्षणादथ परं शंखांशखर्वांशतः ॥
> संख्यामर्बुदकोटिलक्षमयुतं युक्त्या सहस्रं शतं ।
> दत्ते स्वां[3] गतिमक्षयं शिवपदं तस्मै परस्मै नमः ॥ ३ ॥
> नत्वा श्रीपार्वतीं देवीं भैरवं सिद्धसंततिम् ।
> रत्नप्रदीपं वक्ष्येहं देहे लोहे शिवंकरं ॥ ४ ॥
> हरति सकलरोगान् मूर्छितो यो नराणां ।
> वितरति किल बद्धः खेचरत्वं जवेन ॥
> सकलसुरमुनींद्रैर्वंदितं शंभुबीजं ।
> स जयति भवसिंधोः पारदः पारदोऽयं ॥ ६ ॥
> यो न वेत्ति कृपाराशिं रसं हरिहरात्मकं ।
> वृथा चिकित्सां कुरुते स वैद्यो हास्यतां व्रजेत् ॥ ६ ॥

* हे दोन श्लोक नित्यनाथसिद्धाच्या **रसरत्नकरांतील** वादिखंडाच्या प्रारंभीं आहेत. या वादिखंडाच्या तीन प्रति मिळवून या श्लोकांचे पाठभेद शुद्ध करून दिलेले आहेत.

१ तेजोमयं भूगुणाः (रसरत्नप्रदीप) । तेजोजलं भूगुणाः (वादिखंड २ प्रति) ।
२ ईशोरुद्रमुरारिधातृविबुधाः । असा पाठ वादिखंडांत आहे, तोच बरा आहे.
३ दत्ते खे गतिमक्षयं शिवपदं । (वादिखंडांतलि पाठ, ज्यास्त चांगला आहे.)

शुष्कैंधनमहाराशिं यथा दहति पावकः ।
तद्वद्धातुगतः सूतो रोगान् दोषत्रयोद्भवान् ॥ ७ ॥
गुरुसेवां विना कर्म यः कुर्यान्मूढचेतनः ।
स याति निष्फलं कर्म स्वप्ने लब्धंधनं यथा ॥ ८ ॥
तस्मात् श्रद्धापरं यस्य तस्य तत्सफलं भवेत् ॥
विद्यां गृहीतुमिच्छंति चौर्यकूटबलात् छलात् ॥ ९ ॥
न तेषां सिध्यते किंचित् मणिमंत्रौषधादिकं ॥

अथ ग्रंथातरात्संक्षेपतो नानाविधमनुभूतं कर्मकौतूहलाधिकारो लिख्यते.

जयत्यमरवंदिता त्रिपुरसुंदरी देवता ।
विभोगविभवान्विता परमतत्वर्चिताचिंता ॥
उपाधिरहिता हिता सकलशास्त्रनिर्धारिता ।
प्रपंचपदवाचिता त्रिभुवनैकमाता मता ॥ १० ॥
रसाचिंतामणिर्नाम रसरत्नप्रदीपकः ।
भविष्यत्येव वै ग्रंथः श्रीमतां हस्तपुस्तकम् ॥ ११ ॥

ग्रंथकर्त्याचें नांव कोठेंही कळून यत नाहीं, या ग्रंथाची वैद्यमंडळांत बरीच प्रसिद्धि आहे. यांतील प्रयोगही निवडक व चांगले आहेत असें ह्मणतात. ग्रंथकर्त्यानें अनेक ग्रंथांतून अनेक **प्रयोगांचा अनुभव** घेऊन हा कर्मकौतूहलाधिकार लिहिला आहे असें ह्मटलें आहे, तसेंच आपला हा **रसरत्नप्रदीप** ग्रंथ श्रीमंतांचें हस्तपुस्तक (Hand Book) होईल असें त्यानें लिहिलें आहे. खरोखरच या ग्रंथाचीं तशी योग्यता आहे. देहप्रयोग व लोहप्रयोग दोन्हीं यांत मोठे निवडक दिलेलें आहेत. आमच्या हस्तलिखित प्रतींत एकंदर आठ अधिकार अगर उपदेश आहेत. यांत लोहप्रयोग बरेच आहेत; ग्रंथकारानें कित्येक क्रिया मिळविण्यासाठीं फार खटपट व प्रयास केल्याचें दिसतें; कारण, एके ठिकाणीं तो लिहितो का.

विभ्रांता बहवो देशाः रसाश्च बहवः कृताः ।
लब्धस्तदा मया सूतो दारिद्र्यदलनः परः

याप्रकारें हा महत्वाचा ग्रंथ आहे. ग्रंथकर्त्याचें नांव जरी कळत नाहीं तरी काळ कळण्यांस कांहीं हरकत दिसत नाहीं. प्रारंभींचे २।३ श्लोक नित्यनाथाचे वादिखंडांतीलच आहेत. चौथ्या श्लोकांत फरक करून

तो आपल्या ग्रंथास लागू करून घेतलेला आहे; यावरून नित्य नाथानंतरचा हा ग्रंथकार दिसतो.

प्रकरण २१ वें.

मत्स्येंद्रादि नाथपंथीय मंडळी.

रसरत्नसमुच्चयावर लिहितेवेळीं आह्मीं ज्ञानेश्वराची गुरुपरंपरा दिलेली असून, नाथपंथीयांनीं पूर्वी ज्या चार विषयांमध्यें वाकबगारी मिळविली ते दुसऱ्या एका प्रकरणांत दिलेले आहेत. नाथसांप्रदायाच्या मंडळींनीं

आदिनाथ मत्स्येंद्रनाथ गोरक्षनाथ गैनिनाथ (गहिनीनाथ) निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर	(१) ब्रह्मज्ञान (२) योगसिद्धि, (३) मंत्र सिद्धि ऊर्फ शाबरीविद्या, व (४) रस सिद्धि—या चार विषयांत प्राविण्य संपादन केलें होतें. मत्स्येंन्द्रनाथाची शिष्यपरंपरा डावीकडे दिलेली आहे. यांतील आदिनाथ ‘स पूर्वेषा-

मपि गुरुः कालेनावच्छेदात्’ या न्यायानें जर सोडून दिला तर, मत्स्येंद्रनाथापासून ही परंपरा सुरू होते. मत्स्येंद्रादि नवनाथाची हकीकत **नवनाथभक्तिसार** व इतर कांहीं किरकोळ ग्रंथ यांतून मिळते. नरहारिमालूनें आपला वरील ग्रंथ शके १७४१ मध्यें रचिला. या ग्रंथास त्यानें गोरक्षनाथाच्या **किमियागिरि** नामक ग्रंथाचा आधार घेतलेला आहे, तकेंच नव्हे तर आपला ग्रंथ केवळ त्याचेंच भाषांतर आहे असें तो ह्मणतोः—

अगा हा ग्रंथ नोहे भक्तिसार ।
आहे गोरक्षाचा किमयागार ।
परी पालटोनि भाषांतर ।
महाराष्ट्र अक्षरीं रेखिला ॥ अध्याय ४०–१८४ ॥

या ग्रंथांत, पूर्वींच्या पद्धतीप्रमाणें, खालील नऊ नाथांचीं चारित्रें आहेत. मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ जालंदरनाथ, कानीफनाथ, चर्पटीनाथ, नागेशनाथ, भर्तरी ऊर्फ भरतनाथ, रेवणनाथ, व गहिनी ऊर्फ गैनीनाथ. या नाथांस सिद्धही ह्मणतात. हे नवनाथ नवनारायणांचे अवतार मानिले गेले आहेत.

याचा कानफाटा अगर नाथसांप्रदाय असे. यांच्याजवळ या सांप्रदायाचीं चिन्हें ह्मणून शिंगी, शैली वगैरे असे नवनाथ भक्तिसारांतील सिद्धांच्या हकीकतीशीं सध्यां आपणांस विशेष कर्तव्य नाहीं. मत्स्येंद्र गोरक्ष, गहिनी, चर्पटी वगैरे नाथ ज्ञानेश्वरापूर्वीं थोड्या काळांत होऊन गेले. त्यांनीं कांहीं ग्रंथ वगैरे लिहून टेविलेले आहेत कीं काय, व त्यांचे कोठें प्राचीन ग्रंथांत उल्लेख आलेले आहेत. एवढेंच आज आपणांस पहावयाचें आहे.

मत्स्येंद्रनाथाचे सध्यां दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (१) **मत्स्येंद्रसंहिता** व (२) **ज्ञानकारिका** हे दोन्हीं ग्रंथ मला पाहण्यास मिळाले नाहींत तेव्हां याविषयीं विशेष कांहीं लिहितां येत नाहीं.

गोरक्षनाथाचे मात्र बरेच ग्रंथ आहेत, ते डावीकडे देतों.

(१) गोरक्षपद्धति	योगशास्त्र
(२) गोरक्षसंहिता	
(३) सिद्धसिद्धांतपद्धति	वेदांत
(४) विवेकमार्तंड	
(५) किमयागिरि	रसविद्या
(६) सिद्धिगोष्टी	(हिंदींत

यांपैकीं पहिले दोन ग्रंथ योगविद्येवरचे असून ते छापलेलेही आहेत. पुढचे दोन वेदांतशास्त्रावरील असून अप्रसिद्ध आहेत. **किमयागिरि** ग्रंथाचा नरहरिमालूनें उल्लेख केलेला वर दिलेलाच आहे. त्यांत इतर हकीगतीबरोबरच किमया ऊर्फ रसविद्येचीही माहितो होती, असें नरहरिमालू स्पष्ट लिहितो:—"असो हे ऐसी गोरक्षकथा । वदला आहे **किमयागिरिग्रंथा** । तेथें किमयाचीं स्थानें सर्वथा । **सांगितलीं आहेत** जीं ॥ २–१०३ ॥ स्वमुखें गोरक्ष वदला आहे कथन । त्या ग्रंथाचा आश्रय पाहोन । नवही योगी वर्णिले ग्रंथीं ॥ १०५ ॥ संशय आलिया **किमयागिरि** ग्रंथा । विलोकावें विचक्षणीं ॥ १०६ ॥" याप्रमाणें **किमयागिरि**चा उल्लेख आहे सिद्धगोष्टी हा ग्रंथ हिंदींतच आहे असें समजतें. हाही रसशास्त्रावरचाच ग्रंथ होय.

चर्पटीनाथाचा उल्लेख रसरत्नसमुच्चयकर्त्यानें रससिद्धांत केलेला आहे. हा चर्पटीनाथ भर्तृहरि राजाचा गुरु होता असें कित्येक समजतात; असें

समजल्यानें हा ज्ञानेश्वर कालीन न होतां, इ. स. ५६ चे सुमारास येतो. हा कालविपर्यास होईल. मत्स्येंद्र, गोरक्षादिकांचे ज्ञानेश्वरावरून काळ ठरून जातात. मग चर्पटी ज्याचा गुरु म्हणविला जातो तो भर्तरि कोण, असा एक प्रश्न उद्भवतो; पण यास एवढेंच मानावें लागतें कीं चर्पटीचा शिष्य भर्तरिनाथ हा प्रसिद्ध भर्तृहरि राजा नसून त्याहून भिन्न व अर्वाचीन कोणीतरी असावा; व अशीच परंपराही असल्याचें एकदां मला कै. ह. भ. प. भिंगारकरबुवा यांनीं सांगितलें होतें. स्वात्मारामानें आपल्या **हठयोगप्रदीपिकेंत** ज्या महासिद्धांची यादी दिली आहे तींत मत्स्येंद्र, गोरक्ष वगैरेंचीं नांवें आहेत:—

आदिनाथश्च मत्स्येंद्रो शंबरानंदभैरवः ॥
चौरंगी मेघ गोरक्षा विरूपाक्षो बिलेशयः ॥ इत्यादि.

मत्स्येंद्रनाथ स्त्रीराज्यांत गढून गेला असतां गोरक्षनाथानें त्यास आपल्या कार्याची आठवण देऊन परत आणिलें, या कथेचा उल्लेख शांकरदिग्विजयांत तशाच एका प्रसंगाच्या ओघानें आलेला आहे:—

गोरक्ष एषोऽथ गुरोः प्रवृत्तिं ।
विज्ञाय रक्षन् बहुधास्य देहं ॥
निशांतकांतानटनोपदेष्टा ।
नितांतमस्याऽभवदंतरंगः ॥ ९–८४ ॥

नाथमंडळापैकीं प्रत्येकाची सविस्तर हकीकत देणें हा कांहीं येथें उद्देश नाहीं. ज्यांचे रसग्रंथ असतील त्यांविषयीं थोडेसें लिहावें एवढाच आहे; तथापि येथें कानीफनाथाविषयीं माहिती जेवढी मिळाली तेवढी देऊन ठेवतों:—

मत्स्येंद्रादि नवसिद्ध अगर नवनाथ ज्या ज्या ठिकाणीं बसून तपाचरण करीत होते त्या त्या ठिकाणच्या त्यांच्या आसनांस समाधि समजून लोक पूज्य मानतात. हल्लीं या समाधींवरून तुरबती आढळतात. मढी (ता. शेवगांव, जि. नगर) येथील तुरबत कानफिनाथ ऊर्फ कान्होबा

याचा कानफाटी अगर नाथसांप्रदाय असे. यांच्याजवळ या सांप्रदा-याचीं चिन्हें ह्मणून शिंगी, शैली वगैरे असे नवनाथ भक्तिसारांतील सिद्धांच्या हकीकतीशीं सध्यां आपणांस विशेष कर्तव्य नाहीं. मत्स्येंद्र गोरक्ष, गहिनी, चर्पटी वगैरे नाथ ज्ञानेश्वरापूर्वीं थोड्या काळांत होऊन गेले. त्यांनीं कांहीं ग्रंथ वगैरे लिहून टेविलेले आहेत कीं काय, व त्यांचे कोठें प्राचीन ग्रंथांत उल्लेख आलेले आहेत. एवढेंच आज आपणांस पहावयाचें आहे.

मत्स्येंद्रनाथाचे सध्यां दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (१) **मत्स्येंद्रसंहिता** व (२) **ज्ञानकारिका** हे दोन्हीं ग्रंथ मला पाहण्यास मिळाले नाहींत तेव्हां याविषयीं विशेष कांहीं लिहितां येत नाहीं.

गोरक्षनाथाचे मात्र बरेच ग्रंथ आहेत, ते डावीकडे देतों.

(१) गोरक्षपद्धति (२) गोरक्षसंहिता	**योगशास्त्र**	यांपैकीं पहिले दोन ग्रंथ योग विद्येवरचे असून ते छापलेलेही आहेत. पुढचे दोन वेदांतशास्त्रावरील असून अप्रसिद्ध आहेत. **किमयागिरि**
(३) सिद्धसिद्धांतपद्धति (४) विवेकमार्तंड	**वेदांत**	
(५) किमयागिरि (६) सिद्धगोष्टी	**रसविद्या** **(हिंदींत**	

ग्रंथाचा नरहरिमालूनें उल्लेख केलेला वर दिलेलाच आहे. त्यांत इतर हकीगतीबरोबरच किमया ऊर्फ रसविद्येचीही माहिती होती, असें नरहरिमालू स्पष्ट लिहितोः—"असो हे ऐसी गोरक्षकथा। वदला आहे **किमयागिरि-ग्रंथा । तेथें किमयाचीं स्थानें सर्वथा । सांगितलीं आहेत जीं** ॥ २–१०३ ॥ स्वमुखें गोरक्ष वदला आहे कथन।त्या ग्रंथाचा आश्रय पाहोन । नवही योगी वर्णिले ग्रंथीं ॥ १०५ ॥ संशय आलिया **किमयागिरि** ग्रंथा।विलोकावें विचक्षणीं ॥ १०६ ॥" याप्रमाणें **किमयागिरि**चा उल्लेख आहे सिद्धगोष्टी हा ग्रंथ हिंदींतच आहे असें समजतें. हाही रसशास्त्रावरचाच ग्रंथ होय.

चर्पटीनाथाचा उल्लेख रसरत्नसमुच्चयकर्त्यानें रससिद्धांत केलेला आहे. हा चर्पटीनाथ भर्तृहरि राजाचा गुरु होता असें कित्येक समजतात; असें

समजल्यानें हा ज्ञानेश्वर कालीन न होतां, इ. स. ५६ चे सुमारास येतो. हा कालविपर्यास होईल. मत्स्येंद्र, गोरक्षादिकांचे ज्ञानेश्वरावरून काळ ठरून जातात. मग चर्पटी ज्याचा गुरु म्हणविला जातो तो भर्तरि कोण, असा एक प्रश्न उद्भवतो; पण यास एवढेंच मानावें लागतें कीं चर्पटीचा शिष्य भर्तरिनाथ हा प्रसिद्ध भर्तृहरि राजा नसून त्याहून भिन्न व अर्वाचीन कोणीतरी असावा; व अशीच परंपराही असल्याचें एकदां मला कै. ह. भ. प. भिंगारकरबुवा यांनीं सांगितलें होतें. स्वात्मारामानें आपल्या **हठयोगप्रदीपिकेंत** ज्या महासिद्धांची यादी दिली आहे तींत मत्स्येंद्र, गोरक्ष वगैरेंचीं नांवें आहेतः—

आदिनाथश्च मत्स्येंद्रो शंबरानंदभैरवः ॥
चौरंगी मेघ गोरक्षा विरूपाक्षो बिलेशयः ॥ इत्यादि.

मत्स्येंद्रनाथ स्त्रीराज्यांत गढून गेला असतां गोरक्षनाथानें त्यास आपल्या कार्याची आठवण देऊन परत आणिलें, या कथेचा उल्लेख शांकरदिग्विजयांत तशाच एका प्रसंगाच्या ओघानें आलेला आहेः—

गोरक्ष एषोऽथ गुरोः प्रवृत्तिं ।
विज्ञाय रक्षन् बहुधास्य देहं ॥
निशांतकांतानटनोपदेष्टा ।
नितांतमस्याऽभवदंतरंगः ॥ ९–८४ ॥

नाथमंडळापैकीं प्रत्येकाची सविस्तर हकीकत देणें हा कांहीं येथें उद्देश नाहीं. ज्यांचे रसग्रंथ असतील त्यांविषयीं थोडेसें लिहावें एवढाच आहे; तथापि येथें कानीफनाथाविषयीं माहिती जेवढी मिळाली तेवढी देऊन ठेवतोंः—

मत्स्येंद्रादि नवसिद्ध अगर नवनाथ ज्या ज्या ठिकाणीं बसून तपाचरण करीत होते त्या त्या ठिकाणच्या त्यांच्या आसनांस समाधि समजून लोक पूज्य मानतात. हल्लीं या समाधींवरून तुरबती आढळतात. मढी (ता. शेवगांव, जि. नगर) येथील तुरबत कानफिनाथ ऊर्फ कान्होबा

यांची आहे. या नऊ नाथांपैकींच मत्स्येंद्र, गहिनी, जालंदर, नागनाथ इत्यादिकांचीं स्थानें नगरच्या पूर्वेस तुळजापुरापर्यंत ३०।३५ कोस लांबीच्या डोंगराळ प्रदेशांत बहुतेकांवर तुरबती असून मुसलमानी नांवें प्रचारांत आहेत. मत्स्येंद्रनाथ यांचें स्थान मढीनजीक सांबरगांवचे जंगलांत आहे; त्यास गंजपीर अगर मायबा ह्मणतात. मढी हा शब्द मठी याचा अपभ्रंश दिसतो. कान्होबा ऊर्फ कानीफनाथ हे कानफांटी गोसावी असून शैव होते. ते समाधिस्थ झाल्यानंतर त्या स्थानावर तुरबत्तीचा पगडा बसला. मढी येथील हल्लींच्या पुजाऱ्याचे (मुजावराचे) घरीं हिंदु नाथपंथाची मुख्य खूण 'शैली शिंगी' असून ती गळ्यांत अडकवून हे पूर्वी भिक्षेकरितां फिरत असत. **नवनाथ भक्तिरसांत** कानीफनाथाचें स्थान 'मढी' येथें असून मढीचे पश्चिमेस डोंगरांत (यास गर्भगिरी ह्मटलें आहे) नवनाथांनीं यज्ञ करून वृद्धेश्वर नामक शिवलिंगाची स्थापना केली असें ह्मटलेलें आहे. वृद्धेश्वराचें प्रसिद्ध लिंग अद्यापि त्या डोंगरांत आहे. कानीफनाथ समाधिस्थ झाल्यानंतर पुष्कळ दिवसांनीं हल्लींच्या मुजावरांच्या हिंदुपूर्वजांनीं पैठण येथील सादतअल्लीनें मुसलमान करून बादशहाकडून त्यांस मढी येथील मोकासा, साहोत्रा, वगैरे इनामांची सनद मिळवून दिली. सादतअल्लीनें इ. सन १३५० च्या सुमारास **कानीफनाथास** महंमदी दीक्षा दिलेली नसून, त्यांच्या नंतरच्या त्या स्थानच्या एका हिंदु **पुजाऱ्यास** त्यानें ती दीक्षा दिली, हें विसरतां कामा नये. यावरून इ. स. १३५० हून कानीफनाथादि मंडळी प्राचीन तर होती हें निःसंशय सिद्ध होतें.

प्रकरण २२ वें.

इतर ग्रंथकार.

मागें दिलेल्या स्वतंत्र ग्रंथाशिवाय व ग्रंथकारांशिवाय इतर कित्येक ग्रंथकार या विद्येवरचे आपल्यांत होऊन गेले असें त्यांविषयीं आलेल्या अनेक उल्लेखांवरून समजतें. आज या लोकांचे स्वतंत्र ग्रंथ मात्र राहि-

लेले नाहींत, ही दुर्दैवाची गोष्ट होय. रामायणांतील उल्लेखावरून वाल्मीकीस या विद्येची माहिती होती हें मागें दाखविलेलेंच आहे. त्याच वेळचे वसिष्ठ, मांडव्य, ऋष्यशृंग, इंद्रद्युम्न इत्यादिकही या विद्येंत प्रवीण होते ह्मणून उल्लेख आहेत; ते उल्लेख जेथल्या तेथें आह्मीं दिलेले आहेत. त्यानंतर इतर कांहीं किरकोळ उल्लेख आढळले ह्मणून हें स्वतंत्र प्रकरण लिहावें लागलें. जसें वाल्मीकीस तसेंच व्यासासही ही विद्या माहीत होती असें खालील उल्लेखावरून दिसतें:—

एवं संजायते तारं चंद्रकांतिसमप्रभं ।
अन्यथा नास्ति वचनं इदं व्यासोदितं यथा ॥ १ ॥

(रसरत्न प्रदीप)

व्यासांसच ही विद्या माहीत होती असें नाहीं तर भीम व अर्जुन यांसही ती माहीत होती; भीम व अर्जुन यांनीं रसाचें तिर्यक्पातन करून घेण्याची क्रिया बहुधा शोधून काढिली:—

रसाधो ज्वालयेदग्निं यावत्सूतो जलं विशेत् ।
तिर्यक्पातनमित्युक्तं सिद्धैर्भीमार्जुनादिभिः ॥ २ ॥

(आयुर्वेदप्रकाश)

या उल्लेखांवरून रामायणीय व भारतीय काळांत रसविद्या आपल्यांत चांगलीच प्रसिद्ध होती असें वाटतें. यामुळें गीतेंतील.

रसोऽहमप्सु कौंतेय—

या उद्गारांत भगवंताचा कटाक्ष "सर्व द्रवरूपी पदार्थांत मीं (सर्वोत्कृष्ट असा) रस ह्मणजे पारा आहे." असें ह्मणण्याकडेच असावा असें वाटूं लागतें.

या शिवाय **व्याडि** हा रससिद्ध ह्मणून प्रसिद्ध होता; याचें रससिद्धांत नांव असून **गरुडपुराणानें** त्याचा असा उल्लेख केलेला आहे:—

व्याडिर्जगाद जगतां हि महाप्रभावः ।
सिद्धो विदग्धाहिततत्परता दयालुः ॥ (रत्नप्रकरणांत)

यांशिवाय, नागबोधि, रत्नघोष वगैरे नागार्जुनाच्या वेळची मंडळी, नंदी वगैरे त्याच सुमारची मंडळी, अर्वाचीन काळांतील गोरक्ष, मत्स्येंद्र गहिनी इत्यादि नाथ, त्याच सुमारचे सिद्ध लक्ष्मीश्वर, ब्रह्मज्योतिर्मुनींद्र, मंथानभैरव, खर्वणाख्य लोकनाथ, सोमदेव, स्वच्छंद भैरव, गहनानंद नाथ, भव्यदत्तदेव, इत्यादिकांचा उल्लेख रसग्रंथांतून नाना ठाईं येतो. असो.

अनेक रसग्रंथांचीं यादी आह्मीं दुसऱ्या एका प्रकरणांत दिली आहे, त्यांतील कांहीं ग्रंथ यांपैकीं कांहींचे असतीलही.

प्रकण २३ वें.

पाऱ्याविषयीं आपल्या प्राचीन ग्रंथांत मिळणारी माहिती.

प्राचीनकाळीं भारतवर्षांत रसायनशास्त्राचें ज्ञान किती प्रगती पावलेलें होतें हें आम्हीं मागें (समा. वर्ष १ लें अंक ८ वा) दाखविलेलेंच आहे; तसेंच त्या लेखांत रसशास्त्रावरील संस्कृतमधील कांहीं ग्रंथांचेंही वर्णन दिलेलें आहे. आजच्या लेखांत, कांहीं ग्रंथांच्या आधारें, पाऱ्याविषयीं आपल्याकडे काय माहिती मिळते, व आपल्या लोकांची पारदाविषयीं काय कल्पना होती, या विषयीं थोडेसें लिहावयाचें आहे.

वैद्यक व तांत्रिक लोकांचें लक्ष प्रथम पाऱ्याकडे व धातूंकडे लागलें. तांत्रिक लोकांनीं पूर्वीं अनेक भौतिक शास्त्रांतील शोध इकडे लावले. सर्वांत प्राचीन असे रसशास्त्राचे ग्रंथ तांत्रिक परंपरेंतील आहेत. व त्यांत एक प्रकारचें गूढत्व असून ते एका चमत्कारिक तऱ्हेच्या परिभाषेनें लिहिलेले आहेत. तांत्रिक लोकांचें प्रथम इतर धातूंबरोबर पाऱ्याकडेही लक्ष लागलें. उपलब्ध ग्रंथांपैकीं पाऱ्याविषयीं सविस्तर माहिती असलेले प्राचीन तांत्रिक ग्रंथ म्हटले म्हणजे ***रुद्रयामल, रसार्णव, रससिंधु, रसहृदय**

*'रुद्रयामल' हा ग्रंथ अत्यंत महत्वाचा असून तो सवालाखाचा आहे असें म्हणतात. यांत मंत्रशास्त्र, भूगर्भशास्त्र; धातूवाद, रसवाद, रसायन, इत्यादि अनेक अपरूप भाग आहेत असें ऐकिवांत आहे. शोधकांनीं ह्या प्राचीन ग्रंथाचा पत्ता लावावा.

काकचंडीश्वरीमत वगैरे होत. या ग्रंथांपैकीं कांहींतून व इतर कांहीं ग्रंथांतून, पाऱ्याविषयीं रससिद्धांनीं पूर्वीं काय ह्मटलें आहे, व त्याचा सद्यःकालीं काय उपयोग होण्याजोगा आहे, या विषयीं मराठी जाणणाऱ्या लोकांस नीट कल्पना यावी एतदर्थ हा लेख लिहीत आहें.

पाऱ्याचे व इतर धातूंचे 'रसवैद्यक' व 'रसायन, या दोन शास्त्रांत उपयोग आहेत. रसवैद्यकांतील पाऱ्याच्या उपयोगाला 'देहसिद्धि' म्हणत; व'रसायनां' तील पाऱ्याच्या उपयोगाला 'लोहसिद्धि' म्हणत. देहसिद्धि म्हणजे पारा व इतर धातु हीं शुद्ध करून, त्यांचीं भस्में वगैरे करून, त्यांच्या योगें शरीरांतील सर्व प्रकारचे रोग हटवून आयुर्वृद्धीची परमावधि करावयाची, किंबहुना 'शरीर अजरामर' करावयाचें ! लोहसिद्धि ह्मणजे पारा व इतर अनेक धातु यांवर अनेक दिव्यौषधींची क्रिया करून, त्यांस संस्कार देऊन त्यायोगें रुपें व सोनें बनवावयाचें. यासच 'रसायन' किंवा 'किमया' असेंही ह्मणत. सारांश, रससिद्धांच्या डोळ्यांपुढें हीं दोन इष्टें (ideals) असत. (१) शरीर, वैद्यकरीत्या धातूंचे औषधी प्रयोग करून निरोगी करणें (२) रुपें व सोनें तयार करणें. या दोन्ही शास्त्रांत 'रस' ऊर्फ पाऱ्याचें विशेष प्राबल्य माहात्म्य असे; व ह्मणूनच या सर्व शास्त्रास मिळून 'रसायनशास्त्र,' ऊर्फ रसशास्त्र ह्मटलेलें आहे. या शास्त्रांवरील ग्रंथांना 'रसतंत्र, रसागम, रसनिगम' वगैरे ह्मटलेलें असतें. रससिद्धांपुढें वर लिहिल्याप्रमाणें जगाचें 'दैन्य' (रोगादिकांमुळें आलेलें) व 'दारिद्र्य' हीं दोन्ही नाहींशीं करावींत, एवढाच प्रश्न होता; त्यानीं आपापल्या मतानें व शक्त्यनुसार या दोन्ही गोष्टींत 'सिद्धि' मिळाविली आहे. ही सिद्धि आपणास कशी मिळाली याचीं त्यांनीं वर्णनें लिहून ठेविलेलीं आहेत; पण ग्रंथांची भाषा पारिभाषिक शब्दांनीं भरलेली असल्यामुळें ग्रंथ गुरुकिल्लीवांचून कळत नाहीं.

पाऱ्याचे (व इतर धातूंचे) देहसिद्धि व लोहसिद्धि याविषयींचे गुण अनुभवून पाहिलेले सिद्ध अद्यापि या भरतभूमीवर आहेत हें कोणासही

त्या त्या मार्गाचा शोध केला असतां कळून येईल. “ या जगांत अशक्य
असें कांहींच नाहीं, योग्य प्रयत्न करणारा मात्र पाहिजे, ” असें या मा-
र्गांतील लोकांचे मत असतें. ‘ जिनने पाया, उनने छपाया ’ अशी दुसरी
एक यांची ह्मण आहे. हिचा अर्थ असा कीं ज्यांना ही विद्या मिळाली
त्यांनीं ती परिभाषेच्या दडपणाखालीं दडवून ठेविलेली आहे. परिभाषेचें
पटल ज्यांना भेदून याग्रंथांत गति मिळवितां येते, त्यानांच ही विद्या
साध्य होते. शिवाय, ही विद्या परंपरेनेंच कळणारी असल्यामुळें ग्रंथांतून
ऐन ठिकाणीं काकचंडीश्वरादिकांनीं तर ‘ या पुढची क्रिया प्रत्यक्ष गुरू
कडूनच समजावून घ्यावी ’ अशा मेखा मारून ठेविलेल्या आहेत.
सारांश, रसशास्त्रांमधील रहस्यें जरी तदितर लोकांना कळण्याचा मार्गच
नाहीं तथापि, साधारणपणें पाऱ्याविषयीं रससिद्धांची माहिती, शोध व
कल्पना काय काय होत्या हें त्यांच्या ग्रंथांतील उघड भागावरून कळून
येणार आहे. सारीं रसशास्त्रें धुंडाळलीं तरी गुरुकिल्लच्या कांहीं पुस्तकांत
नसतात; व त्या पुस्तकांत असणें शक्यही नाहीं, असें मला तरी वाटतें.

पारा व इतर धातू यायोगें केवळ देहसिद्धि व लोहसिद्धि करून
प्रवृत्तिमार्गांतच सुख व संपत्ति भोगीत बसणें हेंच रससिद्धांचें अंतिम
प्राप्य असेल असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे; पण ‘ परोपकार ’
याशिवाय दुसऱ्या कोणत्याही स्वार्थपर हेतूंनीं रससिद्धांनीं या विषयांचा
अभ्यास केला नाहीं. ते स्वतः मोठे विरक्त, ज्ञानी, ईशकृपा पावलेले,
मंत्र व तपोनिष्ठ, पुण्याचे राशी, असे असत; व असें असल्याखेरीज
व वैषयिक भोगांवरून मन उडून अध्यात्ममार्गांत मन लागल्याखेरीज
अशा सिद्धिही पण प्राप्त होत नाहींत. संसारिक तळमळीच्या माणसांस
असे सिद्धही भेटत नाहींत, व अशा विद्याही प्राप्त होत नाहींत. अरण्यांत
नेहमीं फिरत असणाऱ्या सिद्ध पुरुषांची एखाद्या पुण्यवान् व निर्विषय
प्राण्यास क्वचित् गांठ पडते व तो कृतार्थ होऊन जातो. वनांतील चम-
त्कारिक औषधींखेरीज व विशिष्ट तऱ्हेच्या एकांतिक व आध्यात्मिक

आयुक्रमांखेरीज अशा सिद्धि मिळत नाहींत; व पापी माणसांनीं चुकून
जरी असे प्रयोग केले तरी ते सिद्ध होत नाहींत किंवा त्यांचे मल-
तेच परिणाम होतात असेही कित्येकांचे अनुभव आहेत यामुळें रसशास्त्रांत
शिरणाराची

पूर्वतयारी

कशी असावी, व गुरूही कसे असावेत, या विषयींच प्रथम नियम सांगितलेले
असतात. साधारणपणें व्यवहारिक माणसांना या विद्येंत अधिकारच नाहीं
असें सिद्धाचें मत असे. त्यांचीं मतें सविस्तरपणें जरा पाहूं. कोणत्याही
गूढशास्त्रांत (Ewsoteric sciences) सिद्धि मिळण्यास त्या त्या शास्त्राचें
वाङ्मयही कळलें पाहिजे, व त्यांतील रहस्यें जाणणाऱ्या अनुभवी गुरूचाही
सहवास पाहिजे. शास्त्राध्ययन नुसतें उपयोगी पडत नाहीं. त्याचा क्रम
व परस्परसंबंध कळण्यासाठीं त्या शास्त्रांतील रहस्यज्ञ गुरु लागतो. प्रत्येक
शास्त्रांत कांहीं तरी क्रम असतो व तोच जाणून कार्य केल्यास सिद्धि
मिळते:—

न क्रमेण विना शास्त्रं न शास्त्रेण विना क्रमः ॥
शास्त्रं क्रमयुतं ज्ञात्वा यः करोति स सिद्धिभाक् ॥

गुरु कसा असावा ?

आचार्यो ज्ञानवान् दक्षो रसशास्त्रविशारदः ।
मंत्रसिद्धो महावीरो निश्चलः शिववत्सलः ॥ १ ॥
देवीभक्तः सदाधीरो देवतायागतत्परः ।
सर्वाम्नायविशेषज्ञः कुशलो रसकर्मणि ॥ २ ॥
एवं लक्षणसंयुक्तो रसविद्यागुरुर्भवेत् ॥

सर्व विशेषणें स्पष्टच आहेत. गुरु रसशास्त्रांमध्यें निपुण असावा, मंत्रसिद्धी
असावा, शिवपार्वतीचा भक्त असावा, देवतायागतत्पर असावा,: सर्व रस-
ग्रंथांचें विशेष (मर्म) जाणणारा असावा, व रसकर्मांत कुशल असावा.
असाच मनुष्य रसविद्येंत गुरु होऊं शकेल.

शिष्य कसे असावेत ?

गुरुभक्ताः सदाचाराः सत्यवंता दृढव्रताः ।
निरालस्याः स्वधर्मज्ञाः सदाऽऽज्ञापरिपालकाः ॥ १ ॥
दंभमात्सर्यनिर्मुक्ताः कुलाचारेषु दीक्षिताः ।
अत्यंतसाधकाः शांता मंत्राराधनतत्पराः ॥ २ ॥
इत्येवं लक्षणैर्युक्ता शिष्याः स्युः कार्य सिद्धये ॥

यांतील अनेक लक्षणांपैकीं खालील लक्षणें लक्षांत बाळगण्याजोगीं आहेत. ते 'कुळाचारांत दीक्षित' असावेत, अत्यंत यत्नें करून साधक असावेत, मंत्रसिद्धीमध्यें तत्पर असावेत, व इतकेंही करून उतावीळ नसतां शांत असावेत. कुलाचार किंवा कुलमार्ग हा एक तांत्रिक गूढ मार्ग आहे. त्यांतील रहस्यें कळून मनुष्य अध्यात्मांत मंत्रशास्त्रयोगें अधिकारी झाल्याखेरीज, रसादिशास्त्रांतील सिद्धि त्यांस मिळतच नाहींत. सिद्धांचें हें रसशास्त्र अलीकडील Chemis try सारखें नाहीं. आध्यात्मिक योग्यता व अधिकार यांचे आत्म्यावर संस्कार झाल्याखेरीज या सिद्ध मार्गांत शिरतांच मुळीं येत नसे. अशी शिष्यपणाची तयारी नसतां केवळ कसेंतरी करून विद्या चोरून नेऊं म्हणून कोणी गुरूकडे राहिल्यास ती त्यास सिद्ध होत नसे. गुरूंनीं अंतःकरणपूर्वक सांगितल्याशिवाय सिद्धि प्राप्त होत नाहीं. मणि, मंत्र व औषधें हीं गुरुतुष्टीं वाचून चोरून मिळवूं म्हणजे मिळवितां येत नाहींत:—

नास्तिका ये दुराचाराश्चुंबका, गुरुतोऽपरात् ।
विद्यां ग्रहीतुमिच्छंति चौर्यच्छद्मखलोत्सवात् ॥ १ ॥
न तेषां सिद्ध्यते किंचिन्मणिमंत्रौषधादिकम् ।
कुर्वंति यदि मोहेन नाशयंति स्वकं धनम् ॥ २ ॥
इहलोके सुखं नास्ति परलोके तथैव च ॥

गुरूशिवाय रससिद्धि मिळवूं गेल्यास धनाचा मात्र व्यर्थ नाश होतो; पण विद्या कांहीं साधत नाहीं असें स्पष्ट सांगितलेलें आहे. असें असूनही लोक व्यर्थ गुरूशिवाय किमयेच्या नादीं लागून नाश पावतात. प्रत्येक

शास्त्रांत शिरण्याचे मार्ग व अधिकार आहेत; त्या त्या प्रमाणें तिकडे जावें लागतें. गुरूही तसे मिळणें सहसा दुर्लभ असतें; अलीकडे भोंदुच फार झाले आहेत; पण भोंदूमुळें खऱ्या सिद्धांची किंमत कांहीं कमी होत नाहीं. उलटी ती वाढते. गुरूच्या अनुरोधानें व त्यांच्या संतोषानेंच रसविद्या शिष्यानें मिळवावी.

तस्माद्भक्तिबलादेव संतुष्यति यथा गुरुः ॥
तथा शिष्येण संग्राह्या रसविद्याऽऽत्मसिद्धये ॥ १ ॥

रससिद्धि प्राप्त होण्यापूर्वी रसलिंगार्चन, मंत्रसाधन, साहित्य संमेलन वगैरे कसें करावें याचें विस्तृत वर्णन ग्रंथांतून आढळतें. ग्रंथांमधून वर्णन केल्याप्रमाणें साधकानें नित्य अर्चन करावें:—

एवं नित्यार्चनं तन कर्तव्यं रससिद्धये ॥

रसलिंगाचा महिमा.

रससिद्धी पूर्वी रसलिंगार्चनाचा महिमा फार वर्णिलेला आहे. रसलिंगार्चन घडल्याखेरीज, व तत्साधक मंत्रसिद्धी झाल्याखेरीज, रसविद्या साधत नाहीं. रसलिंगाचा महिमा खालील श्लोकांनीं व्यक्त केला आहे:—

लिंगकोटिसहस्रस्य यत्फलं सम्यगर्चनात् ।
तत्फलं कोटिगुणितं रसलिंगार्चनाद्भवेत ॥ १ ॥
ब्रह्महत्यासहस्राणि गोहत्या अयुतानि च ।
तत्क्षणाद्विलयं यांति रसलिंगस्य दर्शनात् ॥ २ ॥
स्पर्शना त्प्राप्यते भुक्तिरिति नित्यं शिवोदितं ॥

* * * *

केदारादीनि लिंगानि पृथिव्यां यानिकानिचित्
तानि दृष्ट्वा तु तत्पुण्यं तत्पुण्यं रसदर्शनात् ॥ १ ॥
काश्यादि सर्व लिंगेभ्यो रसलिंगार्चनं शिवं ।
प्राप्यते येन तल्लिंगं भोगारोग्यामृतप्रदं ॥ २ ॥

अशा प्रकारचे रसलिंग बनविण्यास पारा स्थिर व घट्ट बनवितां आला पाहिजे; तो गुरूशिवाय येणें शक्य नाहीं; ह्मणून प्रारंभींच गुरु लागतो.

गुरूपासून अभिषेकानंतर रसांकुशी विद्या मिळून तिचा एक लक्ष जप झाल्यानंतर रससिद्धांचें स्मरण व पूजा करावीं; ह्मणजे रससिद्धि होते. नाहीं तर होत नाहीं:——

अन्यथा यो विमूढात्मा मंत्रदीक्षाक्रमाद्विना ।
कर्तुमिच्छाति सूतस्य साधनं गुरुवर्जितः ॥
नासौ सिद्धिमवाप्नोति यत्नकोटिशतैरपि ॥
तस्मात्सर्वं प्रयत्नेन शास्त्रोक्तां कारयेत्क्रियी ॥

इतक्या पूर्वतयारीनें गुरूच्या मार्गदर्शनाखालीं रसशास्त्रांत शिरकाव करावयाचा! मग विद्या मिळाल्यानंतर तरी गुप्तच ठेवावयाची! कारण योग्य अधिकाऱ्यांशिवाय इतरांस ती सिद्धच होत नाहीं:——

रसविद्या दृढं गोप्या मातुर्गुह्यमिवध्रुवं ॥
भवेद्वीर्यवती गुप्ता निर्वीर्या च प्रकाशनात् ॥

असो. ही रसशास्त्रीय प्रस्तावना झाली.

प्रकरण २४ वें.

रससिद्धि कां होत नाहीं ?

रसार्णवच्या–आठराव्या पटलांत याविषयीं असें लिहिलें आहे कीं, मनुष्य विधिपूर्वक नीट समजून घेऊन साधन करीत नाहीं; उगाच शास्त्रां- नां मात्र दूषण देतो:–

कथयेत्सर्वजंतूनां न मे सिद्धं रसायनम् ।
मनसा रससिद्धिस्तु तथा क्लेशो मया कृतः ॥
मया कृता द्रव्यहानिर्दुर्धिया मूढचेतसा ।
ईदृशं नैव जानाति विधिहीनं मया कृतं ॥
पापिष्ठो दूषयेच्छास्त्रं आत्मकर्म न विंदति ।
विधिहीनो रसो देवि ! नैव सिद्ध्येत्कदाचन ॥
शास्त्रहीनस्य देवेशि ! नैव सिद्धी रसायने ।
अशुभैः कर्मभिः सद्यः संप्रदायेन सिध्यति ॥

* * * *

यस्य तुष्टः शिवः साक्षात तस्य सिद्धीरसायने ॥

१ ‘ दूषणे ’ इत्यपि ।

शास्त्राला सोडून किंवा शास्त्र नीट रीतीनें न समजून घेतां भलत्या रीतीनें (विधिहीन) प्रयोग केले असतां रससिद्धि मिळत नाहीं. शास्त्रें अध्यनांनीं तरी नीट समजून घ्यावीं किंवा सांप्रदायिक पुरुषांकडून तरी तीं समजून घ्यावींत, ह्मणजे सिद्धि मिळते. शास्त्रें नीट कळून विधिपूर्वक प्रयोग होण्यासाठींच शास्त्राभ्यास, व संप्रदाय (गुरुशिष्यपरंपरा) होत ! ह्मणून शास्त्र सोडून व गुरुविना प्रयोग करूं नयेत. शास्त्रांचें रहस्य नुसत्या अध्ययनानें कळलें तर बरेंच झालें, रसशास्त्रांची परिभाषा वारंवार वाचून प्रथम समजून घ्यावी, त्याशिवाय पुढें सर्व निरुपयोगी आहे ह्मणून सोमदेवानें ‘ परिभाषा ’*प्रकरणांत लिहिलें आहे. रसकर्मे विधि- पूर्वक व निर्मोह होण्यासाठीं ‘ परिभाषा ’ समजणें अत्यंत आवश्यक आहे.

रसनिगममहाब्धेः सोमदेवः समंतात् ।
स्फुटतरपरिभाषानामरत्नानि हृत्वा ॥
व्यरचयदतियत्नात्तरिमां कंठमालं ।
कलयति (तु) भिषगभ्यो मंडनार्थं सभायां ॥

रसशास्त्रावर जें अफाट समुद्राप्रमाणें वाङ्मय पसरलें होतें, त्यांतील परिभाषानामक रत्नें अतिप्रयत्नानें शोधून काढून सोमदेवानें त्यांचीं कंठ- माला बनविली आहे; ती वैद्य कंठगत करोत, असा भावार्थ आहे, हा अध्याय (परिभाषेचा) चोख समजून तोंडपाठ येत असावा असाच सोमदेवाचा आशय होय; ह्मणूनच तो लिहितो.

भवेत्पठितवारोऽयमध्यायो रसवादिनः ।
रसकर्माणि कुर्वाणो न स मुह्यति कुत्रचित ॥

* सोमदेवाच्या ‘ रसेंद्रचूडामणि ’ नामक ग्रंथावरून बहुधा हा रसपरिभाषेचा आठवा अध्याय ‘ रसरत्नसमुच्चयां ’ त घेतला असावा. ‘ रसेंद्रचूडामणि ’ ग्रंथ अ- द्याप मला पाहण्यास मिळाला नाहीं. वर दिलेले उतारे ‘ रसरत्नसमुच्चय ग्रंथांतीलच आहेत. सोमदेवानें अतिशय श्रमानें रसशास्त्राची परिभाषा, यंत्रादिकांचें वर्णन, मुशी, भाते इ. साहित्यांचें वगैरे वर्णन समजाऊन सांगितलें आहे.

परिभाषा कळल्याखेरीज मनुष्याकडून बिनचूक व विधिपूर्वक *रस-कर्म व्हावयाचें नाहीं हें उघड आहे.

⊰ प्रकरण २५ वें. ⊱

सु-गंध-पिष्टसूतेन यदि *शंभुर्विलेपितः ॥
पूर्वजन्मकृतं पापं सद्यो नश्यति देहिनाम् ॥ १-२७ ॥
अभ्रकं त्रुटिमात्रं यो रसस्य परिजा (चा) रयेत् ॥
शतक्रतुफलं तस्य भवेदित्यब्रवीच्छिव ॥ २८ ॥
अभ्रग्रासो हि सूतस्य नैवेद्यं पारि वर्तितं ॥ ३२ ॥
रसध्यानं—सिद्धे रसे करिष्यामि निर्दारिद्र्यगदं जगत् ॥
रसध्यानमिदं प्रोक्तं ब्रह्महत्यादिपापनुत् ॥ ३१ ॥

---

* याच विषयीं रुद्रयामलांतील **गंधककल्पांत** लिहिलेलें आहे कीं विधिहीन व अयथा शास्त्रप्रयोग करीत असतां सिद्धि मिळत नाहीं; कदाचित् केव्हां तरी चुकून मिळते, (तरी ती पुढें टिकत नाहीं; कारण विषय समजलेला नसतो.):—

विधिहीने न सिद्ध्यंति मंत्राराधनमौषधम् ।
कदाचिद्विधिहीनानां काले सिद्धिस्तु जायते ॥

येथें ‘ मंत्राराधन ’ व ‘ औषध ’ हीं दोन्ही विधिहीन केलीं असतां साधत नाहींत असें ह्मटलें आहे. मंत्रसिद्धि पहिल्या पदानें सूचित आहे, व ‘ औषधं ’ या पदानें ‘ रससिद्धि ’ सूचित आहे हें उघड आहे. कारण ग्रंथकार मुख्यत्वेंकरून रस-सिद्धिवरच लिहीत आहे. येथें ‘ औषध सिद्धि ’ हें पद ‘ रससिद्धि ’ या अर्थानें योजिलें आहे, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे, कारण, पतंजलीनें ‘ जन्मौषधिमंत्रतपः समाधिजाः सिद्धयः या सूत्रांत जन्मसिद्धि औषधि ह्म० रससिद्धि मंत्रसिद्धि, तपः सिद्धि, व योगप्राप्य समाधिसिद्धि अशा नाना सिद्धीचा उल्लेख केलेला आहे. या सूत्रावर व्यास व वाचस्पति मिश्रांनीं ‘ औषधि ’ ह्मणजे रसायनसिद्धि ’ असाच अर्थ घेतलेला आहे.

रसो रसेंद्रो सूतश्च पारदो मिश्रकस्तथा ॥
इति पंचविधो जातः क्षेत्रभेदेन *शंभुजः ॥ ६८ ॥
रसो रक्तो विनिर्मुक्तः सर्वदोषै रसायनः ।
संजाताः त्रिदशास्तेन नीरुजा निर्जरामराः ॥ ६९ ॥
रसेंद्रो दोषनिर्मुक्तः श्यावो रूक्षोऽतिनिर्मलः ॥
रसायिनोऽभवंस्तेन नागा मृत्युजरोज्झिताः ॥ ७० ॥
देवैर्नागैश्च तौ कूपौ पूरितौ मृद्भिरश्मभिः ॥
तदाप्रभृति लोकानां तौ जातौ अतिदुर्लभौ ॥ ७१ ॥
ईषत्पीतश्च रूक्षांगो दोषयुक्तश्च सूतकः ॥
दशाष्टसंस्कृतैः सिद्धो देहं लोहं करोति सः ॥ ७२ ॥
अथाग्यकूपजः कोऽपि स चलः श्वेतवर्णवान् ॥
पारदो विविधैर्योगैः सर्वरोगहरः स हि ॥ ७३ ॥
मयूरचंद्रिकच्छायः सरसो मिश्रको मतः ॥
सोऽप्यष्टादशसंस्कारयुक्तश्चातीव सिद्धिदः ॥ ७४ ॥
त्रयः सूतादयः सूताः सर्वसिद्धिकरा अपि ।
निजकर्म विनिर्माणैः शक्तिमंतोऽतिमात्रया ॥ ७५ ॥

यांत पाऱ्याचे रस, रसेंद्र, सूतक, पारद, व मिश्रक असे पांच भेद करून, रस व रसेंद्र तर देव व दानव यांनीं लपवून ठेविल्यामुळें ते मनु-ष्यांस दुर्लभ आहेत असा शेरा मारिला आहे. मनुष्यांकरितां फक्त सूतक, पारद व मिश्रकच तेवढे राहिले. सूतक व मिश्रक हे अठरा संस्कारांनीं देह व लोह सिद्धि देतात असें ह्मटलें आहे. पारद मात्र केवळ रोगहर आहे. शेवटीं ह्मटलें आहे कीं सूत, पारद, व मिश्रक हे पाऱ्यांचे प्रकार जरी सिद्धिप्रद असले तरी आपापलें काम करण्यास ते ‘ अतिमात्रेनें ’ (मृ. वरील दोहोंच्या मानानें) अधिक प्रमाणानें शक्तिमान् होतात. माणसांना विचार करावयाचा तो याच

---

* शंभूपासून पारा निघाला व तो त्याचें वीर्य आहे, तें अग्निमुखीं टाकिलेलें असतां अग्निलाही न सहन होतां, तो पारा बाहेर पडला वगैरे कथा ६८ श्लोकापर्यंत पूर्वीं दिली आहे.

तिन्हींचा होय. त्यांच्या लक्षणांवरून त्यांना ओळखिलें पाहिजे. तीं लक्षणें अशीं:—

सूतकः—थोडासा पिंवळा.रूक्षांग. दोषांनीं युक्त* यावर आठरा संस्कार केले असतां देहसिद्धि व लोहसिद्धि करितो.

पारदः—पांढऱ्या वर्णाचा. चंचल. हा अनेक योगांनीं सर्व रोगांचें हरण करितो.

मिश्रकः—मोराच्या पिसाऱ्यांतील डोळ्यांप्रमाणें याची छाया असते (निळी)* हा देखील आठरा संस्कार झाला असतां अनेक सिद्धि देतो.

वरील सर्व वर्णनांवरून रस, रसेंद्र या गणांमधील व सूतादिक गणांमधील फरक स्पष्टपणें व्यक्त होतो. **रस** हा ‘ रक्त ’ ‘ सर्वदाषैवि-निर्मुक्त ’ व ‘ रसायन ’ (मृआयुर्वर्धक) असतो; तो देवांनीं घेतला.

रसेंद्र हाही ‘ अतिनिर्मल ’ व ‘ दोषनिर्मुक्त ’ असून, श्याव ह्म. उदीरंगाचा (कपिश) असतो. यावरून रस व रसेंद्र हे शुद्ध असून क्रमें करून तांबड्या व उदी रंगाचे असतात हें कळून येईल. असा **शुद्ध** व त्या त्या रंगाचा पारा सध्यां मिळत नसल्यामुळें मानवांनां तो दुर्लभ ह्मणून शेरा आहे. रस व रसेंद्र हे **सर्वदोषनिर्मुक्त** व **शुद्ध** असत; सूतादिक दोषयुक्त असल्यामुळें त्यांस अष्टादशसंस्कारांनीं शुद्ध व सिद्ध करून घ्यावें लागतें. प्रत्येक प्रकारचा पारा रंगावरून ओळखां येतो. **रस** तांबडा, **रसेंद्र** उदीरंगाचा (कपिश), **सूतक** पिंवळा, **पारद** पांढरा व **मिश्रक** निळा असतो. रंगांप्रमाणें व शुद्धतेप्रमाणें जरी वरील वर्गीकरण आहे तरी रसशास्त्रावरील वाङ्मयांत हा फरक किंवा भेद बहुधा पाळण्यांत आलेला नाहीं; किंवा सध्यां उपलब्ध असलेल्या ग्रंथांतून हा भेद लोपला असेल. पूर्व ग्रंथांतून हा भेद असलाच पाहिजे,

---

* हे बारा दोष आहेत. सात कंचुक व पांच इतर दोष,

* अंतः सुनीलो बहिरुज्ज्वलो यः । मध्यान्हसूर्यप्रतीमप्रकाशः ।

नसता तर रसरत्नसमुच्चयकारानें तो उतरून घेतलाही नसता. शिवाय पूर्वींच्या रसग्रंथांत हा भेद पाळला जात असे. यास रसार्णवग्रंथाचें प्रमाण आहे. त्यांत हेच पाऱ्याचे पांच प्रकार दिले आहेत. यावरून सध्यां अनुपलब्ध अशा प्राचीन रसग्रंथांत हें पाऱ्याचें वर्गीकरण होतें हें कळून येईल. हे प्राचीन ग्रंथ अनेक होते; व ते सर्व महत्त्वाचेही होते. अलीकडील ग्रंथांतून हा भेद नष्ट झाला हें उघड आहे.

पुढें रस, रसेंद्र वगैरे नांवेंकां पडलीं हें दिलें आहे:—

रसनात्सर्वधातूनां रस इत्यभिधीयते ॥

सर्व धातूंना विरघळविण्याची शक्ति (Soevent) यांत आहे म्हणून ‘ रस ’ असें म्हणतात. रस हा पारा सर्व धातूंनां विरघळवीत असे.

रसोपरसराजत्वात् रसेंद्र इति कीर्तितः ॥

सर्व रसें व उपरसें यामध्यें हा श्रेष्ठ ह्मणून यास ‘ रसेंद्र ’ ह्मणत.

देहलोहमयीं सिद्धिं सूते सूतस्त्वतः स्मृतः ॥

देहासिद्धि व लोहासिद्धि हा देतो (प्रसवतो) ह्मणून यास ‘ सूत ’ ह्मणतात.

रोगपंकाब्धिमग्नानां पारदानाच्च पारदः ॥

हा रोगरूपी चिखलांत मग्न झालेल्यांना पार करितो ह्मणून यास **पारद** ह्मणतात.

सर्वधातुगतं तेजो मिश्रितं यच्च तिष्ठति ॥
तस्मात्स मिश्रकः प्रोक्तो नानारूपफलप्रदः ॥

सर्व धातूंतील तेज यांत मिश्रित होऊन यांत राहतें ह्मणून ह्यास मिश्रक ह्मणतात; हा नानारूप फळें देतो.

दोषैश्च कंचुकाभिश्च रसराजो नियोजितः ।
तदाप्रभृति सूतोऽसौ नैव सिद्ध्यत्यसंस्कृतः ॥ ८१ ॥

दोष व कंचुका (आवरणें) यांनीं पारा युक्त असल्यामुळें त्यावर (आठरा) संस्कार केल्याशिवाय तो सिद्ध होत नाहीं.

पुढें जलग, (ति) हंसग (ति) मलग, (ति) धूमग, (ति) व जीवगति अशा पांच गति सांगून चार गति दृश्य व पांचवी गति अदृश्य आहे

असें ह्मटलें आहे. ही पांचवी गति ह्मणजे बाष्पीभवन (Vapowr issuiur) असावें. जीव जातांना जसा अदृश्य होतो तसा पारा बाष्प होऊन जातेवेळींही दिसत नाहीं, म्हणून पांचव्या अदृश्य गतीस जीवगति म्हटलें आहे असें वाटतें. 'जलगति' म्हणजे Eiquid state जलरूप स्थिति असावी; कढ-तांना वर बुडबुडे येतात (कण अग्नीनें त्वरित झाल्यामुळें) व ते फिरूं लागतात ती 'हंसगति' होय. 'मलगति' म्हणजे काय हें कळत नाहीं. 'धूमगति' म्हणजे अदृश्य बाष्पीभवन होण्यापूर्वीं दृश्य जी धुरकट वाफ दिसत असते ती स्थिति असावी. असीं शेवटची 'जीवगति' निरुद्ध होऊन पारा अग्नींत टिकल्याखेरीज त्याची सिद्धि होत नाहीं. ही गति कशी रोधिली जाते याविषयीं लिहितात कीं:—

मंत्रध्यानादिना तस्य रुध्यते पंचमी गतिः ॥ ८५ ॥

मंत्र ध्यानादिकांनीं ही गति रोधितां येते, असें लिहिलें आहे.

शेवटीं पारा कसा प्राप्त होतो हें सांगितलें आहे:—

पतितोदरदे देशे गौरवाद्वह्विवक्रतः ॥ ८९ ॥
स रसो भूतले लीनस्तत्तद्देशनिवासिनः ॥
तां मृदं पातनायंत्रे क्षिप्त्वा सूतं हरंति च ॥ ९० ॥

भारतीयांना पारा प्रथम 'दरद' देशांमधूनच मिळाला असें दिसतें म्हणून हिंगूळ व पाऱ्यास ते तिकडचेच समजत. पण डा. गर्दे यांनीं दाख-विल्याप्रमाणें हिमालयाच्या उत्तरेकडील दरद देशांत प्रत्यक्ष पारा व हिंगूळ मिळत नसून तो स्पेन देशांतून इकडे येत असे; पण तो दरद देशामधून येत होता म्हणून इकडील रसवाद्यांनीं त्याचा संबंध दरद देशाशीं जोडिला. कथील बंगाल्यामधून येत होतें, म्हणून त्यास वंग म्हणत; कथील बंगाल्यांत कोठेंच मिळत नाहीं. तेथून येत मात्र असे.

'पारा अग्नीसही असह्य होऊन तो बाहेर पडला' या कथेनें पाऱ्याचा अग्नि सहन न करण्याचा गुणधर्म बोधित होतो. पाण्याप्रमाणें तो बाष्प होऊन उडून जातो. पारा 'अग्निमुख' किंवा 'अग्निस्थिर' करण्याचा भारतीयांचा सारा प्रयत्न आहे. असो.

प्रकरण २६ वें.

रसशास्त्रांविषयींचें कर्तव्य.

सध्याच्या काळीं रसशास्त्रांविषयीं आमच्या लोकांवर एक फार मोठी जबाबदारी आहे. आह्मीं या व असल्या इतर परिभाषिक (टेक्निकल) व शास्त्रीय ग्रंथांविषयीं काय कर्तव्य बजाविलें पाहिजे याची येथें थोडीशी चर्चा करितों.

(१) सर्व रसशास्त्रावरचे स्वतंत्र ग्रंथ एके ठिकाणीं जमविले पाहिजेत; ते भरतखंडाच्या एकाच भागांतून न जमवितां अनेक भागांतून जमविलें पाहिजेत. हे संस्कृतमधीलच असावे, असा निर्बंध नसावा. संकृत, हिंदी, कानडी वगैरे अनेक देशभाषांतूनही रसविद्येवरचे ग्रंथ आहेत ते सारे जमविणें जरूर आहे. भरतखंडांतील नाना भागांतील प्रती जमविण्याचें कारण एवढेंच कीं, वेगळाल्या प्रतींत वेगळाले पाठभेद असतात; व एखाद्या प्रतींतील खऱ्या पाठभेदानें विषयाचा चांगलाच खुलासा होतो.

(२) तांत्रिक वाङ्मयांत रसविद्या पुष्कळ आढळते. सनातनधर्मीय व बौद्ध आणि जैन तंत्रांतूनही ही विद्या आहे. तेव्हां या सर्व तंत्रांतून रसविद्येविषयींचे भाग उद्धृत करून ठेविले पाहिजेत.

(३) स्वतंत्र ग्रंथांच्या निरनिराळ्या प्रती एकमेकांशीं ताडून त्यांचे सर्व पाठभेद नीट काळजीपूर्वक टिपून ठेविले पाहिजेत. ज्या प्रतीवरून जो पाठभेद घेतला असेल, तो तसा तेथें लिहून ठेवावा. स्वतंत्र बुद्धीनें अशा ग्रंथांत शुद्धि करण्याच्या भरीस पडूं नये; कारण स्वीकृत पाठ व्याकरणदृष्ट्या बरोबर असले तरी, विषयाच्या अज्ञात स्वरूपामुळें, विष-यदृष्ट्या चुकलेले असण्याचा संभव असतो.

स्वतःच्या समाधानासाठीं एखादी पाठशुद्धि करावीच असें वाटल्यास '**स्वकपोलकल्पित पाठभेद**' या सदराखालीं ते पाठभेद अगदीं वेगळ

१७

लिहून ठेविले पाहिजेत. कोणत्याही अशुद्ध प्रतींतील पाठभेदापेक्षां स्वक-
पोलकाल्पित पाठभेद, केव्हांही कमी प्रतीचेच होत, यांत काय शंका
आहे ? कारण प्रतीच्या पाठास कांहींतरी परंपरा आहे. चुकलेल्या ग्रं-
थांच्या पाठांत शुद्धि करण्याला एक प्रकारचा अधिकार—त्या शास्त्रांत यावा
लागतो. तो येईपर्यंत पाठभेदांत फरक करूं नये. स्वतःचे पाठभेद
शुद्धीच्या हेतुनेंही कधीं देऊं नयेत. कारण ' गणपती बनवूं इच्छि-
णाऱ्या चिताऱ्याच्या हातून जसें माकड वठलें ' तद्वत् आमच्या पाठभेदानें
येखाद्या वेळीं ग्रंथ विद्रुप व्हावयाचा. याकरितां लेखकानें काळजीनें भिन्न
भिन्न प्रतींतील पाठभेद मात्र उतरून ठेवावे; स्वतःच्या शुद्धि घालूं नयेत.

(४) **ग्रंथांची तुलना व विषय जिज्ञासा**—एका विषयावर निर-
निराळ्या ग्रंथकारांनीं कांहीं लिहिलें असलें ह्मणजे प्रत्येकांच्या ग्रंथांत त्या
विषयाच्या एखाद्या अंगोपांगावर विशेष विवेचन असतें; किंवा एकच प्रयोग
दोन तीन ठिकाणीं आढळतो, त्यावेळीं त्या प्रयोगाची, एकत्र तुलना करून
अधिक खुलासा होतो. एका ग्रंथांत जो विषय अस्पष्ट किंवा अशुद्ध
असतो, तो दुसऱ्यांत स्पष्टपणें व शुद्धरीत्या आढळतो. ग्रंथ तुलनेखेरीज
पारिभाषिक शास्त्रें कधींहि नीट लागावयाचीं नाहींत. विषयजिज्ञासेस या
प्रकारें ग्रंथांचीं व त्यांतील प्रयोगांची तुलना अत्यावश्यक आहे.

(५) अरबी वगैरे ग्रंथकारांच्या ग्रंथांतूनही ही रसविद्या आढळते.
त्यांतीलही सर्व भाग एकत्र करावेत. या सर्वांचा उपयोग भारतीय रस-
विद्येवरील पटल दूर करून तिजवर प्रकाश पाडण्याकडेच करावा. त्याच-
प्रमाणें युरोपखंडांतील मध्ययुगांतील योग्यांनीं रसविद्येवर अनेक ग्रंथ लिहून
ठेविलेले आहेत, तेही मिळवून सर्व रसग्रंथांची व विषयांची तुलना करावी.
अन्यभाषांतील कोणते रसग्रंथ महत्वाचे आहेत, व कोण कोण रससिद्ध
ह्मणून प्रसिद्ध आहेत हें कळण्यासाठीं अलीकडे कांहीं फ्रेंच व इतर विद्वा-
नांनीं 'रसायन शास्त्रांच्या इतिहासावर, विस्तत पुस्तक लिहिलीं आहेत
तीं पहावीं. एवंच, चोहोंकडची प्राचीन जगाची पद्धत एकच असल्या-

मुळें व बहुधा फार प्राचीनकाळापासून ही विद्या अरबी वगैरे लोक इकडू-
नच शिकून गेल्यामुळें त्यांच्या ग्रंथांवरून आपल्या ग्रंथांतील दुर्बोध
स्थळांवर चांगला प्रकाश पडेल.

(६) या प्रकारची तुलना होऊन, काय झालें असतां रससिद्धि
होईल याची बरोबर कल्पना आल्यानंतर मग करावयाच्या प्रयोगांचें एक
स्पष्ट टांचण करून नंतर उद्योगास लागावें. प्रत्येक स्थितीमध्यें काय चिन्हें
होतात हें ग्रंथांतून दिलेलेंच असतें. क्रमानें या प्रकारें खुणा पटत चालल्या
ह्मणजे रससिद्धि होते, यांत शंका नाहीं. अनुभव घेतां घेतां विषय अधिक
चांगला कळत जातो; यास्तव हे रसग्रंथ कळण्यास अनुभवाची अतिशय
जरूरी आहे; पण अनुभवास सुरवात करण्यापूर्वीं याविषयीं साधारण कल्प-
नाही पण यावी लागते, त्याशिवाय आपण अनुभव तरी कसा घेणार ?

प्रकरण २७ वें.

रस प्रकाश सुधाकर.

रसरत्नसमुच्चय कर्त्यानें ज्या यशोधराचा उल्लेख केलेला आहे, त्याचा
हा ग्रंथ आहे. हा यशोधर २७ रससिद्धांपैकीं एक आहे. रसरत्नसमु-
च्चयाचा बराच भाग या ग्रंथानें व्यापलेला आहे. या ग्रंथाचीं अनुक्रमणि-
का प्रारंभींच यशोधरानें याप्रकारें दिलेली आहे:—

प्रथमं पारदोत्पत्तिं कथयामि यथातथम् ।
ततः शोधनकं तस्य तथाष्टादशकर्म च ॥ ५ ॥
चतुर्धा बंधविज्ञानं भस्मत्वं सूतकस्य च ।
धातूनां शोधनं चैव मारणं गुणवर्णनम् ॥ ६ ॥
अष्टौ महारसाः सम्यक् प्रोच्यंतेऽत्र मया खलु ।
तथा चोपरसानां हि गुणाः शोधनमारणम् ॥ ७ ॥
द (द्रु) तिपातश्च सर्वेषां कथयामि सुविस्तरात् ।
रत्नानां गु (ण. दो)...षाश्च ततो मारण शोधनम् ॥ ८ ॥

तिमेलनकं रसे ।
क्रामणं रंजनं चैव द्रु (द) तिमेलनकं रसे ।
रसस्य शतसंख्याका (नू. प्रवक्ष्या) मि सुविस्तरात् ॥ ९ ॥
औषधीनां समाख्याता भेदाश्चत्वार एव च ।
दिव्या रसौषध्यश्च सि (ध्यौषध्य) स्तथापराः ॥ १० ॥
महौषध्य इति प्रोक्ता यंत्राण्यथ पुटानि च ।
मूषाश्चैवं हि धातूनां कौतुकानि समासतः ॥ ११ ॥
वाजीकरणयोगाः स्युः शुक्रस्तंभकराश्च ये ।
नाति विस्तरसंक्षेपात् ग्रंथेऽस्मिन्परिकल्प्यते ॥ १२ ॥

पाऱ्याचे प्रकार सांगून कोणता पारा कोणत्या कामास येतो हें या प्रकारें सांगितलें आहे.—

श्वेतः श्वेतविधानेन कृष्णो देहकरस्तथा ।
पीतवर्णः स्वर्णकर्ता रक्तो रोगविनाशकृत् ॥२० ॥
सर्वानेकीकृतानेव सर्वकार्यकरः सदा ।
सेवितः सर्वरोगघ्नः सर्वासिद्धि विधायकः ॥ २१ ॥

यशोधर हा एक प्रमाणभूत ग्रंथकार होता; यानें ग्रंथावरून ग्रंथ न लिहितां, स्वतः अनुभव घेऊन ग्रंथ लिहिलेला आहे. पुष्कळ ठिकाणीं त्यानें आपण अनुभव घेऊन मग लिहिलें आहे असें ह्मटलें आहेः—

एवं कृते समं चाभ्रं सूतके जीर्यति ध्रुवम् ।
स्वहस्तेन कृतं सम्यक् जारणं न श्रुतं मया ॥ ११६ ॥
हस्तेनोभय योगेन कृतं सम्यक्; श्रुतं नहि ॥ १३३ ॥

अ. पहिला.

अनुभूतं मया किंचित् गुरूणां हि प्रसादतः ।

अ. २–१

या ग्रंथाचे एकंदर १३ अध्याय आहेत. याहून प्राचीनतर असे देवीशास्त्र, नंदी, सुंदरनाथ, नागार्जुन, सोमदेव, भैरव, पूज्यपाद, प्रकाशामृत ग्रंथ इत्यादि ग्रंथ व ग्रंथकार होऊन गेले. ग्रंथकारानें ग्रंथाच्या शेवटीं स्वतः विषयीं थोडीशी माहिती दिलेली आहे.

श्रीनारायणभक्तिसक्तमनसो विद्याविनोदांबुधेः
श्रीगौडान्वयपद्मनाभसुधियस्तस्यात्मजेनाप्ययम् ॥
सद्वैद्येन यशोधरेण कविना विद्वज्जनानंदकृत ।
ग्रंथोऽयं ग्रथितः करोतु सततं सौख्यं सतां चेतसि ॥ १ ॥
देशानां सुरराष्ट्रमुत्तमतमः तत्रापि जीर्णाभिधः ।
प्राकारोऽस्ति स वेदशास्त्रनिरतैर्विप्रैश्च संशोभितः ॥
तस्मिन्विष्णुपदारविंदरतिकृत् श्रीपद्मनाभात्मजः ।
तत्पुत्रेण यशोधरेण कविना ग्रंथः स्वयं निर्मितः ॥ २ ॥
संतोषाय सतां, सुखाय सुरुजां, शिष्यार्थसंसिद्धये ।
वैद्यानामुपजीविनाय विदुषां उद्वेगनाशाय वै ॥
श्रीमद्दुर्गपुरंतनेऽति निपुणः श्रीपद्मनाथात्मजः ।
श्रीमद्भट्टयशोधरेण कविना ग्रंथः स्वयं निर्मितः ॥ ३ ॥

मला मिळालेली प्रत शके १५५२ मधली होती+ असो. या श्लोकांवरून हा यशोधर पद्मनाभाचा पुत्र असून, हे गौडब्राह्मण होते हें कळतें. हे सौराष्ट्रदेशांतील जुनागड येथील राहणारे. यशोधर हा वैद्यकीचा धंदा करीत असे. याची कविता देखील फार गोड व चांगली आहे. ग्रंथ सुलभ व सरळ असून प्रसादयुक्त आहे. यामुळें यास प्रामाणिक ग्रंथकारांत (Standard author) गणिलें असावें. हा ग्रंथ आपण दुर्गपुरातनांत लिहिला असें ह्मटलें आहे. हें दुर्गपुरंतन ह्मणजे जुनागढच दिसतें. जीर्ण प्राकार व दुर्गपुरंतन ह्मणजे एकच; तें जुनागढ याचेंच भाषांतर होय. हा ग्रंथ रसवैद्यक व रसविद्या या दोन्हीं दृष्टींनीं अत्यंत महत्वाचा आहे.

या ग्रंथाची अध्यायानुक्रमणिका देतों ह्मणजे ग्रंथाचें महत्व कळून येईल:—

+ याच ग्रंथाची मुंबईहून शके १७९९ उर्फ संवत् १९३४ मधील एक प्रत मिळाली.

अध्याय	विषय
१	रसोत्पत्तिः ।
२	रसबंधनं ।
३	रसभस्मप्रकाराः ।
४	धातुशोधनमारणं ।
५	महारसवर्णनं ।
६	उपरसवर्णनं ।
७	रत्नानां मारणं द्रुतयश्च ।
८	रोगनाशका विविधा रसाः ।
९	दिव्यौषधिरसौषधिमहौषध्यः ।
१०	यंत्रमूषाकोष्ठी पुटादीनि ।
११	धातूनां कौतुकानि ।
१२	वाजीकरणम् ।
१३	शुक्रस्तंभः ।

प्रकरण २८ वें

भैषज्यसारामृतसंहिता.

या ग्रंथाची प्रत मुंबईहून मिळाली. या संहितेचा कर्ता श्री० मिश्र लक्ष्मीदासाचा पुत्र उपेंद्र होता. यानें ग्रंथाच्या प्रारंभीं प्रस्तावना अशी लिहिली आहे कीं:—

भैषज्येषु रसा वराः सुफलदा मात्राल्पकाः शंभुना ।
निर्दिष्टाः कथयामि तानहमपि प्रायोपदेशं गुरोः ॥
नत्वा शंकरमच्युतं निजगुरून् ग्रंथान्समीक्ष्याग्रजान् ।
रामस्यात्मसुहृत्तमस्य बहुशः स्वस्यानुभूतानपि ॥ १ ॥

भैषज्यं त्रिविधं रसायनमिदं दैवं तथा मानुषं ।
प्रोक्तं यत्स्वरसादिभिर्यदपरं शस्त्रादिकर्मासुरं ॥
श्रेष्ठं तेषु रसायनं वरगुणं यत्प्रत्ययस्तत्क्षणात् ।
तस्मादत्र मयोच्यते सुकृतिना कार्यं समभ्यस्य तत ॥ २ ॥

पहिल्या श्लोकाच्या शेवटच्या चरणावरून, या उपेंद्राचा मित्र कोणी राम नांवाचा होता, व हे दोघे मिळून रसवैद्यकाचा अनुभव घेत होते हें कळून येतें. एकंदरींत ग्रंथांतील प्रयोग व अनेक रसांची क्रिया हीं पाहिलीं असतां ग्रंथ अनुभविक दिसतो, यांत शंका नाहीं.

प्रकरण २९ वें

रसराज सुंदर.

हा ग्रंथ अलीकडच्या काळांत पं. दत्तराम चौबे मु. मथुरा यांनी हिंदी भाषांतरासह, अनेक ग्रंथांवरून संग्रहरूप बनविलेला आहे. तो मुंबईंत ‘ प्रबोधरत्नाकर ’ छापखान्यांत इ. स. १८९४ सालीं छापलेला आहे. याची एकंदर पृष्ठें साडेपांचशेंवर असून किंमत ३।. सवातीन रुपये आहे. प्रस्तावनेंत संग्रहकार दत्तराम चौबे लिहितो कीं :—“ हमारे सब रसके ग्रंथ संकृतमें हैं, और वो मिलतेभी कम है. फिर किसीमें कुछ अधिक और किसीमें कुछ न्यून हैं–फिरभी अशुद्ध है. और उनके पढानेवाले–तथा हस्तक्रिया बतानेवाले बहुत न्यून है. इसवास्ते हमनें इस **रसराज सुंदरका** रचना प्रारंभ करा–इसमें रसरत्नाकर, रसेंद्रचिंतामणि, रसप्रदीप, रसरत्नसमुच्चय, रसमंगल, रसदीपक, रसहृदय, काकचंडीश्वरग्रंथ, रसेंद्रसारसंग्रह, रसेंद्रकोश, तोडरानंद, गोरखसंहिता इत्यादि अनेक २ प्राचीन और नवीन ग्रंथोंमें जो जो विषय अपूर्व और अनुभविक हैं उन सबके संकलन इसमें करागया है. और जो जो विषय हमको प्राचीन वैद्योंसे भाषामात्र उपलब्ध हुयेथे उनसबकों संस्कृत श्लोकबद्ध निर्माण करके इसमें मिलाय दिये गये. और सबको उपयोगी होय इसवास्ते इसकी हिंदी भाषाटिका कर दीयी गई और यथाशक्य उनमें हस्तक्रियाभी लिखी गई है. बहुतसे प्रयोग तो ऐसे हैं कि उनको बिना किसीके सहायताके केवल इसी पुस्तकके देखनेमात्रसेंही आप बनाय सक्ते हो. ”

या प्रस्तावनेवरून हा ग्रंथ–सर्वांची एकच खिचडी अशा स्वरूपाचा कसा बनला आहे हें समजून येईल. पं. दत्ताराम चौबे यांनीं आपणांस मिळालेल्या मूळ ग्रंथांच्या शुद्धाशुद्ध प्रती जशाच्या तशाच–भाषांतरासह स्वतंत्र छापल्या असत्या तर त्या त्या ग्रंथकारांचा विषय विवेचनाचा क्रम तरी कळून आला असता, व त्यांच्या हस्तलिखित प्रतीशीं इतर प्रती ताडून पाहतां आल्या असत्या. आतां त्यांनीं केलेलें हें काम, शास्त्रीय दृष्ट्या पाहतां, पालथ्या घागरीवर पाणीं ओतल्याप्रमाणें झालेलें आहे. कोणत्या ग्रंथांतला कोणता मजकूर आहे, हें कळण्यास साधन नाहीं; शिवाय ग्रंथांतील श्लोक कोणते व यांनीं स्वतः बनवून घातलेले श्लोक कोणते हेंही समजण्यास यांत मार्ग नाहीं. यामुळें या ग्रंथास खिचडी ह्मणावें लागतें. संग्रह या दृष्टीनें व रसपरिभाषा सोडवून, अगदींच अज्ञात अशा या रसशास्त्रीय विषयांचें, भाषांतर–आपापल्या शक्त्यनुसार–शुद्धाशुद्ध–करण्याचा यत्न केलेला आहे ह्मणून–हा ग्रंथ महत्वाचा आहे खरा पण शास्त्रीयदृष्ट्या पाहतां त्यांचे सर्व श्रम व्यर्थ आहेत. या श्रमांनीं कांहींच निष्पन्न झालें नाहीं. त्यांनीं मूळप्रती जशाच्या तशाच–आपल्या भाषांतरांच्या सहित–छापल्या असत्या तर पुढें **शुद्ध प्रती तरी तयार झाल्या असत्या, ग्रंथांतील विषयांचा अनुक्रम कायम राहिला असता व त्यामुळें या शास्त्राच्या अभ्यासांत यथाशास्त्र प्रगति झाली असती.** आतां संग्रहामुळें व विशेषतः पूर्वार्धामुळें हें पुस्तक उपयुक्त नाहीं असें नाहीं; पण या शास्त्राच्या अभ्यासाच्या प्रगतीस त्याचा उपयोग नाहीं. पूर्वखंडाच्या शेवटीं पुनः संग्रहकार लिहितो कीं:–

नाना तंत्रान्वीक्ष्य स्वमतं संयोज्य यत्नतः सुभगं ।
रसराजसुंदरेऽस्मिन् मध्यमखंडस्तु पूर्णतां नीतः ॥

प्रथमखंडाचे यांनीं पूर्वार्ध व उत्तरार्ध केलेले आहेत असो. हा एक संग्रह ग्रंथ ह्मणून बरा आहे.

प्रकरण ३० वें.

रसराजसमुच्चयांतील

काकचंडीश्वरीमत.

मजजवळ एक पोथी मिळालेली आहे तिच्या शेवटीं ' श्रीविश्वनाथपादविरचिते रससर्वस्वे रसराजसमुच्चये काकचंडीश्वरीमतं संपूर्णं ' असें लिहिलेलें आहे. ही पोथी मला तासगांवचे दे. माधव शंकर सोहोनी यांजकडून मिळाली. वरील पदांवरून आपणांस या ग्रंथाविषयीं व ग्रंथकर्त्याविषयीं काय बोध होतो, तें पाहूं. विश्वनाथ पाद हें एखाद्या भिक्षूचें किंवा संन्यास्याचें नांव दिसतें. आतां यांनीं रचिलेल्या ग्रंथाचें नांव रससर्वस्व असावें कीं, रसराजसमुच्चय असावें, हें पाहिलें पाहिजे, एकंदरींत विचार करितां ' रससर्वस्वे ' हें विशेषण असून रसराजसमुच्चय हेंच ग्रंथाचें नांव असावें असें दिसतें. त्यांत ग्रंथकर्त्यानें अनेक प्राचीन रसग्रंथांतील विषयांचें समालोचन केलेलें असल्यामुळें त्यास रससर्वस्व हें विशेषण दिलेले दिसतें. सारांश, विश्वनाथपाद यांनीं एक महत्वाचा रसराजसमुच्चय नांवाचा ग्रंथ लिहिला व त्यांत अनेक प्राचीन ग्रंथांचें व त्यांतील विषयांचें निरिक्षण केलें. अशा ग्रंथांपैकींच ' काकचंडीश्वरीमत ' हा एक ग्रंथ आहे. याचें हें निरीक्षण प्रस्तुतच्या पोथींत आहे. ह्मणजे रसराजसमुच्चयापैकीं, काकचंडीश्वरीमताच्या निरीक्षणाचा भाग मला मिळालेला आहे, हें उघड होतें हा विश्वनाथपादांचा रसराजसमुच्चय ग्रंथ, वाग्भटाच्या रसरत्नसमुच्चयाहून आगदीं भिन्न होय हें वाचकांनीं विसरूं नये. विश्वनाथपादानें ज्या 'काकचंडीश्वरीमता'चें निरीक्षण केलेलें आहे तो मूळग्रंथ ७०० श्लोकांचा असून, तो काकचंडीश्वरानें लिहिलेला आहे. हा ग्रंथ नेपाळदर्बार लायब्रीमध्यें सध्यां उपलब्ध असून प्रो. हॅाय Histry of Hindu Chaneistry यांचे कर्ते–यांस पाहण्यास मिळालेला होता. विश्वनाथपादानीं रसराजसमुच्चयांत,

या प्रस्तावनेवरून हा ग्रंथ–सर्वांची एकच खिचडी अशा स्वरूपाचा कसा बनला आहे हें समजून येईल. पं. दत्ताराम चौबे यांनीं आपणांस मिळालेल्या मूळ ग्रंथांच्या शुद्धाशुद्ध प्रती जशाच्या तशाच–भाषांतरासह स्वतंत्र छापल्या असत्या तर त्या त्या ग्रंथकारांचा विषय विवेचनाचा क्रम तरी कळून आला असता, व त्यांच्या हस्तलिखित प्रतीशीं इतर प्रती ताडून पाहतां आल्या असत्या. आतां त्यांनीं केलेलें हें काम, शास्त्रीय दृष्टचा पाहतां, पालथ्या घागरीवर पाणीं ओतल्याप्रमाणें झालेलें आहे. कोणत्या ग्रंथांतला कोणता मजकूर आहे, हें, कळण्यास साधन नाहीं; शिवाय ग्रंथांतील श्लोक कोणते व यांनीं स्वतः बनवून घातलेले श्लोक कोणते हेंही समजण्यास यांत मार्ग नाहीं. यामुळें या ग्रंथास खिचडी ह्मणावें लागतें. संग्रह या दृष्टीनें व रसपरिभाषा सोडवून, अगदींच अज्ञात अशा या रसशास्त्रीय विषयांचें भाषांतर–आपापल्या शक्त्यनुसार–शुद्धाशुद्ध–करण्याचा यत्न केलेला आहे ह्मणून–हा ग्रंथ महत्वाचा आहे खरा पण शास्त्रीयदृष्टचा पाहतां त्यांचे सर्व श्रम व्यर्थ आहेत. या श्रमांनीं कांहींच निष्पन्न झालें नाहीं. त्यांनीं मूळप्रती जशाच्या तशाच–आपल्या भाषांतरांच्या सहित–छापल्या असत्या तर पुढें **शुद्ध प्रती तरी तयार झाल्या असत्या, ग्रंथांतील विषयांचा अनुक्रम कायम राहिला असता व त्यामुळें या शास्त्राच्या अभ्यासांत यथाशास्त्र प्रगति झाली असती.** आतां संग्रहामुळें व विशेषतः पूर्वार्धामुळें हें पुस्तक उपयुक्त नाहीं असें नाहीं; पण या शास्त्राच्या अभ्यासाच्या प्रगतीस त्याचा उपयोग नाहीं. पूर्वखंडाच्या शेवटीं पुनः संग्रहकार लिहितो कीं:–

नाना तंत्रान्वीक्ष्य स्वमतं संयोज्य यत्नतः सुभगं ।
रसराजसुंदरेऽस्मिन् मध्यमखंडस्तु पूर्णतां नीतः ॥

प्रथमखंडाचे यांनीं पूर्वार्ध व उत्तरार्ध केलेले आहेत असो. हा एक संग्रह ग्रंथ ह्मणून बरा आहे.

प्रकरण ३० वें.

रसराजसमुच्चयांतील

काकचंडीश्वरीमत.

मजजवळ एक पोथी मिळालेली आहे तिच्या शेवटीं ‘ श्रीविश्वनाथ-
पादविरचिते रसर्वस्वे रसराजसमुच्चये काकचंडीश्वरीमतं संपूर्णं ’ असें लि-
हिलेलें आहे. ही पोथी मला तासगांवचे दे. माधव शंकर सोहोनी यांजक-
डून मिळाली. वरील पदांवरून आपणांस या ग्रंथाविषयीं व ग्रंथकर्त्याविषयीं
काय बोध होतो, तें पाहूं. विश्वनाथ पाद हें एखाद्या भिक्षूचें किंवा संन्या-
स्याचें नांव दिसतें. आतां यांनीं रचिलेल्या ग्रंथाचें नांव रससर्वस्व असावें
कीं, रसराजसमुच्चय असावें, हें पाहिलें पाहिजे, एकंदरींत विचार करितां
‘ रससर्वस्वे ’ हें विशेषण असून रसराजसमुच्चय हेंच ग्रंथाचें नांव असावें
असें दिसतें. त्यांत ग्रंथकर्त्यानें अनेक प्राचीन रसग्रंथांतील विषयांचें समा-
लोचन केलेलें असल्यामुळें त्यास रससर्वस्व हें विशेषण दिलेले दिसतें.
सारांश, विश्वनाथपाद यांनीं एक महत्वाचा रसराजसमुच्चय नांवाचा ग्रंथ
लिहिला व त्यांत अनेक प्राचीन ग्रंथांचें व त्यांतील विषयांचें निरिक्षिण केलें.
अशा ग्रंथांपैकींच ‘ काकचंडीश्वरीमत ’ हा एक ग्रंथ आहे. याचें हें निरी-
क्षण प्रस्तुतच्या पोथींत आहे. ह्मणजे रसराजसमुच्चयापैकीं, काकचंडीश्वरी-
मताच्या निरीक्षणाचा भाग मला मिळालेला आहे, हें उघड होतें हा विश्व-
नाथपादांचा रसराजसमुच्चय ग्रंथ, वाग्भटाच्या रसरत्नसमुच्चयाहून आगदीं
भिन्न होय हें वाचकांनीं विसरूं नये. विश्वनाथपादानें ज्या ‘काकचंडीश्वरी-
मता’चें निरीक्षण केलेलें आहे तो मूळग्रंथ ७०० श्लोकांचा असून, तो
काकचंडीश्वरानें लिहिलेला आहे. हा ग्रंथ नेपाळदर्बार लायब्रीमध्यें सध्यां
उपलब्ध असून प्रो. हॅाय Histry of Hindu Chaneistry यांचे
कर्ते–यांस पाहण्यास मिळालेला होता. विश्वनाथपादानीं रसराजसमुच्चयांत,

काकचंडीश्वरीमताखेरीज इतर अनेक ग्रंथकार व ग्रंथ यांचे उल्लेख केलेले आहेत. ते पुढें दिलेले आहेत. असो.

प्रथम प्रस्तावनेंत, काकचंडेश्वरी नामक भैरवी देवी भैरवास प्रश्न करिते असें दर्शविलेलें आहे. भैरवीच्या प्रश्नांला भैरव उत्तर देतो कीं:—

योऽसौ आत्मा परो नित्यश्चानादिनिधनेश्वरः।
स्वरूपनिर्गुणाभ्यां च सर्वव्यापी निरामयः॥
अनादिकर्मसंबंधी कायस्थो भवति सदा।
जीवोपाधिमयं कम अज्ञाने संप्रवर्तते॥
तस्मात्कर्मप्रसंगेन संसारं सेवतेऽत्यसौ।
करोति विविधं कर्म संसारे काममोहितः॥
द्रव्योपायं न जानाति कामभोगेन हेतुना।
कृषिवाणिज्यसेवा च रसविक्रयकारकाः॥
वहंति काष्ठभारं च तृणभारं त्वनेकधा।
कायक्लेशार्दितः कर्म द्रव्यार्थे कुरुते सदा॥
भ्राम्यमाणा नरा ये च द्रव्यार्ताः कामचिंतकाः॥
जायंते मृत्युलोके तु दारिद्र्यहतचेतसः।
भवंति बधिरांधाश्च पंगुलाः कुब्जखंजकाः॥
महा संसारबंधे च त्रिगुणेन च संयुताः॥
कुर्वंति साहसं कर्म अज्ञानात् द्रव्यहेतुना।
अटंति घोरे संसारे अलातघटका इव॥

अशी स्थिति असतां जीवांच्या कल्याणासाठीं खालील उपायांचें मूल ज्ञान सांग असें भैरवीं ह्मणते:—

कथयस्व महादेव ! कायबोधप्रसाधनं।
अर्थः संपाद्यते येन न क्लेशात्परमेश्वर॥
तदहं श्रोतुमिच्छामि कथयस्व प्रसादतः।
पादुकासाधनं चैव दिव्यस्त्रीकामसाधनं॥
अदृश्यमंजनं चैव गुटिका खेचरी तथा।
साधकानां हितं देव ! भूचराकाशगामिनां॥

जलौका बंधमित्याद्युर्धातुवादं रसायनं।
जारणं मारणं चैव द्रावणं चाभ्रकस्य तु॥
तस्योपायं च देवेश ब्रूहि मे त्रिपुरांतक।
रसकर्म तथा देव सारभूतं वदस्व मे।

वरील प्रश्नांवरून वरील सर्व विषय मूळच्या काकचंडीश्वरीमतांत होते असें वाटते. सध्याच्या विश्वनाथपादाच्या अवलोकनांत बरेच यांतील विषय आलेले आहेत. काकचंडीदेवीनें प्रश्न करून माहिती सांगितली ह्मणून यास काकचंडीश्वरीमत असें नांव पडलें, कीं काकचंडीश्वर नांवाच्या सिद्धानें एक ग्रंथ लिहिला ह्मणून त्यास हें नांव पडलें हें मूळग्रंथ पाहिल्याशिवाय सांगणें कठिण दिसतें. वरील भैरवीचे प्रश्न ऐकून भैरव ह्मणतात:—

न द्रव्येण विनासिद्धि न भोगः काममेव च।
द्रव्यहीना नरा लोके प्रेतरूपेण संस्थिताः॥
अटंति मृत्युलोके च परोपद्रवकारकाः।
श्वानवज्जीवितं तेषां जीवतोऽपि हि मृताहिते॥
कालसंभोगरूपेण पांडित्यज्ञासंयुताः।
द्रव्यहीना न शोभंत्ये; प्राणहीना यथा तनूः॥
तस्माच्च साधयेद्देवि ! रसेंद्रं साधकेश्वरं।
तं देवि कथयाम्यद्य साधकानां हितं प्रिये॥
जारणं मारण देवि द्रव्यसाधनमुत्तमं।
रसानां जायते सिद्धिः कामार्थ भोगसाधनं॥

एवढी प्रस्तावना झाल्यानंतर कांहीं रससाधनाचे प्रयोग यांत दिलेले आहेत. कांहीं प्रयोग महत्वाचे असल्यामुळें व त्याच्या हस्तलिखित प्रती सर्वांसच मिळणें कठिण असल्यामुळें, ते येथें उतरून घेतों:—

वज्रदंडं सुदंडं च लोहदंडं तथैव च।
औषधत्रमेतच्च रसस्य मरणे हितम्॥ १॥
वज्रदंडो यथा वज्रं, लोहदंडो वटस्य च।
सुदंडो ब्रह्मदंडस्तु समासात्परिकीर्तिताः॥ २॥

संग्राह्यैतान्समासेन साधको हृष्टचेतसा ।
तद्रसं रससंयुक्तं एकीकृत्य विमर्दयेत् ॥ ३ ॥
अंधमूषागतं बध्वा रसस्तु म्रियते क्षणात् ।
मूषां च लेपयेत्तेन पुरा गृह्य महौषधीः ॥
अधोमूषां धमेद्यस्तु रसबंधेऽप्ययं विधिः ॥

*　　　*　　　*

अपूर्वमौषधं त्रीणि ग्राहयेद्देवि साधकः ॥
मूषां च लेपयेत्तेन धातुकर्म समारभेत् ।
रसेंद्रो म्रियते सम्यक् कुरु कर्म यथेप्सितं ॥
तारकर्ता भवत्येव कृपकर्ता शृणु प्रिये ।
कृत्वा लोहमयं पात्रं तस्योर्ध्वे कांतजं शुभं ॥
अन्योन्यं पृष्ठलग्नं तु कारयेत्साधकोत्तमः ।
अधोयंत्रेण संधार्य आयसं तत्र जारयेत ॥
सम्यक् खल्वोदरे दत्वा जार्यते नात्र संशयः ॥
षड्गुणं आयसं तत्र हेम चाष्टगुणं भवेत् ।
क्षीरवृक्षं तथाजारि खंजनोदर विग्रहं (?) ॥
ग्राहयेच्च रसस्तेषां आयस्तत्र जार्यते ।
जारयेन्नाच संदेहो यथा हृष्टा यथा स्त्रियः ॥
ततो ग्राह्यो रसो जीर्णः सर्व संवेधयेतत्तः ।
हेमैव जायते तत्र धर्मकार्यार्थ साधनं ॥ इति चतुर्थः पटलः ।

‘ इति चतुर्थः पटलः ’ हे शब्द मुळच्या काकचंडीश्वरीमत नामक तंत्रांतले, त्यांतील विभागदर्शक असावेत. पुढें तिसरा एक प्रयोग सांगितलेला आहे:—

रसेंद्रजारकः प्राज्ञे ! दंडत्रयसुमर्दितः ।
हेम तारं तथाभ्रं च वज्रं कांतं नथायसं ॥
एकीकृत्य रसानां च जारणे पूर्ववद्विधिः ।
लोह एव हि लोहश्च जायते पुरुषेश्वरिः ।
वज्रमेवहि वज्राभ्रं द्रावयति परस्परं ।
रसोपरसलोहानि जारयेत्तु समं यदि ॥
जारितं तु रसं दग्ध्वा गुटिकां कारयेत्ततः ॥

मूषागर्भोदरे धृत्वा धामयेत्खदिरानले ।
गुटिका जायते तेन महाभोगप्रदायिनी ॥

पुढें या गुटिकेचे महत्व सांगितलेलें आहे. नंतर दुसरी एक गुटिका सांगितलेली आहे तिची कृति अशी:——

अथाश्वक्रांतिमादाय वज्रं वैक्रांतकं कचिम् ।
गगनं तारसंयुक्तं त्रिलोहं च महारसं ॥
त्रिदंडेन मर्दयित्वा अम्लवर्गप्लुतं कुरु ॥
जार्यते चितयं भूयो तप्तखल्वोदरे क्षिपेत् ॥
जारितं समभागेन लोहवत्कारयेत् प्रिये ।
वज्रमूषाघृतं तत्तु गुटिका कारयेत्तथा ॥
त्रैलोक्यसुंदरी नाम्ना ततो देवसमो भवेत् ॥

पुढें अनेक प्रयोग आहेत. त्या सर्वांचे उतारे येथें देणें शक्य नाहीं. या ग्रंथांत, काकचंडीश्वरीमत, नित्यनाथाचे रसरत्नाकर, नागार्जुन, वैद्यविनोद वगैरेंचा उल्लेख आहे.

प्रकरण ३१ वें.

भैरवसिद्धि कल्प.

याची एक हस्तालिखित प्रत बडोद्याचे रा. विनायक सदासिव जांबेकर यांजकडून पाहण्यास मिळाली. याचे एकंदर २८५ श्लोक आहेत. यांपैकीं सुमारें १९० श्लोक नवीन असून त्यापुढचे सर्व श्लोक रसार्णवांतून उतरून घेतलेले दिसले सुमारें १५० श्लोकांपुढच्या श्लोकांत अनेक रस-बंधक औषधींचा संग्रह आहे; हा रसार्णवांतूनच घेतलेला आहे. पहिले १५० श्लोक मात्र दुसरीकडे अनुपलब्ध व अतएव नवीन आहेत. प्रस्तावना संपल्यानंतर ग्रंथकार ह्मणतात:——

गोपनीयं प्रयत्नेन कर्तव्यः संग्रहः श्रियः ॥ ३६ ॥
कुर्यात्प्रारंभकाले तु औषधिनां, रसायनं ।
शिवशक्त्योश्च संयोगो रसनिष्पत्तिकारतः ॥ ३९ ॥
हरितालो महादेवी श्वेतांगः शंकरः स्मृतः ॥

यांत शिवशक्तींचा संयोग कसा करावा हें दिलेलें आहे. त्यांतील कित्येक वनस्पतींची ओळख होत नाहीं. रसविद्येविषयीं एकेठांई ह्मटलेलें आहे कीं:—

इमां रसवतीं विद्यां ये न जानंति वै नराः ॥
तेषां रुष्टो महादेवोः कथं कर्मफलं भवेत् ॥ ९७ ॥
यस्य तुष्टो महादेवो भैरवो भयनाशनः ॥
दयार्द्रहृदयो हृष्टो तेषां धातुः पदेपदे ॥ १०३ ॥
शंभुः सर्वत्र नो तुष्टो; गुणी सर्वत्र नो जनः ॥
कुत्रचित्तुषितो देवः तस्यासिद्धिः प्रजायते ॥ १०५ ॥

शेवटीं ग्रंथकर्त्यानें भैरवसिद्धिकल्प कसा लिहिला हें सांगून, पुढें रसार्णवांतील रसबंध औषधीं विषयींचा मजकूर उतरून घेतलेला आहेः—

चतुःषष्टिरसैकाग्रं विद्या प्राप्ता रसायनी ।
तन्मध्ये सारमुद्धृत्य मया प्राप्ता हि भूपते ॥ १४५ ॥

या श्लोकाचा पूर्वार्ध स्पष्ट होत नाहीं; ६४ रसशास्त्रें होतीं असें समजावें कीं काय ? त्यांचें सार ग्रंथकर्त्यानें सांगितलें.

प्रकरण ३२ वें.

स्वर्ण तंत्र.

याची एक हस्तलिखित प्रत मला बडोद्याचे रा. विनायक सदाशिव

जांबेकर यांजकडून मिळाली. हें स्वर्णतंत्र शंकरानें परशुरामास सांगितलेलें आहे असें वर्णन आहे. प्रारंभीं प्रस्तावना अशी आहेः-

राम उवाच ॥ यस्याः साधनमात्रेण स्वर्णतुल्यो नरो भवेत् ॥
तां सिद्धिं वद मे देव ! यदि त्वं भक्तवत्सलः ॥ २ ॥
पूर्वं तु कथितं देव ! रत्नतंत्रं त्वया मम ॥
गुटिकाः कथिताः पूर्वं सहस्राद्धितयं शिव ॥ ३ ॥
पारदाः कथिताः पूर्वं षट्शतं मृत्तिरूपकाः ॥
धातूनामष्टकल्पस्तु पूर्वमेव प्रकाशितः ॥ ४ ॥
रत्नानां करणं तंत्रं पूर्वमेव प्रकाशितं ।
किं तु स्वर्णाख्यतंत्रं तु मम त्वं कथय प्रभो ॥ ५ ॥
कश्यपेन महेशान ! भर्त्सितोऽस्मि महेश्वर ।
भूमिदानं मयादत्तं ऋषये कश्यपाय वै ॥ ६ ॥
कश्यपेन तदा प्रोक्तं भूमिभागं त्यज प्रभो ।
स्थानार्थं तु महेशान ! रक्ताब्धिः[1] प्रार्थितो मया ॥ ७ ॥
बाहुमात्रं स्थलं तेन दत्तं मम महेश्वर ॥
स्थानं प्राप्तं महेशान ! भक्षणं मम नास्ति वै ॥ ८ ॥
भक्षणं देहि मे देव ! यदि पुत्रोऽस्मि शंकर !
शंकर उवाच-शृणु राम ! प्रवक्ष्यामि रहस्यातिरहस्यकं ॥ ९ ॥
स्वर्णतंत्राभिधं तंत्रं कल्परूपेण कथ्यते ॥

पुढें तैलकंदादिकांचे कल्प दिलेले आहेत. वरील उताऱ्यांत रत्नतंत्र, गुटिकाकल्प, पारदकल्प व धातुकल्प यांचा उल्लेख आलेला आहे. रत्नतंत्र व गुटिकाकल्प कोठें ऐकूनही माहीत नाहींत. पारदकल्प व धातुकल्प मात्र उपलब्ध आहेत. पारदकल्पाविषयीं मागें लिहिलेलेंच आहे. धातुकल्प पाहावयाचा आहे. तो मिळतो हें मात्र खरें. या सुवर्णतंत्रांत अनेक वनस्पतींचे कल्प आहेत. ते येथें देत बसल्यास फार विस्तार होईल असो.

---

१ ह्याच सध्याचा Red sea तांबडा समुद्र असेल काय ? Caspian sea हा काश्यपी समुद्र दिसतो. काश्यप व परशुरामाचा Red sea जवळ गांठ पडली असेल.

वैद्यभास्करोदय

ह्याची प्रत वरील बडोद्याच्या गृहस्थांकडूनच मिळाली, हा धन्वंतरीनें केलेला आहे. असें यांत ह्मटलेलें आहे. यांत हारितालकल्प, हिंगुलकल्प, मनशिळ कल्प, व विषकल्प या प्रमाणें चार परिच्छेद आहेत. यांत ९० श्लोक एकंदरींत आहेत. हा ग्रंथ या चार कल्पांनींच संपला कीं पुढें ही होता हें कांहीं समजत नाहीं.

भैरवसिद्धिकल्प, स्वर्णतंत्र व वैद्यभास्करोदय हे तिन्हीं लहान लहान ग्रंथ रसविद्येच्या दृष्टीनें महत्वाचे आहेत. स्वर्णतंत्रांत एकंदर १९ वेगळाल्या वनस्पतींचे कल्प असून एकंदर २२५ श्लोक आहेत. स्वर्णतंत्र तेवढ्यालाच संपलें असें दिसत नाहीं, कारण स्वर्णतंत्रांत जे प्रयोग आहेत म्हणून मीं ऐकत होतों त्यांपैकीं बरेच यांत आढळून आले, पण कांहीं आढळले नाहींत. यावरून कांहीं भाग अझून मिळाला नाहीं असें दिसतें. पुढील शोधकांस तो मिळविण्यास बरें पडावें म्हणून मला मिळालेल्या स्वर्णतंत्रांतलि कल्पांचीं नांवें देऊन ठेवितों. या माझ्या कल्पांत मुख्य कोरफडीचा कल्पच नाहीं. तो स्वर्णतंत्रांत आहे ह्मणून प्रसिद्ध आहे. स्वर्णतंत्रांतील कल्पः—– १ तैलकंद, २ कटुकूष्मांड, ३ कटु ऋद्धिवल्ली, ४ कटुतुंबी (कडु भोंपळा), ५ सिद्धवल्ली (श्वेतगिरिकर्णी), ६ श्वेत गोक्षुर, ७ श्वेतस्कैरंड, ८ काकतुंडी (काकारी), ९ वेंगरी, १० दग्धरोहा, ११ श्वेतबृहती (पांढरी रिंगणी). १२ कांटे शिरीष, १३ कांटे पळस, १४ पळसवेल १५ रिंगणीवेल (वल्लीत्रिपिरा), १६ श्वेतनिशा (पांढरी हळद), १७ नखशिखणी (ब्रह्मांडभेदिनी), १८ लोहद्रावादि पांच फळांचा कल्प, १९ त्रिधारा वज्रवली (तिधारी कांडवेल). इतक्यांचे कल्प आहेत. असो. राहिलेले कल्प पुढील मंडळींस मिळतील अशी आशा आहे.

प्रकरण. ३४ वें.

धातु कल्प.

गंधककल्प, पारदकल्प व रसार्णवकल्प यांप्रमाणेंच धातुकल्प हाही एक रुद्रयामल तंत्राचा भागच आहे. यांत स्वर्णादिसप्त धातूंचें निरूपण असून त्याविषयीं फारच उत्तम माहिती आहे. रुद्रयामलापैकीं खालील तीन कल्प मिळून इतकी ग्रंथसंख्या आहे.

गंधककल्प	....	१४३६
पारदकल्प	....	३५५०
धातुकल्प	....	१६८०
		६६६६

धातुकल्पासच कोणीं धातुक्रिया, धातुमंजरी, ऊर्फ सप्तधातुनिरूपण असें म्हणतात यांत एकंदर १६८० श्लोक आहेत. यांत गंधककल्प, पारदकल्प, तैलकल्प वगैरे कल्पांचा वारंवार उल्लेख येतो. हा ग्रंथ रस सिद्धि व रसायन सिद्धि या दोन्ही दृष्टीनीं अत्यंत महत्वाचा आहे एकंदरीत रुद्रयामलपैकीं सुमारें साडेसहाहजार ग्रंथ आमच्या हातीं लागलेला आहे, हें तरी सुदैवच समजलें पाहिजे.

प्रकरण ३५ वें.

पाश्चात्यांतील रसविद्या.

नंबर. १

भारतीय रसायनशास्त्राचा अभ्यास करीत असतां कित्येक स्थळीं असें

आढळून आले कीं पाश्चात्यांतील प्राचीन रसविद्या व आपल्याकडील रसविद्या यांत बरेंच साम्य असून, बहुधा आपल्या देशांतूनच ही रसविद्या तिकडे गेली असावी? असें मानण्यास उत्तम कारणें दिसूं लागलीं। यामुळें पाश्चात्य रसग्रंथ वाचण्याची उत्कंठा उत्पन्न झाली व त्याप्रमाणें पाश्चात्य रसग्रंथा पैकीं काहीं वाचीत आहे.

बेनिडिक्टस फिग्युलस.

हा कवि, ग्रंथकार, तत्ववेत्ता, वैद्य व जर्मनींतील युटेन होफेन येथील संन्यासी होता. यास रसविद्येचाही बराच नाद असे; पण यास ही विद्या साधली होती कीं नाहीं हें नीट कळून येत नाहीं. हा फक्त साधक होता; यास सिद्ध पदवी मिळाली नव्हती असें दिसतें. हा प्रसिद्ध पाश्चात्य रससिद्ध थियोप्रास्टस पॉरासेल्ससस् याचा मोठा चहाता असून त्याचा अनुयायी होता; यानें त्याचे ग्रंथ मिळवुन प्रसिद्ध करण्याची खटपट केली. यानें रसविद्येवरील, आपल्या पूर्वींचीं अनेक पुस्तके मिळवून एक, The Golden and Blessed casket of Napire's marvels. या नांवाचें पुस्तक लिहिलेलें आहे; त्याचें आतां इंग्रजी भाषांतर झालेलें आहे. हा सिद्ध नसल्यामुळें याची वाणी अधिकारयुक्त नाही. यानें स्वतंत्र ग्रंथ न लिहितां फक्त प्राचीन ग्रंथांचें संपादन, टीका वगैरे मात्र केलेल्या आहेत. याच्या इतर ग्रंथांचीं नावें अशीं:—

(2) The Heavenly Tripartite Golden Treasury.
(3) The New Olympic and blessed Rosary.
(4) Hortulus Olympicus Aureolus.
(5) The Golden Hermetic Paradise.

याशिवाय त्याचें आणखी कांहीं ग्रंथ आहेत; पण ते तितके महत्वाचे नाहींत. हे ग्रंथ जर्मनींत बहुतेक इ. स. १६०८ च्या सुमारास वरील ग्रंथकारानें प्रसिद्ध केले.

रसविद्या साधण्यास दीक्षाच लागते असें काहीं नाहीं, असें मानणारां
पैकीं हा ग्रंथकार होता. पाश्चात्यांतही दीक्षाहीन व सदीक्ष असे दोन
पंथ असत. यास दीक्षेची गरज वाटत नव्हती; पण यास सिद्धदशा प्राप्त
झाली होती असें दिसत नाहीं.

There is no conclusive reason for supposing that Figulus had attained to the Great mystery of adeptship.

इंग्रजींत रससिद्धांना adepts म्हणत असून सिद्धदशेस adeptship
म्हणतात. ह्यास सिद्धि मिळाली नसली तरी ती लवकरच मिळेल अशी
आशा मात्र असलेली दिसून येते. कारण त्यानें ग्रंथ प्रकाशनाचे कामीं
आपणांस मदत करणारांस, रससिद्ध झाल्यावर. बक्षीस देण्याचें वचन
दिलेले आहे.

ॲलेक्झांडर व्हान सचेटन.

याचे कांहीं लेख वरील लेखकानें आपल्या पुस्तकांत प्रसिद्ध केलेले
आहेत; त्यांवरून ॲलेक्झांडर हा ‘ रससिद्ध ’ होता असें कळून येतें
याचा व बर्नहार्डस रससिद्धाचा ॲलेक्झांडरच्या साधकदशेंत संवाद झालेला
आहे; तोही वरील पुस्तकांत आहे (1) The Novum Lumen che-
micum (The New Light of Alchemy) या प्रसिद्ध रसग्रंथाचें
इंग्रजी भाषांतर आतां The Hermtiec nuseum नांवाच्या ग्रंथसंग्रहांत
छापलेले काहे. हा ग्रंथ पाश्चात्य रसविद्येवरील अत्यंत महत्वाचा असून
तो ॲलेक्झांडर सेटन या रससिद्धानेंच लिहिलेला होता. हा ग्रंथ रसविद्ये
वरील पाश्चात्य ग्रंथांत अत्यंत स्पष्ट व उघड आहे; शिवाय त्यांत प्रतिभा
संपन्नताहीं आहे. या ग्रंथाच्या कर्त्याला रसविद्येसाठीं, भारतीय नागा
र्जुना प्रमाणेंच, बळी पडावे लागलें ! एलेक्टर ऑफ सॉक्सनीनें त्याचा
नाना तऱ्हेनें छळ केला:—He was pierced with pointed iron
scorched with molten lead, burnt by fire, beaten with

rods, racked from head to foot, and wasted by solitary confinement, *rather than betray his Secret.*" शेवटीं, यानें प्राण दिला, पण रसविद्येचे गुह्य कांहीं प्रगट केलें नाही ! हाल सहन केले ! पण बोलला नाही ! नागार्जुनाला शालिवाहनाच्या मुलांपासून असाच मृत्यु प्राप्त झाला ! (मागें पृष्ठ ८३ पहा.)

हा ॲलेक्झांडर सेटन स्कॉचमन असून, रसविद्येच्या सिद्धीनंतर त्यानीं अनेक गुप्तनांवानीं दिवस काढले; शेवटीं त्याचा मृत्यु वर लिहिल्याप्रमाणें १६०४ सालीं झाला. वरील ग्रंथाचा कर्ता **ॲलेक्झांडर सेनट** व Golden Casket मध्यें ज्याचे लेख आलेले आहेत तोॲलेक्झांडर व्हान सचटेन— हे एकच असावेत असें कित्येक लोक ह्मणत असत. पण हा दुसरा ग्रंथकार जर्मन लेखक होता हें आतां नक्कीं ठरलेले आहे; बासल येथें हा इ० स० १५७३ च्या सुमारास आपले लेख प्रासिद्ध करीत असे; तेव्हां पहिल्या ॲ० सेटनचा उदयही झाला नव्हता. Golden casket (सोनेरी टोपली) मधील सचटेनच्या लेखां खेरीज त्यानीं खालील लेख लिहील्याची प्रासिद्धि आहेः—

(1) mystery of Antimony (Latin)
(2) The same (German)
(3) TheBook of the secret of Antimony (Latin)
(4) Clavis Alchimie. (German)

या ॲलेक्झांडर व्हॉन सचटेन नांवाच्या जर्मन रससिद्धाचा गुरु **थियो फ्रास्टस पॉरासेलसस** हा प्रसिद्ध पुरुष होता.

Golden Casket च्या प्रस्तावनेंत बेनि डिक्टस फिग्युलस यानें स्वतः ची हकीकत दिलेली आहे. त्यास इ. स. १५८८ च्या सुमारास (Hermetic philosophy) रसविद्येचा नाद लागला! व तेव्हांपासून त्यास रससिद्ध बनण्याची हाव होती! या सुमारास त्यानें थियो फ्रास्टस पॉरासेलसस, रोजर बेकन व एम. आयूझॅक् इत्यादिकांचे ग्रंथ वाचले! वरील रसग्रंथ वाचून आपल्या मनाची काय स्थिति झाली हें त्यांनीं याप्रमाणें वर्णिलेले आहेः—

"In them, I in medicine, Saw and Found a little Foundation, and yet understood it not at first. But I took such a liking to the subject that I resolved not to die noen yet to take my ease until I had obtained the Universal Stone and Blessed Heavency mepicine."

रसग्रंथ वाचून वैद्यकीला रसभस्माचा चांगलाच उपयोग होईल असें त्यास वाटून त्यानें निश्चय केला की, **ती चीज मिळविल्याखेरीज मरावयाचें नाहीं, कीं विश्रांति घ्यावयाची नाहीं !!!** शाबास धन्य पाश्चात्य शोधकहो ! तुमच्या या चिकाटीमुळें व दृढनिष्ठमुळेंच देव तुम्हांस यश देतो ! पुढें गरीबीमुळें सर्वस्वीं रसविद्येसच त्यास जरी वाहून घेतां आलें नाहीं, तरी त्यास त्याबद्दल इतकी तळमळ लागून राहिली होतीकीं, त्यास त्यामुळें कित्येक महिनेपर्यंत झोंप कशी ती आली नाहीं ! निदिध्यास ह्मणतात तो यासच ! I was so eager for it that for many months, I counld ot sleep on account of it. शेवटीं १५९० च्या सुमारास हा अगदीं अजारी पडून मरतां मरतां वांचला ! व पुढें गरीबीमुळें त्यानें व्यापार आरंभिला. पण हें सर्वस्वी त्याच्या मनाविरुद्ध होतें पण नाइलाजास्तव हें त्यास उदरभरणार्थ पत्करावें लागलें. शेवटीं इ.स.१६०४ सुमारापासून तो पुनः रसविद्याध्ययनादाकडे लागला व आपणांस थियो फ्रास्टस पॉरासेलसस याचा शिष्य ह्मणवूं लागला ! यानंतर बे. फिग्युलस हा रसविद्येवरील ग्रंथ जमवून ते आपल्या प्रस्तावनांसह प्रसिद्ध करूं लागला !

याप्रमाणें आज १।२ प्राश्चात्य रसवेत्त्यांबद्दल मिळालेली हकीकत दिलेली आहे. ती एवढ्याच करितां कीं, कोणत्याही शास्त्रांत पूर्ण गती मिळण्यास मनुष्यास किती तन्मय व्हावें लागतें हें आपल्या मंडळींनां कळावें ! आपल्याकडे नागार्जुनाला साधक दशेंत तपेंचीं तपें घालवावीं लागलीं; तर बे. फिग्युलसला १९।२० वर्षें झालीं तरी कांहीं हातीं लागलें नाहीं। शिवाय जरी हातीं लागलें, तरी ॲलेंझांडर सेटन

सरखे आपले हाल होणार कीं काय! अशी ही भीति साधकाचे मनांत उत्पन्न होण्याचा संभव आहे! काहीं दिवसापूर्वी एका गांवीं रसविद्येच्या नादानें काहीं जयांनीं एका बैराग्यास दगडानीं ठेंचून मारल्याची गोष्ठी ऐकिवांत आहे! ह्मणूनच आमच्या शास्त्रकारांनीं ह्मटलेलें आहे कीं:—

रसविद्या परागुह्या मातुर्गुह्य पिवस्वयं । तशीती गुप्तच ठेवली पाहीजे

❀ पाश्चात्यांतिल रसविद्या ❀

नंबर २.

बेनिडिक्टस फिग्युलसची ओळख आह्मीं वाचकांस वर करून दिलेली-च आहे. त्यानें अपल्या प्रस्तावनेंत पाश्चात्य रसविद्येच्या प्रारंभाविषयीं दिलेली माहिती येथें देऊन ठेवितोः—

रसविद्येला पाश्चात्यांत हर्मेटिक फिलॉसोफी असें ह्मणतात. या हर्मेटिक फिलॅसॉफीमध्यें रसविद्येशिवाय, ज्येतिष व तंत्रशास्त्र (Magic) यांचाही अंतर्भाव होतो. ते ही विद्या आडम ❋ (Adam) यास माहीत होती व तेथूनच ती निघाली असें मानतात. पाश्चात्य लोक अडमला पाहिला किमयागार अगर रससिद्ध समजतात. आडम पासून परंपरेनें ही विद्या चालत आली होती. पुढे अब्राहाम तुबलकेयम या लोहारानें आपल्या बरोबर ईजिप्तमधून इतर विद्यांबरोबर हीही विद्या कानॉनभूमींत (आशिया मैनरमध्यें) आणिली ! ईजिप्तच्या लोकांनां या विद्येंत फारच प्राविण्य मिळालेलें असून त्यांनीं ही विद्या मग इतर राष्ट्रांना (अर्थात् पाश्चात्य) शिकविली.

खाल्डीयन, हेब्रू, पार्शी व ईजिप्ती लोकांना या रसविद्येचें ज्ञान होतें. मोसेसला या विद्येचे ईजिप्तच्या लोकांपासून ज्ञान झालें व ह्मणूनच देवानें

❋ ह्याच आपल्या र. र. स. तील 'आडमो' 'आदिमो' 'वगैरे असल काय ?' ईजिप्तचे लोक हे मूळचे भारतीयच होत याबद्दल Modern Review 1910 चे अंक पहा.

त्यास इस्त्राएलच्या लोकांचा पुढारी नेमिलें. डानिएलनें ही विद्या खाल्डी लोकांपासून संपादन केली! magi (मग) हे लोक रसविद्येंत प्रवीणहोते. सुमारें इ. पू. १६८० मध्यें खाल्डी, ईजिप्त व पार्शी यांच्या या विद्येचें ज्ञान मिळविण्यासाठीं कांहीं ग्रीक लोक गेले. नंतर खाल्डी व ईजिप्ती लोकांपासून थोडेसें शिकल्याबरोबर तें इतके उन्मत्त झाले कीं त्यांनीं मग एक वेगळेंच तत्वज्ञान व वेगळाच पंथ काढिला ? हें त्यांचें नवें तत्वज्ञात ग्रीकांपासून लॅटिनांत पसरलें व त्यामार्फत सर्व युरोपभर पसरलें. या नव्या तत्वज्ञानामुळें रसविद्येवरचें लोकांचें लक्ष उडालें व ती विद्या आतां पाश्चात्य खोटी मानीत आहेत.

भारतीय रसवेत्यांप्रमाणेंच पाश्चात्यांची देखील अशींच समजूत आहे कीं. रसविद्या एखाद्यास प्राप्त होणें व काया अमर होणें हें परमेश्वराच्या कृपा प्रसादाशिवाय होणें नाहीं! (It is the office of the Holy spirit to in struct men in things eternal. त्यांचे मत असें आहे कीं सर्व देशांत रससिद्ध होऊन गेले व त्यांच्या खिस्ती ग्रंथांवरून नवा नवा प्रकाश पडतो. (rach fresh country is a new leaf in the Book of Nahire) रसविद्येच्या ज्ञानांत ख्रिस्तेतर असा भेद परमेश्वरानें ठेविलेला नाहीं, असें बे. फिग्युलस याचें मत आहे. मोंदूनीं लिहिलेले बरेच ग्रंथ उपलब्ध असले तरी, अस्सल रसविद्येवरचें ग्रंथ ख्रिस्ती व ख्रिस्तेतर या दोघांतही आहेत, असें तो मानतो. Both Heathens and Christians have left us true writings whic godelss coso phists and pseudosophists, have for the most part, either wholly kept back or altered. अस्सल रससिद्धांचे ग्रंथांत फरक केलेले आहेत व कांहीं तर सपशेल बुडवूनच टाकिले आहेत. अशी जरी स्थिति असली, तरी. रसविद्यारूप देवतेचाच शेवटीं जय होईल, असें फिग्युलस मानतो. (Yet the Goddess will fully triumph at last,)

जगांतील 'परमरहस्या' बद्दल हर्मीसचें जें Book of Revealation आहे, त्याच्यावर पाश्चात्य रससिद्ध थियोफ्रास्टस पॅरासेलसस् यांनीं प्रकाश पाडलेला आहे. हर्मीस, प्लेटो, आरिस्टॉटल वगैरे तत्ववेत्त्यांनीं पिंडधारण व शरीराचें अजरामरत्व यांसाठीं प्रयत्न केला, व त्यांनीं (One Thing) एक वस्तु अशी निर्माण केली कीं जी बरेच दिवसपर्यंत मनुष्यांचें पिंड धारण होऊं देईल. ही एक वस्तु तारुण्य आणिते, व पोट्रीअर्कांप्रमाणें आयुष्य वाढवूं शकते. या वस्तुला Fifth Substan किंवा Quintessence 'पांचवें सत्व' ह्मणतात; कारण पाश्चात्यांत फक्त चारमहाभूतांनींच हें जग उत्पन्न झालेलें आहे असें मानतात. चार महाभूतां पलीकडची ही वस्तु ह्मणून, तीस 'पंचम सत्व' ह्मटलेलें आहे. हें सत्व 'स्थिरस्वभाव' (Indestructible essence) असून, कृतीनें बनविता येतें. आरिस्टॉटलला हें माहीत होतें. यालाच Spiritual Essence ह्मणतात; हें सत्व आडम (Adam) ला परमेश्वरानें सांगितलें अशी पाश्चात्यांची समजूत आहे. संन्यासी, हर्मीस व अरिस्टॉल यासच Truth without Lies 'अढळ सत्य' ह्मणतात. यासच 'परमरहस्य' ऊर्फ 'रहस्यातिरहस्यक' The Secret of all secrets असें ह्मणतात. याविषयीं मॉरिएनस नांवाचा सिद्ध लिहितो कीं:—

He who has this has all things, and wants no other aid and for in it are all temporal happiness, bodily health earthly fortune. It quickly heals all Diseases and destroys Poverty and misery.

यालाच Spirit of Truth ह्मटलेलें असून, हें पंचम सत्व जगाला परमेश्वराच्या कृपेशिवाय कळणार नाहीं. असें म्हटलेलें आहे. The world cannot comprehend it without the interposition of the Holy Ghost. It is sought by many and found by few. पुष्कळ लोक याच्या मागें असतात, पण थोड्याच भाग्यवंतानां हें मिळतें। (केषां चित्पुण्यकृतामुन्मीलति चिन्मयं ज्योति ।) याच पंचम सत्वाच्या

योगानें आडम (Adam) आणि इतर पेट्रियार्कस (प्रजापति) हें पुष्कळ दिवस जगले व मोठ्या श्रीमंतीत राहिले !

जेव्हां तत्ववेत्त्यांना हें 'पंचम तत्व' कळलें तेव्हां त्यांनी ही विद्या गुप्त, सांकेतिक भाषेंत लिहून ठेविली. (They straightway concealed it under a strange tongue and in parables, lest the same should become known to to the unworthy and the pearls be cast before swine.) याचा हेतु असा कीं फक्त योग्य पुरुषांनांच तेवढी ही विद्या मिळावी; व भलत्या लोकांच्या हातीं ती जाऊन पडूं नये. या पंचमतत्वाचें वर्णन थियोफ्रास्टसनें असें केलेलें आहे:—

This essence also reveals all treasures in earth and sea, converts all metallic bodies into gold and there is no thing like unto it under Heaven.

वेगळाल्या स्थितींत हें 'ईशतेज' ऊर्फ 'पंचमसत्व' असतांना, त्याला काय काय नांवें असतात हें थियोफ्रास्टसनें दिलेलें आहे:—

This spirit in its fiery form is called a Sandaraca, in the aerial a Kybrick, in the watery an Azoth, in the earthly Alcohoph and Aliocosoph.

या ईशतेजाला अग्निस्थिर स्थितींत Sandaraca ह्मणतात, असें थियो. ह्मणतो. Sandaraca हा. सिद्धरस होय. या व खालील शब्दांवरून रसविद्येची परिभाषा देखील आमचीच तिकडें अपभ्रष्ट रूपानें वापरण्यांत येत आहे. Kybrick हें कदाचित क्षारबद्ध असूं शकेल. Azoth या नांवाच्या विषयीं बराच लांबलचक इतिहास आहे. याच्या इतिहासावरून भारतीयांच्या विद्या पाश्चात्यांत कोणत्यामार्गानें पसरल्या हें कळुन येतें. Azoth हा पाश्चात्य किमयागारांच्या पारदाला शब्द आहे. हा शब्द अरबींतील az-zaing(अझ् झॉग), az-al (the), व zang from Persian ziwah (झिवः), quicksilver. पारशीभाषेंतील हा झिवः शब्द संस्कृतमधील 'जीव' हाच आहे. पारदाला संस्कृतमध्यें 'जिव' ह्मणतात. मृतांश्च जीवयेज्जीवान् तेन जीवः स्मृतश्च सः' जीव, झिव, अझझोन्ह, अझोट

अशीं याची रूपांतरें होत गेली. या नांवावरूनही रसविद्येचा उगम कोठून झाला हें बरोबर कळेल, Alcohoph Aliosocosoph हीं नांवें जरा विशेष अपभ्रष्ट दिसतात. तथापि पाहिला शब्द **आरोटक आलोटक** हाच असें मला वाटतें. संस्कृत ग्रंथांमधून पारदाचे २५ बंध सांगितलेले आहेत. त्यापैकीं कशाचींतरीं हीं अपभ्रष्ट रूपं आहेत, पण 'सिद्धरस' व 'जीव' यांबद्दल तर शंकाच नको.

हीं वेगळाली नांवें असली तरी हीं तत्वें कांहीं वेगळीं नाहींत असें थियोफ्रा० बजावतो. याला त्यानें Spirit of good ह्मटलेलें आहे? हें आमच्याकडचें 'ईशतेज' होय.

ही रसविद्या मोझेस सोलोमन, इझ्रा, मेरियम, अब्रहम, आयझाक, जेकेब या प्राचीन काळच्या, बैबलमधील व्यक्तींना माहित होती असें थियोफ्रास्टस ह्मणतो. ही रसविद्या अनधिकाऱ्यानें सांगणारें देवाचे गुन्हेगार होत असें तो लिहितो, The discoverers of the mystery of this thing to the unworthy are breakers of the seal of heavenly Revelation; many seek it but few find it. Hence the impure and those living in vice are unworthy of it."

Fifth Essence किंवा Spiritul medicine ह्म. रसभस्म यासारखें जगांत दुसरें औषध नाहीं असें पाश्चात्य सिद्ध वैद्यांचें मत आहे: In the whole world there is no better medicine than this. यालाच Philosopher's Stone किंवा Powder ह्मणतात; हेंच आपलेकडील 'रसभस्म' होय यालाच 'सिद्धरस' ही ह्मणतात.

ऑपॉलो यास इ. पू. १९१५च्या सुमारास हीविद्या माहीत होती, असे बर्नहार्डस याचें मत आहे. याच्यानंतर सुमारें ३९००वर्षांनी फिलीप थियो फ्रास्टस बंबास्ट हा जर्मन रससिद्ध होएनहिम येथें निर्माण झाला याला monarch of medicine ह्मणतात. नोवाच्या वेळेपासून थिओफ्रास्टस पारासेलसच्या वेळेपर्यंत कोणांस असाध्य रोगाचें खरें कारण कळलें नाहीं असें बर्नहार्डस याचें मत आहे. " Since Noah's time no one has

understood the causes of so called incurable diseases, but Paracelsus alone.

रसविद्येला पाश्चिमात्य रसग्रंथांत The Art of water असें ह्मटलेलें आहे. प्राचिन मॉजी magi लोकांनीं आपले ग्रंथ गुप्त भाषेंत लिहीले होते; व ते ग्रंथ कळेनासे झाले, तेव्हां ही रसविद्या बहुत कालपर्यंत पश्चात्य देशांत बुडाली होती. मगांचीं पुस्तकें (magical books तांत्रिक ग्रंथ) ज्यू, टर्क तार्तार, खिस्ती वगैरे लोकांकडे अद्यापि तुरळकपणें मिळतात. मगलोकांनीं लिहिलेले वैद्यकी ग्रंथही हरवले! याचें कारण ते दुर्बोध होते

हार्मिस किंवा मर्क्युरीयस ट्रिसमाजिस्टस (Thrice Great) हा एक ईजिप्तदेशांतील राजा व पुरोहित होता. त्यापासून पाश्चात्य देशांत ही रसविद्या प्राचीन काळीं पसरली; यामुळें या विद्येस (हर्मेटिकल आर्ट) हर्मिसची विद्या असें ह्मणतात. तथापी एक्झोडस नंतर मोझेसनें जे लेख मागे ठेविले असतील त्यां वरून हर्मिसला रसविद्येचें ज्ञान झालें असावें, असें ॲलेक्झांडर व्हॉन सचटन हा लेखक ह्मणतो.

बर्नहार्डस नांवाचा पाश्चात्य रससिद्ध हिंदुस्थानांत येउन रसविद्या शिकून गेल्याचा उल्लेख Golden casket of Nature's marvels स्पष्टपणें आहे:– Bernhardus has travelled yet farther (than Cyprus), say ing that he fetched his man viz. the chosen jewel, the golden book *from India* (p. 250).

पाश्चात्य रससिद्ध थियो फ्रास्टस ह्यानें पारद व हिंगुळ कोठे कोठें चांगला मिळतो हें लिहिलेलें आहे. त्याचें मतें, हिंगुळ हंगरीदेशाचा चांगला, 'पारद' आस्ट्रिया देशचा चांगला, व 'सिद्धरस' सायप्रस Cyprus मधील चांगला! रसरूपांत असो किंवा पिंडरूपांतर (हिंगुळरूपांत) असो वरील ठिकाणांहूनच पारा आणणें चांगलें, असें त्याचें मत आहे. " Whether liquid or coalgulated form, it is best to obtain mercury from the above-named places, by reason of its beautiful

red colour. वरील देशांत तांबडा पारद * मिळतो असें यावरून दिसते, जर्मनी देशांत जरी हा पदार्थ मिळतो तरी तो वरील देशांतल्या इतका चांगला नसतो. थिऑफ्रास्टस चें असें मत आहे कीं जर्मनीदेशांत 'सिद्धरसही' आयताच मिळतो. इस्ट्रिया ! कांडिया, हंगेरी व स्पेन येथील पारा व हिंगुळ चांगला असें पाश्चात्यांचें मत आहे. पाश्चात्य रसविद्येंत ज्यारणादि संस्कारांना खालील शब्द आहेत:—

जारणा	Coction; Digestion; Fermentation.
सारणा	Incorporation.
क्रामणा	Ingression.
वेध	Projection
रंजन	Tinging; coluring.

पारद व हिंगुळ हे पदार्थ मूळ इकडचे नव्हेत असें कित्येकांचें मत असल्यामुळें, ही रसविद्याही परदेशची इकडे आलेली असावी असें त्यांचें मत आहे; पण हिंदुस्थानांत अद्यापि पारा मिळत असल्याबद्दल आम्हीं पाश्चात्य शोधकांचीच एक साक्ष दुसरीकडे दिलेली आहे. शिवाय, जशी हिंदुस्थानांत, तशीच इतर देशांतही ही विद्या माहीत असल्याबद्दल वाचस्पतिमिश्रयानें आपल्या योगभाष्यावरील टीकेंत म्हटलें आहे.

कैवल्यपादांतील पहिलें सूत्र जें " जन्मौषधि तपः समाधिजाः सिद्धयः॥ यांतील औषधि शब्दावर व्यासाची टीका अशी आहे.

औषधिभिः असुरभवनेषु रसायनेनेति । यावर वाचस्पतिमिश्राची अशी टीका आहे:—

औषधिसिद्धिमाह असुरभवनेष्विति । मनुष्यो हि कुतश्चिन्निमित्तादसुरभवनमुपसंप्राप्तः कमनीयाभिरसुर कन्याभिः उपनीतं रसायनमुपयुज्य अजरामरणत्वमन्याश्चसिद्धीरासादयति ।इहैव वा रसायनो पयोगेन। यथा मांडव्यो

* तांबड्या पाऱ्याविषयीं, भारतीय रसायनशास्त्र, पृष्ठ १२५।१२६ पहा. तेथें 'रस' हा तांबडा असतो असें म्हटलेलें आहे.

मुनिः रसोपयोगाद्विंध्यवासी इति पातंजलदर्शन कलकत्ताप्रत, पृ. १८० अजरामरणत्वादि सिद्धिबद्ध ऊर्फ सिद्धरसानेंच प्राप्त होतात हा आर्य पाश्चात्य सिद्धांचा सिद्धांत आहे.

बद्धो रसश्च मुक्तो विधिना सिद्धिप्रदो भवति । वाचस्पतिमिश्रानें प्रथम असुरामध्यें रसविद्या आहे हें सांगून, नंतर असुरांतच कशास पाहिजे, येथेही मांडव्यादिक मुनि रसायनाच्या उपयोगानें सिद्ध झाले, हें सांगितलें आहे.

प्राचीनकाळीं मग, असुर, खाल्डी, व आगुप्त (ईजिप्त) वगैरे देशांत रसविद्या प्रसिद्ध असल्या बद्दल वर पाश्चात्यांची माहिती आलेलीच आहे. वाचस्पातिमिश्र व व्यास यांनीं असुरभवनांत ह्म. असुरियामध्यें रससिद्धीनें लोक सिद्धिपावतात असें लिहिलें आहे. व्यासानें भागवतांतही स्कंध पांचवा, अ. २५ मध्यें रसरसायनांपासून व विशेषेंकरून हाटकरसानें असुर व असुरकन्या सिद्धि मिळवितात व नाना उपभोग भोगतात असें लिहिलें आहे; पहा:—

न वा एतेषु (बिलस्वर्गेषु) वसतां दिव्यौषधिरसरसायनान्न पानस्नानादिभिः आधयो व्याधयो वलीपलितजरादयश्च देहवैवर्ण्य दौर्गंध्यस्वेदक्लमग्लानिरिति वयोवस्थाश्च भवंति । यस्य मयस्य च मुखादुदपद्यंत स्वैरिण्यः कामिन्यः पुंश्चल्य इति । या वैबिलायनं प्रविष्टं पुरुषं रसेन हाटकाख्येन साधयित्वा स्वविलासावलोकनानुरागस्मितसंलापोपगूहनादिभिः स्वैरं किल रमयंति, यस्मिन्उपयुक्त, पुरुषः ईश्वरोहं सिद्धोहं इतित्युतिमहागजबलमात्मानमभिमन्यमानः कथ्यते मदांध इव + ॥ १६ ॥ ततोऽधस्ताद्वितले हरो भगवान्हाटकेश्वरः स्वपार्षदभूतगणावृतः प्रजापतिसर्गोपबृंहणाय भवो भवान्या सह मिथुनीभूत आस्ते यतः प्रवृत्ता सरित्प्रवरा हाटकी नाम

+ भगवंतांचा, भगवद्गीतेंत खालील वाक्यांत अशा विषयलंपट आसुरीरस रससिद्धां वरच कटाक्ष आहे असें वाटते ईश्वरोहं अहं भोगी सिद्धोहं बलवान सुखी ॥ १४ ॥ आढयोऽभिजनवानस्मि । कोन्यो । ऽस्ति सदृशोमम ॥ यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहितः ॥ १५ ॥—

भवयौंवीर्येण यत्र चित्रभानुः मातरिश्वना समिध्यमानः ओजसा पिबति, तन्निष्ठ्यूतं हाटकाख्य सुवर्ण भूषणेन असुरेंद्रावरोधेषु पुरुषाः सह पुरुषीभीर्धारयंति ॥ १७ ॥

या भागवतांतील उताऱ्यावरून व्यासास असुर लोकांत रसायनसिद्धि असल्याचें माहीत होतें हें कळून. वरील सर्व हकीकतींवरून पाहतां प्राचीनकाळीं हर्मीस ट्रिसमॉजिस्टस् या ईजेप्त (आगुप्त) देशाच्या राजापासून प्राचीन हिब्रू, असुरी, खाल्डी, मग वगैरे लोकांत ही रसविद्या पसरली असें दिसून येतें. प्राचीन आगुप्ती लोक ह्मणजे भारतीयच होत असें अनेक प्रकारें दाखविण्याचा Modern Review च्या १९१० सालच्या अंकांत एका. शोधकानें यत्नकेलेला आहे. तसें नसलें तरी, स्वतंत्रपणें असुरादिकांच्या भवनांत रससिद्धि असल्याचें व्यासास व श्रीकृष्णास माहीत होतें रामयणकालीन व्यक्तींला पारा व पारदविद्या इकडे माहीत होती. पाश्चात्यांच्या रसविद्येतील परिभाषा वगैरे पाहिलीतर प्राचीन-काळीं ही भरतखंडांतूनच ही विद्या बाहेरदेशीं गेली असें म्हणावें लागतें.

अर्वाचीन काळीं मात्र भरतखंडांतून पारसी, आरबी वगैरे लोक ही विद्या शिकून त्यांच्या मार्फत ग्रीक व लॅटिनांच्या योगें सर्व युरोपखंडभर निवडक लोकांतही विद्या पसरली. पाश्चात्य व पौरस्त्य दोन्हीं दशांतून ही विद्या गुप्तच असे व आहे याप्रकारें बहुधा प्राचीन काळीं एकद

अनेकचित्तभ्रांता मोहजालसमावृता. ।
प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरकेऽशुचौ ॥ १६ ॥

अध्याय १६

हें भगवंताचें वर्णन आसुरी रससिद्धांनां अक्षरशः लागू पडते. हे असुरी लोक 'काम भोगांत कसे असक्त' असत हें वरील उताऱ्यांवरून कळून येईलच.

१ रसोऽहमप्सु याचा अर्थ देखील सकल प्रवाही पदार्थांत मी पारा आहे असाच असावा ! रामायणकर्ता वाल्मिकी यानें ३१८ ठिकाणीं 'रस' शब्द पाऱ्याच्या अर्थी आणिला आहे. तो कृष्णांस माहिती नसणे अशक्य ?

व ४००।५०० वर्षांपूर्वीं एकदा असें दोन वेळां भारतखंडांतून रसविद्येचा ओघ पाश्चात्य देशांत वाहत गेलेला आहे. या ग्रंथांतच बर्नहार्डस रससिद्धानें आपली तहान भागवून घेतल्याचा स्पष्टउल्लेख आम्हीं दिलेलाच आहे. असो.

याप्रकारें एके काळीं भारतवर्ष हें या रसविद्येचें माहेरघर होतें.

प्रकरण ३६ वें.

रसेश्वरदर्शन.

माधवाचार्यांच्या सर्वदर्शनसंग्रहामधील नववें प्रकरण म्हणजे रसे-श्वरदर्शन' होय. माधवाचार्यांच्या वेळीं (सुमारें १३५०) भरतखंडांत प्राचीन म्हणून कोणकोणते रसग्रंथकार समजले जात असत, याची माहिती समजण्यासाठीं मीं खालीं रसेश्वरदर्शनाचें भाषांतर देतों. त्यांत उतारे तसेंच ठेविले असून त्यांचेंही भाषांतर केलेलें आहे.

"दुसरे माहेश्वर परमेश्वरतादात्म्य (करून घ्यावें असें) म्हणत असतांही, पिंडस्थैर्य नसतां सर्वांना आवडणारी जीवन्मुक्तीस खंड पडेल असें समजून, पिंडस्थैर्याचा उपाय, पारदादि पदांनीं जाणला जाणारा रसच आहे असें सांगतात. संसार सागराच्या परतीराला नेऊन पोंच-वितो म्हणून रसाला पारद म्हणतात; याविषयीं म्हटलेलें आहे कीं:—

* संसारस्य परं पारं दत्ते ऽसौ पारदः स्मृतः

अर्थ—संसारांतून पलीकडे नेऊन पोंचवितो म्हणून यास पारद म्हणतात रसार्णवांत देखील म्हटलें आहे कीं:-

---

* हा श्लोकार्ध माधवाचार्यांनीं, नित्यनाथांच्या रसरत्नाकर वादिखंड, प्रथमो-पदेशांतील (श्लो.५) घेतलेला आहे.

पारदो गदितो यस्मात् परार्थं साधकोत्तमैः ।
सुप्तोऽयं मत्समो देवि. मम प्रत्यंगसंभवः ॥
मम देहरसोयस्माद्रसस्तेनायमुच्यते ॥

प्रकारांतरांनीं जीवन्मुक्तीची युक्ति लभ्य असतांही शाब्दिक युक्ति काहीं बरोबर नाहीं असें कोणीं म्हटल्यास तें योग्य नव्हे; कारण सहाही दर्शनांमध्यें देहपातानंतरच मुक्ति सांगितलेली असल्यामुळें, त्यावर विश्वास न उत्पन्न होतां, संशय घेण्याची प्रवृत्ति नष्ट होत नाहीं. याविषयींही तेथेंच (रसार्णवांत) लिहिलेलें आहे:—

षड्दर्शनेऽपि मुक्तिस्तु दर्शिता पिंडपातने ।
करामलकवत्सापि प्रत्यक्षा नोपलभ्यते ।
तस्मात्तं रक्षयेत्पिंडं रसैश्चैव रसायनैः ।

(अर्थः—सहाही दर्शनांमधून पिंडपातनानंतर मुक्ति दाखविलेली आहे; हातावरील आंवळ्याप्रमाणें ती प्रत्यक्ष मिळत नाहीं. ह्मणून हें (तें) शरीर रस व रसायनें यांनीं राखुन ठेवावें.)

गोविंदभगवत्पादाचार्यांनीं देखील (ह्मटलें आहे कीं:—)

इति धनशरीर भोगान् मत्वाऽनित्यान् सदैव यतनीयम् ।
मुक्तौ; साच ज्ञानात; तच्चाऽभ्यासात; सच स्थिरे देहे ॥

(अर्थः—याप्रकारें धन, शरीर व भोग हे अनित्य मानून नेहमी मुक्तीविषयीं प्रयत्न करावा, ती मुक्ती ज्ञानानें प्राप्त होते. ज्ञान अभ्यासानें मिळतें व अभ्यास देह स्थिर असतां घडतो.)

क्षणभंगुर ह्मणून दिसून येत असलेल्या शरीराला नित्यत्व कसें येईल असें वाटत असेल तर तसें वाटूं देऊं नकोस. सहा कोशांचें हें शरीर जरी अनित्य आहे, तरी रस व अभ्रक या पदांनीं सांगितल्या जाणाऱ्या हरगौरीसृष्टीनें उत्पन्न झालेलें (शरीर) नित्य होतें असा प्रत्यय येतो. (रसाभ्रकपदाभिलप्य हरगौरीसृष्टिजातस्य (शरीरस्य) नित्यत्वोपपत्तेः)

तसेंच रसहृदयांत (ह्मटलें आहे कीं):—

ये चात्यक्तशरीरा हरगौरीसृष्टिजां तनुं प्राप्ताः ।
वंद्यास्ते रससिद्धा मंत्रगणः किंकरो येषां ॥

(अर्थः-ज्या रससिद्धांनीं, हरगौरीसृष्टीपासून उत्पन्न झालेलें शरीर मिळाल्यामुळें, तें (शरीर) टाकून दिलेलें नाहीं, व ज्यांचे मंत्रगण केवळ दास आहेत, असे रससिद्ध वंद्य होत.)

तस्माज्जीवन्मुक्तिं समीहमानेन योगिना प्रथमं
दिव्या तनुर्विधेया ....।

(अर्थ—म्हणून जीवन्मुक्ति मिळवावी अशी इच्छा असणाऱ्या योग्यानें प्रथम आपलें शरीर दिव्य करावें.)

हरगौरीसृष्टिसंयोगजनितत्व (शरीराला जें सांगितलें) तें रस, हरज म्हणून व अभ्रक, गौरीसंभव म्हणून प्रसिद्ध असल्यामुळें तें (शरीर) तदात्मक असावें असें सांगितलें आहे:—

अभ्रकस्तव बीजं तु मम बीजं तु पारदः ।
अनयोर्मेलनं देवि! मृत्युदारिद्र्यनाशनं ॥

(अर्थः—हे देवि ! अभ्रक तुझें बीज व पारा माझें बीज आहे, यांच्या संयोगानें मृत्यु व दारिद्र्य यांचा नाश होतो.)

हें फार थोडें सांगितलें आहे. देव, दैत्य, मुनि व मानव इत्यादिकांमध्यें पुष्कळच लोक रससामर्थ्यानें दिव्य देह प्राप्त करून घेऊन जीवन्मुक्ति पावले असें रसेश्वरसिद्धांतावरून कळून येतें:—

देवाः केचिन्महेशाद्याः दैत्याः काव्यपुरःसराः ।
मुनयो वालखिल्याद्याः नृपाः सोमेश्वरादयः ॥
गोविंदभगवत्पादाचार्यो गोविंदनायकः ।
चर्पटिः कपिलो व्याडी कापालिः कंदलायनः ॥
एतेऽन्ये बहवः सिद्धाः जीवन्मुक्ताश्चरंतिहि ।
तनुं रसमयीं आप्य तदात्मककथाचणाः ॥

(अर्थः-कित्येक महेशादि देव, शुक्राचार्य ज्यांचे पुरोहित होते असे दैत्य, वालखिल्यादि मुनि व सोमेश्वरादि राजे, गोविंदभगवत्पादाचार्य; गोविंदनायक, चर्पटि, कपिल, व्याडी, कापालि, कंदलायन हे व इतर

अनेक सिद्ध जीवन्मुक्त होऊन व रसमय शरीर बनवून, त्याच्याविषयीं (पाऱ्याविषयीं) लोकांत गोष्टी सांगत फिरतात.

याचा हाच अर्थ परमेश्वरानें परमेश्वरीला (म्ह० पार्वतीला) विस्तारानें सांगितला आहे.

कर्मयोगेन देवेशि! प्राप्यते पिंडधारणं ।
रसश्च पवनश्चैव कर्मयोगो द्विधा स्मृतः ॥
* मूर्छितो हरति व्याधीन् मृतो जीवयति स्वयं ।
बद्धः खेचरतां कुर्यात् रसो वायुश्च भैरवि ! ॥

(अर्थः—हे देवेशि, कर्मयोगानें पिंडधारण होतें. हा कर्मयोग, रसयोग व पवनयोग याप्रकारें दोन प्रकारचा आहे. मूर्छित होऊन व्याधींचा नाश करतो, स्वतः मरून (इतरांस) जीवंत करतो, व बद्ध होऊन (साधकास) आकाशगामित्व देतो. हे भैरवि, याप्रकारें रस व वायु (यांची कर्तबगारी आहे.)

मूर्छित (पारदाचें) स्वरूपही सांगितलेलें आहे.

नानावर्णो भवेत्सूतो विहाय घनचापलं ।
लक्षणं दृश्यते यस्य मूर्च्छितं तं वदंति हि ।
आर्द्रत्वं च घनत्वं च तेजो गौरवचापलं ।
यस्यैतानि न दृश्यंते तं विद्यान्मृतसूतकं ॥

(अर्थः—पारा घनत्व व चंचलपणा सोडून ज्या वेळीं नानारंगांचा होतो त्या वेळीं त्यास मूर्छितपारद म्हणतात. ओलेपणा, घनत्व, तेज, गौरव, (जडपणा) व चंचलता हीं ज्यांत नसतात, अशा पारदास मृत पारद म्हणतात.)

दुसरीकडे बद्धाचें स्वरूप देखील सांगितलेलें आहे.

अक्षतश्च लघुद्रावी तेजस्वी निर्मलो गुरुः ।
स्फोटनं पुनरावृत्तौ बद्धसूतस्य लक्षणं ॥

---

* हा श्लोक मूळ रसार्णवांतील असून माधवाचार्यांनीं येथें व स्वात्मरामांनीं आपल्या हठयोगप्रदीपिकेंत उद्धृत करून घेतलेला आहे.

(अर्थ—:(अग्नींत) कमी न होणारा, लवकर वितळणारा, तेजस्वी, निर्मल, जड, पुनः नितळविला असतां फुटणारा—हीं बद्धपारदाचीं लक्षणें आहेत.)

हरगौरीसृष्टि सिद्धि झाली असतां पिंडस्थैर्य होतें असें वर्णिलें तरी, ती सिद्धी तरी कशी होते? अशी शंका घेऊं नका. कारण, (पारद) अठरा संस्कारांनीं सिद्ध होतो. याविषयीं आचार्यांनीं म्हटलेलें आहे कीं:—

तस्यहि साधनविधौ सुधियां प्रतिकर्मनिर्मलाःप्रथमम् ।
अष्टादशसंस्कारा विज्ञातव्याः प्रयत्नेन ॥

(अर्थः—त्याच्या (पाऱ्याच्या) साधनविधीमध्यें, शहाण्यांनीं, प्रत्येक कर्मांनीं निर्मलता आणणारे अठरा संस्कार प्रयत्नांनी जाणावेत.)

ते संस्कारही सांगितलेले आहेत:—

स्वेदनंमर्दनं मूर्च्छोत्थापन पातननिरोधनियमाश्च ।
दीपनगगनग्रासप्रमाणमथचारणाविधानं च ॥ १ ॥
गर्भद्रुतिबाह्यद्रुतिजारणरसरागसारणाश्चैव ।
क्रामणवेधा भक्षणमष्टादशधेति रसकर्म ॥ २ ॥

(अर्थः—स्वेदन[1], मर्दन[2], मूर्च्छन[3], उत्थापन[4], पातन[5], निरोध[6], नियमन[7], दीपन[8], गगनग्रासप्रमाण[9], चारण[10], गर्भद्रुति[11], बाह्यद्रुति[12], जारण[13], राग[14], सारण[15], क्रामण[16], वेध[17] व भक्षण[18] या प्रकारें रसकर्म १८ प्रकारचें आहे.)

याचा विस्तार गोविंदभगवत्पादाचार्य, सर्वज्ञ रामेश्वर, भट्टारक वगैरे प्राचीन आचार्यांनीं निरूपण केलेला आहे. ग्रंथ वाढेल म्हणून आम्ही त्याविषयीं उदासीनपणा करितों.

रसशास्त्र केवळ धातुवादार्थच आहे असें मानूं नये; कारण देहवेधाच्या द्वारें तें मुक्तीला परमकारणीभूत आहे, याविषयीं रसार्णवांत सांगितलेलें आहे कीं:—

लोहवेधस्त्वया देव, यद्दत्तः परमीशितः ।
तं देहवेधमाचक्ष्व येन स्यात्खेचरीगतिः ॥ १ ॥
यथा लोहे तथा देहे कर्तव्यः सूतकः सदा (ता) ।

समानं कुरुते देवि! प्रत्ययं देहलोहयोः ॥ २ ॥
पूर्वं लोहे परीक्षेत पश्चाद्देहे प्रयोजयेत् ।

(अर्थः--(पार्वती ह्मणते) हे देवा! तूं या परमश्रेष्ठ पाऱ्याचा लोहवेध सांगितलास (दिलास) आतां त्याचा देहवेध सांग, कीं जेणेंकरून मनुष्यांस आकाशगमन प्राप्त होईल. (परमेश्वर ह्मणतात) ज्याप्रमाणें लोहावर त्याचप्रमाणें देहावरही सूतकाचा प्रयोग करावा. तो देह व लोह यांवर सारखीच खात्री पटवितो. लोहावर प्रथम परीक्षा करून (खात्री झाल्यानंतर मग देहाच्या ठिकाणीं त्याचा प्रयोग करावा.)

सच्चिदानंदात्मक परतत्वाच्या स्फुरणानेंच मुक्तिची सिद्धी प्राप्त होत असतां हा दिव्य देह संपादन करण्याचा खटाटोप तरीं कशास हवा अशी शंका आल्यास, हें शरीर आर्त ह्म. रोगांनीं पीडित असून, आर्त शरीरामध्यें मोक्षाची वार्ताही असणें शक्य नाहीं. याविषयीं रसहृदयांत ह्मटलेलें आहे कीं:-

गलितानल्पविकल्पः सर्वाध्यविवक्षितश्चिदानंदः ।
स्फुरितोऽप्यस्फुरिततनोः करोति किं जंतुवर्गस्य ॥
यज्जरया जर्जरितं कासश्वासादिदुःखवशमाप्तं ।
योग्यं तन्न समाधौ प्रतिहत बुद्धींद्रियप्रसरं ॥ २ ॥
बालःषोडशवर्षो विषयरसास्वादलंपटः परतः ।
यातविवेको वृद्धो मर्त्यः कथमाप्नुयान्मुक्तिं ॥ ३ ॥

(अर्थः —अनेक विकल्प नाहींसे झाल्यामुळें उत्पन्न होणारा, व सर्व पंथांनीं विवक्षित असा चिदानंद अस्फुरित प्राण्यास स्फुरण पावला तरी त्याचा त्यास काय उपयोग होणार? जें शरीर जरेनें जर्जरित (म्हातारपणानें खिळखिळीत झालेलें, कास व श्वास इत्यादि दुःखांच्या तावड्यांत गेलेलें, व यामुळें ज्यांतील बुद्धी व इंद्रियें यांच्या योग्य कार्यांत अडथळे उत्पन्न होतात असें, आहे तें शरीर समाधीला योग्य नव्हे. सोळा वर्षेपर्यंत पोरवय असतें; त्यापुढें मनुष्य विषयरसास्वादांत लंपट होऊन जातो; म्हाता-

रपणीं त्याचा विवेक निघुन जातो—अशी स्थिति असतां, मरणाधीन प्राण्यास कोठून मोक्ष मिळणार!)

जीवत्व ह्मणजे संसारित्व असून, या उलट स्थितीस मुक्तत्व म्हणतात असें असतां, परस्पर विरुद्ध अशा दोन स्थितींचा* भाव एकाच ठिकाणीं कसा योग्य असेल, अशी शंका आल्यास ती योग्य नव्हे. असा विकल्प घेणें योग्य नव्हे. मुक्ति सर्व तीर्थकरांना संमत आहे. ती काय ज्ञेयपदांत आहे कीं नाहीं? कीं, शेवटीं ती सशाच्या शिंगाप्रमाणें (काल्पनिक) आहे? प्रथम गोष्टींत (ज्ञानांत) जीव कांहीं सोडावयाचा नसतो जीवंत नसलें तर ज्ञातृत्वपणा संभवत नाहीं. याविषयीं रसेश्वरसिद्धांतांत ह्मटलेलें आहे कीं:-

रसांकमेयमार्गोक्तः जिवमोक्षोन्यथा तु न ।
प्रमाणांतरवादेषु युक्तिभेदावलंबिषु ॥
ज्ञानज्ञेयमिदं विद्धि सर्वतंत्रेषु संमतं ।
नाजीवज्ज्ञास्यति ज्ञेयं यदतोस्त्येव जीवनम् ॥

(अर्थः– रसमार्गातील जीवन्मोक्ष कांहीं वेगळा नाहीं.) (युक्तिभेदाचा अवलंबन करणाऱ्या, व प्रमाणांतरांच्या वादांतल्या पक्षां) सर्वतंत्रांमधुन हे ज्ञानानेंच ज्ञेय आहे अशाबद्दल संमति आहे. जिवंत असल्याखेरीज मनुष्य ज्ञेयवस्तु जाणणार नाहीं; ह्मणून (जीवन्मुक्ती) सही जीवन आहेच!)

तसेंच, ही कोणीं न पाहिलेली गोष्ट आहे असें मानूं नये, कारण विष्णुस्वामींच्या मतानुयायांनीं नृसिंहाचें शरीर नित्य आहे असें प्रतिपादन केलेलें आहे. या विषयीं साकारसिद्धींत ह्मटलेलें आहे कीं:—

सच्चिन्नित्यनिजाचिंत्यपूर्णानंदैकविग्रहं ।
नृपंचास्यमहं वंदे श्रीविष्णुस्वामिसंमतम् ।

ह्मणून, आह्मांला पाहिजे असलेलें देहाचें नित्यत्व अगदींच दिसून येत नाहीं असें नाहीं, असें पुरूषार्थाची इच्छा असलेल्या पुरुषांनीं मानावें. ह्मणूनच ह्मटलें आहे कीं:-

* सदेहता व मुक्ति

आयतनं विद्यानां मूलं धर्मार्थकाममोक्षाणां ।
श्रेयः परं किमन्यत् शरीरमजरामरं विहायैकं ? ॥

(अर्थः–विद्यांचें घर, व धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांचे मूळ असें जें अजरामर शरीर तें सोडून बाकीचें काय श्रेयस्कर आहे?)

(शरीराला) अजरामरण करण्याला समर्थ असा एक रसेंद्रच आहे. तें असें सांगितलें आहे कीं:—

एकोऽसौ रसराजः शरीरमजरामरं कुरु ते ।

(अर्थः–एकटा तो पाराच हें शरीर अजरामर करितो.) (रसाचें माहात्म्य काय सांगावें दर्शनस्पर्शनांनीं देखील मोठें फळ प्राप्त होतें याविषयीं रसार्णवांत ह्मटलेलें आहे कीं:–

दर्शनात्स्पर्शनात्तस्य भक्षणात्स्मरणादपि ।
पूजनाद्धारणाश्चैव दृश्यते षड्विधं फलं ॥
केदारादीनि लिंगानि पृथिव्यां यानिकानिचित् ॥
तानि दृष्ट्वा तु यत्पुण्यं तत्पुण्यं रसदर्शनात् ।

(अर्थः–त्याच्या दर्शनानें, स्पर्शनानें, भक्षणानें, स्मरणानें, पूजनानें व धारणानें सहा प्रकारचें फळ दिसून येतें. केदारादिक जें कांहीं पृथ्वीवर लिंगें आहेत तीं पाहून जें पुण्य मनुष्यांस मिळतें, तें पुण्य रसदर्शनानें त्यांस मिळतें.)

दुसऱ्या ठिकाणींही म्हटलें आहे:–

काश्यादि सर्वलिंगेभ्यो रसलिंगार्चनं शिवं ।
प्राप्यते येन तल्लिंगं भोगारोग्यामृतप्रदं ॥

(अर्थः–काशी आदि ठिकाणच्या सर्व लिंगांपेक्षां पाऱ्याच्या लिंगाची पूजा कल्याणप्रद आहे. ज्याला हें लिंग मिळतें त्यास तें भोग, आरोग्य व अमरत्व देतें.)

रसनिंदेचा प्रत्यवायही याप्रकारें दाखविलेला आहे:–

प्रमादाद्रसनिंदायाः श्रुतो एनं स्मरेत्सुधीः ॥
द्राक्त्यजेत्त्रिदकं नित्यं निंदयापूरिताशुभं ॥

(अर्थः–चुकीनें जर पाऱ्याची निंदा कानीं पडली तर त्याचें स्मरण करावें व झटकन् निंदेनें भरलेल्या निंदकास टाकून जावें.)

म्हणून आह्मीं सांगितलेल्या रीतीनें दिव्य देह मिळवून योगाभ्यासानें परमतत्वाचा साक्षात्कार झाला असतां पुरुषार्थप्राप्ति होते. तेव्हां

भ्रुयुगमध्यगतं यत् शिखिविद्युत्सूर्यवज्जगद्भासि ।
केषांचित्पूण्यकृतां उन्मीलति चिन्मयं ज्योतिः ॥
परमानंदैकरसं परमं ज्योतिः स्वभावमविकल्पं ।
विगलितसर्वक्लेशं ज्ञेयं शांतं स्वसं वेद्यं ॥
तस्मिन्नाधाय मनः स्फुरदखिल चिन्मयं जगत्पश्यन् ।
उत्सन्नाकर्मबंधो ब्रह्मत्वमिहैव प्राप्नोति ॥

(अर्थः–जें भिवयांच्या मध्यभागीं आहे व जें अग्नि, वीज व सूर्य यांच्या प्रमाणें जगत्प्रकाशक आहे, असें चिन्मय ज्योतिःस्वरूप कोणातरी पुण्यवान् प्राण्यांच्या दृष्टीस पडतें, तें परमानंदैकरस, परम ज्योतिःस्वभाव, अविकल्प, सर्व क्लेशरहित, शांत व स्वसंवेद्य आहे असें समजावें. त्याच्या ठिकाणी मन ठेऊन हें सर्व जगत् चैतन्यमय स्फुरण पावत आहे असें जाणून सर्व कर्मबंधांपासून मनुष्य मोकळा झाला असतां त्यास येथेंच ब्रह्मत्वप्राप्त होतें

श्रुति ह्मणते कीं:–

रसो वै सः, रसं ह्येवायं लब्ध्वाऽऽनंदी भवति ।

(तो रसच होय; रसच मिळवून मनुष्य आनंदी होतो.).

याप्रकारें, दुसऱ्यांचे दुःखाचा भार नाहींसा करून टाकणारा एक पाराच होय, हें सिद्ध आहे तसेंच पाऱ्याचें परब्रह्मतत्त्वाशीं साम्य आहे, असेंप्रतिपादन करणारा खालील श्लोक आहे:–

यः स्यात्प्रावरणाविमोचनधियां साध्यः प्रकृत्या पुनः ।
संपन्नः सहते न दीप्यति परं वैश्वानरे जाग्रति ॥
जातो यद्यपरं न वेदयति च स्वस्मात्स्वयं द्योतते ।
यो ब्रह्मैव स दैन्यसंसृतिभयात पायादसौ पारदः ॥

(अर्थ—जो प्रकृत्याच आपलें प्रावरण (कंचुकादि दोष) दूर करण्यास समर्थ असलेल्यांना साध्य होतो, जो संपन्न झाल्यामुळें प्रखर व जळजळीत अग्नीही सहन करतो (व जळून जात नाहीं), व जो सिद्ध झाला असतां आपल्याशिवाय दुसऱ्या कशासही जाणूं देत नाहीं स्वतःच प्रकाशमान होतो, पारद ब्रह्मच आहे. तो (तुमचें) रक्षण, सर्व प्रकारच्या दैन्यांपासुन व संसाराच्या भयापासून, करो.)

या प्रकारें सर्व दर्शनसंग्रहांतील रसेश्वरदर्शन संपलें!

यांत महादेवाच्या रसार्णवाचा, गोविंदभगत्पादांच्या रसहृदयाचा, नित्यनाथाच्या) रसरत्नाकरांतील चरणाचा, रसेश्वरसिद्धांताचा, सर्वज्ञरामेश्वराचा, भट्टारकाचा, सोमेश्वर राजाचा, गोविंदनायकाचा (रससारकर्ता?) चर्पटीचा, कपिलाचा, व्याडीचा, कापालीचा व कंदलायनाचा उल्लेख आहे. सोमेश्वर हा रसेंद्रचूडामणीचा कर्ता दिसतो. एक गोविंदाचार्य रसहृदयकर्ते असून दुसरे रससारकर्तें होत. सर्वज्ञरामेश्वर, भट्टारक चर्पटि, कपिल, व्याडि, कापाली व कंदलायन यांनीं लिहिलेल्या ग्रंथांचीं नांवें कळत नाहीं. तसेंच रसेश्वरसिद्धांत हा ग्रंथ कोणाचा होता हेंही कळत नाहीं. हे सर्व ग्रंथ व ग्रंथकार इ. स. १३१० हून प्राचीनतर होत हें उघड आहे.

प्रकरण ३७ वें.

* आर्यवैद्यकाचा इतिहास. *

डॉ. गर्दे यांनीं आपल्या वाग्भटाच्या प्रतीच्या प्रस्तावनेंत आर्यवैद्यकाच्या इतिहासाविषयीं बहुतेक चर्चा केलेली असून ती पुष्कळ अंशीं समाधानकारक आहे; तथापि, कांहीं अधिक माहितींची भर घालून मींही याविषयींची थोडीशी चर्चा करितों. ही चर्चा डॉ० गर्दे यांच्या माहितीस पुरवणीदाखल आहे, हें कोणासही कळून येईल. या इतिहासांत मीं फक्त आत्रेय पुनर्वसु धन्वंतरि इत्यादि आर्षपरंपरेचाच विचार केलेला आहे. रसवैद्यकाच्या परंपरेसंबंधानें प्रस्तुत ग्रंथांत माहिती दिलेली असून या बाबतींत मात्र डॉ० गर्दे यांचीं मतें बरीच कच्चीं व चुकीचीं आहेत हें वाचकांच्या उघडकीस येईल. याबद्दल त्यांस दोषमात्र देतां येत नाहीं; कारण त्यावेळीं त्याबद्दल तेवढीच माहिती होती.

चरकसंहिता.

सध्यां आपल्याला चरकसंहिता ह्मणून जी मिळत आहे तीच सर्वांत प्राचीन ग्रंथ आहे. पण ती एकाची कृति नसून, तींत निदान तिघांचा तरी हात आहे. यामुळें प्रत्येकाच्या काळाचा विचार स्वतंत्रपणें करावा लागतो.

(१) मूळचें आग्निवेशाचें तंत्र; (२) त्यावरचा चरकमुनींचा संस्कार. (३) त्यावरचा दृढबलाचा संस्कार. याप्रकारें तीन ग्रंथकारांचा हात या ग्रंथावर फिरलेला आहे.

अग्निवेशादिकांचा काळ.

आतां भरद्वाज (ज्याला इंद्राकडून आयुर्वेदाचें थोडेंबहुत ज्ञान प्राप्त झालें, पण ज्याचा आज ग्रंथ एकही उपलब्ध नाहीं) पुनर्वसु, आत्रेय याचा पिता अत्रि, व पुनर्वसु आत्रेय यांचे आग्निवेश, भेड, जातुकर्ण्य, पराशर, हारीत, क्षारपाणि इत्यादि शिष्य यांचा काळ ठरविणें बरेंच कठिण दिसतें. भरद्वाज व अत्रि या रामायणकालीन व्यक्ति असतील, तर

पुनर्वसु आत्रेय हे रामायणाच्या काळींच होऊन गेले, असें अनुमान निघेल. पुनर्वसु आत्रेय हे जर रामायणकालीन असतील, तर त्यांचा पट्टशिष्य अग्निवेश हाही पण तत्कालीन असूं शकेल, पण बाकीचे संहिताकार भेड, जातूकर्ण्य पराशर, हारीत, व क्षारपाणि हे पुनर्वसु आत्रेयांचे साक्षात् शिष्य होते कीं नाहीं (चरक लिहितो त्याप्रमाणें) याची मोठी शंका आहे. भेडाचें नांव संस्कृत वाङ्मयांत दुसरें कोठें ऐकूं येत नाहीं तेव्हां त्याची गोष्ट सोडून देऊं पण जातूकर्ण्य व पराशर हे मात्र भारतकालीन ऋषि होते यांत शंकाच नाहीं. हारीत मात्र कदाचित् प्राचीन तर असेल, पण सध्या हारीताच्या नांवानें मिळणारा ग्रंथ मात्र अस्सल हारीताचा ग्रंथ नव्हे; संग्रहरूपग्रंथ आहे. (तेव्हां क्षारपाणिचे नांव तेदुसरीकडे आढळत नाहीं) जातूकर्ण्य व पराशर यांच्या संबंधानें तरी खात्रीनें सांगतां येतें कीं ते भारतकालीन ऋषि असल्यामुळें, पुनर्वसु आत्रेयाचे साक्षात् शिष्य, चरक ह्मणतो त्याप्रमाणें, ते असूं शकणार नाहींत यावरून असें कळून येईल, कीं अग्निवेश हा पुनर्वसु आत्रेयाचा अस्सल शिष्य व त्या काळचा दिसतो. बाकीच्या पांच संहिता भेड, जातूकर्ण्य, पराशर, हारीत व क्षारपाणि या अग्निवेश व चरक या दोघांच्या काळाच्या दरम्यान निर्माण झाल्या असाव्यात. अग्निवेशाबरोबरच त्यांनीं आपले ग्रंथ लिहिलेले असणें बहुधा शक्य दिसत नाहींत. चरकाची मात्र अशी समजूत होती कीं अग्निवेशाप्रमाणेंच बाकीचे पांच ग्रंथकारही पुनर्वसु आत्रेयाचे साक्षात् शिष्य असावेत, तें कांहीं असो. एवढें मात्र खास कीं चरकमुनींच्या पूर्वी या साही संहिता निर्माण झालेल्या होत्या, व त्या बऱ्याच प्रसिद्ध होत्या यावरून—

चरकाचा काळ.

आपणांस अनुमानानें काढितां येईल. तो कसा तें पहा. वरील सहा भेषजसंहितांपैकीं जातूकर्ण्य व पराशर यांच्या संहिता ज्या अर्थीं चरकमुनीस माहीत होत्या, त्या अर्थीं पराशर व जातूकर्ण्य यांनंतर बऱ्याच काळानंतर चरकमुनि झालेले असावेत. हे पराशर व्यासाचे वडीलच होत

यांत शंका दिसत नाहीं; कारण इतर ठिकाणीं संस्कृत वाङ्मयांत जातूकर्ण्य पराशर, व व्यास हे क्रमानें वंशोक्त ऋषींमध्यें येत असतात यावरून पाहतां, चरकमुनि हे जातूकर्ण्य व पराशर यांनंतर बऱ्याच काळानें झालेले दिसतात. यास दुसरेंही प्रत्यंतर पुरावे आहेत. ' कठचरकाल्लुक्' असें पाणिनीचें सूत्र आहे (४–३–१०७) यावरून कोणी एक चरक पाणिनीचे पूर्वी होऊन गेला हें सिद्ध होतें; परंतु यांतील कठ व चरक हे याजुषशाखेचे प्रवर्तक असून, यांतील चरकाचें, वैद्यकीय चरकाशीं ऐक्य ठरविण्यास अवांतर प्रमाणें पाहिजेत. या सूत्रावर जयादित्यानें जी काशिकावृत्तींत टीका केलेली आहे, तींत " चरकाचे वैदिक ग्रंथ व श्लोकग्रंथ " असे शब्द येतात, व पाणिनीय सूत्रांवरील अ. ४–२–६६ व अ. ४–३–१०२ या ठिकाणच्या टीकेवरूनही वैदिकग्रंथांचा व श्लोकग्रंथांचा कर्ता कोणी एक चरक होता असें कळून येतें; व ज्या अर्थीं ह्या वैदिक शाखाप्रवर्तक चरकांचा दुसरा कोणताही " श्लोकमय ग्रंथ" उपलब्ध नाहीं, त्या अर्थीं ही जी वैद्यकीय संहिता तीच वरील चरकाचा श्लोकग्रंथ असावा असें वाटणें सहाजिक आहे. अनुमान हें बरोबर असल्यास चरक हा पाणिनीहून निदान दोन तीनशें वर्षामागें होऊन गेल्याचें कळून येईल. पाणिनीनें वैदिकग्रंथकार ह्मणून कठ व चरक यांचा मिळून उल्लेख केलेला आहे यावरून कठ व चरक हे समकालीन तरी असतील किंवा कठ हा चरकाहून प्राचीनतर तरी असेल, असें वाटतें. यापैकीं कोणतीही गोष्ट सिद्ध धरिली तरी त्यायोगें चरकाचा काळ ठरवितां येतो. कठाची जी काठकसंहिता आहे, त्यांत धृतराष्ट्र व विचित्रवीर्य या भरतकालीन व्यक्तींचा उल्लेख आहे. यावरून कठ हा धृतराष्ट्र व विचित्रवीर्य यांच्यानंतर पण भारतीय युद्धापूर्वी (बहुधा) होऊन गेलेला असावा; चरक त्याचा समकालीन किंवा बहुधा त्यानंतरचा असल्यामुळें तो भारतीय युद्धानंतरच झाला असला पाहिजे; व ही अनुमानें आह्मीं मागें, जातूकर्ण्य व पराशर यांच्या संहिता चरकास माहीत होत्या यावरून काढिलेलींच आहेत. यावरून चरकमुनींचा

काळ भारतीययुद्धानंतर बहुधा लवकरच ठरतो. भारतीय युद्धाचा काळ ऐतिहासिक दृष्ट्या इ. पू. १२००-ते-१५०० च्या सुमाराचा आहे. आपण कमींत कमी १२०० इ. पू. हाच जरी भारतीय युद्धाचा काळ धरिला तरी, त्यानंतर १००-१५० वर्षानंतर चरकमुनि होऊन गेले असावेत. पाणिनीच्या काळावरूनही चरकाचा काळ हाच ठरतो. पाणिनीचा काळ इ. पू. ८०० च्या सुमाराचा असावा असें प्रो. भांडारकर प्रभृति मंडळींचें मत आहे. चरक पाणिनीचें पूर्वी दोनतीनशें वर्षे होऊन गेला असावा हें मागें आह्मीं दाखविलेलेंच आहे. यावरून चरक इ. पू. १०००-११०० वर्षांच्या सुमारास होऊन गेला हे कळून येईल.

चरकाचा याप्रकारें अनेक प्रमाणावरून काळ ठरविल्यानंतर भरद्वाज, पुनर्वसु आत्रेय अग्निवेश यांचे काळ ठरवितां येतात कीं काय, हें आपण पाहूं. भरद्वाज, व पुनर्वसु आत्रेय हे बहुधा रामायणकालीन ऋषि असावेत, असें वर सुचविलेलेंच आहे. महाभारतांत वैद्यकाचा प्रवर्तक ह्मणून कृष्णात्रेयाचा उल्लेख आढळतो. शिवाय, या आत्रेयाचा शिष्य अग्निवेश हा रामायणकालीन होता, यास दुसरेंही प्रमाण आढळतें. तें असें कीं रामायणाच्या युद्धकांडांतील 'रामतिलक' टीकेंत 'अग्निवेश्यकृत रामायणा' चे उतारे दिलेले आहेत. ते उतारे पाहतां तत्कालीन ग्रंथकाराखेरीज इतरांस तसें रामायण लिहिणें शक्यच नाहीं हें कळून येईल; कारण त्यांत, रामाच्या वनवासाची बरोबर रोजनिशी दिलेली असून, शिवाय, रामायणांचें युद्ध बरोबर ७२ च दिवस सारखें कसें झालें, व सीतेचा रामाशीं बरोबर किती दिवस विरह झालेला होता, ही सविस्तर माहिती तत्कालीन ग्रंथकाराखेरीज इतरांस देतां येणें शक्यच नाहीं. शिवाय, ही माहिती खरी आहे, यास पद्मपुराणांतील लोमशरामायणाची ही साक्ष आहे. हे लोमशऋषि रामायणकालींच होतें, असें येथं स्पष्ट ह्मटलें आहे. असो. यावरून अग्निवेश्य, (पुनर्वसु आत्रेयाचे शिष्य), हे बहुधा एका रामायणाचे कर्ते व तत्कालीन होते, या बद्दल शंका दिसून येते हानीं. रामायणकाळ व भारतकाळ यांत ३० पि ां अंतर आहे. प्रत्य

पिढीस २०-२२ वर्षांचा अवकाश दिला तर या काळांत ३०×२०=६०० ६५० वर्षांचें अंतर पडतें. भारतीय युद्धाचा काळ आपण १२०० तें १६०० इ. पू धरिला आहे. त्यावरून रामायण काळ १८०० ते २००० इ. पू. ठरेल सामान्यतः इ. पू. २८०० हाच खालचा काळ आपण धरूं. हे ऐतिहासिक काळ आहेत.

वरील सर्व विवेचनावरून खालील कालगणना ठरतेः---

१ भरद्वाज(व त्याचे शिष्य)
२ आत्रेय पुनर्वसु (मूलिकावैद्यकाचे प्रवर्तक)
३ व पुनर्वसूचे शिष्य अग्निवेश्य (अग्निवेश्यतंत्राचे व एका रामायणाचेही कर्ते)
} रामायणकाळीं झाले इ. पू. २००० ते इ. पू. १८००

१ भेड
२ जातूकर्ण्य
३ पराशर
४ हारीत
५ क्षारपाणि
} रामायणकाळ व भारतकाळ यांच्या दरम्यान या संहिता निर्माण झाल्या. यांचा काळ इ. पू. १८०० किंवा २००० } —इ. पू. १२००

० कठ (काठकसंहितेचा कर्ता) ... इ. पू. १२००च्या पूर्वी.

१ चरक(चरकसंहिताकार व याजुषशाखाप्रवर्तक) .... इ. पू. सुमारे १००० ते ११००

१ दृढबल—चरकाचा संस्कर्ता— इ. पू. ६००-७००

याप्रमाणें अग्निवेश्य व चरक यांच्या काळाविषयीं विचार केल्यानंतर चरकावर संस्कार करणारा दृढबल किती प्राचीन असावा, या विषयींही विचार करूं. वाग्भटावरचा टीकाकार अरुणदत्त हा या दृढबलाचा उल्लेख करितो. [कुंटे यांची वाग्भटाची प्रत, (सर्वांगसुंदरा टीकेसह) पहा. पृ. ५७१] अरुणदत्त तेथें ह्मणतोः—तथा चरकसंहितायां दृढबलोऽप्याह ! यावरून दृढबल हा अरुणदत्ताहून प्राचीन तर आहे हें उघड होतें अरुणदत्त हा (पृष्ठ ६१४) मध्यें नागानंदनाटकाचा उल्लेख करीत असल्यामुळें तो इ. स. ६४० नंतरचाच असला पाहिजे, कारण नागानंदनाटक

श्रीहर्ष राजानें रचिलें अशी प्रासीद्धि आहे. हा दृढबलाचा चरकसंहितेवरचा संस्कार वाग्भटासही माहीत असावा, असें मानण्यास बरींच कारणें आहेत पण चरकसांहितेवर इ. पू. १५ च्या सुमारच्या पतंजलीनें भाष्य केलें (तें हल्लीं उपब्ध नाहीं) त्यांत दृढबलाच्या भागावरही तें होतें कीं नाहीं हेंही कळण्यास कांहीं साधन नाहीं तथापि दृढबल हा ग्रंथकारही बराच प्राचीन तर दिसतो. चरकसंहिता सध्या जशी मिळते तशी ह्मणजे दृढबलाच्या मजकूरासह—इ. पू. ६०० च्या पूर्वींच तयार झालेली होती असे प्रो. रॉय वगैरे विद्वानांचें मत आहे. (History of Hiuduchem. dstry, Vot I, in troiuction) पहा. सारांश सर्व तऱ्हांनीं इ. पू. ६०० च्या पूर्वीं चरकसंहिता संपूर्ण झाली होती.

पतंजलि.

आतां पतंजलीविषयीं थोडासा विचार करूं. हा व्याकरण सूत्रावरील योगदर्शन सूत्रकार व चरकसंहितेवरील भाष्यकार होता. चरक संहितेवर पतंजलीनें एखादें भाष्य लिहिले होतें. यास खालील वाक्य प्रमाण आहे:- (नागेश भट्टाची परमलघु मंजूषा)

“ आप्तो नाम, अनुभवेन वस्तुतत्वस्य कार्त्स्न्ये न ।निश्चयवान्” रागादिवशादपि नान्यथावादी यः स इति चरकेपतंजलिः ॥ ” असो हे तिन्ही ग्रंथकार पतंजली एकच होते हे दर्शविणारा खालील श्लोक केव्हां केव्हां व्याकरण महाभाष्याच्या प्रारंभीं आढळतो.

योगेन चित्तस्य, पदेन वाचा । मलं शरीरस्य तु वैद्यकेन ॥
योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां । पतंजलिं प्रांजलि रानतोऽस्मि ॥ १ ॥

या श्लोकावरून परंपरेनें पाहतां, योगसूत्रकार व्याकरण महाभाष्यकार, व चरकसंहितेवरील भाष्यकार पतंजलि एकच असावा असें वाटतें, याचा काळ व्याकरण महाभाष्या वरून इ. पू. १५० हा ठरविला आहे. चरकसंहितेवर जे पतंजलीनें भाष्य लिहिलें त “ हल्लीं उपलब्ध असलेल्या चरकसंहितेंत ” च समाविष्ट नसून, तो भाष्यरूप ग्रंथ स्वतंत्रच होता

कारण वरील चरकभाष्यांतील वाक्य हल्लींच्या चरकसंहितेत मिळत नाहीं. पतंजली व चरक हे अगदीं भिन्न ग्रंथकार असून, चरक हा इ. पू. १००० ११०० च्या सुमारचा असून, त्यावरील भाष्यकार पतंजलि हा इ. पू. १५० च्या सुमारचा आहे. दोघांत जवळ जवळ १००० वर्षांचें अंतर आहे

चरकावरच्या टीका.

चरकावर चक्रदत्त व शिवदाससेन यांच्या शिवाय हरिश्चंद्र भट्टारक याचीही एक टीका होती. तीही हल्लीं उपलब्ध नाहीं तिचा हेमाद्रीनें आपल्या वाग्भटाच्या टीकेच्या प्रस्तावनेंत उल्लेख केला आहे. चक्रदत्त व शिवदाससेन यांच्या चरकावरील टीका बहुधा पूर्णच असाव्या पण त्या मी पाहिलेल्या नसल्यामुळें मला त्याविषयीं खात्रीनें लिहितां येत नाहीं. वरील दोन तीन टीकांशिवाय, पतंजलीचें एक चरकावर भाष्य होतें, हें वर आलेलेंच आहे.

षड् भिषक् संहिता व इतर वैद्यकसंहिता.

अग्निवेशादिकांच्या संहिता पैकीं भेडाची तेवढी संहिता हल्लीं तंजावरच्या दर्बारीं पुस्तकालयांत (palace Lidarary) मिळतें. अरुणदत्ताचे वेळीं धन्वंतरिसंहिता, काश्यपसंहिता, निमि ऊर्फ विदेहतंत्र व पराशर संहिता या उपलब्ध होत्या (पृ. ५७३ मध्यें अरुणदत्तानें पराशरसंहितेचा याप्रमाणें उल्लेख केलेला आहे. “ तथाच पराशरोऽष्टरात्रेणान्नं परिणमति, शुक्रद य तीति संजगात्वं’ असें ह्मणून पुढें त्यांतील उतारे दिलेले आहेत. असो. सध्यां फक्त एकेच ठिकाणी भेडसंहिता तेवढी मिळते.बाकीच्या आर्षग्रंथांपैकीं एकही ग्रंथ आज उपलब्ध नाहीं. धन्वंतरीच्या परंपरेपैकीं औपधेनव, औरभ्र, पौष्कलावत व सुश्रुत या संहितां पैकीं फक्त शेवटची तेवढी उपलब्ध आहे. धन्वंतरी संहिता ह्मणून एक ग्रंथ वेंकटेश्वर प्रेसनें छापलेला आहे पण तो अस्सल ग्रंथ आहे कीं, नाहीं हें मीं पाहिलेला नसल्यामुळें सांगूं शकत नाहीं याप्रकारें शक्य तेवढा आर्यवैद्यकाचा इतिहास दिलेला आहे. याशिवाय ऋषिकाळच्या १८ संहिता कित्येक

ठिकाणीं सांगितलेल्या आढळून येतात; पण नुसत्या नांवापलीकडे त्यांचें कांहीं मिळत नाहीं. हारीतसंहितेंत (हल्लींच्या) कांहीं इतर ग्रंथकारांचा उल्लेख आहे. कांहीं श्लोक गमतीचे असून ह्या बनावट संहितेचा काळ दाखवितात.

आदौ यद्ब्रह्मणा प्रोक्तं, अत्रिणा तदनंतरम् ॥
धन्वंतारिणा प्रोक्तं च, अश्विनाच महात्मना ॥ १ ॥

* * * *

चरकः सुश्रुतश्चैव वाग्भटश्चा तथापरः ।
मुख्याश्च संहिता वाच्यास्तिस्र एव युगे युगे ॥ २ ॥
अत्रिः कृतयुगे वैद्यो, द्वापरे सुश्रुतो मतः ।
कलौ वाग्भटनामा च, गरिमात्र प्रदृश्यते ॥ ३ ॥
वैष्णवी, चाश्विनी, गार्गी; तत्र माध्याह्निकाऽपरा ॥
मार्कंडेया च कथिता योगिराजेन धीमता ॥ ४ ॥
संहिता ऋषिभिः प्रोक्ता, मंत्रैर्नानाविधैर्विभो ॥ ५ ॥

* * * *

अग्निवेशश्च भेडश्च जातूकर्ण्यः पराशरः ॥
हारीतः क्षारपाणिश्च षडेते ऋषयस्तुः ते ॥ ६ ॥

यावरून हल्लींच्या हारीत संहितेवर, चरकाप्रमाणेंच, वाग्भटानंतर कोणाचा तरी संस्कार झालेला आहे एक; किंवा ही संहिता संपूर्णच बनावट आहे एक; पैकीं पहिला विचारच दाखविण्यास बरींच कारणें आहेत. असो. वरील श्लोकांवरून सहा भिषक् संहितां शिवाय, आणखी खालील वैद्यक संहिता भरतखंडांत हारीतसंहितेच्या संस्कर्त्याच्या वेळीं प्रचलित होत्या हें कळून येतें.

१ धन्वंतरि संहिता.
२ आश्विनी कुमार संहिता.
३ वैष्णवी संहिता.
४ गार्गी संहिता.
५ माध्यान्हिकी संहिता.
६ मार्कंडेय संहिता.

७ योगीश्वर (याज्ञवल्क्य) यांची संहिता.

येणेंप्रमाणें आर्यवैद्यकांचा संक्षिप्त इतिहास ऋषिकाळाचा, दिलेला आहे.

प्रकरण ३८ वें.

* वाग्भट व रसरत्नसमुच्चयकार. *

वैद्यराज शिवराम कालिदास यांच्या गुजराथी भाषांतरासह निघालेल्या रसरत्नसमुच्चयाच्या प्रस्तावनेंत अष्टांगहृदयकार वाग्भट व र० र० स० कार वाग्भट हे दोन नसून एकच पुरुष होत असें मत देऊन, त्याच्या प्रतिपादनाकरितां त्यांनीं आपल्या विचारसणीचेंही दिग्दर्शन केलेलं आहे. जुन्या लोकांचें मत व नव्या लोकांचें मत केव्हां केव्हां जमत नाहीं, हें खरें आहे पण नव्या लोकांचीं मतें कांहीं उगीच प्रचलित झालेलीं नसतात. अष्टांगहृदयकार वाग्भट हा युधिष्ठिराच्या सभेंत वैद्य ह्मणून असल्याची जुन्या मंडळीमध्यें प्रसिद्धि आहे; पण त्यास आधार काय ? उलट वाग्भटीय ग्रंथांत चाणक्याचा स्पष्ट उल्लेख असल्यामुळें, त्यास इ० पू० ३०० च्या नंतरच ठरवावें लागतें. एकाच वाग्भटानें कायाचिकित्सा व रसवैद्यक यांवरील सर्व तत्कालीन ग्रंथ पाहून दोन स्वतंत्र ग्रंथ लिहिणें शक्य नाहीं, असें नव्या पक्षाचें बिलकुल ह्मणणें नाहीं. असें हा जरूर असूं शकेल. अष्टांगहृदयांत रसायणप्रकरण आलें नाहीं एवढ्यावरून पहिल्या वाग्भटाच्या वेळीं रसविद्या भारतवर्षांत अवगत नव्हती, असें जुन्या मताप्रमाणें नवीनाचेंही मत नाहीं. शिवसंहिता मिळाली, नागार्जुनाचे सुटे अध्याय कां, पण संपूर्ण रसरनाकर मला मिळालेला आहे, व सीलोनमध्यें रावणसंहिता मिळालेली असेल—पण एवढ्यांवरूनच—वरील ग्रंथांचा बरोबर नक्की काळ समजल्याशिवाय—चरकसुश्रुतापूर्वींही रसायनविद्या आपल्यांत होती, हें कसें सिद्ध होतें, हें मात्र समजत नाहीं. शिवसंहिता व रावणसंहिता यांचा तर काळच माहीत नाहीं. रावणसंहिता रामायणकालीन रावणानेंच लिहिली यास प्रमाण काय ? ग्रंथ पाहून

कदाचित् कळेल. शिवसंहिता तांत्रिक ग्रंथ, शंकराच्या नांवावर असल्या-
मुळें, त्याचाही काळ निश्चित नाहीं. नागार्जुनाच्या काळासंबंधानें स-
विस्तर विवेचन, करून त्याचा काळ इ० पू० पहिलें शतक असा
ठरविलेला आहे तेव्हां, या एवढ्याच प्रमाणांवरून जर रसविद्या आ-
पल्यांत पूर्वीं होती असें ह्मणावयाचें असेल तर तें शक्य नाहीं. इ० पू०
३५० च्या पूर्वीं ही भारत व रामायणकाळीं भारतवर्षांत रसविद्या होती,
हें मीं दाखविलेलेंच आहे. तेव्हां र० र० स० च्या काळापूर्वीं इ० स०
च्या ४ थ्या शतकांत रसविद्या नव्हती ह्मणून. र० र० स० कार व अ-
ष्टांगहृदयकार वेगळे, असें नव्या मतांच्या लोकांचें मत नाहीं. एकाच
वाग्भटानें कायचिकित्सा ग्रंथांचें सार ‘ अष्टांगहृदय ’ जसें रचिलें, तसेंच
रसग्रंथांचें सार ‘ र० र० स० ’ लिहिलेलें असावें असे ही असंभवते
मग अडचण कोठें येते ? या विषयीं विचार करूं.

आपण सोईसाठीं यापुढें अष्टांगहृदयकारास ‘ वैद्यवाग्भट ’ व रसरत्नसमुच्च-
यकारास रसवाग्भट ‘ह्मणूं जुन्या लोकांच्या मताप्रमाणें वैद्यवाग्भट व रसवाग्भट
हे एकच धरिले, तर खालील घोटाळे उत्पन्न होतात. या घोटाळ्यांचें कोणीं
निरसन करीत असल्यास हे दोन्हीं वाग्भट एकच होऊं शकतील.

(१) बगदाद येथील खलिफ मनसूर (इ० स० ७५३–७७४)
व खलीफ हरून (इ० स० ७८६–८०८) यांच्यावेळीं बगदाद येथें
मूळ संस्कृत ग्रंथांतून अगर पेल्हवी भाषांतरावरून ब्रह्मसिद्धांत, खंडखाद्य,
चरक, सुश्रत, निदान, अष्टांगहृदय, सनकाचें विषतंत्र वगैरे भारतीय ग्रं-
थांचें आरबीभाषेंत भाषांतर झालें. प्रत्येक ग्रंथांच्या नांवाची अपभ्रष्ट रूपें
झालेलीं असून अष्टांगाचें ‘ अशंगार ’ असें त्यांनीं रूप केलेलें आहे. या
खलीफांचे वेळीं बगदाद येथें बरेच भारतीय वैद्य राहिलेले असून ते तेथें
आपल चिकित्साकर्म चालवीत असत. मंख नांवाच्या एका भारतीय वै-
द्यानें खलीफ हरून अररसचिद यांचा रोग घालविला व यामुळें
त्याची सरकारी दवाखान्यावर नेमणूक झाली. या मंखानें सुश्रुताचें व
वनस्पतींवरील एका संस्कृत ग्रंथांचें अरेबीमध्यें भाषांतर केलें. चरकाचें

व शीतोष्णा वरील एका पुस्तकाचें (उष्णताशास्त्रावरलि ग्रंथाचें) याच
वेळीं अरेबींत भाषांतरें झाली ! यावरून भारतीय वैद्यकांत आठव्या शत-
कांत उपलब्ध असलेलीं पुस्तकेंही तूर्त उपलब्ध नाहींत हें कळून येईल.
आयुर्वेदीय ग्रंथापैकीं, त्यावेळीं चरक संहिता, सुश्रुतसंहिता, अष्टांगहृदय
निदान (माधव काराचें), सनकाचें विषतंत्र, व उष्णता शास्त्रावरील
एक ग्रंथ इतकें बगदाद येथें प्रसिद्ध होतें. यावरून इ. स. च्या आठव्या
शतकाच्या मध्यभागीं तरी वैद्य वाग्भटाचा ‘ अष्टांग हृदय ’ ग्रंथ प्रसिद्ध
होता हें उघडच होतें.

चक्रपाणि हा बंगाली ग्रंथकार इ० स० १०४० च्या सुमारास हो-
ऊन गेला यानें आपला ग्रंथ वृंदाच्या **सिद्धयोगावरून** * लिहिला अ-
सून, चरक, सुश्रुत व वैद्यवाग्भट यांतील अनेक उतारे त्यानें आपल्या
ग्रंथांत दिलेले आहेत. वृंदानें माधवनिदानाचा रोगक्रम पत्करिला आहे.
* यावरूनही चक्रपाणीच्या पूर्वीं (१०४०) एक दोन शतकें तरी
वृंदाचा सिद्धयोग प्रसिद्ध असावा, व त्याही पूर्वीं शंभर दीडशें वर्षें नि-
दान माधवनिदान प्रसिद्ध असावें. ह्मणजे इ. स. ६००–७०० च्या
सुमारास माधवनिदान ग्रंथ भरतखंडांत प्रसिद्ध असला पाहिजे. बगदा-
दच्या खलीफानीं आठव्या शतकांत अरबीभाषेंत याच माधवनिदानाचें
भाषांतर करवून घेतलें. माधवनिदान व अष्टांगहृदय मिळवून वाचणाऱ्यांस
कित्येक ठिकाणीं माधवानें नुसतें चरक, सुश्रुत, व वैद्यवाग्भट यांचें
भाषांतर केलेलें आहे. असें आढळून येईल. यावरून इ. स. ६००–
७०० च्याही पूर्वीं वैद्यवाग्भट होऊन गेला असावा असें अनुमान
निघतें.

तिबेट देशांत कांहीं बौद्ध ग्रंथाचीं भाषांतरें झालेलीं आहेत. ‡ तिबेटी
तंजुर नांवाच्या एका मोठ्या भाषांतररूपी संग्रहग्रंथांत, इतर ग्रंथाबरो-

---

* यः सिद्धयोगलिखिताधिक सिद्धयोगान् ।
अत्रैव निक्षिपति केवलयुद्धरेद्वा ॥

‡ वृंदन...संलिख्यते **गदविनिश्चयज**क्रमेण.

बरचे चरक, सुश्रुत व वाग्भट यांच्या ग्रंथांचींहीं भाषांतरें असल्याचें आढळून आलेलें आहे. जॉर्ज हूथ साहेबानें या भाषांतरांचा काळ अगदीं अलीकडचा ह्मणजे इ. स. च्या आठव्या शतकांत येतो असें ठरविलेलें आहे. यावरूनही इ० स० ६००–७०० च्या पूर्वीं बऱ्याच काळापासून वैद्यवाग्भट प्रसिद्ध असावा असें अनुमान निघतें.

चिनी प्रवासी इटासिंग यानें आयुर्वेदाच्या एका **अष्टांगसंग्रहकाराचा** उल्लेख केलेला आहे, व हा संग्रहकार ह्मणजे बहुधा वैद्य वाग्भटच असावा. तो उल्लेख असाः–

"These eight arts formerly existed in eight books, but *LATELY A MAN* epitomised them and made them into one bundle." Itsing *RECORDS OF THE BUDDHIST RELIGION, P. 128.* By Takaktsu.

ईटसिंगचा अष्टांग संग्रहकार बहुधा वैद्य, वाग्भटच असावा, यांत शंका दिसत नाहीं. हा चीनी लेखक इ. स. ६७३ च्या सुमारास हिंदुस्थानांत होता. याच्या पूर्वीं २७०–३०० वर्षें वैद्यवाग्भट प्रसिद्ध असला पाहिजे ह्मणजे वैद्यवाग्भट प्रसिद्ध डॉ. गणेश कृष्ण गर्द्रे, यांनीं ठरविलेलें असल्याप्रमाणें इ. स. च्या ४ थ्या शतकांत होऊन गेला असला पाहिजे. वरील सर्व प्रमाणें डॉ. गर्दे यांच्या सिद्धांतासच पुष्टता आणणारीं आहेत. वैद्यवाग्भट चाणक्या **नंतर** [इ. पू. ३२५] व. इ. स. ६०० च्या **पूर्वीं** २००-३०० वर्षें होऊन गेला असावा हें उघड दिसून येतें.

[२] आतां 'रसवाग्भटा' विषयीं थोडेसें विचार करून पाहूं र. र. स. ग्रंथांत गोविंद भिक्षूच्या रसहृदयांतील उतारे आहेत ह्या रसहृदयाच्या काळासंबंधीं विवेचन मीं, नुकतेंच निघालेल्या **आयुर्वेदीय ग्रंथमाला** मासिक पुस्तकाच्या पहिल्या अंकांत रसहृदयाच्या भूमिकेंत, केलेलें आहे. रसहृदयकार बहुधा शंकराचार्यांचे गुरु व इ. स. च्या आठव्या शतकांतले होते अर्थात् रसवाग्भट आठव्या शतकाहून अर्वाचीन होय हें खास ठरतें.

तसेंच, र. र. स. मध्यें चर्पटिनाथाचा व सिंघणराजाचा उल्लेख आहे. (पृष्ठें ३९।४४ पहा) हे दोघेही तेराव्या शतकाच्या सुमारास होऊन गेले. यांचा रसवाग्भटानें उल्लेख केलेला असल्यामुळें तो इ. स. १३०० च्या सुमाराचा असावा.

तसेंच, नित्यनाथ सिद्धाच्या रसरत्नाकरांतील वादिखंडांतील, 'संसारस्य परं पारं दत्तेऽसौ पारदः स्मृतः ।' ही ओळ सर्वदर्शनसंग्रहांत माधवाचार्यांनीं उतरून घेतलेली आहे. या नित्यनाथानें चर्पटीचाही उल्लेख केलेला आहे. तेव्हां याचा काळ इ. स. १२५० ते १३०० हा असावा. या नित्यनाथाचा उल्लेख र. र. स. ह्यानें [५।५७ मध्यें] व दुसऱ्या एका ठिकाणीं असा केलेला आहे.

सर्वेषां हितकारको निगदितः श्रीनित्यनाथेन वै ।

